अहवाल क्रमांक : १७८

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या जळगांव जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# बत्तीसावा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक १ जुलै, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
**२०१९**

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या जळगांव जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत

# बत्तीसावा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड.राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) ***रिक्त

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) ***रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) * श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) ** श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) ** श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

* श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख :**

(१) *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. अनिल गोटे, वि.स.स.
(३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
(४) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
(५) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(६) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
(७) श्री. समीर कुणावार, वि.स.स.
(८) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
(९) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
(१०) श्री. अनिल बाबर, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
(१४) ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
(१५) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
(१६) श्री. अमित झनक, वि.स.स.
(१७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१८) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(१९) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२०) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२१) श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
(२२) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
(२३) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
(२४) **रिक्त
(२५) **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची " कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा बत्तीसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तींवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-०९ व सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने जळगांव जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने जळगांव जिल्हा परिषदेस दिनांक २५, २६ व २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी भेट देऊन श्री. कौस्तुभ दिवेगावकर, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २८ ऑगस्ट, २०१८, दिनांक ३० जानेवारी, २०१९ व दिनांक ११ जून, २०१९ रोजी जिल्हा परिषद, जळगांव संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. विजय कुमार, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, श्री. अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. आर. व्ही. पानसे, सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग, श्री. खा. म. नानद, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. म. र. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. वि. वि. बेंद्रे, अवर सचिव, जलसंपदा विभाग, श्री. कि. शा. परब, उप सचिव, जलसंपदा विभाग, श्री. विजयकुमार कलवले, सह संचालक, जलसंधारण विभाग, श्रीमती सु. प्र. आहिरराव, सहाय्यक संचालक, सामाजिक न्याय व विशेष

सहाय्य विभाग, श्री. संजीव कुमार, संचालक, महावितरण मंडळ, श्री. एन. व्ही. शिंदे, मुख्य अभियंता व प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे प्रतिनिधी, श्री. सी. आर. गजभिये, मुख्य अभियंता व विकास (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग), श्री. आर. आर. माने, विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, नाशिक तसेच श्री. प्रताप मोहिते व श्री. सुनिल भोसले, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या जळगांव जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २७ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,,
दिनांक २७ जून २०१९.

**सुधीर पारवे,**
समिति प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका



| अनुक्रमांक (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | ग्रामपंचायतीतील अफरातफर प्रकरणांबाबत (सन २०११-१२) | ३. १५/१६ | १ |
| (२) | दोन | मंजूर आकृतीबंधापेक्षा जास्त पदे असल्याबाबत (सन २०११-१२) | ३. ८६ | ९ |
| (३) | तीन | शालेय पोषण आहार धान्यादी पारित देयकाबाबत (सन २०११-१२) | ३. ८७ | १५ |
| (४) | चार | गणवेश अनुदान वाटपाबाबत (सन २०११-१२) | ३. ८९/६ | २४ |
| (५) | पाच | एका कामाचे तुकडे/ भाग केल्याबाबत (सन २०११-१२) | ३. २०७/३ | ३० |
| (६) | सहा | आसराबारी परसाडे रस्ता ग्रा. मा. ३८ कि. मी. १/०० ते २/०० बांधकाम करणे (सन २०११-१२) | ३. २१४/६८ | ३४ |
| (७) | सात | गावतलाव, साठवण तलाव व साठवण बंधारे बांधकामातील अनियमितता (सन २०११-१२) | ३. ३१६/२<br>३.३१८/२७<br>३.३५० ते ३.४८३ | ३७ |
| (८) | आठ | जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीतील पाणीपट्टीच्या थकीत वसुलीबाबत (सन २०११-१२) | ३. ८०९ (१०)/ ७/४. ३९५ | ५४ |
| (९) | नऊ | पंचायत समिती सेस १० टक्के महिला व बालकल्याण योजनेतून मागासवर्गीय/ सर्व साधारण महिलांना शिवण यंत्रे पुरविणेबाबत (सन २०११-१२) | ४. २७८/१ | ६३ |
| (१०) | दहा | उपकर निधीतून समाजकल्याण व महिला व बालकल्याण योजनेवर खर्च न केलेबाबत (सन २०११-१२) | ४. २८०/१ | ६६ |
| (११) | अकरा | अपूर्ण स्थितीतील बांधकामे (सन २०११-१२) | ४. ३९४ | ७१ |
| (१२) | बारा | पंचक वरगव्हाण व बिडगांव मोहरद रस्ता डांबरीकरण व खडीकरण करणेबाबत (सन २००८-२००९) | ३. १८५ | ७८ |
| (१३) | तेरा | पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणास अभिलेख सादर न करणेबाबत | | ८२ |
| (१४) | चौदा | सर्वसाधारण शिफारशी | | ८८ |
| | | **परिशिष्ट (अ) शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके** | | ९१ |
| | | **परिशिष्ट (ब) समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | | १३५ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, जळगांव

## ग्रामपंचायतीतील अफरातफर प्रकरणांबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१५/१६ (सन २०११-१२)**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडील दिनांक ३१ मार्च, २०११ अखेर अफरातफरीची ९०५ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांत रक्कम रुपये ६,९८,९८,५७३ गुंतलेली आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्र.टी.पी.एम./२६८७/३०२०/२१, दिनांक ५ जुलै, १९८९ अन्वये ग्रामपंचायतीतील अपहाराची प्रकरणे हाताळण्यासाठी अवलंब करावयाची कार्यपद्धती दिलेली आहे त्या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.पंरास-२००५/प्र.क्र.२६२/पंरास-३, दिनांक ०३ सप्टेंबर, २००५ अन्वये ग्रामपंचायत आर्थिक व्यवहारात मालमत्ता अथवा निधीचा अपहार करण्यास जबाबदार असणारे सरपंच, उपसरपंच, सदस्य, सचिव, कर्मचारी किंवा हजर संबधित व्यक्ती यांच्यावर कार्यवाही होणे अपेक्षित होते.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.डी.ई.एस.२००६/ प्र.क्र.७७१/आस्था-१२, दिनांक २८ सप्टेंबर, २००६ अन्वये ग्रामपंचायत अपहार प्रकरणी विस्तार अधिकारी, कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, गट विकास अधिकारी यांनाही जबाबदार धरण्यात यावे.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.संक्रीर्ण/१०९६/ प्र.क्र.११५/२१ अ, दिनांक २७ जून, १९९६ अन्वये विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दरमहा पंचायतीचे तपासणी/निरीक्षण करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहारासंदर्भात दिनांक ३१ मार्च, २०११ अखेर ग्रामनिधी/जरोयो/जग्रासयो/संग्रायो चे एकूण ९०५ प्रकरणे प्रलंबित होती.

सदर प्रकरणांत प्रत्यक्षात गुंतलेली रक्कम रुपये ८,८१,२८,२२०.०९ पैसे मात्र गुंतलेली होती. सदर प्रकरणांपैकी आतापर्यंत ५०७ प्रकरणामधील संपूर्ण रक्कम रुपये ३,३६,८२,२१५.७१ मात्र वसूल झालेली आहे. एकूण ९०५ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ४,५०,९३,४४३.७० पैसे मात्र वसूल झालेली आहे व रक्कम रुपये इतकी रक्कम ४,३०,३४,७७६.३९ पैसे मात्र वसूल होणे बाकी आहे.

अपहारीत रक्कम ही न्यायप्रविष्ठ प्रकरणे, काही सरपंच/ग्रा.से. मयत झाल्याने, तसेच स्थावर मालमत्ता नसणे इ.कारणामुळे वसुली प्रलंबित आहे. सदर प्रकरणांतील एकूण २१७३ व्यक्ती दोषी असून त्यातील १५५१ व्यक्तींकडून संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित ६२२ व्यक्ती पैकी १७ व्यक्ती विरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल आहे. ११८ व्यक्तीच्या मालमत्तेवर बोजा बसविण्यात आलेला आहे. ९० ग्रामसेवक सेवा निवृत्त झालेले आहे. २० ग्रामसेवकांच्या मासिक वेतनातून वसूली सुरू आहे. ३५ व्यक्ती विरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात आलेली आहे तसेच इतर कारवाई करण्यात आलेली आहे. ४ व्यक्ती परांगदा आहे. ८९ व्यक्ती मयत झालेले आहे. तसेच २४९ व्यक्तींना नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन निर्णयात नमूद केलेनुसार विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी,उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालील नमूद केलेनुसार ग्रामपंचायतीचे तपासणी /निरीक्षण केलेले आहे :—

| अधिकारी यांचा हुद्दा | उद्दिष्ट | साध्य/भेट |
|---|---|---|
| विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) | ३६०० | १८९९ |
| गट विकास अधिकारी | १८०० | ४२४ |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.वसूल पं.) | ११० | ६७ |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | १० | ५ |

वर नमूद केलेप्रमाणे पंचायतीचे तपासणी/निरीक्षण केलेले आहे. त्याचप्रमाणे अफरातफर प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी जि.प.स्तरावरुन फौजदारी कारवाईच्या नोटीस देणे प्रकरणे समायोजनीत करणे व जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांच्या वेतनातून वसूली करण्यात येत आहे. तसेच सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या उपदानातून रकमा वसूल करण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद, जळगांव मधील अफरातफरीच्या प्रकरणातील किती रक्कम वसूल करून शासन सदरी भरण्यात आलेली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर प्रकरणात प्रत्यक्षात गुंतलेली रक्कम रुपये ८,८१,२८,२२० गुंतलेली होती. सदर प्रकरणांपैकी आतापर्यंत ५०७ प्रकरणांमधील संपूर्ण रक्कम रुपये ३,३६,८२,२१५ वसूल झालेली आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, अफरातफरीच्या प्रकरणांमधील किती रक्कम वसूल करण्यात आली याची माहिती कशाच्या आधारे काढण्यात आली, या प्रकरणाबाबत संपूर्ण व सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी. समितीला अर्धवट माहिती देण्यात येऊ नये. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यासंदर्भातील सविस्तर माहितीचा तक्ता समितीला सादर करण्यात येईल.

त्यानंतर समितीने विचारणा केली की, हा विषय ग्रामपंचायत विभागाशी संबंधित आहे. या प्रकरणासंदर्भात सविस्तर माहिती का सादर करण्यात आलेली नाही. समितीला अर्धवट माहिती सादर करण्याची काय कारणे आहेत. तसेच जळगांव जिल्हा परिषदेने समितीस सादर केलेल्या पुस्तिकेत सविस्तर माहिती पाहिजे होती. कोणत्या प्रकरणात किती रक्कम गुंतली आहे याची सविस्तर माहिती आली पाहिजे होती. ३ कोटी ३१ लाख रुपये वसूल झाले आहेत. अफरातफर झाली म्हणूनच वसुली केली आहे. अफरातफर केलेल्या व्यक्तींकडून वसुली केली आहे. मात्र त्यांच्यावर कोणती कारवाई केली, हेही तुमच्या अहवालात नमूद पाहिजे होते. आपण नमूद केलेल्या माहितीमध्ये यासाठी जबाबदार कोण आहे, ते सांगितलेले नाही. ग्रामपंचायतीची तपासणी वर्षभरात कोणाला करायची आहे, त्यांनी काय अहवाल दिला आहे, लेखापरीक्षकांच्या हे लक्षात आले. मग ग्रामपंचायतीची ज्यांनी तपासणी केली, त्यांच्या लक्षात का आले नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, ९०५ प्रकरणे आहेत. ही प्रकरणे वेगळी करण्याची गरज आहे. परिच्छेद क्रमांक ३.१५ मध्ये सर्व एकूण प्रकरणे आहेत. आपण म्हणता त्याप्रमाणे परिच्छेद क्रमांक ३.१४ मध्ये वेगळी प्रकरणे दिसत आहेत. परिच्छेद क्रमांक ३.१४ मध्ये ग्रामपंचायतींच्या संदर्भातील प्रकरणे आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, परिच्छेद क्रमांक ३.१५ मध्ये ९०५ प्रकरणे प्रलंबित आहेत. परिच्छेद क्रमांक ३.१४ मध्ये परिच्छेदांची संख्या ८३१०९ सांगितली आहे. दोन्ही विषय वेगळे आहेत. परिच्छेद क्रमांक ३.१५ मध्ये ही रक्कम घेतली असेल तर आपण तत्संदर्भात सविस्तर दुभागून दिले पाहिजे होते. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत यांनी सर्व ग्रामपंचायतींचे अनुपालन अहवाल संकलित करताना या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजे होत्या. मात्र याकडे दुर्लक्ष केले आहे. दोन्ही प्रकरणे वेगवेगळी आहेत. अफरातफरीची प्रकरणे वेगळी आहेत. दोन्हींमध्ये किती प्रकरणे आहेत आणि त्यामध्ये किती रक्कम गुंतली आहे या संदर्भात संचालकांनी सांगावे.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांनी असा खुलासा केला की, अधिकारी चुकीची माहिती देत आहेत. लेखा आक्षेपामध्ये काही वसुली असते, ती वसुली करण्याबाबत सांगितले जाते. जिल्हा परिषदेने फक्त ३ कोटी रुपयांची वसुली केली आहे. मागच्या वर्षांत काही टॅक्सेस वसूल करायचे असतात, ती वसुली करून पुढील रक्कम दिली पाहिजे होती. जास्त रक्कम असली पाहिजे होती. वसुलीची रक्कम आणि अफरातफरीची रक्कम यामध्ये फरक आहे. यावर समितीने तीव्र नाराजी व्यक्त करून सांगितले की, अधिकाऱ्यांकडून चुकीची माहिती देण्यात आली आहे, ती रक्कम कितीतरी पटीने जास्त राहू शकते. समितीला चुकीची माहिती देणे योग्य नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात तपासलेले नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी क्षमा मागितली असता समितीने पुढीलप्रमाणे निदेश देऊन विचारणा केली की, हा क्षमा मागण्याचा विषय नाही. समितीने इतके दिवस अगोदर कळविले आहे. सदर परिच्छेदांच्या संदर्भात सविस्तर तपासणी करण्याची जबाबदारी आपली होती. समिती आल्यावर असे म्हणणे हा प्रकार समितीचा अवमान करण्यासारखा आहे. समितीचा यामुळे विशेषाधिकार भंग होत आहे. आपण सदर बाबतीत कोणती कारवाई प्रस्तावित केली आहे, याबाबत आपणाकडून उत्तर अपेक्षित आहे. अधिकारी कारवाईस पात्र आहेत. आपण संबंधितांना या संदर्भात नोटीस दिली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यासंदर्भात माहिती घेण्यात येईल व त्यानुसार खुलासा मागवून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

यानंतर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. अहवाल समितीसमोर सादर करताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाहिले पाहिजे होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची खात्री झाल्याशिवाय अहवाल समितीसमोर येऊ शकत नाही.

खाते प्रमुखांना बैठकीसमोर अहवाल ठेवण्याचा अधिकार नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खात्री करून अहवाल सादर का केला नाही, अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भात खात्री करून घेण्यात येईल असे नमूद केले.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, अफरातफरीच्या प्रकरणामध्ये जिल्हा परिषदेने ३ कोटी रुपये वसूल केले आहेत, किती रकमेपैकी किती वसुली केली आहे आणि किती वर्षांपूर्वीची आहे, वसुली रकमेबाबत २-४ वर्षांपूर्वीच पाहण्याचे काम होते. वसुली त्या काळातील आहे, त्यावेळी वसुली होणे गरजेची होती. यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, ९०५ प्रकरणांमध्ये रु.८,८१,२८,२२० रुपये वसुली होती. परिच्छेद क्रमांक ३.१४ च्या संदर्भातील सविस्तर माहिती नंतर सादर करण्यात येईल. आता सदरची माहिती उपलब्ध नाही.

तद्नंतर समितीने असे निदेश दिले की, अधिकाऱ्यांनी समितीची दिशाभूल केली आहे. २ वर्षे अगोदर माहीत आहे. लेखा अहवाल पूर्ण होऊन ४ वर्षे झाली आहेत. सदर प्रश्नांच्या संदर्भात सविस्तर उत्तर न देऊन समितीची दिशाभूल केली आहे, माहिती सादर केलेली नाही. अधिकारी यासाठी जबाबदार आहेत, आपण चौकशी करून तत्काळ दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि तत्संदर्भातील अहवाल समितीला सादर करावा. सदर विषयांच्या संदर्भातील चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरच झाली पाहिजे. लवकरात लवकर विहित कालमर्यादेत चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि तसा अहवाल तत्काळ समितीला सादर करावा.

तद्नंतर ग्रामपंचायत अफरातफर प्रकरणाबाबत समितीने विचारणा केली की, एकूण ९०५ प्रकरणांमधील वसूल रकमेमध्ये तफावत असण्याचे कारण काय आहे, पोलिसांत गुन्हा दाखल प्रकरणांची सद्यःस्थिती काय आहे, २४९ व्यक्तिंना नोटीसा दिल्या आहेत, तथापि त्या संदर्भात कोणती कार्यवाही केली आहे, शासन परिपत्रक दिनांक २८ सप्टेंबर, २००६ नुसार जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ९०५ प्रकरणांमध्ये रु.८,८१,२८,२२० रुपये गुंतले आहेत. मूळ मुद्यात सर्व प्रकरणे घेतली आहेत. सदर प्रकरणांत किती रक्कम होते, ते सांगितले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, प्रकरणांची संख्या ९०५ आहे. रु.६,९८,९८,५७३ अशी रक्कम दिली आहे. मात्र दुसरीकडे ८ कोटी ८१ लाख अशी आकडेवारी दिली आहे. आकडेवारी बदलली आहे काय, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभाग) यांनी खुलासा केला की, रु.६,९८,९८,५७३ हा लेखापरीक्षण परिच्छेदामधील आकडा आहे. प्रत्यक्ष त्या वर्षाची माहिती घेतली, त्यामधील गुंतलेली रक्कम ८ कोटी ८१ लाख रुपये आहे. रु.३,४०,४६,०८७ वसूल झाले आहेत. सन २०१२-१२ अखेर अफरातफरीची एकूण ९०५ प्रकरणे प्रलंबित होती. या ९०५ प्रकरणांमध्ये रु.८,६७,३१,११३ इतकी रक्कम गुंतलेली होती. यापैकी ५०७ प्रकरणे निकाली निघाली असून, ३९८ प्रकरणे प्रलंबित आहेत. ५०७ प्रकरणांतील रु. ४,५०,९३,४४३ इतकी १०० टक्के वसूल झाली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, लेखा परीक्षणाच्या वेळी अफरातफर तसेच गैरव्यवहारात गुंतलेली रक्कम आणि आता आपण नमूद करीत असलेली रक्कम जुळत नाही. दोन्ही रकमांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. माहिती आपल्या स्वाक्षरीनिशी समितीला प्राप्त झालेली असताना आता वेळेवर आपण वेगळी माहिती कशी देत आहात, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ९०५ प्रकरणांतील सविस्तर आढावा घेत असताना यामध्ये अधिक रक्कम गुंतल्याचे आढळून आले. पूर्वी जी रक्कम निघालेली होती त्यामध्ये अधिकच्या रकमेचा समावेश केल्यामुळे हा आकडा वाढलेला आहे.

तद्नंतर समितीने पुन्हा विचारणा केली की, परंतु या दोन्ही रकमांमध्ये जवळजवळ २ कोटी रुपयांची तफावत आहे. पूर्वीच्या रकमेच्या तुलनेत आता २ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. कदाचित आपण पुन्हा एकदा नव्याने आढावा घेतल्यास या रकमेत अजून वाढ होऊ शकते. तसेच लेखा परीक्षणाच्या वेळी अफरातफरीच्या रकमेबाबत विचारणा केली जाते. त्यावेळी अफरातफरीमध्ये ६ कोटी रुपये गुंतल्याचे सांगण्यात आले होते. परंतु आता मात्र हा आकडा ८ कोटी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पूर्वीच्या आणि आताच्या रकमेत एवढा मोठा फरक यावयास नको होता.

लेखापरीक्षणावेळी आक्षेप आल्यानंतरच ही बाब जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आली की त्यापूर्वीच लक्षात आली होती, अशा प्रकारचा गैरव्यवहार झाल्याची बाब गट विकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) किंवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तपासली नाही काय, मुळात उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी १५ दिवसांची नोटीस काढून ग्रामपंचायतींची तपासणी करावयास पाहिजे होती.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, लेखापरीक्षणामध्ये विशिष्ट अफरातफरीसंदर्भातील अहवाल जिल्हा परिषदेला निर्गमित केला जातो. ती रक्कम ६ कोटी ९८ लाख रुपये आली होती. परंतु ज्यावेळी ग्रामपंचायतीचा प्रकरणनिहाय आढावा घेतला त्यावेळी अफरातफर व गैरव्यवहारात अधिकची रक्कम गुंतलेली असल्याचे निदर्शनास आले. ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण विभागाकडून होते. त्यांना जी प्रकरणे निदर्शनास येतात त्याचा अहवाल जिल्हा परिषदेला प्राप्त होतो. जिल्हा परिषदेला लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या मुद्यांची विशिष्ट अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली जाते. त्यांच्याकडून ग्रामपंचायतीचे अभिलेखे तपासले जातात आणि त्यावेळी अफरातफर व गैरव्यवहाराच्या रकमेची खात्री केली जाते.

तद्नंतर तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायत तपासणीच्या वेळी कामकाजात अनियमितता वा अफरातफर आढळून आल्यास तत्काळ ग्रामसेवक किंवा सरपंच यांच्यावर कारवाई प्रस्तावित करण्यात येते. विभाग प्रमुखांना ग्रामपंचायतींची तपासणी करण्याचे अधिकार आहेत, परंतु हे खरे आहे की, १०० टक्के तपासणी होऊ शकत नाही. यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, लेखा परीक्षण होण्यापूर्वी ९०५ प्रकरणांपैकी किती प्रकरणात अफरातफर झाल्याचे आपल्या निदर्शनास आले होते, मुळात प्रशासनामध्ये बेकायदेशीर कामे होऊ नयेत म्हणून तपासणीपूर्वी अद्ययावत अभिलेखे उपलब्ध करून ठेवण्याबाबतच्या सूचना दिल्यानंतर संबंधित कार्यालयांची तपासणी केली जाते. मी पुन्हा विचारू इच्छितो की, लेखा परीक्षणापूर्वी आपणास किती ग्रामपंचायतींमध्ये अफरातफर वा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले होते, या जिल्ह्यातील तब्बल ९०५ ग्रामपंचायतींमध्ये अफरातफर व गैरव्यवहार झालेला असताना आपल्याकडे ग्रामपंचायतनिहाय संपूर्ण रेकॉर्ड उपलब्ध असावयास हवे होते. जिल्हा परिषदेकडे एवढ्या मोठ्या प्रमाणावर यंत्रणा असताना जर दोषींवर कारवाई होत नसेल तर त्यास कोण जबाबदार आहे.

याप्रकरणी समितीच्या असे निदर्शनास आले की, लेखा परीक्षणात अशा प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आल्यानंतर जिल्हा परिषद स्तरावरुन तत्काळ कारवाई होणे आवश्यक होते. परंतु तशा प्रकारची कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.

ग्रामपंचायतीतील अफरातफर आणि गैरव्यवहारामध्ये २१७३ व्यक्ती दोषी असल्याचे नमूद केले आहे. या २१७३ मध्ये विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), गट विकास अधिकारी किंवा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे दोषी आढळून आलेले आहेत काय, २१७३ दोषी व्यक्तींपैकी १५५१ व्यक्तींकडून संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली आहे. ज्यांनी अफरातफर केली त्यांच्याकडून केवळ अपहारीत रक्कम वसूल करून त्यांना कारवाईविना सोडून दिले असावे.

अफरातफर म्हणजे एफआयआर दाखल करणे आवश्यक आहे. ही प्रकरणे पूर्णपणे अफरातफरीची आहेत. शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे ताबडतोब कार्यवाही केली पाहिजे. यामध्ये २१७३ व्यक्तींना दोषी ठरविले आहे. फक्त १७ जणांविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे. उर्वरित सर्व व्यक्ती निर्दोष आहेत काय, यावर समितीने अशी विचारणा केली की, दोन वर्षांचा कालखंड उलटून गेला आहे. ऑडिट होऊन चार वर्षे झाली आहेत. अफरातफर झाली असल्याचे नमूद केले आहे. दोन कोटी रुपयांचा फरक दिसून येतो. संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी माहिती दिली आहे. ग्रामसेवक, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, खाते प्रमुख यामध्ये सामील असताना जिल्हा परिषदेचे प्रमुख म्हणून सुद्धा मोठया प्रमाणात जबाबदारी आहे. याप्रकरणी तपासणी केली पाहिजे होती. तात्काळ कारवाई करण्याचे अधिकार आपल्याला असताना आपण दिरंगाई केल्याचे सकृत दर्शनी दिसून येते २४९ व्यक्तींना नोटीस दिली आहे, कारवाई करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम ठरलेले आहेत. ग्रामपंचायत अधिनियमामध्ये तरतूद आहे, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस देऊन थांबण्याची गरज नव्हती. तात्काळ कारवाई करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पार पाडली नाही असे समितीचे मत आहे. या प्रकरणात विभागीय सचिवांसमक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात येईल. महाराष्ट्र नागरी सेवा नियमांच्या अंतर्गत जे जे दोषी असतील त्यांच्याविरुद्ध तातडीने माहिती घेऊन कारवाईचा प्रस्ताव समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) अफरातफरीच्या ९०५ प्रकरणांमध्ये रुपये ८,८१,२८,२२० रकमेत किती अधिकारी/ कर्मचारी गुंतलेले आहेत, याची सविस्तर माहिती यादीसह सादर करण्यांत यावी ?

(२) लेखा परीक्षणाच्या वेळी जी आकडेवारी दिली जाते तीच आकडेवारी ग्राह्य धरण्यात येते, परंतु या प्रकरणांत चुकीची रक्कम नमूद केल्याने कोणकोणत्या जबाबदार अधिकारी/ कर्मचारी यांच्या विरुद्ध महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कारवाई करण्यात आली आहे व त्यांच्याकडून किती रक्कम वसूल करण्यात आली आहे ?

(३) ग्रामपंचायत अधिनिमयातील तरतुदीनुसार ११५१ जणांकडून थकीत वसुली रकमेबाबत फौजदारी गुन्हे दाखल न करण्याची कारणे काय आहेत. ?

(४) सदरहू प्रकरणांत २१७३ व्यक्तींना, दोषींना दोषी ठरविले असून त्यात फक्त १७ जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आली असून उर्वरित दोषींविरुद्ध गुन्हे दाखल न करण्याची कारणे काय आहे ?

(५) रुपये ४ कोटी थकीत रक्कम वसूल न झाल्या प्रकरणी त्यास जबाबदार असणाऱ्या संबधितांविरुद्ध कोणती शास्ती करण्यात आली आहे ?

(६) ग्रामपंचायतीमध्ये गैरकारभार झाल्याचे तपासणीमध्ये आढळून देखील ग्रामपंचायतीला समाधानकारक असा शेरा देणाऱ्या संबधीत अधिकाऱ्यांची चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधीतांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

(७) लेखा परीक्षण होऊन चार वर्षांचा कालावधी होऊनही तात्काळ कारवाई करण्याचे अधिकार असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असताना २४९ जणांना नोटीस देण्यास विलंब करणाऱ्या संबधिताविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) लेखा परीक्षण वेळी मूळ परिच्छेद क्र.१६ मध्ये एकूण ९०५ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ८,६७,३१,११३.९२ मात्र थकीत दाखविलेली होती. त्यापैकी रक्कम रुपये १,६८,३२,५४०.८८ मात्र वसूल झालेली होती. त्यामुळे रक्कम रुपये ६,९८,९८,५७३.०४ मात्र गुंतलेली होती.

या ९०५ प्रकरणांमध्ये एकूण २१७३ व्यक्ती गुंतलेले असून त्यांत ग्रामसेवक-१७०४, सरपंच-३९५ तसेच इतर ७४ व्यक्ती गुंतलेले आहेत. त्यापैकी १५८९ व्यक्तींकडील वसुली झालेली आहे. सध्या ५८४ व्यक्तीकडील वसुली बाकी आहे. यासंबधितांचे सविस्तर तपशील स्वतंत्र्यरित्या पुस्तिकेच्या स्वरूपात सोबत सादर करण्यात येत आहे.

(२) लेखा परीक्षणासाठी दप्तर उपलब्ध झालेले नाही असा लेखा आक्षेप नसल्याने लेखा परीक्षण अधिनियम, १९३० मधील कलम ७ नुसार तरतूद नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही. या अफरातफर प्रकरणांत जबाबदार व्यक्तींकडून आज अखेर रक्कम रुपये ४,६०,८७,१५०.१० मात्र वसूल करण्यात आलेली आहे.

(३) व (४) अद्यापि रु.४,१२,७३,५९९.८२ इतकी रक्कम वसूल होणे बाकी असून वसुलीसाठी प्रयत्न करण्यात येत आहे. वसुलीसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

१. कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याच्या वेतनातून समान हप्त्याने तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनातून समान हप्त्याने वसुली करण्यात येत आहे.

२. पंचायत समितीस्तरावर विशेष शिबीराचे आयोजन करून वसुली बाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

३. १०५ सरपंचांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्यात आला आहे. त्यांचेकडून जमीन महसुलाची थकबाकी (RRC) करण्याची कार्यवाही प्रस्तावात आहे.

**परिच्छेदामध्ये सादर केलेल्या अनुपालनाची स्थिती**

| अ.क्र. | तपशील | सद्य:स्थिती |
|---|---|---|
| १ | एकूण प्रकरणे | ९०५ |
| २ | गुंतलेली रक्कम | ८६,७३,११,१३.९२ |
| ३ | वसुल झालेली रक्कम | ८,६०,८७,१५०.१० |
| ४ | शिल्लक राहिलेली रक्कम | ४०,६४,३९,६३.८२ |
| ५ | प्रकरणामध्ये एकूण दोषी व्यक्ती | २,१७३ |
| ६ | संपूर्ण वसुल झालेली व्यक्ती | १,५८९ |
| ७ | पोलिसांत गुन्हा दाखल | १७ |
| ८ | मालमत्तेवर बोझा बसविला | १०५ |
| ९ | सेवानिवृत्त ग्रामसेवक | १२३ |
| १० | वेतनातून वसुली चालू | ३१ |
| ११ | शिस्तभंगविषयक कारवाई केलेले | ३५ |
| १२ | शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित केलेले | ११५ |
| १३ | मयत ग्रामसेवक | ९५ |
| १४ | परांगदा | ४ |
| १५ | वारस व पत्ते इ. कारणास्तव कार्यवाही न केलेले व्यक्ती | ५९ |

वरील तक्त्यानुसार वसुलीची रक्कम विचारात घेऊन १७ व्यक्तीविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल केलेले आहे. वसुलीची रक्कम व फौजदारी गुन्हे दाखल करण्यामुळे सुरू होणाऱ्या न्यायालयीन प्रक्रियेचा खर्च, वकील फी इत्यादी बाबी विचारात घेवून गुन्हे दाखल करण्यात येतात.

न्यायालयीन प्रक्रियेचा खर्च, वकील फी इत्यादी बाबींचा खर्च वसुलीच्या रकमेपेक्षा जास्त होत असेल तर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करणे उचित ठरत नाही.

(५) प्रश्न भाग ३ व ४ ला प्रस्तावित केलेल्या उत्तराप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावरून कार्यवाही करण्यात येत असल्याने वसुलीसाठी कोणत्याही एका व्यक्तीला जबाबदार धरणे योग्य नाही. वसुली संदर्भात इतक्या व्यक्ती विरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे.

(६) या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून ग्रामपंचायतीमध्ये गैरकारभार झाल्याचे तपासणीमध्ये आढळून आलेल्या ग्रामपंचायतीस समाधानकारक असा शेरा कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यानी दिला नसल्याचे आढळून आले आहे.

(७) लेखा परीक्षण वर्षात वसुल झालेली रक्कम रुपये १,६८,३२,५४०.८८ मात्र होती. याबाबत गेल्या चार वर्षात विशेष मोहिम राबवून वसुलीची रक्कम २,९२,५४,७०९.२२ मात्र वसूल करण्यात आलेली असून एकूण रुपये ४,६०,८७,२५०.१० मात्र वसूल केलेली आहे. उर्वरित रक्कम वसुलीसाठी प्रयत्न सुरू आहे. नोटिसा देण्यात आलेल्या २४९ पैकी ३८ व्यक्तींकडून नंतर वसुली करण्यात आलेली आहे. ११५ ग्रामसेवक यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे. ४ व्यक्ती परागंदा आहे. ३३ मयत, ५९ व्यक्ती यांचे पत्ते, स्थावर मालमत्ता नसणे, वारस नसणे इ. कारणांमुळे विलंब झालेला आहे. सदर कार्यवाहीस प्रशासकीय कारणांमुळे विलंब झालेला असल्याने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात आलेली नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—**जिल्हा परिषद, जळगाव यांनी केलेल्या कार्यवाहीस सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगाव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायतीतील अफरातफरीच्या प्रकरणाबाबत सध्या वसुलीची वस्तुस्थिती काय आहे, शिक्षणाधिकारी पंचायत आणि खंड विकास अधिकारी यांना वर्षभरात तपासण्या ठरवून दिल्या आहेत. त्यांच्या तपासणीमध्ये जर गैरप्रकार निदर्शनास येत नाही आणि लेखा आक्षेप घेताना ऑडिटर आक्षेप घेतो. ग्रामपंचायतचे काम समाधानकारक आहे असे तो दाखवत असेल आणि त्याच कालावधीमध्ये हा भ्रष्टाचार घडून येत असेल तर मला वाटते की, त्या पंचायत विस्तार अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. कारण पूर्ण ग्रामपंचायतीचे कागदपत्रे व अभिलेखे तपासण्याची जबाबदारी त्याची सुद्धा आहे. कारण सरकारची व्यवस्था ही गटविकास अधिकारी व जिल्हा परिषद खातेप्रमुख म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, शिक्षक हे जिल्हा परिषदेची आस्थापना आहे.

यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, एखादी बाब दिसून आल्यास संबंधितांविरुद्ध कारवाई करणे क्रमप्राप्त राहील हे मान्य आहे. तद्नंतर समितीने पुढे अशी विचारणा केली की, चौकशीदरम्यान जर गैरप्रकार झाला असेल तर त्या ग्रामसेवकासोबत पंचायत विस्तार अधिकारी किंवा गटविकास अधिकारी यांनी तपासणी केली असेल तर दोघांवरही जबाबदारी निश्चित करावी. गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी पंचायतीला सर्वच बाबी तपासायच्या आहेत. अशा ग्रामपंचायतीवर कारवाई करताना ते गटविकास अधिकारी यांच्या का लक्षात आले नाही मग ते फक्त लेखापरिक्षकांनीच का लक्षात घ्यायला पाहिजे.

यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, एखादा भाग समजा उघड असेल आणि तो त्यांना समजला नसेल तर ते मान्य आहे. पण त्यांनी तो भाग समोर आणला नाहीतर त्यांचा उद्देश असेल असे म्हणू शकतो. तद्नंतर समितीने विचारणा केली की, किती कर्मचाऱ्यांवर कारवाई केलेली आहे याची माहिती पृष्ठ क्र. ६ व ७ वर दिलेली आहे. प्रकरणात दोषी व्यक्ती, वसुली झालेल्या व्यक्ती, पोलिसात गुन्हा दाखल झालेल्या व्यक्ती, मालमत्तेवर बोजा चढवला, वेतनातून वसुली तसेच शिस्तभंग व्यक्तीवर कारवाई पण सुरू आहे. हे सर्व गुन्हे ग्रामसेवक आणि सरपंचावर आहेत. मग ज्या बाबी ऑडिटरच्या लक्षात आल्या त्याच बाबी तपास अधिकाऱ्याच्या लक्षात का आल्या नाहीत. ऑडिटरने काही काम तपासले नाही तर रेकॉर्ड तपासले आहे. मग पंचायत अधिकारी व गटविकास अधिकारी यांना पण अभिलेख तपासायचा आहे. या गैरप्रकारामध्ये संगनमताने गटविकास अधिकारी, पंचायत अधिकारी आहेत.

यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, त्याला संगनमत म्हणून आपल्याला काही निष्कर्ष काढता येत नाही. कारण मग त्यांच्या येण्याची काही गरजच भासणार नाही. तद्नंतर समितीने विचारणा केली की, या प्रकरणामध्ये माहे एप्रिल, २०११ ते दिनांक ३१ मार्च, २०१८ या कालावधीत किती अफरातफरीची प्रकरणे उद्भवली आहेत आणि त्यामध्ये किती रक्कम गुंतलेली आहे, कारण साक्षीच्यावेळी ती वेगळी रक्कम सांगितली आहे आणि आता त्यामध्ये तफावत आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ९०५ प्रकरणामध्ये ८ कोटी ६७ लक्ष ३१ हजार ११३ रुपये एवढी रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी ज्यावेळेस लेखापरीक्षण झाले त्यावेळेस १ कोटी ६८ लाख ३२ हजार ५४० एवढी रक्कम वसुल झालेली होती. परंतु लेखापरीक्षण झाल्यानंतर पंचायती राज समिती आली त्यादरम्यान २ कोटी ९२ लक्ष ५४ हजार ६०९ रुपये वसुल झालेले होते. एकूण ४,६०,८७,७१५ रुपये वसूल झाले होते. पंचायती राज समितीचा दौरा केल्यानंतर ६,२९,७३६ रुपयांची वसुली झालेली आहे. अशाप्रकारे एकूण ४ कोटी ६७ लाख रुपये वसूल झालेले आहेत, अद्याप वसुलीची प्रक्रिया सुरुच आहे.

या उत्तरानंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी निदर्शनास आणून दिले की, ज्यावेळी समितीने साक्ष घेतली त्यावेळी आपण दिलेली आकडेवारी बरोबर नव्हती. समितीने निश्चित आकडेवारी किती आहे ते सांगावे अशी विचारणा केली होती. त्यावेळी ८ कोटी ८१ लाख रुपये सांगितले होते. आता ती आकडेवारी ८ कोटी ६७ लाख रुपयांवर आली आहे. जिल्हापरिषदेकडे अफरातफरीच्या प्रकरणांची माहितीच उपलब्ध नाही. त्यामुळे आकडेवारीमध्ये बदल होत आहे. प्रथम ती माहिती तयार करावी लागेल.

समितीने पुढे असे निदेश दिले की, जे जबाबदार अधिकारी आहेत ते वारंवार अशा चुका करतील आणि एखाद्या कनिष्ठ अधिकाऱ्याला जबाबदार धरतील, त्यामुळे इतर अधिकारी त्यातून सुटतील. मग त्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांना का जबाबदार धरले जात नाही, या संदर्भात सविस्तर चौकशी करून जे दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. संपूर्ण राज्यात अशी प्रकरणे आहेत. ग्रामसेवकाला जबाबदार धरले जाते आणि वरिष्ठ अधिकारी जबाबदार असताना त्यांना मात्र सोडून दिले जाते. कनिष्ठ स्तरावरील एखाद्या अधिकाऱ्यावर कारवाई केली जाते ही बाब बरोबर नाही. विभागातील अधिकाऱ्यांच्या माध्यमातून या संदर्भात सखोल चौकशी करावी आणि जे दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, जळगाव यांचे कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतीमध्ये दिनांक ३१ मार्च, २०११ अखेर अफरातफरीची एकूण ९०५ प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये रुपये ८,८१,२८,२२०.०९ एवढी रक्कम गुंतलेली आहे. सदर प्रकरणांपैकी ५०७ प्रकरणांमधील संपूर्ण रक्कम रुपये ३,३६,८२,२१५.७१ एवढी रक्कम वसूल झालेली आहे. तसेच एकूण ९०५ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ४,५०,९३,४४३.७० एवढी रक्कम वसुल झाली असून रुपये ४,३०,३४,७७६.३९ एवढी रक्कम वसूल होणे बाकी आहे. याबाबत खालीलप्रमाणे लेखा आक्षेप घेण्यात आले आहेत :—

ग्रामविकास विभागाच्या दिनांक ५ जुलै, १९८९ रोजीच्या परिपत्रकान्वये ग्रामपंचायतीतील अपहाराची प्रकरणे हाताळण्यासाठी अवलंब करावयाची कार्यपद्धती दिलेली आहे, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. दिनांक ३ सप्टेंबर, २००५ रोजीच्या परिपत्रकान्वये ग्रामपंचायत आर्थिक व्यवहारात मालमत्ता अथवा निधीचा अपहार करण्यास जबाबदार असणारे सरपंच, उपसरपंच, सदस्य, सचिव, कर्मचारी किंवा संबंधित व्यक्तींवर अपेक्षित कार्यवाही केली नाही. दिनांक २८ सप्टेंबर, २००६ अन्वये ग्रामपंचायत अपहार प्रकरणी विस्तार अधिकारी, कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, गट विकास अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. दिनांक २७ जून, १९९६ परिपत्रकान्वये विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दरमहा पंचायतीचे तपासणी/निरीक्षण करणे आवश्यक आहे. सदरहू लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने पाठविलेल्या लेखी माहितीद्वारे असे कळविण्यात आले आहे की, अपहारीत रक्कमेची प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे तसेच काही सरपंच, ग्रामसेवक मयत झाल्याने तसेच स्थावर मालमत्ता नसल्यामुळे अद्याप वसुली प्रलंबित आहे.

सदर प्रकरणातील एकूण २१७३ व्यक्ती दोषी असून त्यातील १५५१ व्यक्तींकडून संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित ६२२ व्यक्तींपैकी १७ व्यक्तींविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल असून ११८ व्यक्तींच्या मालमत्तेवर बोजा बसविण्यात आलेला आहे. ९० ग्रामसेवक सेवानिवृत्त झालेले आहेत. २० ग्रामसेवकांच्या मासिक वेतनातून वसुली सुरू आहे. ३५ व्यक्तींविरुद्ध शिस्तभंगविषक कारवाई करण्यात आलेली आहे. ४ व्यक्ती परागंदा आहेत. ७९ व्यक्ती मयत झालेल्या आहेत. २४९ व्यक्तींना नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावरून फौजदारी कारवाईच्या नोटीस देणे, प्रकरणे समायोजित करणे व जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांच्या वेतनातून तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या उपदानातून रकमा वसूल करण्यात येत आहेत. सदरहू लेखी माहितीच्या आधारे समितीने दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी घेतलेल्या साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, अफरातफरी प्रकरणांमधील किती रक्कम वसूल करण्यात आली याची माहिती कशाच्या आधारे काढण्यात आली, याबाबतची सविस्तर माहिती समितीला न देता अपूर्ण माहिती देण्यात आल्यामुळे समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

अफरातफर झालेल्या ९०५ प्रकरणांपैकी ५०७ प्रकरणांमधील संपूर्ण रक्कम रुपये ३ कोटी ३६ लाख ८२ हजार २१५ एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. सदर रक्कम अफरातफर झालेल्या व्यक्तींकडून वसूल केलेली आहे. मात्र संबंधित व्यक्तींविरुद्ध कोणती कारवाई केली

आहे याबाबतची माहिती अहवालात नमूद केली नाही. जिल्हा परिषदेचे अधिकाऱ्यांनी समितीची दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे सकृतदर्शनी असे दिसून येते की, लेखा आक्षेपामध्ये जेवढी वसुली असते ती वसुली करण्याबाबत सांगितले जाते. जिल्हा परिषदेने फक्त ३ कोटी रुपयांची वसुली केली आहे. जिल्हा परिषदेने मागील वर्षामध्ये काही कर रुपाने वसुली करावयाची होती त्या रकमेची वसुली करून पुढील रक्कम द्यावयास पाहिजे होती. त्यामुळे जास्त रक्कम प्राप्त होणे आवश्यक होते. त्यामुळे वसुलीची रक्कम आणि अफरातफरीची रक्कम यामध्ये तफावत आहे.

ग्रामपंचायतीतील अफरातफर प्रकरणी सर्व गुन्हे ग्रामसेवक आणि सरपंचांविरुद्ध आहेत ज्या बाबी लेखापरीक्षकांच्या निदर्शनास आल्या त्याच बाबी तपास अधिकाऱ्यांच्या लक्षात आल्या नाहीत. लेखापरीक्षकांनी अभिलेखे तपासलेले असून प्रत्यक्ष काम तपासलेले नाही. पंचायत समितीचे अधिकारी व गटविकास अधिकारी यांनी देखील अभिलेखे तपासणे आवश्यक होते. त्यामुळे या गैरप्रकारांमध्ये जळगांव जिल्ह्यात ५८४ ग्रामपंचायती कारवाईस पात्र आहेत. गटविकास अधिकारी, पंचायत विस्तार अधिकारी, खाते प्रमुख यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याप्रकरणी अधिकाऱ्यांकडून अक्षम्य चूक झालेली आहे. या सर्व बाबींवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रण आवश्यक असून त्यांनी यासंदर्भात तपासणी केल्याचे दिसून येत नाही. समितीने पाहणी केल्यावर हा प्रकार आढळून येणे ही घटना अवमानजनकआहे.

**ज्यावेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली होती त्यावेळी रुपये ८ कोटी ८१ लाख एवढी रक्कम ९०५ अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये गुंतलेली असल्याचे त्यांनी नमूद केले होते. मात्र विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी हीच रक्कम ८ कोटी ६७ लाख रुपये एवढी रक्कम गुंतलेली असल्याचे सांगण्यात आले. यावरुन जिल्हा परिषदेकडे अफरातफरीच्या प्रकरणाची निश्चित माहितीच उपलब्ध नाही, असे समजण्यास समितीस प्रत्यवाय नाही. जिल्हा परिषदेच्या अक्षम्य ढिसाळ कारभारामुळे संबंधित अधिकारी कारवाईस पात्र असून देखील त्यांना नोटीसेस देण्यात आल्या नाहीत. याप्रकरणी संबंधातील अहवाल समितीसमोर सादर करताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रथम त्यांची खात्री करणे आवश्यक होते. मात्र त्यांनी तसे केले नसल्यामुळे व याठिकाणी समन्वयाचा अभाव असल्यामुळे समिती अत्यंत खेद व्यक्त करून तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सबब, ग्रामपंचायतीतील अफरातफरीच्या प्रकरणांबाबत सखोल चौकशी करून संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, जळगांव

## मंजूर आकृतीबंधापेक्षा जास्त पदे असल्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८६ (सन २०११-१२)**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एपीटी-१००१/प्र.क्र. ९६०/आस्था-८ दिनांक २७ जून, २००३ अन्वये शिक्षण विभागात मंजूर पदापेक्षा मुळ अहवालात नमूद केले प्रमाणे विविध संवर्गातील एकूण १०१ पदे जादा भरण्यात आलेली आहे.

शिक्षण विभाग, जिल्हा स्तरावर एकूण १३३ कर्मचारी कार्यरत आहेत. उपरोक्त शासन निर्णयानुसार आकृतीबंध मंजुर केलेला नाही. सुधारीत आकृतीबंधानुसार एकूण ३३ पदे मंजूर केलेली आहे, मंजुर पदाव्यतिरिक्त एकूण १०१ पदे संवर्गनिहास अतिरिक्त पदे शासनाच्या कोणत्या योजनेखाली व कोणत्या शासन निर्णयानुसार मंजूर केलेली आहेत. याबाबत शिक्षण विभागात अद्यावत माहिती उपलब्ध नसल्याने कर्मचारी आकृती बंधाबाबत अचुकता प्रमाणित करता येत नाही. अतिरिक्त पदे कार्यरत ठेवल्यास वेतन व भत्यावर अनावश्यक खर्च होऊन शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-२०१२ मध्ये शिक्षण विभागाकडे एकूण १३३ पदे भरलेली होती. त्यापैकी ३३ पदांना ग्रामविकास विभागाने मान्यता दिलेली होती. उर्वरित १०० पदे ही शिक्षण संचालनालयाने वेळोवेळी मंजूर केलेली होती. व त्यासाठी प्रत्येक आर्थिक वर्षात वेतन अनुदानही संचालकाकडून प्राप्त होत. त्यानंतर विविध संवर्गातील सन २०१२-२०१३ मधील २३ पदे व सन २०१३-२०१४ मधील १७ पदे अश्या एकूण ४० पदांचे समायोजन करण्यात आले आहे. उर्वरित ३३ व ६१ अशी एकूण ९४ पदे शिक्षण विभागात कार्यरत असून त्यांचे वेतन व भत्यांचे अनुदान ग्रामविकास विभाग व संचालनालयाकडून प्राप्त होत असल्याने ती पदे अतिरिक्त ठरत नाही.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, संचालनालयाकडील मंजूर १०० पदांचे आदेश उपलब्ध आहेत काय, संचालनालयाकडून पदे मंजूर असतील तर ४० पदांचे समायोजन करण्याचे प्रयोजन काय आहे? पदे समायोजित करण्यात आली म्हणजे पदे मंजूर नसताना शिक्षण विभागाने जादा वेतन अदा केले नाही काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी असा खुलासा केला की, शिक्षण विभागाची १०१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ऑडिट झाले त्यावेळी ६१ पदे मंजूर होती. परंतु प्रत्यक्षात १०१ पदे कार्यरत होती. त्यामुळे ४० लोकांचे जिल्हा परिषदेमध्ये समायोजन केले आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, कार्योत्तर मंजुरी घेतली होती का, कशामुळे पदे भरली, आकृतीबंधापेक्षा जास्त पदे कशी भरली, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी असा खुलासा केला की, ४० पदे अधिक होती. काही पदे जिल्हा परिषद अंतर्गत असतात. या उत्तरावर समितीने अशी विचारणा केली की, सक्षम प्राधिकारी कोण होते, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी असा खुलासा केला की, मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम प्राधिकारी होते.

यावर समितीने अशी विचारणा केली की, खाते प्रमुख म्हणून तुम्ही जी माहिती देत आहात त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यवाही करीत असतात. नस्ती तुमच्याकडून त्यांच्याकडे जात असते. पदे मंजूर नसताना ती भरण्याबाबतची माहिती शिक्षणाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, लेखी स्वरुपात ३३ पदे मंजूर आहेत. ग्रामविकास विभागाची त्या पदांना मंजुरी आहे. उर्वरित १०१ पदांना शिक्षण संचालनालयाच्या वेगवेगळया आदेशान्वये मंजुरी दिलेली आहे.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, आकृतीबंधापेक्षा अधिक पदे कशी भरली, शासनाला चुकीची माहिती दिली का, या पदांना मंजुरी देण्याचे अधिकार ग्रामविकास विभागाला आहेत. शिक्षण विभागाने वेळोवेळी मंजुरी दिली असे नमूद केले आहे. शिक्षण विभाग कशी मंजुरी देऊ शकतो, आकृतीबंधापेक्षा जास्त शिक्षक अगोदर भरले गेले, नंतर शासनाची परवानगी मिळविण्यात आली. जादा पदे कशी भरली गेली,

यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी असा खुलासा केला की, ग्रामविकास विभागाची ३३ पदे मंजूर होती. शिक्षण संचालनालयाची ६१ पदे मंजूर होती. प्रत्यक्ष ९४ पदे कार्यरत असावयास पाहिजे होती. परंतु प्रत्यक्षात १३३ पदे कार्यरत होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, ३९ पदे जादा कशी झाली, या पदांना शिक्षण संचालनालय किंवा ग्रामविकास विभागाची मंजुरी होती का, ९४ शिक्षकांचा विषय वेगळा आहे. १३३ शिक्षक कार्यरत होते. ३९ पदे अतिरिक्त कशी झाली याची माहिती आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, नाही. परंतु समायोजन पूर्ण झालेले आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी आपण जबाबदार अधिकारी आहात. यासंदर्भात शिक्षण अधिकारी यांनी आपल्याला ब्रिफिंग केले नाही काय, आपण शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून सविस्तर माहिती घेणे आवश्यक होते. याबाबत परिपत्रक आहे, मान्यता आहे, असे जे यामध्ये दिलेले आहे, तो भाग वेगळा आहे. परंतु अतिरिक्त ३९ शिक्षकांना कोणत्या नियमाप्रमाणे मान्यता देण्यात आली, हे तपासण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने आपली जबाबदारी होती. परंतु अतिरिक्त ३९ शिक्षकांना कोणत्या नियमाप्रमाणे मान्यता देण्यात आली, याची चौकशी किंवा तपासणी न करता त्यास मान्यता दिली व आपल्यासारख्या जबाबदार अधिकाऱ्याकडून असे होणे अपेक्षित नाही. तसेच आताही आपल्याकडून समितीला मोघम उत्तर अपेक्षित नाही. हे गंभीर प्रकरण आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे. या प्रकरणामध्ये कोण अधिकारी दोषी आहे, याबाबतची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. ३९ शिक्षकांच्या समायोजनाच्या कार्यवाहीसंदर्भात कोणत्या नियमाचा वापर करण्यात आला, यासंदर्भात कोणता नियम आहे, नियम नसताना संबंधित अधिकाऱ्यांनी असे केल्याचे दिसून येत आहे. असे असताना अशा अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसत नाही. या बुकलेटमधील " जिल्हा परिषदेने केलेले अनुपालन " या कॉलममध्ये शेवटी असे लिहिलेले आहे की, ही पदे अतिरिक्त ठरत नाही. ही बाब तर त्याहीपेक्षा गंभीर आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, विविध संवर्गातील सन २०१२-२०१३ मधील २३ पदे व सन २०१३-२०१४ मधील १७ पदे अशा एकूण ३९ पदांचे समायोजन करण्यात आलेले आहे. सदरची पदे कोणत्या कारणामुळे समायोजित करावी लागली यासंदर्भातील माहिती समितीला सादर करण्यात येईल.

यावर समितीने मत व्यक्त केले की, समितीला आश्चर्य वाटत आहे की, आपण अतिरिक्त ३९ पदांबाबत अजूनही माहिती घेतलेली नाही. आपण समिती येण्याची वाट पाहात होता काय, ही सन २०१२-२०१३ मधील २३ पदे आणि सन २०१३-२०१४ मधील १७ पदे असून आपण समिती आल्यावर सांगत आहात की, याबाबत माहिती घेऊन सादर करतो. समितीला असे उत्तर अपेक्षित नाही. समिती येण्यापूर्वी यासंदर्भातील माहिती का घेतली नाही, शिक्षणाधिकारी यांनी आपल्याला चुकीची माहिती दिली आणि आपण ती माहिती न तपासता जशीच्या तशी बुकलेटमध्ये छापण्याच्या सूचना दिल्या. यामध्ये मोघम उत्तर देण्यात आलेले आहे, आपल्याला चुकीची माहिती देण्यात आलेली आहे व आपण समितीला मोघम उत्तर दिलेले आहे, याला कोण दोषी आहे, यासंदर्भात अनियमीतता होत असेल तर ही बाब योग्य नाही. त्यावेळी असेलेले तत्कालिन अधिकारी उपस्थित असतील तर त्यांनी यासंदर्भात माहिती द्यावी. यावर तत्कालिन शिक्षणाधिकारी यांनी असा खुलासा केला की, माझ्याकडे जादा कार्यभार होता. माझे मूळ पद शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) यांनी त्यांना या विषयासंदर्भात सविस्तर माहिती नसल्याबाबत सांगितले. यावर समितीने अशी विचारणा केली की, शिक्षणाधिकारी यांनी तत्कालिन शिक्षणाधिकारी यांना या प्रश्नाबाबत समिती येण्यापूर्वी माहिती द्यायला पाहिजे होती.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, हा प्रश्न त्यांच्या कार्यकाळातील असल्यामुळे त्यांना समिती समोर बोलविण्यात आलेले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ते समितीला ही माहीत आहे. परंतु तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सद्यः उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्याबाबतची माहिती अवगत करायला पाहिजे होती. तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या विषयाबाबत त्यांना काहीही माहीत नाही असे उत्तर दिले आहे.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, श्री. महाजन यांच्याकडे एका महिन्याकरिता कार्यभार होता व त्यांच्यानंतर श्री. मोगल यांच्याकडे कार्यभार सोपविण्यात आला होता. श्री. मोगल यांना समितीच्या बैठकीस हजर राहण्याबाबत पत्र पाठविण्यात आले होते. परंतु ते बैठकीस आलेले नाहीत. यावर तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, ते २०११ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, हे प्रकरण सन २०१२-२०१३ मधील आहे. या कालखंडातील शिक्षणाधिकारी श्री. मोगल यांना बैठकीकरिता का बोलविण्यात आले नाही, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, त्यांनी काल श्री. मोगल यांना आजच्या बैठकीस हजर राहण्याचे दुरध्वनीद्वारे सांगितले होते व त्यांना पत्र देखील पाठविले होते. परंतु ते आलेले नाहीत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, शिक्षणाधिकारी यांनी या सर्व बाबी आपल्याला ब्रिफ केल्या किंवा कसे याबाबत माहिती द्यावी, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शिक्षकांची समायोजन प्रक्रिया योग्य पद्धतीने झाली नसल्यामुळे मी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना आजच्या बैठकीकरिता बोलविले होते, परंतु संबंधित अधिकारी आलेले नाहीत.

यावर समितीने विचारणा केली की, आज समितीचा पहिला दिवस आहे. सर्व संबंधित अधिकाऱ्यांना समिती येण्यापूर्वी माहिती जाणून घेण्याकरिता का बोलविले नाही. शिक्षणाधिकारी यांनी सांगितले आणि आपण ऐकले, आपण पडताळणी केलेली नाही. आपल्याला मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून विशेष अधिकार आहेत. शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे आपण समिती येण्यापूर्वीच व्हेरिफिकेशन करायला पाहिजे होते. आपण सांगत आहात की, आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना आज उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या होत्या. याचा सरळसरळ अर्थ असा होतो की, आपण समितीला गांभीर्याने घेतल्याचे दिसत नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना समितीच्या सूचनेनुसार बोलविले होते. त्यांच्याशी वारंवार संपर्क केला होता, परंतु सदरहू अधिकारी उपस्थित झालेले नव्हते. यावर समितीने विचारणा केली की, शिक्षणाधिकारी यांनी आक्षेपाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सविस्तर माहिती देणे आवश्यक होते व त्यांनी दिलेली माहिती आपण तपासून पाहिली पाहिजे होती. शिक्षणाधिकारी यांनी दिलेली माहिती आपण पडताळणी करून पाहिली काय, आपण बुकलेट वाचले असेलच. बुकलेट वाचल्यानंतर या प्रकरणाची माहिती शिक्षणाधिकारी यांच्याकडून जाणून घेतली काय.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, लेखा आक्षेप आल्यानंतर अतिरिक्त पदे समायोजित झाली किंवा कसे याबाबत माहिती घेतली होती. परंतु आता आपल्या मार्गदर्शनानुसार त्यापूर्वीची प्रक्रिया कशी झाली, तेव्हा कोण कोण अधिकारी होते, याबाबत माहिती घेण्यात येऊन चौकशी करण्यात येईल व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. यावर समितीने निर्देश दिले की, समायोजन केलेल्या ३९ पदांची सद्यःस्थिती काय आहे, तसेच अनुपालनामध्ये असे दिलेले आहे की, उर्वरित ३३ व ६१ अशी एकूण ९४ पदे शिक्षण विभागात कार्यरत असून त्यांचे वेतन व भत्यांचे अनुदान ग्रामविकास विभाग व संचालनालयाकडून प्राप्त होत असल्याने ती पदे अतिरिक्त ठरत नाही. या पदांबाबतही माहिती मिळणे आवश्यक आहे. सर्व अधिकारी व कर्मचारी यांना शासन पगार देते. या ठिकाणी अतिरिक्त पदांचे समायोजन करण्यात आले असून त्यांचे पगार नाहक दिले जात असून ही बाब अतिशय गंभीर आहे. या प्रकरणाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हास्तरावर ३३ व ६१ अशी एकूण ९४ पदे मंजूर आहेत. सन २०११-२०१२ मध्ये शिक्षण विभागाकडे एकूण १३३ पदे भरण्यात आली होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, याचाच अर्थ असा आहे की, १३३ पदांपैकी ९४ पदांना मान्यता होती. म्हणजेच ३९ पदे जादा होती. या लोकांना केव्हा पासून वेतन दिले जात आहे, वेतनाची एकूण रक्कम किती आहे, पदे आपोआप व्यपगत होतात. मान्यता न घेता, ही पदे भरण्यात आलेली आहे. याचाच अर्थ यामध्ये मोठ्या प्रमाणात अफरातफर झालेली आहे.

तद्नंतर समितीने असे निदेश दिले की, हे प्रकरण अतिशय गंभीर असल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे. या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून लक्ष दिल्याचे दिसत नाही. यासंदर्भातील ऑडीट झालेले आहे. आपण ऑडीटमध्ये अभिप्राय सादर केलेला नाही. या प्रकरणाला तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी होती. तसेच शिक्षणाधिकारी यांची देखील जबाबदारी होती. यासंदर्भात आता देखील शिक्षणाधिकारी यांनी आपल्याला माहिती देणे आवश्यक होते. आपल्याला चुकीची माहिती देऊन अधिकाऱ्यांनी दिशाभूल केलेली आहे. तसेच आपणही समितीला मोघम स्वरुपाची उत्तरे देणे योग्य नाही. यासंदर्भात तातडीने चौकशी करण्यात यावी व दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करण्यात यावा. या विषयासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष लावण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) संचालनालयाकडून मंजूर १०० पदांचे आदेश उपलब्ध असतांना ४० कर्मचाऱ्यांचे समायोजन कोणत्या नियमानुसार करण्यात आले या प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

(२) लेखा आक्षेपाचे अभिप्राय सादर केलेले नसल्याने तत्कालिन शिक्षणाधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) शिक्षण विभागात ९२ पदे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णयानुसार मंजूर केली आहे व ३३ पदे ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मंजूर केली आहे, अशी एकूण १२५ पदे मंज्जूर केली आहे. सन २०१२-१३ मध्ये २३ पदे व सन २०१३-१४ मध्ये १७ पदे अशी एकूण ४० पदांचे समायोजन शिक्षण विभागातील कार्यासनाची पदाची आवश्यकता विचारात घेऊन करण्यात आली आहे. सदर प्रक्रीयेस मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांची कार्यात्तर मंजुरी प्राप्त आहे.

शिक्षण संचालनालयाचे मंजूर केलेल्या ९२ पदांसाठी शिक्षण विभागाकडून तसेच ३३ पदासाठी ग्रामविकास विभागाकडून अनुदान प्राप्त होते.

या प्रकरणी लेखा परिक्षणाचेवेळी आवश्यक ती कागदपत्रे जसे की, शिक्षण व क्रीडा विभागाने मंजूर केलेल्या ९२ पदांची माहिती सादर न केल्याने सदरचा लेखा आक्षेप उपस्थित झालेला आहे.

(२) मंजूर आकृतीबंधापेक्षा जास्त पदे असलेबाबत परिच्छेदासंदर्भात चौकशी अहवाल सोबत सादर करण्यात आला असून परिच्छेदासंदर्भात अनुपालन सादर न करणे व पंचायत राज समितीच्या साक्षीवेळी उपस्थित न राहीलेबाबत तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री.मोगल यांना कारणे दाखवा नोटीस दिनांक २५ एप्रिल २०१८ रोजी बजावून त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशीच्या दोषारोपाचा प्रस्ताव मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दिनांक ८ ऑगस्ट २०१८ रोजी सादर करणेत आला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :—**

(१) शिक्षण विभागात ९२ पदे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णयानुसार मंजूर केली आहे व ३३ पदे ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मंजूर केली आहे. अशी एकूण १२५ पदे मंजूर केली आहे. सन २०१२-२०१३ मध्ये २३ पदे व सन २०१३-२०१४ मध्ये १७ पदे अशी एकूण ४० पदांचे समायोजन शिक्षण विभागातील कार्यासनाची पदाची आवश्यकता विचारात घेऊन करण्यात आली आहे. सदर प्रक्रीयेस मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांची कार्यात्तर मंजूरी प्राप्त आहे.

शिक्षण संचालनालयाचे मंजूर केलेल्या ९२ पदांसाठी शिक्षण विभागाकडून तसेच ३३ पदासाठी ग्रामविकास विभागाकडून अनुदान प्राप्त होते.

या प्रकरणी लेखापरिक्षणाचेवेळी आवश्यक ती कागदपत्रे जसे की, शिक्षण व क्रीडा विभागाने मंजूर केलेल्या ९२ पदांची माहिती सादर न केल्याने सदरचा लेखा आक्षेप उपस्थित झालेला आहे.

(२) वरील व या संदर्भात तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री.मोगल यांना कारणे दाखवा नोटीस दिनांक २५ एप्रिल २०१८ रोजी बजावुन त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशीच्या दोषारोपाचा प्रस्ताव मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दिनांक ८ऑगस्ट २०१८ रोजी सादर करण्यात आला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, संचालनालयाकडून मंजूर १०० पदांचे आदेश उपलब्ध असताना ४० कर्मचाऱ्यांचे समायोजन कोणत्या नियमानुसार करण्यात आले या प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित दोर्षीविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली.

यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, त्यांनी या संदर्भात चौकशी केलेली आहे. जिल्हा परिषदेत ग्राम विकास विभागाची शिक्षणाशी संबंधित ३३ पदे आणि शालेय शिक्षण विभागाची ९२ पदे अशी एकूण १२५ पदे मंजूर आहेत. ही सन २०१२-१३ मधील बाब आहे. ज्यावेळी लेखापरीक्षण झाले त्यावेळी केवळ ३३ पदांचे आदेश दाखविण्यात आले आणि १२३ पदे भरलेली होती. त्यामुळे ३३ पदे मंजूर असताना १२३ पदे कशी काय भरण्यात आली अशी त्यांनी विचारणा केली. त्यावेळी समाधानकारक उत्तर देण्यात आले नाही. खरे म्हणजे ग्रामविकास विभागाची ३३ पदे अधिक शालेय शिक्षण विभागाची ९२ पदे अशी एकूण १२५ पदे मंजूर आहेत. म्हणून आपण १२३ पदे भरलेली आहेत. परंतु, त्यावेळी हे लक्षात आले नाही. त्यामुळे मंजूर पदांपेक्षा जास्त पदे भरलेली आहेत असा आक्षेप घेण्यात आला. लेखा आक्षेपाची पुर्तता करण्यासाठी त्यांनी ४० लोकांचे समायोजन केले. एकूण १२३ पदे भरलेली होती. म्हणून ४० लोकांचे दुसरीकडे समायोजन केल्यानंतर सुद्धा त्यांच्याकडे ८५ लोक उपलब्ध होते. त्यामुळे दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम झाला नाही.

यावर समितीने अशी विचारणा केली की, लेखी माहितीमध्ये एकूण ४० पदांचे समायोजन शिक्षण विभागातील कार्यासनाची पदाची आवश्यकता विचारात घेऊन करण्यात आले. सदर प्रक्रियेस मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांची कार्योत्तर मंजूरी प्राप्त आहे असे नमूद केले आहे. कायद्यात कार्योत्तर मंजुरी घेण्याची तरतूद आहे काय, यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी होय, कायद्यात तशी प्रोव्हिजन असल्याबाबतचा खुलासा केला.

यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण कोणता शासन निर्णय कोट केलेला आहे, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस असा खुलासा केला की, ते तो शासन निर्णय बघून घेतो. विभागीय आयुक्तांनी मंजुरी देताना मेरीट प्रमाणे मंजूर केले असावे. यावर समितीने अशी विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समायोजन केले. त्यासाठी विभागीय आयुक्तांनी कार्योत्तर मंजुरी दिली असे होते काय, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना समायोजनाचे अधिकार नसताना त्यांनी समायोजन करावयाचे आणि विभागीय आयुक्तांनी कार्योत्तर मंजुरी द्यावयाची अशी कायद्यात तरतूद नाही. आपण कृपया समितीला चुकीचे उत्तर देऊ नये. ज्यांनी कार्योत्तर मंजुरी घेतल्याचे कोट केले त्यांना समज देण्यात यावी.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, मंत्रालयीन विभागामार्फत अभिप्राय सादर केला जातो. आपण हे तपासून घ्यावयास पाहिजे होते. शालेय शिक्षण विभाग व ग्रामविभाग विभागाने सारखाच अभिप्राय दिलेला आहे. अतिरिक्त पदे नव्हती तर समायोजन करण्याची आवश्कता का निर्माण झाली, यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, शिक्षण विभागाची जी गरज आहे ती लक्षात घेऊन समायोजन करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांनी खुलासा केला की, लेखा परिक्षणाच्या वेळी ९२ पदांचे आदेश दाखविले नसल्यामुळे सदर परिच्छेद आलेला आहे. ग्रामविकास विभागाची ३३ पदे आणि शालेय शिक्षण विभागाची ९२ पदे अशी एकूण १२५ पदे होतात आणि १२३ पदे भरलेली आहेत. त्यामुळे समायोजन करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु, जिल्हापरिषदेने आयुक्तांकडे प्रस्ताव का पाठविला हे कळत नाही.

विभागीय आयुक्तांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा बचाव करण्यासाठी कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे. ही कोणती पद्धत आहे असे समितीने मत व्यक्त केले. तद्नंतर समितीच्या प्रश्नास सचिव, ग्रामविकास विभाग यांनी उत्तर दिले की, त्यावेळी नजर चुकीमुळे ९२ पदांचे आदेश दाखविण्यात आले नव्हते. त्यांनी ऑडिट पॅरा आल्यामुळे ओव्हर रिॲक्ट करून हे केलेले दिसते. समितीने आदेश दिले तर मी याबाबत सविस्तर माहिती घेतो. परंतु, कार्योत्तर मंजुरी घेण्याची आवश्यकता नव्हती, असे सकृतदर्शनी दिसते. त्यांनी समायोजन असा शब्दप्रयोग केलेला आहे. But it is the transfer within the Zilla Parishad from one department to another department. परंतु, मंजूर पदांपेक्षा जास्त पदे भरण्यात आलेली नाहीत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, जेवढी पदे मंजूर होती त्यापेक्षा कमी पदे भरलेली आहेत. मग तो अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनाच आहे. त्यासाठी विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नव्हती. अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यासाठी विभागीय आयुक्तांची मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही. परंतु, अतिरिक्त कर्मचारी नव्हते तर विभागीय आयुक्तांची कार्योत्तर मंजुरी का घेण्यात आली,

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जेवढी पदे मंजूर होती त्यापेक्षा कमी पदे भरलेली आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, जेवढी पदे मंजूर होती त्यापेक्षा कमी पदे भरलेली असल्यामुळे समायोजन करण्याची आवश्यकता नव्हती.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, मंजूर पदांपेक्षा जास्त पदे भरलेली आहेत असे झालेले नाही. त्यांनी लेखा आक्षेप आल्यामुळे ओव्हर रिॲक्ट करून हे केलेले दिसते. यावर समितीने अशी विचारणा केली की, शासन धोरण निश्चित करते. परंतु, त्याची चुकीच्या पद्धतीने अंमलबजावणी होत असेल तर ते योग्य नाही. आपण विभागाचे सचिव म्हणून याची दखल घेतली पाहिजे. सचिव महोदय, आपण या संदर्भात जे शासन निर्णय आहे त्याची इत्यंभूत माहिती घ्यावी. आपण त्या शासन निर्णयाची प्रत समितीला दाखवावी. तसेच जिल्हा परिषदेमध्ये विषय समितीची मंजुरी नसताना खरेदी केली जाते, खर्चास मंजुरी नसताना परस्पर खर्च केला जातो. त्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्यांची कार्योत्तर मंजुरी घेतली जाते. जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांना महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ५४ ((२) अन्वये अधिकार आहेत. परंतु, मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनेक वेळा योजनांमध्ये आपल्या अधिकाराचा वापर करतात आणि नंतर मंजुरी घेतात.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, त्यावेळी ९२ पदांचे आदेश न दाखविल्यामुळे लेखा आक्षेप आलेला आहे. त्यावेळी ९२ पदांचे आदेश दाखविले असते तर आक्षेप आला नसता. शिक्षण विभागात पदे मंजूर नसताना जास्त लोक कसे काम करतात, असा आक्षेप होता. परंतु, त्यानंतर ३३ व ९२ अशी १२५ पदे मंजूर असल्याचे लक्षात आले. त्यामुळे समायोजन करण्याची आवश्यकता नव्हती.

यावर समितीने अशी विचारणा केली की, संबंधित अधिकाऱ्यांनी त्याच वेळी उत्तर दिले असते तर हा परिच्छेद आला नसता यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, त्यावेळी त्यांनी ९२ पदांचे आदेश न दाखविल्यामुळे हा परिच्छेद आलेला आहे. त्यांनी त्याच वेळी ९२ पदांचे आदेश दाखविले असते तर हा मुद्दा उपस्थित झाला नसता.

## अभिप्राय व शिफारशी

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २७ जून २००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जळगाव जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभागात मंजूर पदापेक्षा मूळ अहवालात नमूद केले प्रमाणे विविध संवर्गातील एकूण १०१ पदे जादा भरण्यात आलेली आहेत. सुधारित आकृतीबंधानुसार एकूण ३३ पदे मंजूर असताना एकूण १०१ अतिरिक्त पदे शासनाच्या कोणत्या योजनेखाली व कोणत्या शासन निर्णयानुसार मंजूर केलेली आहेत, याबाबत अद्ययावत माहिती उपलब्ध नसल्याने कर्मचारी आकृतीबंधाबाबत अचुकता प्रमाणित करता येत नाही. अतिरिक्त पदे कार्यरत ठेवल्यास वेतन व भत्यावर अनावश्यक खर्च होऊन शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या लेखा आक्षेपावर लेखी खुलासा करण्यात आला की, सन २०११-१२ मध्ये शिक्षण विभागाकडे एकूण १३३ पदे भरलेली होती. त्यापैकी ३३ पदांना ग्रामविकास विभागाने मान्यता दिलेली होती. उर्वरित १०० पदे ही शिक्षण संचालनालयाने वेळोवेळी मंजूर केलेली होती व त्यासाठी अनुदानही प्राप्त होते.

विविध संवर्गातील सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मध्ये एकूण ४० पदांचे समायोजन करण्यात आले आहे. उर्वरित ९४ पदे शिक्षण विभागात कार्यरत असून त्यांचे वेतन व भत्याचे अनुदान ग्रामविकास विभाग व संचालनालयाकडून प्राप्त होत असल्याने ती पदे अतिरिक्त ठरत नाही. या खुलाशाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर २०१७ रोजी साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, ग्रामविकास विभागाची ३३ पदे मंजूर होती तसेच शिक्षण संचालनालयाची ६१ पदे मंजूर होती असे सकृतदर्शनी दिसून येते. सदर अतिरिक्त ३९ शिक्षकांना कोणत्या नियमानुसार मान्यता देण्यात आली, याची चौकशी किंवा तपासणी सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करणे ही त्यांची जबाबदारी होती. याहून गंभीर बाब म्हणजे समितीसमोर सादर करण्यात आलेल्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये जिल्हा परिषदेने दिलेल्या उत्तरामधील अनुपालन रकान्यामध्ये सदरहू पदे अतिरिक्त ठरत नाहीत असे नमूद केले आहे. यावरून असे दिसून येते की, शिक्षणाधिकारी यांनी दिलेली माहिती न तपासता व चुकीची व मोघम दिली असल्यामुळे अनियमितता झाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

यासंदर्भात शिक्षण विभागाने दिलेल्या अभिप्रायामध्ये असे नमूद केले आहे की, एकूण १२५ पदे मंजूर असून सन २०१२-१३ मध्ये २३ पदे व सन २०१३-१४ मध्ये १७ पदे अशा एकूण ४० पदांचे समायोजन शिक्षण विभागातील कार्यासन पदाची आवश्यकता विचारात घेऊन करण्यात आले आहे. सदर प्रक्रियेत विभागीय आयुक्त, नाशिक यांची कार्योत्तर मंजुरी प्राप्त आहे. ९२ पदांसाठी शिक्षण विभागाकडून तसेच ३३ पदांसाठी ग्रामविकास विभागाकडून अनुदान प्राप्त होते. याप्रकरणी जिल्हापरिषदेचे तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री.मोगल यांना कारणे दाखवा नोटीस दिनांक २५ एप्रिल २०१८ रोजी बजावून त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशीच्या दोषारोपाचा प्रस्ताव आयुक्त (शिक्षण), पुणे यांचेकडे दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी सादर करण्यात आला आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, ९२ पदांचे आदेश लेखापरिक्षणाच्या वेळी न दाखविल्यामुळे लेखापरिक्षणात आक्षेप घेण्यात आला आहे. जिल्हापरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी त्याचवेळी ही बाब निदर्शनास आणून दिली असती तर सदरहू आक्षेप आला नसता जिल्हा परिषदेमध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे हा मुद्दा उपस्थित झाला आहे. यासंदर्भात **समितीला चुकीची व मोघम स्वरूपाची माहिती दिल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध केलेल्या कारवाईचा अहवाल तसेच तत्कालिन शिक्षणाधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्यानंतर त्यांचेविरुद्ध आयुक्त (शिक्षण), पुणे यांचेकडे सादर करण्यात आलेल्या दोषारोप पत्रानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे. याबाबतच्या सद्यःस्थितीची माहिती समितीला एक महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, जळगांव

## शालेय पोषण आहार धान्यादी पारित देयकाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८७ (सन २०११-१२)**

उपरोक्त नमूद योजनेकरिता रक्कम रु. ९,९१,३६,२५९ खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन परिपत्रक, शापोआ २००९/प्र.क्र./३८३/प्रा.शि- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक २६ फेब्रुवारी २०१० (परिशिष्ट ३.१) मधिल (क-३) नुसार गट स्तरावर तांदळाची वाहतूक तसेच इ.धान्यादी मालाचा पुरवठा याबाबतचा पुरवठा आदेश एकाच वेळी द्यावा असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन निर्णयातील (क-४) नुसार सदर माल उशिरा प्राप्त झाल्याबाबत ०.५ टक्के दंडाची रक्कम वसूल केलेली नाही.

(३) उपरोक्त शासन निर्णयातील (इ-१) नुसार जिल्हा स्तरावर भरारी पथके व ग्रामशिक्षण समितीने स्थानिक पातळीवर अनधान्य व आहाराचा दर्जा बाबत वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, तपासणी केलेबाबतचा अहवाल नस्ती सोबत नाही.

(४) करारनाम्यातील अट क्र. ७ नुसार पुरवठा करावयाच्या पावत्या बाबत पाचोरा तालुक्यातील (उदा. दुसखेडा, लोहारा, कासमपुरा, शहापुरा, वडगांव, खाजोळा, आखतवाडे इ.) देयकासोबत पांढरी पावती लाऊन देयक पारीत करण्यात आलेले आहे. करारनाम्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

(५) धान्यादी मालाचा पुरवठा केलेल्या पावत्यांवर बालाजी माध्यमिक गांधली, पिळोदे जिल्हा परिषद प्राथमिक विद्यामंदीर वडगांव (हडसन) जिल्हा परिषद शेतकी बेसीक शाळा गाळण बु. मुख्याध्यापकाची स्वाक्षरी नाही.

(६) मक्तेदार यांनी दिनांक २१ ऑक्टोबर २००९ च्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तेल किलोमध्ये पोहोच करणे आवश्यक असतांना ते ९१० मिलीग्रॅम मध्ये पोहोच आहे, तथापि, देयक प्रदान करतांना त्याचे रुपांतर कि.लो. मध्ये करून देयके अदा केलेली आहेत. शाळेवर संबंधित मक्तेदार ते पाऊच मध्ये पोहोच केले अथवा किलो. मध्ये पोहोच केले याबाबत साठा नोंदवही नमूद असल्याने सदर तेलाचा पुरवठा पाऊच मध्ये केला असल्यास संबंधितांकडून रक्कम रुपये १३,४३,०८३ वसूल करणे आवश्यक आहे.

(७) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. शापोआ २००९/प्र.क्र.३८३/प्रा.शि.-४ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक २६ फेब्रुवारी २०१० मधील (ड-१) नुसार पुरवठा धारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे नमुने प्रत्येकी २५० ग्रॅम प्रमाणे गट शिक्षण अधिकारी/अधीक्षक शालेय पोषण आहार यांनी त्यांच्या पत्रासोबत शासकीय प्रयोगशाळेत पाठवावेत असे असतांना मक्तेदार यांनी स्वतःच्या पत्रानुसार नमुने शासकीय प्रयोगशाळेत पाठवून तपासणी अहवाल प्राप्त केलेला आहे. तसेच एकाच तपासणी अहवालाच्या छायांकित प्रती तयार करून प्रत्येक तालुक्यातील गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या अहवालावर स्वाक्षरी घेण्यात आलेल्या आहेत. तरी नियमाप्रमाणे कार्यवाही न केल्याने गटास प्राप्त झालेला धान्यादी माल योग्य दर्जाचा असण्याची अचुकता प्रमाणित करता येत नाही. तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शासन परिपत्रक क्र.शापोआ २००९/प्र.क्र.३८३/प्रा.शि. ४ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक २६ फेब्रुवारी २०१० मधील (क-३) नुसार तांदुळ व धान्यादी मालाचापुरवठा आदेश एकाच वेळी देण्यात आलेला आहे.

(२) शासन निर्णयातील (क-४) नुसार १५ दिवसांच्या आत मालाचापुरवठा न केल्यास मालाच्या किंमतीवर अर्धा टक्का आठवड्याप्रमाणे दंड आकारला जाईल असे नमूद आहे. परंतु पुरवठा धारकास धान्यादी मालाचा पुरवठा आदेश मिळाल्यापासुन जास्तीत जास्त ५ दिवसांमध्ये पुरवठा सुरू करावा लागेल व जास्तीत जास्त २० दिवसांमध्ये (शालेय कामकाजाचे दिवस गृहित धरून) संपुर्ण पुरवठा करणे बंधनकारक आहे त्यामुळे पुरवठा आदेशानुसार माल उशिरा प्राप्त झाला नसल्याने दंडाची रक्कम वसूल केलेली नाही.

(३) शासन निर्णयातील (इ-१) नुसार ग्रामशिक्षण समितीकडून अन्यधान्य व आहाराच्या दर्जा बाबत वेळोवेळी तपासणी करण्यात येते. संचालनालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार दर्जा बाबत शाळा स्तरावर चव रजिष्टर ठेवण्यात आले आहे.

(४) करारनाम्यातील अट क्र. ७ नुसार पुरवठा करावयाच्या पावत्यानुसार पाचोरा तालुक्यातील दुसरखेडा, लाहोरा, कासमपुरा, शाहापुरा, वडगांव, खाजोळा, आखतवाडे या शाळेच्या देयकासोबत पांढऱ्या पावत्या पुरवठा धारकाकडून जोडल्या गेलेल्या होत्या त्या बदलून पिवळ्या रंगाच्या पावत्या देयका सोबत जोडलेल्या आहेत.

(५) बालाजी माध्यमिक गांधली पिळोदे जि. प. प्राथ. विद्या मंदिर वडगांव (हडसन), जिल्हा परिषद बेसीक शाळा गाळण बु. संबंधित शाळेला साठा प्राप्त झाल्याची खात्री करण्यात आली असून पुरवठा पोहोच पावत्यावर मुख्याध्यापक यांची स्वाक्षरी घेण्यात आली आहे.

(६) म.शिक्षण संचालक (प्राथ) महाराष्ट्र राज्य पुणे-१ व पुरवठाधारक महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांच्याशी दिनांक १ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या मंजूर दर करारनाम्याप्रमाणे शाळेवर पोहोच करावयाचे तेल लिटरमध्ये नमूद केलेले आहेत. त्याप्रमाणे धान्यादी मालासोबत तेल करारनाम्याप्रमाणे लिटर मध्ये पोहोच करण्यांत आले आहे. त्यामुळे रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

(७) पुरवठा धारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्यांचे नमुने प्रत्येकी २५० ग्रॅम प्रमाणे गट शिक्षणधिकारी/अधीक्षक शालेय पोषण आहार यांनी त्यांचे पत्राप्रमाणे शासकीय प्रयोगशाळेमध्ये पाठविले बाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार तालुका स्तरावर कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षात तांदुळ व धान्यादी मालाचापुरवठा आदेश केव्हा देण्यात आला आहे व त्यानुसार प्रत्यक्ष माल कधी प्राप्त झाला, पुरवठाधारक कोण आहे याचा तपशील घ्यावा. आहाराचा दर्जा तपासणीबाबत जिल्हा स्तरावरून भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली होती काय, असल्यास कोठे भेटी देण्यात आल्या त्याचा तपशील सादर करावा. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पुरवठादार महाराष्ट्र को.ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन हे होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, या परिच्छेदामध्ये महाराष्ट्र राज्य उपभोक्ता महासंघ लिमिटेड, मुंबई हे पुरवठादार होते, असे दिलेले आहे. तसेच ठेकेदार कोण होते, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ठेकेदार तिरुपती सप्लायर्स हे होते.

समितीन पुढे विचारणा केली की, महाराष्ट्र कन्झ्युमर्स फेडरेशन सोबत करार केलेला आहे व देयक तिरुपती या ठेकेदाराला दिलेले आहे. करारनाम्याची प्रत शाळेला देखील मिळाली पाहिजे. प्रत्यक्षात अंमलबजावणी शाळेवर होत आहे. करारनाम्याची प्रत शाळांमध्ये देण्यात आलेली नाही. देयक देताना मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी कोणत्याही बाबी तपासलेल्या नाहीत, तिरुपतीला देयक दिले आहे. शासनाने जो करारनामा केला आहे, त्यानुसार किरकोळ कंत्राट कोणालाही देता येत नाही, तसे करारनाम्यात नाही. मग अशा परिस्थितीत त्रयस्थ पक्षाच्या नावाने देयक का देण्यात आले, महाराष्ट्र कन्झ्युमर्स फेडरेशन सोबत दरकरार केले आहे. दर कराराप्रमाणे त्यांचे जे विक्रेते असतात, ते पुरवठा करतात, अशी साधारणतः तरतूद असते. दर करारामध्ये थेट पुरवठा करीत नाहीत. यासाठी निविदा काढली होती का, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासन स्तरावर निविदा काढली होती. तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, दर करार केले आहे. कन्झ्युमर्स सोसायटींचे पुरवठादार असतात, ते पुरवठा करीत असतात. शासनाने त्यांच्यासोबत करार केला. संचालक आणि कन्झ्युमर्स फेडरेशन यांच्यामध्ये करार झाला आहे. त्यामध्ये किरकोळ कंत्राटाची कुठेही अट नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करारनामाच वाचलेला नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ते करार व्यक्तिशः मान्य करीत नाही. एमएससीएफकडे करारनामा केलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, तुम्ही मान्य केलेला आहे, देयक अदा केले आहे. तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून या संदर्भात जाणून घेण्याची गरज आहे. तसेच देयक अदा करतेवेळी करारनाम्यात असलेल्या व्यक्तीच्याच नावाने दिले पाहिजे, मग त्याच्याकडून इतराला देता येईल. करारनाम्यात असणाऱ्या व्यक्तीलाच देयक दिले पाहिजे. सदर प्रकरणी जबाबदारी निश्चित केली पाहिजे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. जे काही प्रश्न विचारण्यात येत आहेत, त्यांचे गांभीर्यपूर्वक व समितीचे समाधान होईल असे उत्तर मिळालेले नाही. अधिकाऱ्यांकडून अशी उत्तरे दिली जात असतील तर हा समितीचा अवमान आहे. ही बाब गंभीर आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या सर्व गोष्टी जबाबदारीने पाहून, तपासून त्यांची उत्तरे दिली पाहिजेत. अनियमितता केलेल्या व्यक्तिविरुद्ध कारवाई केली, असे सांगितले पाहिजे होते, मात्र ते सांगत नाही. त्यामुळे येथे गंभीर बाब निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर्स फेडरेशन, मुंबई ही कंपनी पुरवठाधारक आहे. ही कंपनी शासनाची आहे का, या कंपनीशी महाराष्ट्र शासनाचा काहीही संबंध नाही. फक्त नाव वापरले जात आहे. ही सहकारी संस्थाही नाही. महाराष्ट्र शासनाचा संलग्न किंवा अंगीकृत असा हा उपक्रम आहे का, दुसरी कंपनी आहे काय याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती घेतली पाहिजे. शालेय पोषण आहार पुरवठा करण्याचा करार शिक्षण संचालक, प्राथमिक, पुणे यांनी महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर्स फेडरेशनशी केला. फेडरेशनने आपल्याला माल पुरवठा केला पाहिजे होता. आपण त्यांना देयक दिले पाहिजे होते. आपण जळगावच्या एजन्सीच्या नावाने कसे काय देयक दिले, तसेच करार नोटरी केलेला आहे, नोंदणीकृत केलेला नाही.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी असा खुलासा केला की, फेडरेशनला जे काही प्रदान करण्यात आले आहे, त्याची देयके आहेत. यावर समितीने विचारणा केली की, मग साई हे नाव कसे आले, आपण फेडरेशनला देयक अदा केले असेल तर साईला देयक अदा कसे झाले आणि त्याने कसा काय पुरवठा केला, कोणत्या आधारावर त्याने पुरवठा केला आहे, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी असा खुलासा केला की, जिल्हा परिषद स्तरावर करार झालेला नाही. यावर समितीने विचारणा केली की, २ करार आहेत. एक करार शिक्षण संचालक आणि कन्झ्युमर्स फेडरेशनचा आहे. आपसात दोन करार केले आहेत, त्यांच्या स्तरावर करार केला आहे, मग जिल्हा परिषदेने तो मान्य कसा केला.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी असा खुलासा केला की, कन्झ्युमर्स फेडरेशननेच पुरवठा केला आहे आणि त्यांनाच जिल्हा परिषदेने प्रदान केले आहे. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेकडून मागणीसाठी टिप्पणी कोण पाठविते, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, गट शिक्षणाधिकारी कार्यालय मागणीसाठी टिप्पणी पाठविते.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, नस्तीमध्ये तिरुपती एजन्सीचा करार कसा काय आहे, संचालकांच्या सोबत करारनामा नाही. संचालकांची त्यावर स्वाक्षरी नाही. आपसातील करार जिल्हा परिषदेच्या नस्तीमध्ये कसा जोडण्यात आलेला आहे, तिरुपती एजन्सीचा काहीही संबंध नसताना त्याच्याशी करारनामा करण्याचे काय कारण होते, अधिकाऱ्यांकडून मोघम उत्तरे दिली जात आहेत. खुलासा चुकत आहे. अधिकारी म्हणत आहेत की, ५ टक्के दंडाच्या वसुलीसाठी तो पात्र नव्हता. दंडाची रक्कम वसूल केली नाही. विहित मुदतीत पुरवठा झाला नाही. या उत्तरातून समितीचे समाधान होत नाही. सदर प्रकरणी फार मोठी अनियमितता झाल्याचे दिसत आहे. सदर मुद्याच्या बाबतीत सविस्तर माहिती देण्यात यावी, सदर मुद्याच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल. हा विषय या जिल्ह्यात गंभीरपणे उपस्थित झाला आहे. समितीकडे यासंबंधी तक्रारी देखील प्राप्त झालेल्या आहेत. अधिकाऱ्यांकडे सविस्तर माहिती उपलब्ध नाही. याप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि त्याचा अहवाल समितीला द्यावा.

कन्झ्युमर्स फेडरेशनसोबत माहे सप्टेंबर, ऑक्टोबर, २००९ मध्ये करार झाला, त्यांचा आपसातील करार दिनांक ४ नोव्हेंबर, २००९ रोजी झाला. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनचा करार सन २०११ मध्ये झाला. सन २००९ मध्ये कन्झ्युमर्स फेडरेशनला काम मिळाले. सन २००१ मध्ये स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनला काम मिळाले. आपसात काम वाटून घेतले आहे. समितीला या संदर्भातील करारनाम्याच्या प्रती देऊन सविस्तर माहिती द्यावी. समितीने असे मत व्यक्त केले आहे की, अनियमितता असेल तर त्या संदर्भात सोक्षमोक्ष लागला पाहिजे आणि जबाबदार व दोषी असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई झाली पाहिजे, कारवाई करून तशा प्रकारच्या घटनांस पायबंद बसला पाहिजे. विभाग प्रमुख व खाते प्रमुख यांनी या संदर्भात कोणती कार्यवाही केली.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१५ मध्ये वृत्तपत्रात हे प्रकरण आले. दोषपूर्ण नमुने मिळाले होते, ते एफडीएला पाठविले होते, त्याचा अहवाल विभागाचे सचिव, माननीय मंत्री, शालेय शिक्षण यांना पाठविला आहे. विवादात्मक मुद्दा असा होता की, तुरडाळीची किंमत मागच्या वर्षी १५० रुपयांच्या आसपास होती. आता मुदतवाढ देताना ५३ ते ६० रुपयांच्या आसपास तुरडाळीची किंमत आहे. मुदतवाढ असल्यामुळे जुन्याच दराने पुरवठा होत होता. ही बाब वृत्तपत्रात आली. शासनाचे आर्थिक नुकसान संभवते म्हणून विभागाचे सचिव व शिक्षण संचालक यांना सांगितले. कारण या संदर्भात करार झाला आहे. करारनामा ज्यांच्यामध्ये झाला आहे, त्यांच्या निदर्शनास बाबी आणून दिल्या आहेत, त्यानंतर सचिव, शालेय शिक्षण यांना दिनांक १८.७.२०१७ रोजी संपूर्ण कार्यवाहीचा अहवाल दिला आहे. त्याच्या प्रती समितीला देऊ शकतो. मग त्या आधारे थेट लाभ हस्तांतरणाचा निर्णय झाला. आता शासनाने शालेय व्यवस्थापन समितीमार्फत खरेदी केली आहे. सन २०१३-१४ चे हे प्रकरण होते. अन्न व औषधी द्रव्ये विभागाचा अहवाल निरंक आलेला आहे. मूळ नमुन्याशी ते जुळत नाही, असे दिसत आहे. जिल्हा परिषदेने पुन्हा शासनाला ही बाब कळविली की, सकृतदर्शनी फरक दिसत आहे. सदर बाबतीत काय कारवाई करावी, याबाबत विचारले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, अन्न व औषधी द्रव्ये विभागाकडे तपासणीसाठी कोणासमोर पाठविले, या करारनाम्याची प्रत शाळांकडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्याकडे आहे का, करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार माल कशा पद्धतीने घ्यायचा, या संदर्भातील सूचना मूळ नियमात दिलेल्या आहेत. मात्र या करारनाम्याची प्रत कोणत्याही शाळेकडे नाही. जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीला हा करारनामा माहीत आहे काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, नाही. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, हे प्रकरण झाले, त्यावेळी शिक्षण समितीमध्येही चर्चा झाली होती.

यावर समितीने विचारणा केली की, अनेकदा शालेय पोषण आहाराचा विषय सूचीवर येत नाही. केवळ वार्षिक प्रशासन अहवालाच्या आधारावर जिल्हा परिषदेची मंजुरी घेण्यात येते. शालेय पोषण आहाराचा करारनामा प्रत्येक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीकडे असता तर या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून निरंक अहवाल आलाच नसता. या जिल्ह्यात घडलेल्या शालेय पोषण आहाराबाबत तत्कालिन पालकमंत्र्यांनी मागच्या अधिवेशनात सदरहू विषय सभागृहात उपस्थित केला होता. या पोषण आहाराबाबत अनेक तक्रारी झाल्या, शालेय पोषण आहाराच्या चोरीच्या गाड्या पकडल्या गेल्या. परंतु या प्रकरणी कोणावरही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करावा की करू नये या बाबतीत मतभेद आहेत. एवढे मोठे प्रकरण घडलेले असताना दोषींवर गुन्हा दाखल का केला गेला नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शालेय पोषण आहाराचे प्रकरण सन २०१३-१४ मध्ये घडले होते. ते प्रकरण चौकशीसाठी आर्थिक गुन्हे शाखेकडे गेले होते. आर्थिक गुन्हे शाखेकडून जिल्हा परिषदेला पत्र प्राप्त झाले की, आपल्या अधिनस्त जे अधिकारी आहेत त्यांनी सदरहू प्रकरण एमआयडीसी पोलीस स्टेशनकडे वर्ग करावे. त्यानुसार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्याचे आदेश दिले. जिल्हा परिषदेने या प्रकरणाची संपूर्ण नस्ती कागदपत्रे पोलिसांना सादर केली. परंतु अद्यापपर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला नाही.

यावर समितीने विचारणा केली की, हे प्रकरण सन २०१३-१४ मध्ये घडलेले आहे. गेल्या तीन-चार वर्षात या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा का दाखल करण्यात आला नाही, सदरहू प्रकरण घडल्यानंतर सुद्धा दि.१८ ऑगस्ट २०१६ रोजी शालेय पोषण आहार घेऊन जात असलेला ट्रक भुसावळ येथे जप्त करण्यात आला. या प्रकरणी आपण काय कारवाई केली, दिनांक १ जुलै २०१६ ते २० नोव्हेंबर २०१६ या कालावधीत पंचायत समिती, जामनेर अंतर्गत शालेय पोषण आहाराचा कार्यभार कोणाकडे होता, त्या संदर्भातील आदेशाची प्रत उपलब्ध आहे काय, शिक्षणाधिकारी यांनी या प्रकरणात जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली.

पोलीस स्टेशनमध्ये एखादा फिर्यादी गेल्यानंतर ठाणे अंमलदार यांनी त्याची तक्रार दाखल करून घ्यावयास पाहिजे. पोलीस तपासामध्ये जे काही निष्पन्न होईल त्यानुसार पुढील कारवाई केली जाते. आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल करण्याबाबत लेखी अर्ज देऊनही ठाणे अंमलदार या प्रकरणी गुन्हा का दाखल करीत नाहीत, पोलिसांकडून गुन्हा दाखल करून घेतला जात नाही या विषयी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांसोबत चर्चा केली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पोलीस अधीक्षकांना या बाबतीत लेखी अर्ज दिला आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यास सांगितल्यानंतर त्यास पोलीस अधीक्षकांनी काय उत्तर दिले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पोलीस अधीक्षकांकडून उत्तर आलेले नाही. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरून या बाबत पाठपुरावा करीत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर मे, २०१७ मध्ये या ठिकाणी रुजू झाल्यापासून या प्रकरणी पोलीस अधीक्षकांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल का होत नाही, यामध्ये जिल्हा परिषदेकडून काही त्रुटी राहिल्या आहेत काय, हे तपासण्यात येत आहे. या बाबत जिल्हा परिषदेच्या पॅनलवरील वकिलांकडून नव्याने माहिती घेऊन अभिप्राय देण्यात येत आहेत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सर्वसामान्य माणूस छोटीशी तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये गेला तर त्याची तक्रार घेतली जाते. परंतु आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांनी चार-चार वेळा सांगून सुद्धा त्यांची तक्रार दाखल करून घेतली जात नसेल तर यामध्ये काही तरी काळेबेरे आहे असा संशय समितीला येत आहे. या प्रकरणी पोलीस अधीक्षकांना समितीसमोर बोलावून या प्रकरणी अद्यापपर्यंत गुन्हा दाखल का करून घेतला नाही या बाबत विचारणा करण्यात यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी हे आयएएस दर्जाचे आहेत. त्यांनी आपले प्रशासकीय अधिकार वापरुन संबंधितांवर कारवाई का केली नाही, शालेय पोषण आहार योजनेत गंभीर प्रकरण घडल्यामुळेच जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यासाठी अधिकारी गेले होते. पोलीस स्टेशनने जरी तक्रार दाखल करून घेतली नसली तरी प्रशासनाने संबंधितांवर काय कारवाई केली, ज्यावेळी सदरहू शालेय पोषण आहाराचा पंचनामा झाला त्यावेळी पुरवठादाराने जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमोर मान्य केले होते की, त्यांनी केलेला पुरवठा निकृष्ठ दर्जाचा आहे, असे असताना अन्न व औषध प्रशासन विभागाकडून त्याच मालाच्या बाबतीत निरंक अहवाल कसा येतो, निकृष्ट दर्जाचा माल आढळल्याची बाब कुठेतरी कागदावर आलेली असावी. समितीच्या मते यामध्ये मोठी टोळी समाविष्ट आहे, या शालेय पोषण आहारातील टोळीवर कारवाई झाली पाहिजे.

ज्यावेळी हे प्रकरण घडले त्यावेळी तुरीचे भाव प्रती किलो ३० रुपये होते आणि तुरीची डाळ प्रती किलो ४० रुपये होती. परंतु कंत्राटदाराने मात्र तुरीच्या डाळीचा पुरवठा प्रती किलो रु.१५५ या दराने केला. या प्रकरणामुळे शासनाचे किती नुकसान झाले याची माहिती प्रशासनाकडून घेतली जाईल तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीस यामध्ये शासनाचे नुकसान झाले आहे काय याबाबत खुलासा करावा असे मत समितीने व्यक्त केले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यात नुकसान झाले आहे काय ही बाब तपासून घेतली जाईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पुस्तिकेत नमूद केले आहे की, नियमाप्रमाणे कार्यवाही न केल्याने गटास प्राप्त झालेला धान्यादी माल योग्य दर्जाचा असण्याची अचूकता प्रमाणित करता येत नाही. तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही केलेली नाही. माहिती पुस्तिकेत असे स्पष्टपणे नमूद केलेले असताना शासनाची दिशाभूल करण्यात आलेली आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणी प्रशासकीय स्तरावरून दोषींवर काय कारवाई केली याबाबत समितीस माहिती द्यावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पाच शाळांमध्ये खराब माल होता. करारनाम्यातील अट आहे की, माल खराब असेल तर तो बदलून देण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादाराची आहे. यावर समितीने मत व्यक्त केले की, समितीचा सुरूवातीलाच प्रश्न होता की, शालेय पोषण आहाराच्या करारनाम्याची प्रत सर्व शाळांना उपलब्ध करून दिली आहे काय, परंतु आपण सांगितले की, करारनाम्याची प्रत

शाळांना उपलब्ध करून दिलेली नाही. असे असताना आपण शाळांच्या मुख्याध्यापकांवर कारवाई केली. परतु आपण गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी किंवा अधीक्षक, शालेय पोषण आहार यांच्यावर कारवाई केली नाही. जिल्हा परिषदेकडे सर्वात अगोदर सदरहू शालेय पोषण आहाराच्या करारनाम्याची प्रत आली होती. त्यामुळे सर्व शाळांना करारनाम्याची प्रत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची होती. शाळांना पोषण आहाराचे नमुने दिले नाहीत किंवा करारनाम्याची प्रत सुद्धा दिली नाही. तसेच मालाची ऑर्डर दिल्यानंतर २० दिवसांच्या आत मालाचा पुरवठा झाला पाहिजे आणि त्यानंतर त्या मालाचे नमुने तपासणीसाठी द्यावयास पाहिजे अशी करारनाम्यात तरतूद आहे. परंतु जिल्हा परिषदेने मुख्याध्यापकांना करारनाम्याची प्रत उपलब्ध करून दिलेली नसताना यात मुख्याध्यापकांना कसे जबाबदार धरता येईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१६-१७ या वर्षात जिल्हा परिषदेने सविस्तर तपासणी करण्यासाठी परिपत्रक निर्गमित केले आहे.

तद्नंतर समितीने असा अभिप्राय दिला की, जिल्हा परिषदेने मुख्याध्यापकांना करारनाम्याची प्रत उपलब्ध करून दिली असती तर हा प्रश्नच उद्भवला नसता. शालेय पोषण आहाराचा माल खराब असल्यास तो स्वीकारता कामा नये व तो माल बाहरून खरेदी करावा अशी तरतूद उक्त करारनाम्यात होती. परंतु करारनाम्याची प्रत शाळांना उपलब्ध करून न दिल्यामुळे मुख्याध्यापकांना करारनाम्यातील तरतुदीच माहीत नव्हत्या. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी पुरवठादारास जून महिन्यात मुदतवाढ मिळाली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने त्या मुदतवाढीस विरोध केला होता.

यावर समितीने मत व्यक्त केले की, या कामास शासनाने मुदतवाढ दिल्यानंतर त्यास जिल्हा परिषदेला विरोध करण्याचा अधिकार नाही. सरकारने जो करारनामा केला आहे त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सरकारची नव्हे तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. समितीचा मूळ प्रश्न एवढाच आहे की, शालेय पोषण आहाराच्या करारनाम्यानुसार अंमलबजावणी का केली नाही, समितीच्या भेटीच्या वेळी शाळा तपासल्या आणि त्यांच्याकडे करारनाम्याची प्रत आढळून आली नाही तर आपण त्या शाळेच्या मुख्याध्यापकांना जबाबदार धरणार काय, तसेच करारनाम्याची प्रत शाळांपर्यंत न पोहचविणाऱ्या अधिकाऱ्यांवर जिल्हा परिषद काय कारवाई करणार काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, आता थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धत सुरू करण्यात आलेली आहे. या संदर्भात करारनामा झाल्यास त्याची प्रत प्रत्येक शाळेपर्यंत पोहचविण्याची जबदारी घेतली जाईल. या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल मागवून घेण्यात येईल. या प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

पुढे समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत झालेल्या गैरव्यवहाराचा विषय अत्यंत गंभीर आहे. या विषयाच्या अनुषंगाने समितीने विचारलेल्या उपप्रश्नांना अद्यापपर्यंत जिल्हा परिषदेकडून समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रत्येक वेळी तपासतो, बघतो, माहिती नाही अशी उत्तरे देणे अपेक्षित नाही. मुळात शालेय पोषण आहार योजनेच्या करारनाम्याची प्रत प्रत्येक शाळेपर्यंत पोहचवावयास पाहिजे होती. तसेच शाळांनी पुरवठादाराकडून "अ" श्रेणीचा माल घेणे आवश्यक होते. जर करारनाम्यानुसार माल नसेल तर तो स्वीकारता कामा नये, अशी करारनाम्यात तरतूद होती. परंतु करारनाम्याची प्रतच शाळांना पाठविण्यात आली नाही. त्यामुळे शाळांना कोणता माल घ्यावा याची कल्पनाच नव्हती. जर पुरवठा करण्यात आलेला माल चांगल्या दर्जाचा नसेल तर बाजारातून खरेदी करण्याची तरतूद करारनाम्यात होती. परंतु करारनाम्याची प्रतच मिळाली नसल्यामुळे मुख्याध्यापकांना या तरतुदीची माहिती नव्हती. तसेच ज्या गाड्यांमध्ये शालेय पोषण आहार आढळून आला त्या प्रकरणी कोणावरही कारवाई करण्यात आली नाही किंवा गुन्हा दाखल केला नाही. तसेच शिक्षणाधिकाऱ्यांनी सुद्धा करारनाम्यानुसार कार्यवाही केली नाही. समितीचे मत आहे की, या संपूर्ण प्रकरणी मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. या विषयाच्या अनुषंगाने जे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत त्या बाबत जिल्हा परिषदेने तात्काळ विभागीय चौकशी केली पाहिजे. तसेच बैठक संपण्यापूर्वी जिल्हा परिषदेने या प्रकरणाची सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी पोलीस अधीक्षकांना समितीसमोर उपस्थित राहण्यास सांगावे. तसेच शालेय पोषण आहाराच्या करारनाम्याची प्रत, जिल्हा परिषदेने या प्रकरणी सादर केलेला अहवाल, तक्रारीची प्रत इत्यादी आवश्यक ती सर्व कागदपत्रे समिती सदस्यांना उपलब्ध करून दिली पाहिजेत. या प्रकरणी अद्यापपर्यंत गुन्हा का दाखल करण्यात आला नाही या बाबतची माहिती पोलीस अधीक्षकांकडून प्राप्त करण्यात यावी. यामध्ये जे दोषी आहेत त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तात्काळ प्रशासकीय करावयास पाहिजे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर चौकशी केली पाहिजे. या विषयी सर्व संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल. तसेच चार वर्षे पाठपुरावा करून सुद्धा तक्रार दाखल केली जात नसेल तर त्या बाबतीत गृह विभागाच्या सचिवांना सुद्धा साक्षीसाठी बोलविण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) धान्यादी मालाच्या साहित्याबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी शाळांमध्ये होत असल्याने करारनाम्याची प्रत सर्व शाळांमध्ये देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

(२) शालेय पोषण आहार पुरवठा करण्याचा करार शिक्षक संचालक प्राथमिक, पुणे यांनी महाराष्ट्र राज्य कंझ्युमर्स फेडरेशनाशी केलेला असताना तिरुपती एजन्सीचा करार करण्याची कारणे काय आहेत याबाबतचा सविस्तर खुलासा करण्यात यावा ?

(३) या संदर्भात ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी अनियमितता केली आहे त्यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार किती जणांवर कारवाई करण्यात आली आहे ?

(४) सन २०१३-१४ मध्ये शालेय पोषण आहाराचे प्रकरण चौकशी करता आर्थिक गुन्हे शाखा यांचेकडून एमआयडीसी कडे वर्ग करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निदेश देऊनही अद्यापपर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल न होण्याची कारणे काय आहेत ?

(५) दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजी शालेय पोषण आहार धान्यादी माल घेऊन जात असताना सदरहू ट्रक भुसावळ येथे जप्त करण्यात आला, त्यावेळी आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल करण्याबाबत लेखी अर्ज देऊनही ठाणे अंमलदार यांनी या प्रकरणी गुन्हा दाखल न करण्याची कारणे काय आहेत ?

(६) सदरहू प्रकरण घडले त्यावेळी तुरीचे भाव प्रती किलोग्रॅम ३० ते ४० रुपये असताना कंत्राटदाराने तुरीच्या डाळीचा पुरवठा प्रती कि. ग्रॅ. रुपये १५५ या दराने खरेदी करण्याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) तालुका/बीट/केंद्रप्रमुख स्तरावर मुख्याध्यापकांची वेळोवेळी सभा/संमेलने आयोजित करून करारनामा सर्व संबंधित शासन निर्णय/ परिपत्रके व सर्व उल्लेखांचे सविस्तर वाचन करण्यात येऊन मार्गदर्शन करण्यात आले आहे. केंद्र शासनाची संगणकीय प्रणालीमध्ये एम.डी.एम. पोर्टल अद्ययावत असून त्यावर सर्व शासन निर्णय करारनामे परिपत्रके स्कॅन करून अपलोड करण्यात आले आहेत. शाळा स्तरावरील पोर्टल मध्ये माहिती भरते वेळेस अद्ययावत आदेशाचे वाचन करण्यात येते. त्याचप्रमाणे शाळास्तरावरील नोंदवह्या मध्ये सुद्धा सर्व प्रकारची माहिती प्रपत्र आधुनिक पद्धतीने छापण्यात आले असून सर्व शाळांमध्ये उपलब्ध असून त्यांचा रोज वापर करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत करारनामे शाळास्तरावर देण्यात आले आहे.

(२) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदुळ वाहतुक व धान्यादी मालाचा पुरवठा करणेसाठी नोंदणीकृत शासकीय/सहकारी/कार्पोरेट/ इतर मक्तेदार यांच्याशी मा. शिक्षण संचालक, प्राथमिक संचालनालय, पुणे यांच्यासोबत निविदेचा करार करण्यात आलेला असून त्यात सर्व प्रकारचे बदल/फेरबदल/रद्दबातल इ. अधिकार मा. संचालक, पुणे यांच्याकडे अबाधितपणे ठरवून ठेवण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये दि. ३० ऑक्टोबर २०११ पर्यंत महाराष्ट्र राज्य को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन मार्फत साई मार्केटिंग ॲन्ड ट्रेडिंग कंपनी जळगांव व दिनांक १ नोव्हेंबर २०११ पासून महाराष्ट्र राज्य को ऑपरेटिव्ह कंन्झुमर्स फेडरेशन मुंबई यांना मक्ता देण्यात आला होता. यामध्ये दिनांक ३० ऑक्टोबर, २०११ पर्यंत मूळ मक्तेदाराने तिरूपती सप्लायर्स, औरंगाबाद यांना फक्त माल वाहतुकीचा सर्व ठेका देण्यात आलेला होता व तो नियमानुसार मक्तेदाराला करारनामा करण्याचा अधिकार आहे. यामध्ये कोणतीही अनियमितता नाही. या कालावधीतील सर्व देयके महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन यांनाच अदा करण्यात आलेले आहे. तिरूपती सप्लायर्स औरंगाबाद यांना कोणताही पुरवठा आदेश देण्यात आला नसून त्यांना काहीही रक्कम देण्यात आलेली नाही. त्यांचा माल वाहतुकीचा करारनामा नस्ती सोबत जोडला गेल्याने सदरहू विषय चर्चीला गेला आहे.

(३) संचालकांनी ज्या शासकीय मक्तेदार एजन्सीशी मुळ करार केला आहे त्यांनाच पुरवठा आदेश दिला असून त्यांनाच म्हणजे महाराष्ट्र राज्य स्टेट को ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन यांना दि. ३० ऑक्टोबर २०११ पर्यंत व महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह कंन्झुमर्स फेडरेशन यांना दि. १ नोव्हेंबर, २०११ पासून पुरविलेल्या मालाची देयके तपासून रक्कम अदायगी करण्यात आली असून या संदर्भात कोणत्याही अधिकारी कर्मचारी यांनी काहीही अनियमितता केलेली नसल्याने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० च्या कलम नुसार कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

(४) सन २०१३-१४ मधील मुदतबाह्य माल सापडले बाबत कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार अन्न व औषध प्रशासन आयुक्त यांना असून मा. उपायुक्त अन्न व औषध प्रशासन जळगांव यांनी विहित वेळेत मुदतबाह्य मालाची योग्य प्रकारे विल्हेवाट लावून कार्यवाही शिल्लक नसल्याचे दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषदेकडील पॅनलवरील वकील श्री. मोहन देशपांडे यांचा अभिप्राय घेण्यात आलेला आहे. मुळात सदरहू मुदतबाह्य माल मक्तेदाराने शाळांना पुरविण्यासाठी नव्हे तर नष्ट करण्यासाठी गोडाऊन मध्ये स्वतंत्र रित्या ठेवले होते व त्यावर ठळक अक्षरात दिसेल असे बोर्ड ज्यावर नमुद होते की, “ Not for sale or supply” असे पंचनाम्यात नमूद केले आहे.

(५) सन २०१६-१७ मधील तांदुळ वाहतुकीतील तांदुळ सापडल्यामुळे जिल्हा परिषद शाळांमधील नऊ मुख्याध्यापकांचे निलंबन दि. २२ ऑगस्ट २०१६ रोजी करण्यात आले आहे. तसेच, त्यांची खातेनिहाय चौकशी सुरू आहे. पर्यवेक्षकीय दुर्लक्ष करण्याचे दोषामुळे श्री. सचिन मगर, अधीक्षक, शालेय पोषण आहार यांना दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६ रोजी निलंबित करण्यात येऊन त्यांचेवर खातेनिहाय चौकशी सुरू आहे. प्रस्तुत प्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन जळगाव कडे गुन्हा दाखल असून मुख्याध्यापक व संबंधित व्यक्ती अशा एकूण २० आरोपींविरुद्ध दोषारोप

पत्र मा. न्यायालय, जळगांव येथे दाखल करण्यात आलेले आहे. याबाबत मा. पोलीस निरिक्षक, जळगांव यांनी दि. ६ डिसेंबर, २०१७ रोजी अहवाल दिला आहे.

(६) इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट अंतर्गत करण्यात आलेले करार / स्टँडर्ड बिल्डींग डाक्युमेंट मधील मंजुर दर भारतीय बाजारपेठेतील विविध शासकीय संस्था / कार्पोरेट कंपनी / इतर नोंदणीकृत मक्तेदार संस्था यांचेकडून निविदा मागवून निश्चित करण्यात आले असून त्यासंबंधीचे संपुर्ण अधिकार मा. संचालक, प्राथमिक शिक्षण, पुणे यांना आहेत. मे. साई मार्केटिंग आणि कंपनी यांच्या करारनाम्याची मुदत दि. ३१ मे, २०१७ पर्यंत होती. नवीन मक्तेदार निश्चित झाला नसल्याने माहे जून, जुलै साठी पुरवठा आदेश रु. १५५ प्रती किलो देण्यात आला होता. नवीन मक्ता दि. ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी निश्चित झाल्यानंतर त्यामध्ये तुरडाळ प्रती कि.लो रु. ५५ आहे. तथापि, तुरडाळ सप्लायरने जरी रु. १५५ प्रती किलो पुरवठा केला असला तरीदेखील संचालनालयाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दि. ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या करारातील तुरडाळीच्या दराप्रमाणे मक्तेदारास रक्कम सुधारित दराने अदा करण्यात आल्याने खर्चात मोठ्या प्रमाणात बचत झाली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :—**

(१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळांमध्ये योजनेची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होणे आवश्यक आहे. यासाठी योजनेबाबतची माहिती, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले महत्त्वाचे शासन निर्णय, परिपत्रके तसेच, पुरवठेदारासोबत केलेला करारनामा समाविष्ट असलेली नोंदवही प्रत्येक पात्र शाळेमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पंचायत राज समितीच्या उस्मानाबाद जिल्ह्याच्या साक्षीदरम्यान शालेय पोषण आहार योजना राबविणाऱ्या प्रत्येक घटकाला पुरवठेदारासोबत केलेल्या तरतुदीची माहिती असणे आवश्यक असल्याने प्रत्येक केंद्र स्तरावर याबाबत जनजागृती बैठका घेण्याचे निर्देश दिले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत शासनाच्या दि. १ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये शिक्षण संचालक (प्राथ.) यांना कळविण्यात आले आहे.

सदरप्रमाणे बैठकांचे आयोजन करण्याबाबत सविस्तर सूचना सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिनांक ०३ मार्च, २०१८ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. त्यानुसार करारनाम्यातील तरतुदीची माहिती जनजागृती बैठकांच्या माध्यमातून देण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे.

शालेय पोषण आहार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी MDM Portal सुरू करण्यात आले आहे. सदर पोर्टलवर दररोज योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती शाळेमार्फत भरली जाते. प्रस्तुत MDM पोर्टलवर करारनाम्याची प्रत माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागात तांदूळ वाहतूक आणि ग्रामीण भागात तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदेद्वारे दरवर्षी जिल्हानिहाय पुरवठेदार नियुक्त करण्यात येतात. निविदेमार्फत नियुक्त पुरवठेदारासोबत करारनामा करण्यात येतो. तसेच, नियुक्त झालेल्या पुरवठेदारास धान्यादी मालाची मागणी केली जाऊन पुरवठा करण्यात आलेल्या धान्यादी मालाची देयके अदा केली जातात.

नियुक्त करण्यात आलेल्या संस्थांच्या उपविधी मधील तरतुदींनुसार त्यांचेमार्फत पुरवठेदारांची नियुक्ती केली जाते. सदर पुरवठेदारांकडून पुरवठा करून घेण्याची जबाबदारी संबंधित सहकारी संस्थांची आहे.

(३) याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, जळगांव यांनी दिलेल्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

(४) याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, जळगांव यांनी दिलेल्या अभिप्रायाशी हे विभाग सहमत आहे.

(५) याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, जळगांव यांनी दिलेल्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

(६) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागात तांदूळ वाहतूक आणि ग्रामीण भागात तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी जिल्हानिहाय ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येते.

निविदा प्रक्रियेंतर्गत व्यापारी लिफाफ्यामध्ये नमूद केलेले दर तत्कालीन बाजारभाव विचारात घेऊन नमूद करण्यात येतात. सदर दरामध्ये शाळास्तरापर्यंत धान्यादी मालाच्या वाहतुकीच्या खर्चाचा समावेश असतो. ई-निविदा प्रक्रियेव्दारे निश्चित केलेल्या पुरवठेदारासोबत पुढील एक वर्षाच्या कालावधीकरिता धान्यादी मालाचा पुरवठा करण्याबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावर करारनामा करण्यात येतो. सदर वर्षभरात बाजारातील धान्यादी मालाचे दर कमी किंवा जास्त झाले तरीही करारनाम्यात नमूद केलेल्या दरानुसार धान्यादी मालाची रक्कम पुरवठेदारास अदा केली जाते.

माहे जून व जुलै, २०१७ मध्ये पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची देयके बाजारभावातील दराप्रमाणे अदा करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यानुसार सदर महिन्यासाठी पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची देयके संबंधित पुरवठेदारास अदा केली आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, धान्यादी मालाच्या साहित्याबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी शाळांमध्ये होत असल्याने करारनाम्याची प्रत सर्व शाळांमध्ये देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, यावर अप्पर मुख्य सचिव यांनी खुलासा केला की, या संदर्भात लेखी माहिती सादर केलेली आहे. जे करार होतात त्याची प्रत विविध माध्यमातून शाळांपर्यंत पोहोचविण्यात येते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, आता शाळांकडे करारनाम्याची प्रत पाठविली जाते काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, शाळांकडे करारनाम्याची प्रत उपलब्ध असते.

यावर समितीने निदेश दिले की, विभागाने "अे" ग्रेडचा माल असावा असा करारनामा केलेला आहे. परंतु, "अे" ग्रेडचा माल पुरविला जातो काय हे विभागाने तपासून घ्यावे. समितीने मागील आठवड्यात वर्धा जिल्ह्याचा दौरा केला. वर्धा शहरातील शाळेमधील ७० टक्के विद्यार्थी शाळेत जेवण करीत नाहीत, ते विद्यार्थी घरुन डबे आणतात. परंतु, मागणी मात्र तेवढीच असते. हा संशोधनाचा विषय आहे. विभागाने यामध्ये लक्ष घातले पाहिजे. शालेय पोषण आहाराचे एका जिल्ह्याचे प्रत्येक महिन्याचे देयक १ कोटी रुपये आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सरल प्रणालीमध्ये सर्व विद्यार्थ्यांची नावे असतात. त्यामुळे आता तसे होत नसावे.

## अभिप्राय व शिफारशी

जळगांव जिल्हा परिषदेमध्ये शालेय पोषण आहार योजनेकरिता रुपये ९,९१,३६,२५९ एवढी रक्कम खर्च झालेली आहे याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. दिनांक २६ फेब्रुवारी, २०१० रोजीच्या शालेय पोषण आहार योजनेच्या परिपत्रकानुसार गट स्तरावर तांदूळ वाहतूक तसेच इतर धान्यादी मालाचा पुरवठा एकाच वेळी करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही, माल उशीरा प्राप्त झाल्याबाबत ०.५ टक्के दंडाची रक्कम वसूल केलेली नाही. जिल्हा स्तरावर भरारी पथके व ग्रामशिक्षण समितीने स्थानिक पातळीवर अन्नधान्य व आहाराचा दर्जाबाबत वेळोवेळी तपासणी केलेबाबतचा अहवाल नस्तीसोबत जोडला नाही. पुरवठा करावयाच्या पावत्याबाबत पाचोरा तालुक्यातील देयका सोबत पांढरी पावती जोडून देयक पारित करण्यात आलेले आहे करारनाम्यानुसार कार्यवाही केलेली नाही धान्यादी मालाच्या पुरवठा केलेल्या पावत्यावर मुख्याध्यापकांची स्वाक्षरी नाही. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार खाद्यतेल किलोग्रॅम मध्ये पोहोच करणे आवश्यक असताना ते लिटर (९१० मि.ग्रॅ.) मध्ये करून पोहोच केलेले असताना देयक प्रदान करताना त्याचे रुपांतर किलोग्रॅम मध्ये करून देयक अदा केलेली आहेत. याबाबत साठा नोंदवही नमूद असल्याने सदर खाद्यतेलाचा पुरवठा पाऊच मध्ये केला असल्यास संबंधितकडून रक्कम रुपये १३,४३,०८३ वसूल करणे आवश्यक आहे. पुरवठाधारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे नमुने प्रत्येकी २५० ग्रॅम प्रमाणे गट शिक्षण अधिकारी/अधीक्षक शालेय पोषण आहार यांनी त्यांच्या पत्रासोबत शासकीय प्रयोगशाळेत पाठविणे आवश्यक असताना मक्तेदाराने स्वतःच्या पत्रानुसार नमुने उक्त प्रयोगशाळेत पाठवून तपासणी अहवाल प्राप्त केलेला आहे त्यामुळे धान्यादी मालाचा योग्य दर्जा असण्याची अचुकता प्रमाणित करता येत नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपावर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत समितीने मुख्य कार्यकारी यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षात तांदूळ व धान्यादी मालाचे पुरवठादार महाराष्ट्र राज्य उपभोक्ता महासंघ लिमिटेड, मुंबई हे होते तसेच ठेकेदार तिरूपती सप्लायर्स हे होते महाराष्ट्र राज्य कन्झ्युमर्स फेडरेशन सोबत शालेय पोषण आहार पुरवठा करण्याबाबतचा करार केलेला आहे व देयक तिरूपती सप्लायर्स या ठेकेदाराला दिलेला आहे. करारनाम्यामध्ये अटी व शर्तीनुसार माल कशा पद्धतीने घ्यावा यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत, परंतु शालेय पोषण आहाराचा पुरवठा प्रत्यक्ष शाळांमध्ये होत असल्याने करारनाम्याची प्रत शाळांमध्ये देण्यात आलेली नाही. जिल्हा परिषदेने मुख्याध्यापकांना करारनाम्याची प्रत उपलब्ध करून दिली असती तर शालेय पोषण आहाराचा माल खराब असल्यास तो स्वीकारू नये व "अ" श्रेणीचा माल बाहेरून खरेदी करावा या तरतुदी लक्षात घेऊन मुख्याध्यापकांना शालेय पोषण आहाराबाबत नियोजन करणे सोयीचे झाले असते असे समितीचे स्पष्ट मत आहे.

तसेच शासनाने जो करारनामा केला आहे त्यानुसार किरकोळ कंत्राट (Petty Contract) कोणालाही देता येत नाही असे असताना तिरुपती सप्लायर्स या त्रयस्थ पक्षाच्या नावाने देयक अदा करण्यात आले आहे. महाराष्ट्र कंझ्युमर्स फेडरेशन सोबत दर करार (Rate Contract) केला आहे सदर दर कराराप्रमाणे जे विक्रेता (Dealer) असतात ते पुरवठा करतात अशी तरतूद आहे या वरून असे दिसून येते की तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी कोणत्याही बाबी तपासलेल्या नाहीत व तिरुपती सप्लायर्स या ठेकेदाराला देयक अदा केले आहे.

तसेच तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार शालेय पोषण आहाराचा पुरवठा झाला आहे किंवा कसे याबाबतची माहिती जाणून घेतलेली नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते त्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, तिरूपती सप्लायर्स एजन्सीचा काहीही संबंध नसताना सदर एजन्सी समवेत करारनामा करण्यात आला आहे. विहीत मुदतीत शालेय पोषण आहाराचा पुरवठा न केल्याप्रकरणी ५ टक्के दंडाची रक्कम वसुली करणे आवश्यक असताना दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. यासंदर्भात समितीकडे गंभीर तक्रारी प्राप्त झालेल्या असल्याने प्रस्तुत प्रकरणी फार मोठी अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे. तसेच शालेय पोषण आहार पुरवठ्याचे नमुने दोषपूर्ण आढळले असून ते अन्न व औषध प्रशासन विभागाला पाठविण्यात आले होते, यामध्ये विवादात्मक पुरवठा करण्यात आला असा मुद्दा होता की तुरडाळीची किंमत त्यावर्षी १५० रुपयांच्या आसपास होती. मुदतवाढ देताना मात्र रुपये ५३ ते ६० प्रति किलोग्रॅमच्या आसपास होती. मुदतवाढ असल्यामुळे जुन्याच दराने म्हणजेच १५० रुपयांच्या दराने तुरडाळ पुरवठा करण्यात आला होता, त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. शालेय पोषण आहार पुरवठा करण्यासाठी केवळ वार्षिक प्रशासन अहवालाच्या आधारावर जिल्हा परिषदेची मंजुरी घेण्यात येते. **शालेय पोषण आहाराच्या करारनाम्याची प्रत प्रत्येक शाळेच्या व्यवस्थापन समितीकडे दिली जात नाही. अन्न व औषध प्रशासन विभागाकडून प्राप्त झालेल्या नमुन्यासंदर्भातील अहवालामध्ये निरंक म्हणून अहवाल प्राप्त आहेत. शालेय पोषण आहाराच्या चोरीच्या गाड्या पकडल्या गेल्या परंतु, याप्रकरणी संबंधित कोणत्याही व्यक्तिविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला नाही. सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये प्रकरण घडलेले असून त्यानंतर शालेय पोषण आहार घेऊन जात असलेला ट्रक जप्त करण्यात आला होता. तसेच दिनांक १ जुलै, २०१६ ते २० नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत पंचायत समिती, जामनेर अंतर्गत शालेय पोषण आहारामध्ये झालेल्या अनियमिततेप्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल करण्याबाबत लेखी अर्ज देऊनही पोलीस ठाणे अंमलदारांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला नाही ही बाब अत्यंत गंभीर असून त्याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**यावरून समितीचे स्पष्ट मत आहे की, जळगांव जिल्हा परिषदेच्या शालेय पोषण आहार योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, जळगांव

## गणवेश अनुदान वाटपाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८९/६ (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद, जळगांव अंतर्गत वर्ग १ ते ४ च्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना मोफत शालेय गणवेश पुरविणे योजना राबविण्यासाठी गट स्तरावर रक्कम रु. ५०,१६,५१९ अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) नमुन्या नुसार कापड खरेदी केलेबाबत शिलाई व अल्पबचत गटाकडून केलेबाबत तसेच ग्राम शिक्षण समितीने खरेदी केलेल्या कापडाचा दर्जा उत्कृष्ट व चांगला आहे याबाबत शासनमान्य प्रयोगशाळेकडून तपासणीचा अहवाल प्राप्त केलेला नाही.

(२) ग्राम शिक्षण समित्यांनी स्थानिक स्तरावर गणवेश शिलाई केल्यानंतर गट शिक्षण अधिकारी यांनी शाळांची तपासणी रुपये न शिवलेले गणवेश योग्य मापात असल्याचे प्रमाणित रुपये न तसा अहवाल शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प.जळगांव यांना सादर केल्याचा अहवाल पहावयास मिळाला नाही.

(३) शाळानिहाय निवडलेले लाभार्थी व हजर लाभार्थी व लाभ घेतलेले लाभार्थी यांचा विचार करून खर्च अहवाल प्राप्त नाही.

(४) प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थी च्या अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाची योजना सन १९७७-७८ पासून राबविण्यात येत आहे. त्यानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्याचा शासनाचा उद्देश व प्राथमिक शिक्षकांच्या सशक्तीकरणाचे उद्दिष्ट साध्य झालेबाबतचा अहवाल पहावयास मिळाला नाही.

(५) गणवेश वाटप करतांना विद्यार्थी (लाभार्थी) दारिद्रय रेषेखालील आहेत किंवा नाहीत याबाबतचा पुरावा प्राप्त करून दप्तरी ठेवलेला नाही.

(६) मोफत गणवेश वाटपाची योजना सर्व शिक्षा अभियानामार्फतसुद्धा राबवली जात असल्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत राबविलेल्या योजनेतील लाभार्थ्यांना दुबार लाभ झाला किंवा कसे याची अचुकता प्रमाणित करता आली नाही.

(७) कापड खरेदी व शिलाईची प्रक्रिया पूर्ण झालेनंतरचा अहवाल संचालनालयाने प्राथमिक शिक्षण पुणे यांना सादर केलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शासन निर्णय पीआरई/२००३/१७/२००३, दिनांक २० मे, २००४ नुसार या योजने अंतर्गत कापड खरेदी व शिलाई करून घेण्याची कार्यवाही ही ग्राम शिक्षण समितीची व मुख्याध्यापक यांची आहे. मात्र ग्राम शिक्षण समितीने खरेदी केलेल्या कापड व शिलाईबाबत कोणतीही तक्रार नसल्याने कापड व शिलाई दर्जा चांगला असल्याचे दिसून येते.

(२) ग्राम शिक्षण समित्यांनी स्थानिक स्थरावर शासन निर्णयात नमूद केल्यानुससार स्थानिक महिला बचत गट तसेच स्थानिक टेलर (शिंपी) यांचेकडून विद्यार्थ्यांच्या मापानुसार गणवेश शिलाई करून घेतलेले आहेत.

(३) शाळानिहाय पात्र व निवडलेले विद्यार्थी यांची संख्या विचारात घेऊन ग्राम शिक्षण समितीने खर्च केलेला आहे. खर्चाचा अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र गट शिक्षणाधिकारी यांचकडे आहेत.

(४) गळतीचे प्रमाण कमी करणे संदर्भात शासनाचे धोरणात्मक निर्णयाप्रमाणे शालेय पोषण आहार, उपस्थिती भत्ता लेखन साहित्य इ. प्रोत्साहनपर योजना राबवून गळतीचे प्रमाण कमी करणेसाठी कार्यवाही करणेत येत आहे. त्यामुळे गळतीचे प्रमाण कमी झाले आहे.

(५) शासन निर्णय दिनांक २० मे, २००४ मध्ये नमूद केल्यानुसार इ. १ ली ते ४ थी पर्यंत सर्व विद्यार्थी यांना गणवेश पुरविणेबाबत निर्देश आहेत. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना गणवेश पुरविले आहेत.

(६) जिल्हा परिषद मार्फत राबविलेल्या गणवेशाबाबत अनुदान व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दुबार गणवेशाचा लाभ दिलेला नाही. याबाबत खातरजमा केलेली आहे.

(७) महाराष्ट्र शासन निर्णय पीआरई/२००३ /(१७/२०१३) प्राशि-४, दिनांक २० मे, २००४ नुसार योजनांची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार कापड खरेदी व शिलाई प्रक्रिया पूर्ण झाल्याने वेळावेळी वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जळगांव जिल्हा परिषदेने शाळानिहाय निवडलेले लाभार्थी व उपस्थित लाभार्थी याचा मेळ घेऊन गटशिक्षण अधिकारी यांचा अहवाल व वरिष्ठ कार्यालयास कापड खरेदी व शिलाईचे अहवाल लेखा परीक्षणावेळी उपलब्ध न करून देण्याची कारणे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासन निर्णय पीआरई/२००३/१७/२००३ दिनांक २० मे २००४ नुसार या योजनेंतर्गत कापड खरेदी व शिलाई करून घेण्याची कार्यवाही ही ग्राम शिक्षण समितीची व मुख्याध्यापक यांची आहे.

यावर समितीने विचारणा केली की, लेखापरिक्षण झाल्यानंतर त्रूटींची पुर्तता करण्यासाठी किंवा योग्य ते म्हणणे मांडण्यासाठी लेखापरिक्षक यांच्याकडून मुदत दिली जाते. या मुदतीच्या काळामध्ये त्रूटींची पुर्तता पूर्ण करणे आवश्यक होते. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी समितीस विदित केले की, लेखापरिक्षण झाल्यानंतर संबंधितांना ०३ वेळेस संधी दिली जाते. तसेच त्यांच्याकडून काही अभिलेखे मागितले जातात. संबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर परिच्छेद नस्तीत ठेवला जातो. तसेच संबंधितांचे काही म्हणणे आहे काय, असेही संबंधितांना विचारले जाते व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जाते.

समितीने असे मत व्यक्त केले की, लेखापरिक्षक यांनी मागितलेली माहिती जिल्हा परिषदेने पूर्णपणे सादर केली नाही. गणवेश वाटप झाले असते, देयक अदा झाले असते तर जिल्हा परिषदेने लेखापरिक्षक यांना पूर्ण माहिती दिली असती. आक्षेप घेण्यात आला तेव्हा या बाबी दाखविल्या पाहिजे होत्या. लेखापरिक्षण झाल्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे परिच्छेद येत असतात. संबंधित विभागाकडून लेखापरिक्षणामधील सर्व बाबी पूर्ण करून घेण्याची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची असते. अधिकाऱ्यांना सांगूनही ते योग्य ती माहिती पूर्ण करण्यास सहकार्य करीत नसतील तर त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणले पाहिजे होते. याचाच अर्थ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या बाबी पूर्ण करण्यास असक्षम राहिले. लेखापरिक्षक यांच्या परिच्छेदांमधील बाबी पूर्ण करण्यासंदर्भात खाते प्रमुख यांना पत्र दिले असेल तर ते समितीला दाखवावे.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पत्रव्यवहार झाला आहे असा खुलासा केला. तद्नंतर समितीने विचारणा केली की, ३ वेळा लेखा आक्षेप निघाले. ३ वेळा कळविल्यानंतर जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक १३ जूनला नोटीस दिली होती. त्यावेळी बाब लक्षात आली की, राज्य हातमाग महामंडळाने पुरवठा केला होता. या संदर्भात पाहण्याची गरज होती. वेळेवर पोहचले की नाही, याची तपासणी करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी अहवाल सादर करतील.

यावर समितीने विचारणा केली की, गणवेश वाटप झाले की नाही, शाळा व्यवस्थापन समितीला पैसे दिले जातात, त्याची तपासणी करण्याचे अधिकार केंद्र प्रमुख, शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांना आहे, त्यांनी तपासणी केली नाही काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, उशीर झाला आहे, ही जबाबदारी होती, संबंधितांनी लक्षात आणून देणे गरजेचे होते.

यावर समितीने विचारणा केली की, केंद्र प्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी केली नाही काय, त्यांची नेमकी जबाबदारी काय आहे, संबंधितांना कोणते काम वाटून दिले आहे, शाळेपर्यंत जाऊन तपासणी करण्याची संबंधितांची जबाबदारी नाही काय, आपण शाळा व्यवस्थापन समितीला फक्त पैसे देतो. दिलेल्या पैशांची अंमलबजावणी होते की नाही, हे पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे, त्यामुळे त्यांची या संदर्भात जबाबदार निश्चित केली पाहिजे. यामध्ये सर्वजण जबाबदार आहेत, त्यामुळे सर्व संबंधितांची चौकशी झाली पाहिजे. तसेच गणवेश वाटपाची सद्यःस्थितीत काय परिस्थिती आहे.

यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, शाळेला अनुदान वितरित करण्यात येते. ग्राम शिक्षण समिती व मुख्याध्यापक यांच्या संयुक्त खात्यामध्ये पैसे दिले जातात. यावर समितीने अशी विचारणा केली की, गणवेश कोणाला दिले जातात, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, एससी, एसटी प्रवर्गातील विद्यार्थी, सर्व मुली, दारिद्र्यरेषेखालील मुले यांना गणवेश दिले जातात.

पुढे समितीने असे मत व्यक्त केले की, ओबीसी प्रवर्गामध्ये किंवा खुल्या प्रवर्गामध्ये एखादा विद्यार्थी असेल तर त्याचे काय, जिल्हा परिषद शाळेत येणारा विद्यार्थी गरीबच असतो. ओबीसी प्रवर्गातील किंवा खुल्या प्रवर्गातील गरीब विद्यार्थ्याचा विचारच केला जात नाही. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, दारिद्र्य रेषेखालील मुलांचा विचार केला जातो. खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी असला तरी दारिद्र्य रेषेखालील असणाऱ्या कुटुंबामध्ये त्याचा विचार केला जातो. द्रारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या यादीत नाव नसेल तर लाभ मिळत नाही. जिल्हा परिषद शाळेत येणारा मुलगा गरीबच असतो. सर्वांना गणवेश मिळाला पाहिजे. एखाद्या विद्यार्थ्याच्या पालकांचे नाव दारिद्रय रेषेखालील कुटुंब असलेल्या यादीमध्ये नसेल तर तो विद्यार्थी सधन कुटुंबातील आहे, असा त्याचा अर्थ होत नाही. द्रारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या यादीमध्ये पालकांचे नाव नाही,

मात्र तो विद्यार्थी गरीब आहे, मग त्याला लाभ मिळाला नाही तर त्या विद्यार्थ्यांचा अवसानभंग होतो, हा मुद्दा महत्त्वाचा आहे, सदर मुद्दा विभागीय सचिवांच्या साक्षीला घेण्यात येईल.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, शाळांच्या संदर्भात वारंवार अनियमितता दिसत आहे. दिलेल्या कार्यक्रमामध्ये गणवेश वाटप का केले नाही. गणवेश शिलाईसाठी का दिले नाहीत, खरेदी का केली नाही, उशीर का केला, कोणी उशीर केला, कोणी लक्ष घातले नाही, या सर्व प्रश्नांची उत्तरे अभिलेख्यावर आली पाहिजेत. तीन वेळा कळविल्यानंतर देखील कारवाई होत नाही, हे बरोबर नाही. सर्व प्रश्नांच्या संदर्भात चौकशी करून सविस्तर अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करावा. सदर विषयाच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, अर्धे वर्ष संपले आहे. चालू वर्षाचे गणवेश विद्यार्थ्यांना मिळाले का, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, पैसे मुख्याध्यापकांच्या खात्यावर दिले आहेत. आता थेट लाभ हस्तांतरणामध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांना विद्यार्थ्यांचे गणवेश घ्यायचे आहेत, त्याची पावती मुख्याध्यापकांना दिल्यावर पैसे खात्यावर वर्ग होणार आहेत. यावर समितीने विचारणा केली की, गणवेशासाठी किती रक्कम देणार आहात, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, ४०० रुपये देणार आहोत. यावर समितीने विचारणा केली की, आता जिल्ह्यात जेवढे विद्यार्थी आहेत, त्यांची किती रक्कम आली, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, रु.४,३९,८२,८०० इतकी रक्कम आली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सर्वांचे गणवेश आले आहेत का, पैसे शिल्लक नाहीत, याचा आढावा घेतला आहे काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, होय. ६०,३२७ खाते ओपन झाले आहेत. अजून १,५९,६१९ लाभार्थी आहेत. यावर समितीने विचारणा केली की, अजून १ लाख विद्यार्थ्यांचे खाते उघडणे बाकी आहे, हे कधी होणार आहे, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, बँकेत अडचणी येत आहेत, झिरो बॅलन्स खाते ओपन होत नाही. यावर समितीने विचारणा केली की, आपण ही बाब कोणाच्या लक्षात आणून दिली आहे का, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, झिरो बॅलन्स खाते सुरू होत नाही ही बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिली आहे. यावर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सांगितली आहे का, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, होय, पत्रही दिले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले आहे. सर्व बँकांना पत्र दिले आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर विषयाच्या संदर्भात अडचणी येत होत्या. जिल्हाधिकाऱ्यांच्याही लक्षात ही बाब आणून दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांच्या व्यवस्थापनाला सूचना दिल्या आहेत. पोस्टाने देखील सहकार्य केले आहे. दिशा समितीमध्ये सन्माननीय खासदारांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. सन्माननीय खासदारांनी सूचना केली होती. मात्र संयुक्त खात्यामुळे वेळ लागतो. त्या दृष्टीने विद्यार्थ्याच्या किंवा पालकाच्या नावाने आरटीजीएसी करावे, अशी बाब पुढे आली आहे. आरटीजीएसची नोंद असते, ती नोंद तपासता येऊ शकते. उशीर होऊ नये म्हणून तसा प्रस्ताव सादर केला आहे. पोस्टाच्या माध्यमातून लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येत आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आता ६ महिने झाले आहेत. परीक्षा संपली आहे, दिवाळीची सुट्टी संपली आहे, दुसरे सत्र सुरू होत आहे. एक लाख विद्यार्थ्यांना गणवेश मिळत नाहीत, हे योग्य नाही. सहकारी बँकेत झिरो बॅलन्सवर खाते उघडता येते, एसबीआयमध्ये खाते उघडता येत नाही, बाकी सर्व ठिकाणी खाते उघडता येते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, एकूण विद्यार्थ्यांची संख्या १ लाख ६५ हजार असल्याबाबत सांगितले आहे. लाभार्थ्यांची संख्या १ लाख ५९ हजार आहे. फक्त मुली व आरक्षणातील विद्यार्थी यांना गणवेशाचा लाभ होतो. जिल्ह्यात गणवेश देण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, १,५९,५७९ पात्र विद्यार्थी आहेत. गेल्या वर्षीच्या पटसंख्येवरुन सांगत आहे. यावर समितीने विचारणा केली की, जिल्ह्यात एकूण विद्यार्थी संख्या किती आहे, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, जिल्ह्यातील एकूण विद्यार्थी संख्या ३,५९,६१४ आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, दीड लाखांचा फरक निघालेला आहे. राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडले जात आहेत. एक लाख विद्यार्थ्यांचे खाते उघडलेच गेले नसतील तर यंत्रणा काही कामच करीत नाही, असे दिसते. पहिले सत्र संपले आहे. खाते उघडली गेली पाहिजे होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेने गेल्या ३ महिन्यांत हा आकडा खाली आणला आहे. आम्ही अजून तातडीने खाते उघडण्याचा प्रयत्न करतो.

यावर समितीने मत व्यक्त केले की, पहिले सत्र संपले आहे. दुसरे सत्र सुरू होत आहे. ६ महिने खाते उघडत नाहीत. विद्यार्थ्यांना अशा पद्धतीने लाभ मिळणार नाही. एक लाख विद्यार्थ्यांचे खाते उघडायची आहेत. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या संदर्भातील हा गंभीर मुद्दा आहे. आपण ३ महिन्यांत विद्यार्थी व आई यांची किती संयुक्त खाते उघडली आहेत काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, ६०,०२७ खाते उघडली आहेत. कोणत्या बँकेत किती खाते उघडली आहेत, त्याची माहिती द्यावी. लिड बँकेच्या प्रतिनिधीला बोलाविले आहे का लाभाची,

कल्याणकारी योजना आहे. विद्यार्थ्यांची खाते उघडली पाहिजेत, तरच त्यांना त्या योजनेचा लाभ देता येईल, बँकनिहाय किती विद्यार्थ्यांची खाते उघडली आहेत, त्याची देखील माहिती सादर करण्यात यावी, हा महत्त्वाचा विषय आहे त्यामुळे आपण हा मुद्दा देखील विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप झाले किंवा नाही तसेच शाळा व्यवस्थापन समितीला दिलेल्या पैशांची अंमलबजावणी होते किंवा नाही या अनियमिततेबाबत संबंधितांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यामध्ये काय आढळून आले ?

(२) अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत शासनाची नेमकी भुमिका स्पष्ट करण्यात यावी ?

(३) सदरहू कार्यक्रमामध्ये गणवेश वाटप न करणे, शिलाईसाठी न दिले जाणे या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय ?

उर्वरित एक लाख विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे काय, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले असून शाळा व्यवस्थापन समितीमार्फत पैशांची अंमलबजावणी केलेली आहे. सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता झालेली नाही त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्‌भवला नाही.

(२) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण, शासन निर्णय दि. २० मे २००४ नुसार जिल्हा परिषदेने चालविलेल्या इ. १ ली ते ४ थीतील अनुसूचित जमातीचे विद्यार्थी तसेच अनुसूचित जमाती व भटक्या जमातीतील विद्यार्थी यांना शासकीय मोफत गणवेश पुरवठ्याची योजना लागू आहे. अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश योजना लागू नाही. तसेच, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयाच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळातील सर्व मुली, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील मुले यांना योजनेचा लाभ देण्यात येतो. सबब, खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश योजनेचा लाभ देण्यात येत नाही.

(३) गणवेश वाटप करणे संदर्भात कोणत्याही तक्रारी / अनियमितता झालेली नसल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही व त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवला नाही. मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या दि. १४ डिसेंबर २०१७ च्या पत्रानुसार विद्यार्थी व आई यांच्या संयुक्त खात्याचा आग्रह न धरता विद्यार्थी व आई किंवा वडील आणि आई वडील नसल्यास पालकांच्या वैयक्तिक आधार सलग्न खात्यावर गणवेश लाभाची रक्कम वर्ग करता येईल अशा सूचना प्राप्त झाल्यानुसार उपलब्ध खात्यावर सन २०१७-१८ करीता निधी वर्ग करण्यात आला आहे.

सन २०१८-१९ करिता मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र दि. २८ जून २०१८ मध्ये गणवेश पुरवठ्याबाबत संपूर्ण अधिकार संबंधित शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीस असल्याने शाळेतील गणवेश पात्र लाभार्थ्यांच्या वयोगटानुसार व विद्यार्थ्यांच्या मापानुसार मुलांसाठी व मुलींसाठी गणवेश खरेदी करून वितरीत करण्यात यावे असे नमूद आहे. आजमितीस सन २०१७-१८ च्या योजनेच्या एकूण १,६१,३७० इतक्या लाभार्थी विद्यार्थ्यांपैकी १,४८,२७३ विद्यार्थ्यांचे बँकेत खाती उघडण्यात आली असून उर्वरित विद्यार्थ्यांची बँकेत खाते उघडण्याची कार्यवाही सुरू आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :—**

(१) याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, जळगांव यांनी दिलेल्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

(२) जिल्हा परिषदेच्या शाळांमधील इ. १ ली ते ४ थी मध्ये शिकणारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जातीचे विद्यार्थी राज्य शासनाच्या मोफत गणवेश वाटप योजनेंतर्गत पात्र आहेत. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना १ गणवेश पुरविण्यासाठी मुलांसाठी प्रति विद्यार्थी रु. ५७ आणि मुलींसाठी प्रति विद्यार्थी रु ६९ अशी तरतूद उपलब्ध आहे.

तसेच, केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश वाटप केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत इ. १ ली ते इ. ८ वी च्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळातील सर्व मुली, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील मुले यांना योजनेचा लाभ देण्यात येतो. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना २ गणवेश पुरविण्यासाठी प्रति विद्यार्थी रु. ६०० अशी तरतूद उपलब्ध आहे.

सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना गणवेश खरेदी करण्यासाठी लागणारी रक्कम शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यामध्ये जमा करण्यात येते. शाळा व्यवस्थापन समितीमार्फत गणवेशाची खरेदी करून विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात येतात.

(३) याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, जळगांव यांनी दिलेल्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

नियोजन विभागाच्या शासन निर्णय दि. ५ डिसेंबर २०१६ अन्वये राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तू स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण, रोख स्वरुपात लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण (DBT) व्दारे करण्याबाबतचा घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामध्ये राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांच्या गणवेशाचाही समावेश आहे. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील एकूण ३७,६२,०२७ इतक्या पात्र लाभार्थ्यापैकी मे, २०१८ अखेर २७,२५,९३६ लाभार्थ्यांची बँक खाती उघडण्यात आली असून यापैकी २२,३८,५२८ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात प्रत्यक्ष रक्कम जमा करण्यात आली आहे. गणवेश खरेदी पावती सादर न केल्याने व काही पालकांना बँक खाते क्रमांक न मिळाल्याने ४,८७,४०८ लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आलेली नाही. सदर योजनेंतर्गत डिसेंबर, २०१७ अखेर बँक खाते उघडण्यात न आलेल्या विद्यार्थ्यांना विहित कालावधीत गणवेश मिळण्यासाठी बँक खात्यात लाभाची तरतूद जमा करण्याच्या योजनेतून सूट देण्यात आली आहे.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात बँक खाती उघडण्यास पालकांना आलेल्या अडचणी, बँकेचे असहकार्य धोरण व लाभापोटी मिळणारी कमी रक्कम इत्यादी बाबी विचारात घेता, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ विहित वेळेत होण्याच्या दृष्टीने DBT धोरणातून शालेय विद्यार्थ्यांचा गणवेश वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस माहिती प्राप्त झाली की, विभागाकडून गणवेश वाटपबाबतचा अभिप्राय आलेला आहे. थेट लाभ हस्तांतरणामधून हे वगळलेले आहे.

यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, या वर्षी गणवेश वाटपाचा मुद्दा थेट लाभ हस्तांतरणामधून वगळलेला आहे. शाळा व्यवस्थापन समितीकडे निधी वाटप केले असून त्या समितीमार्फत गणवेशाचे वाटप करण्यात आले आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०११-१२ मध्ये जिल्हा परिषद जळगांव अंतर्गत वर्ग १ ते ४ च्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना मोफत शालेय गणवेश पुरविण्यासाठी राबविलेल्या योजनेमध्ये गट स्तरावर रक्कम रुपये ५०,१६,५१९ एवढे अनुदान वितरित करण्यात आले होते, याबाबत लेखा परिक्षणामध्ये पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी नमुन्यानुसार कापड खरेदी, शिलाई अल्पबचत गटाकडून केलेबाबत तसेच ग्रामशिक्षण समितीने खरेदी केलेल्या कापडाचा दर्जा उत्कृष्ट व चांगला आहे, याबाबत शासनमान्य प्रयोगशाळेकडून तपासणी अहवाल प्राप्त केलेला नाही. गणवेश शिलाई केल्यानंतर गटशिक्षण अधिकारी यांनी शाळांची तपासणी व गणवेश योग्य मापात शिवलेले असल्याचे अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर केल्याचे पहावयास मिळाले नाही. शाळानिहाय निवडलेले लाभार्थी व हजर लाभार्थी व लाभ घेतलेले विद्यार्थी यांचा विचार करून खर्च अहवाल प्राप्त नाही. मोफत गणवेशाची योजना राबविण्यात येत असूनही मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी झाल्याचे उद्दिष्ट साध्य झाल्याचे पहावयास मिळाले नाही. गणवेश वाटप करताना विद्यार्थी दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही याबाबतचा पुरावा दप्तरी ठेवलेला नाही, लाभार्थ्यांना गणवेशाचा दुबार लाभ झाला किंवा कसे याची अचूकता प्रमाणित करता आली नाही इत्यादी लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, दिनांक २० मे, २००४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मोफत शालेय गणवेश योजनेंतर्गत कापड खरेदी व शिलाई करून घेण्याची कार्यवाही ही ग्रामशिक्षण समितीची व मुख्याध्यापक यांची आहे. लेखा परिक्षण झाल्यानंतर त्रुटींची पूर्तता करण्यासाठी किंवा योग्य ते म्हणणे मांडण्यासाठी लेखापरिक्षक यांच्याकडून संबंधितांना ३ वेळेस संधी दिली जाते तसेच त्यांच्याकडून काही अभिलेखे मागितले जातात. संबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर परिच्छेद नस्तीमध्ये ठेवला जातो तसेच संबंधितांचे काही म्हणणे असल्यास ते ऐकून घेतले जाते. तथापि, लेखापरिक्षकांनी मागितलेली माहिती जिल्हा परिषदेने पूर्णपणे सादर केली नाही. गणवेश वाटप झालेले असते तर देयक अदा करण्यात आलेले असते व जिल्हा परिषदेने लेखा परिक्षकांना पूर्ण माहिती दिली असता लेखा आक्षेप घेण्यात आला तेव्हा या बाबी दाखविल्या पाहिजे होत्या. लेखापरिक्षण झाल्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे परिच्छेद येत असतात संबंधित विभागाकडून लेखापरिक्षणामधील सर्व बाबी पूर्ण करून घेण्याची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची असते. अधिकाऱ्यांना सांगूनही ते योग्य ती माहिती पूर्ण करण्यास सहकार्य करीत नसतील तर त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणले पाहिजे होते. याचाच अर्थ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या बाबी पूर्ण करण्यास असक्षम राहिले.

गणवेश वाटपासाठी शाळा व्यवस्थापन समितीला पैसे दिल जातात त्याची तपासणी करण्याचे अधिकार केंद्र प्रमुख, शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांना आहेत. तथापि उपरोक्त अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यासाठी विलंब झाला असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सबब या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व त्यानुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये येणारा प्रत्येक विद्यार्थी परिस्थितीने गरीब असल्यामुळे दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेशाचा लाभ मिळावा. एखाद्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे नाव दारिद्रय रेषेखालील कुटुंबामध्ये नसल्यास उक्त विद्यार्थी सधन कुटुंबातील आहे असा त्याचा अर्थ होत नाही. त्यामुळे विद्यार्थी गरीब असतानाही गणवेश न मिळाल्यास त्या विद्यार्थ्याचा अवसान भंग होऊ नये या दृष्टीने योग्य ती काळजी घेण्यात यावी. अनुसूचित जाती/जमाती, इतर मागासवर्गीय व दारिद्रय रेषेखालील कुटुंबामधील विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्याचा शासनाचा उद्देश सफल व्हावा अशी समितीची धारणा आहे. याकरिता शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.

**जळगांव जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेंतर्गत एकूण विद्यार्थी संख्या ३,५९,६१४ एवढी असून गणवेशाच्या लाभार्थ्यांची संख्या १ लाख ५९ हजार ५७९ एवढी आहे. फक्त मुली व आरक्षण असलेले विद्यार्थी यांना मोफत गणवेशाचा लाभ होतो. साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, शाळा सुरू होऊन ६ महिने झालेले असतानाही संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बँक खात्यामध्ये गणवेशाची प्रती लाभार्थी रक्कम रूपये ४०० आर. टी. जी. एस. प्रणालीद्वारे बँकमध्ये झिरो बॅलेन्स खाते नसल्यामुळे जमा करण्यात आली नसल्याच्या कारणास्तव सुमारे १ लाख विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहीले, त्यामुळे जिल्हा परिषदेमध्ये अत्यंत निष्क्रीयता व उदासीनता असल्याचे दिसून येते. यावरून जिल्हा परिषदेचे सदर योजनेबाबत पुरेसे गांभीर्य दिसून येत नाही ही बाब अत्यंत खेदजनक असून समिती याबाबत पूर्णपणे असमाधान व तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**जिल्हा परिषदेने विद्यार्थ्यांची कोणकोणत्या बँकेत किती खाती उघडली व सदर योजनेचा लाभ किती विद्यार्थ्यांनी घेतला आहे, याबाबतची सविस्तर माहिती व बँकेत खाते उघडण्यास प्रदिर्घ विलंब केल्याप्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, जळगांव

## एका कामाचे तुकडे / भाग केल्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.२०७/३ (सन २०११-१२)**

बांधकाम विभागाने रक्कम रु. १३,४७,३६६ ची कामे तुकडे करून केलेली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्र.पी.ए.१०८९/प्र.क्र.१०४४/३३ दिनांक २७ एप्रिल, २००० अन्वये अपवादात्मक परिस्थिती वगळता कामाची विभागणी किंवा तुकडे करण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. असे असतांनाही कामाचे तुकडे (भाग) करून काम केलेले आहे. विभागाने वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय व तांत्रिक मान्यता टाळण्याच्या दृष्टीने एकाच साखळीतील कामाची विभागणी करून कामाचे वाटप केलेले आहे. पर्यायाने विभागास स्पर्धात्मक दराचा व उत्कृष्ट दर्जाचा लाभ मिळालेला नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १४७ ((१) नुसार आदेश देणेपूर्वी करारनामा करून घेवून त्यात मक्तेदाराकडून कामाची सुरूवात व ते कधी पूर्ण होईल, अशा विविध प्रकारच्या शर्ती नमूद करणे आवश्यक असतांना करारनामे विनादिनांकित असून त्या करारातील कोणतीही अट/शर्त भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी, तशी पद्धत अवलंबिण्यात आलेली नाही.

(३) उपरोक्त शासन निर्णयातील बाब क्रमांक १३ नुसार काम पूर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच एका कामासाठी एक मोजमाप पुस्तिका वापरण्यात यावी. अशी तरतूद असतांना कामासाठी दोन/तीन मोजमाप पुस्तिका वापरण्यात आलेल्या आहेत.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-१०९९/प्र.क्र.५४/०८, दिनांक २० मे, १९९९ नुसार शासन निर्णय क्र.स्थाविका २००३/प्र.क्र.३६९/ का-१४४५, दिनांक २८ नोव्हेंबर, २००३ नुसार रक्कम रु. २०,००० वरील कामाचा फलक बसविल्याशिवाय अंतिम देयक अदा करू नये, असे आदेश असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

(५) सदरील कामाची नोंद नमुना नंबर ४० नोंदवहीत नोंदविण्यात आलेली नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सर्वसाधारण दुरूस्ती कार्यक्रम गट अ अंतर्गत रस्ते दुरूस्तीमध्ये रस्त्यावरील खड्डे आवश्यकतेनुसार तात्काळ भरणे अपेक्षित आहे. या कामाचे कि.मी. वेगवेगळे आहेत. तसेच कामनिहाय व रक्कमनिहाय अधीक्षक अभियंता यांनी जॉब क्रमांक मंजूर केलेले असल्याने या कामाचे तुकडे (भाग) पाडलेले नाहीत. प्रत्येक कामास स्वतंत्र जॉब क्रमांक असल्याने ही कामे वेगवेगळी आहेत. तसेच प्रत्येक कामास स्वतंत्र तांत्रिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. (२) बी-१ निविदेतील निर्धारित केलेल्या अटी व शर्ती च्या प्रत्येक पृष्ठावर संबंधित मक्तेदारच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या असून या सर्व शर्ती व अटी मान्य असल्याबाबत विहित किमतीच्या मुद्रांक शुल्कावर संबंधित मक्तेदाराच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या आहेत.

(३) शासन परिपत्रकातील बाब क्र.१३ नुसार काम पूर्ण झाल्यावर पुर्णत्वाचा दाखला मोजमाप नोंदवहीत नोंदविणेत यावे, असे असले तरी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे तरतुदीनुसार नमुना नं.६५ मध्ये काम पूर्णत्वाचा दाखला स्वतंत्रपणे देयका सोबत जोडलेला आहे. त्यानुसार नमुना नं.६५ देयका सोबत जोडलेला आहे. आक्षेपात नमूद केल्यानुसार पूर्णत्वाचा दाखला मोजमाप नोंदवहीत दाखविण्यात आलेले आहे.

(४) सदरील कामे किरकोळ व नैमित्तीक दुरूस्तीचे असलेमुळे अंदाजपत्रकात फलकांचे बाबींचा समावेश केलेला नव्हता त्यामुळे फलक लावलेले नाहीत.

(५) नोंदवही नमुना नं. ४० मध्ये नोंद करण्यात आली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मोजमाप पुस्तिकेमध्ये काम पूर्णत्वाचा दाखला नोंदविणे आवश्यक असताना तसे न नोंदविण्याची कारणे काय आहेत, तसेच रु.२०,००० वरील प्रत्येक कामाचा फलक बसविणे बंधनकारक असताना त्याची तरतूद न करण्याबाबत केलेला खुलासा समाधानकारक नाही, या बाबत विभाग प्रमुखांचे काय म्हणणे आहे, यावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, लेखापरीक्षणाच्या वेळी काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत दर्शविण्यात आला नव्हता. परंतु आता तो दाखला मोजमाप पुस्तिकेत दर्शविण्यात आलेला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, मुळात या मुद्यातील मुख्य आक्षेप हा एका कामाचे तुकडे/भाग केल्याबाबतचा आहे. या बाबतीत आपले काय म्हणणे आहे, यावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, अधीक्षक अभियंता (बांधकाम) यांनी कामनिहाय व रक्कमनिहाय जॉब क्रमांक मंजूर केलेले असल्याने या कामाचे तुकडे करण्यात आलेले नाहीत. प्रत्येक कामास स्वतंत्र जॉब क्रमांक असल्यामुळे ही कामे स्वतंत्र आहेत.

यावर समितीने असे मत व्यक्त की, ज्यावेळी लेखापरीक्षणात हा आक्षेप घेण्यात आला त्यावेळी अधीक्षक अभियंता हे प्राधिकारी होते. त्यांनी सुचविल्यानुसार या कामाचे दोन भाग करण्यात आले आहेत. कार्यकारी अभियंता हे कामांना परवानगी देतात. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी त्यास मान्यता देतात. कार्यकारी अभियंत्यांनी विदित केले की, अधीक्षक अभियंत्यांनी उक्त कामाचे जॉब क्रमांक मंजूर केलेले आहेत. आतापर्यंत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून एकाही प्रश्नावर स्पष्ट असे उत्तर मिळालेले नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. प्रत्येक मुद्यावर समितीचे सन्माननीय सदस्य उपप्रश्न विचारत आहेत, परंतु त्यावर प्रशासनाकडून कसल्याही प्रकारचे ठोस उत्तर येत नाही. प्रत्येक वेळी गोलगोल उत्तर मिळत आहे. आतापर्यंतच्या एकाही उत्तराने समितीचे समाधान झालेले नाही. त्यामुळे नाईलाजाने समितीला प्रत्येक मुद्याच्या बाबतीत चौकशी करण्याबाबत किंवा विभागीय सचिवांची साक्ष घेण्याबाबत निदेश द्यावे लागत आहेत.

या मुद्याच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास लेखापरीक्षकांनी एका कामाचे तुकडे/भाग केल्याबाबत आक्षेप घेतलेला आहे. जर या कामाचे दोन भाग करण्यात आले असतील तर या कामाचे दोन मोजमाप पुस्तिका अभिलेखे झाले असतील. त्यामुळे या मुद्याच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक सविस्तर माहिती समितीला द्यावयास पाहिजे होती. तसेच समितीच्या दौऱ्यापूर्वी उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या कामांचा आढावा घ्यावयास पाहिजे होता. आपणास तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळालेला असताना सुद्धा जिल्हा परिषदेने पुरेशी तयारी केली नसल्याचेच आतापर्यंतच्या उत्तरांवरून दिसून येत आहे. प्रत्येक मुद्याच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी एक महिन्यात अहवाल सादर करतो, असे उत्तर देणे कदापि अभिप्रेत नाही. समितीला वाटते निदान आता तरी समितीच्या उपप्रश्नांना समर्पक, समाधानकारक आणि वस्तुस्थितीदर्शक उत्तरे द्यावयास पाहिजेत.

ज्या तत्कालिन अधिकाऱ्यांना आजच्या बैठकीसाठी आमंत्रित करण्यात आले आहे. त्यांना कोणत्या मुद्यांच्या अनुषंगाने बोलविण्यात आले आहे त्या बाबतची माहिती दिली होती काय, वास्तविक पाहता तत्कालिन अधिकाऱ्यांना त्यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्या मुद्यांवर चर्चा होणार आहे याबाबतची कल्पना द्यावयास हवी होती.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, अहवाल वर्षातील परिच्छेदाच्या अनुषंगाने संबंधित तत्कालिन अधिकाऱ्यांना आजच्या बैठकीसाठी बोलविण्यात आले होते. अहवाल वर्षातील एकूण २१ कामांच्या अनुषंगाने तत्कालिन अधिकाऱ्यांना बोलविण्यात आलेले आहे. या २१ कामांना अधीक्षक अभियंत्यांनी २१ प्रशासकीय मान्यता दिल्या होत्या. त्या प्रशासकीय मान्यतेनुसार ही कामे करण्यात आली. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या तरतुदीनुसार नमुना नं.६५ मध्ये काम पूर्णत्वाचा दाखला स्वतंत्रपणे देयकासोबत जोडावयास पाहिजे होता. परंतु लेखापरीक्षणाच्या वेळी हा दाखला जोडलेला नव्हता. परंतु आता नमुना नं.६५ मध्ये काम पूर्णत्वाचा दाखल जोडलेला आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, काम पूर्णत्वाचा दाखला न पाहताच सदरहू कामाचे देयक काढण्यात आले, ही अतिशय गंभीर बाब आहे. वास्तविक पाहता कनिष्ठ अभियंता, उप अभियंता यांनी कामाची तपासणी करणे गरजेचे असते. तसेच कार्यकारी अभियंता यांनी ५ टक्के कामाची तपासणी करावयास पाहिजे. परंतु अशी कोणतीही तपासणी न करता ती केल्याचे दाखविण्यात आले आहे. १८ कामांच्या ठिकाणी बोगस तपासणी झालेली आहे. तसेच या कामांवर एकूण किती खर्च झाला, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, एकूण २१ कामांवर १३,४७,३६६ रुपये खर्च झाला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, नमुना नं.६५ मध्ये काम पूर्णत्वाचा दाखला स्वतंत्रपणे देयकासोबत जोडण्याची जबाबदारी कोणाची होती, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, नमुना नं.६५ मध्ये काम पूर्णत्वाचा दाखला हा देयकासोबत जोडण्यात आला होता. वास्तविक पाहता काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदविणे आवश्यक होते. परंतु तो दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेला नव्हता. मोजमाप पुस्तिकेत काम पूर्णत्वाचा दाखला नोंदविण्याची जबाबदारी शाखा अभियंत्याची होती. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी निदर्शनास आणून दिले की, काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत जोडता कामा नये. तो दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ही चूक तत्कालिन कार्यकारी अभियंत्यांची आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू कामाची नस्ती शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता ते मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यापर्यंत सादर झाली असेल. तरी सुद्धा ही बाब कोणाच्याच लक्षात आली नाही, केवळ कार्यकारी अभियंताच नव्हे तर कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, उप अभियंता हे सर्वच या प्रकरणी दोषी आहेत. या प्रकरणी ज्यांनी चूक केली असेल त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे. या प्रकरणी जे दोषी असतील त्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे व केलेल्या कारवाईसह चौकशी अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

लेखापरिक्षणात एका कामाचे दोन भाग करण्यात आल्याप्रकरणी वस्तुस्थितीदर्शक सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी तसेच २१ बांधकामांच्या अनुषंगाने चौकशी करून संबंधित दोषी व्यक्तींविरुद्ध केलेल्या कार्यवाहीसह चौकशी अहवाल सादर करण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) प्रस्तुत कामे शासन पत्र क्र.आरएमआर २००२/प्र.क्र.१०९/रस्ते-१, दिनांक ०४ जून, २००२ सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ अन्वये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी प्रत्येक कामासाठी स्वतंत्र जॉब क्रमांकाअन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे.

(२) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांनी मंजूर केलेल्या जॉब क्रमांकानुसार (प्रशासकीय मान्यता दिलेली आहे) प्रशासकीय मान्यतेतील रकमेनुसार प्रत्येक कामाची प्रचलित पद्धतीनुसार निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. मंजूर जॉब क्रमांकानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली असल्याने मंजूर कामाचे भाग करण्यात आलेले नाहीत. रस्ते वाहतुकीस योग्य स्थितीत राखण्याच्या कामाअंतर्गत कामाची निकड लक्षात घेता या रस्त्यावरील वाहतूक पूर्णत बंद पडण्यापूर्वी दुरुस्तीने तातडीच्या उपाय योजनेअंतर्गत सदरची कामे तत्कालिन प्रचलित पद्धतीतील कमीत कमी कालावधीत कामे हाती घऊन दुरुस्तीची कामे करण्यात आलेली आहेत.

उपरोक्त प्रक्रियेत शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. तसेच तत्कालिन शासन सूचनांनुसार सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरी अंती तातडीने मर्यादित कालावधीतील प्रक्रियान्वये कामे करण्यात आलेली आहेत.

चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवालामध्ये अनियमितता झाली नाही, असे नमूद केले आहे. याबाबत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याने कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय.—** सदर अभिप्रायाशी हा विभाग सहमत आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—**बांधकाम -(३) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरिक्षणात एका कामाचे दोन भाग करण्यात आल्याप्रकरणी वस्तुस्थितीदर्शक सविस्तर माहिती समितीला सादर करण्याबाबत तसेच २१ बांधकामांच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी खुलासा केला की, एकूण २१ कामे असून प्रत्येक कामाला स्वतंत्र प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यामुळे कामाचे तुकडे पाडण्यात आले असे म्हणणे बरोबर नाही. ही सर्व किरकोळ दुरुस्तीची कामे आहेत.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी समितीस माहिती दिली की, ही कामे एकाच कि.मी.मध्ये काढलेली आहेत. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी खुलासा केला की, शेंदूरर्णे ते नाचण खेडा रस्ता कि.मी. १.०० ते १.६०० मधील डांबरी खड्डे भरणे हे एक

काम आहे. त्याच्या पुढील काम हे १.६०० ते २.०० पर्यंत आहे. ही ५०-५० हजार रुपयांची लहान कामे आहेत आणि त्या कामांना स्वतंत्र प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तो रस्ता अत्यंत खराब असल्यामुळे ती कामे केलेली आहेत.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी असे मत व्यक्त केले की, एस.ई यांनी तुकडे करुनच मान्यता दिलेली आहे. जिल्हा परिषदेने प्रशासकीय मंजुरी दिलेली नाही.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी खुलासा केला की, प्रस्ताव जिल्हा परिषदेचा असतो. यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, जिल्हा परिषदेकडून तुकडे पाडून तसा प्रस्ताव यावयास पाहिजे होता. अधीक्षक अभियंता यांनी तुकडे पाडून सर्व मान्यता दिली आहे, असा आक्षेप आहे. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी खुलासा केला की, तसे नाही, हा रस्ता अत्यंत खराब असल्यामुळे किरकोळ दुरुस्तीमधून खड्डे भरण्याची कामे घेतलेली आहेत. ५० हजार रुपयांचे एक काम याप्रमाणे सहा कामे घेण्यात आली.

## अभिप्राय व शिफारशी

**जळगांव** जिल्हा परिषदे अंतर्गत सन २०११-१२ या वर्षामध्ये बांधकाम विभागाने रु. १३,४७,३६६ एवढ्या रकमेची कामे तुकडे करून केलेली आहेत याबाबत असे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत की, ग्रामविकास विभागाच्या दिनांक २७ एप्रिल, २००० रोजीच्या परिपत्रकानुसार अपवादात्मक परिस्थिती वगळता कामाची विभागणी किंवा तुकडे करण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे असे असतानाही कामाचे तुकडे (भाग) करून काम केलेले आहे. पर्यायाने विभागास स्पर्धात्मक दराचा व उत्कृष्ट दर्जाचा लाभ मिळालेला नाही, करारनाम्यामध्ये विविध प्रकारच्या शर्ती नमूद करणे आवश्यक असताना करारनामे विना दिनांकित असून त्या करारातील कोणतीही अट / शर्त भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तदतुद करारनाम्यात करण्याची पद्धत अवलंबविण्यात आलेली नाही. काम पूर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखल मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. एक मोजमाप पुस्तिका वापरण्याऐवजी दोन/तीन मोजमाप पुस्तिका वापरण्यात आलेल्या आहेत. रुपये २०,००० वरील कामाचा फलक बसविल्याशिवाय अंतिम देयक अदा करू नये असे आदेश असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, मोजमाप पुस्तिकेमध्ये काम पूर्णत्वाचा दाखला लेखा परिक्षणाच्यावेळी दर्शविण्यात आला नव्हता. परंतु आता तो दाखला मोजमाप पुस्तिकेत दर्शविण्यात आला आहे. तसेच रुपये २०,००० वरील प्रत्येक कामाचा फलक बसविणे बंधनकारक असताना सदरील कामे किरकोळ व नैमित्तीक दुरुस्तीचे असल्यामुळे अंदाजत्रकात फलकांचे बाबीचा समावेश केलेला नव्हता. त्यामुळे फलक लावलेले नाहीत हा खुलासा समाधानकारक नाही. सन २०११-१२ या अहवाल वर्षामध्ये बांधकाम विभागाच्या एकूण २१ कामांना अधीक्षक अभियंत्यांनी २१ प्रशासकीय मान्यता दिल्या होत्या. त्या प्रशासकीय मान्यतेनुसार कामे करण्यात आली. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या तरतुदीनुसार नमुना ६५ मध्ये काम पूर्णत्वाचा दाखला स्वतंत्रपणे देयकासोबत जोडावयास पाहिजे होता. परंतु, लेखापरिक्षणाच्यावेळी हा दाखला जोडलेला नव्हता, मात्र आता नमुना क्र.६५ मध्ये काम पूर्णत्वाचा दाखला जोडलेला आहे, यावरुन असे दिसून येते की, काम पूर्णत्वाचा दाखला न पाहताच सदरहू कामाचे देयक काढण्यात आले आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे. **वास्तविक पाहता कनिष्ठ अभियंता, उप अभियंता यांनी कामाची तपासणी करणे गरजेचे असते तसेच कार्यकारी अभियंता यांनी ५ टक्के कामाची तपासणी करावयास पाहिजे होती. परंतु अशी कोणतीही तपासणी न करता ती केल्याचे दाखविण्यात आले आहे तसेच मोजमाप पुस्तिकेत काम पूर्णत्वाचा दाखला नोंदविण्याची जबाबदारी शाखा अभियंत्यांची होती. सदर कामाची नस्ती शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता ते मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यामार्फत सादर झाली असेल तरी सुद्धा ही बाब वरीलपैकी कोणाच्याही लक्षात आली नाही, याचे समितीस सखेद आश्चर्य वाटते. केवळ कार्यकारी अभियंताच नव्हेतर कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, उप अभियंता यासाठी जबाबदार आहेत. त्यामुळे याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, जळगांव

## आसराबारी परसाडे रस्ता ग्रा.मा.३८ कि.मी. १/०० ते २/०० बांधकाम करणे

**परिच्छेद क्रमांक ३.२१४/६८ (सन २०११-१२)**

उपरोक्त नमुद बांधकामावर रक्कम रू.१४,९४,२८३ खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १२६ (१) व महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम, १९६१ चे कलम १२४ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक. झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२/वित्त-९ (३३) दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ नुसार ग्रामपंचायतीस प्राधान्य देण्यात आलेबाबत ठरावाची प्रत दिसून येत नाही.

(२) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.गौखनि-१०/२७०१/प्र.क्र.३०८/ दिनांक १५ डिसेंबर, २००३ तसेच जिल्हा दर सूची सन २०१०-११ पृष्ठ क्र.-३ मधील अट क्र. १४ (ब) नुसार सदर कामासाठी १२६३ घ.मी.इतके वापरलेल्या गौण खनिजाची रक्कम रू. ८९,२६८/- वसुल करणे आवश्यक आहे.

(३) मंजुर अंदाजपत्रकातील बाब क्र-१ मधील रस्त्याच्या दुतर्फा गटारीचे खोदकाम करतांना उपलब्ध झालेले बांधकाम साहित्य १२६३ घ.मी. हे सदर कामाच्या रस्त्याच्या पृष्ठभागावर बाब क्र-२ नुसार वापरलेले आहे. तथापि, सदरचे साहित्य वापरण्यायोग्य असल्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेवर प्रमाणित केलेले नाही.

(४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र-का-/३/ परिपत्रक/प्रआ/११८८/दिनांक १ मार्च, २००२ नुसार बांधकामाचे साहित्याच्या वाहतुकीसाठी लीड चार्जेस १० कि.मी.अंतरापेक्षा जास्त अंतरासाठी अधीक्षक अभियता यांची परवानगी घेतलेली नाही. सबब रक्कम ३,७७,६५० संबंधिताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

(५) महाराष्ट्र शासन, उद्योग कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक. बीसीए/२००९/प्र.क्र.१०८/कामगार-७अ/दिनांक १० जून, २०१० मध्ये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम, १९९८ अंतर्गत बांधकाम मुल्यांवर १ टक्के उपकर रक्कम शासकीय कोषागारात भरणा केल्याबाबतचे आवश्यक ते अभिलेखे अर्धसमासपत्र क्र.९ दिनांक २३ नोव्हेंबर, २०१२ अन्वये लेखी मागणी करूनही उपलब्ध केले नाहीत.

(६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नमुना नंबर ३९ व ४० मध्ये सदरील विभागाने बांधकामाची नोंदवही ठेवलेली नाही.

(७) सदरील कामाचे अंदाजपत्रक मंजुर दरापेक्षा मोजमाप पुस्तिकेतील प्रदान दर निविदेतील अनुसूची 'ब' मधील दर हे जास्तीचे आहेत. त्यामुळे संबंधितास रू.७३,३७७ इतकी रक्कम अतिप्रदान झालेली आहे.

(८) मंजुर अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.१७ दर पृथक्करणातील डांबराची दरनिश्चिती चुकीची केल्याने रक्कम रू.१,२८८/ जादा प्रदान झालेली आहे. रक्कम संबंधिताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

(९) मंजुर अंदाजपत्रकामध्ये बाब क्र. १८ दर पृथक्करणातील डांबराची दरनिश्चिती चुकीची केल्याने रक्कम रू. १,४६२/ जादा प्रदान झालेली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक. झेडपीए. २००५. प्र.क्र.-४७२.वतत. ९ दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ अन्वये ग्राम पंचायत कार्यक्षेत्रात करावयाची कामे प्राधान्याने ग्राम पंचायतींना देणेत यावी असे नमूद आहे. तथापि सदर काम ग्राम पंचायतीचे कार्यक्षेत्रात येत नाही. त्यामुळे प्रस्तुत काम कामवाटप समितीद्वारे मजुर संस्थेस देणेत आले आहे.

(२) या कामासाठी केलेले माती उत्खनन हे त्याच भुखंडाच्या विकास प्रक्रीयेसाठी वापरली असल्याने त्याची रक्कम भरण्याची आवश्यकता नाही. तथापि सदर कामावर खदानीवरून आणलेल्या गौण खनिजाची रक्कम रू.८६,६१७ मात्र या कामाचे प्रमाणक क्रमांक ४७१ दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ अन्वये शासन सदरी भरणा केलेली आहे.

(३) अंदाजपत्रकातील बाब क्र.१ मधील रस्त्याच्या दुतर्फा गटारीचे बांधकाम करतांना उपलब्ध झालेले बांधकाम साहित्य १२६३ घ.मी. हे रस्त्याचे पृष्ठभागावर बाब क्र.२ नुसार वापरले आहे. सदर कामांचा दर्जा व गुणवत्ता योग्य असलेची खात्री केले नंतरच देयक अदा केलेले आहे. उप अभियंता यांनी १०० टक्के व कार्यकारी अभियता यांनी ५ टक्के तपासणी केलेली आहे.

(४) लिड चार्जेसची परवानगी अधीक्षक अभियंता यांचेकडून घेण्यांत आलेली आहे.

(५) देयकात १ टक्का रक्कम उप कर कपात केली असून अर्थ विभाग जिल्हा परिषद, जळगांव यांचेमार्फत या कामाचे प्रमाणक क्रमांक ४७१ दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ अन्वये शासकीय सदरी भरणा केलेला आहे.

(६) नोदवही नमुना नं. ४० ठेवण्यांत आली आहे.

(७) शेडयुल बी अंदाजपत्रक व देयक पाहता दर्शविलेला दर बरोबर आहे, त्यामुळे अतिप्रदान झालेले नाही. याबाबत खात्री केलेली आहे.

(८) आक्षेपात नमूद केलेप्रमाणे बी. बी. एम. साठी असलेले दर मुल्यांकन ८०/१०० ग्रेडचे वापरण्यात आले आहे. त्याप्रमाणे परिगणना केली आहे. तथापि, डी. एस. आर. नुसार मुल्यांकन ८०/१०० चा दर ३३,९७० आहे. आक्षेपात दर ३५,००० नमूद केला आहे. जिल्हा दरसूचीनुसार देयक अदा केलेले आहे. त्यामुळे जादा प्रदान झालेले नाही.

(९) कारपेट हे ६०/७० ग्रेड मध्ये करणेत येते त्याप्रमाणे दर पृथःकरण अंदाजपत्रकात केले आहे. तथापि, आक्षेपात ८०/१०० चे दराची तुलना केल्याने रक्कम वसुलपात्र नाही.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने देयके अदा करतांना गौण खनिजाची रक्कम रु.८९,२६८ का वसूल करण्यात आली नाही, लीड चार्जेससाठी परवानगी घेण्यात आली होती तर लेखापरीक्षणाचे निदर्शनास का आणून दिली नाही अशी विचारणा करून ज्या ज्या परिच्छेदामध्ये अनियमितता आहे व समितीने सूचना केलेल्या आहेत त्या संदर्भात पूर्ण परिक्षण करून ज्या कामांत अनियमितता झाली आहे, त्या कामांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी आणि समितीला अहवाल सादर करावा. समिती यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेईल असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) आसराबारी-परसाडे ग्रा.मा.३८ कि.मी. च्या १ ते २ कि.मी. बांधकामाबाबत (ता.यावल) देयके अदा करतांना गौण खनिजाची रक्कम रुपये ८९,२६८ रक्कम वसूल न करण्याची कारणे काय आहेत ?

(२) तसेच लीड चार्जेससाठी परवानगी घेतली असताना लेखा परिक्षणाचे वेळी ही बाब निदर्शनास आणून न देण्याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) या कामासाठी केलेली माती उत्खनन हे शासकीय जमिनीमधून शासकीय कामासाठी वापरलेले असल्याने गौण खनिज रक्कम वसूल केलेली नाही.

या कामासाठी बाहेरून आणलेल्या गौण खनिजाची रक्कम रु.८६,६१७ मात्र देयकातून वसूल करण्यात आलेली आहे.

(२) सदरचे आदेश स्वतंत्र नस्तीत असल्याने लिड चार्जेसची घेतलेली परवानगी लेखा परिक्षणाच्या वेळी दाखविण्यात आलेली नव्हती. मात्र ते आजही नस्तीत उपलब्ध आहेत.

चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवालामध्ये गौण खनिजाची वसुली न करण्याबाबत चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय.—**ग्रामविकास विभागाशी संबंधित रस्ता आहे. सबब या विभागाशी संबंधित नाही.

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय.—**(बांधकाम-३) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, गौण खनिजाची रक्कम वसूल न करण्याची कारणे काय आहेत, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग खुलासा केला की, आसराबारी-परसाडे रस्त्याच्या कामाचा हा मुद्दा आहे. स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्यात आली नाही असा आक्षेप आहे. जे काही मातीकाम आहे त्याची वसुली करण्याची काही गरज नाही आणि ती माती तेथेच वापरलेली आहे. बाहेरुन आणलेल्या मालाची स्वामित्वधनाची रक्कम वसूल केलेली आहे. यामध्ये अनियमितता नाही.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०११-१२ मध्ये जळगांव जिल्हा परिषदेअंतर्गत आसराबारी-परसाडे रस्ता ग्रा.मा.३८ कि.मी. १/०० ते २/०० बांधकामावर रक्कम रूपये १४,९४,२८३ एवढा खर्च केलेला आहे, याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १२६ (१) व महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम, १९६१ चे कलम १२४ व ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ नुसार ग्रामपंचायतीस प्राधान्य देण्यात आलेबाबत ठरावाची प्रत दिसून आली नाही. सदर कामासाठी वापरलेल्या गौण खनिजाची रक्कम रूपये ८९,२६८ वसूल करणे आवश्यक होते. बांधकाम साहित्य वापरण्यायोग्य असल्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेवर प्रमाणित केलेले नाही. तसेच बांधकाम साहित्याच्या वाहतुकीसाठी लीज चार्जेस १० कि.मी. अंतरापेक्षा जास्त अंतरासाठी अधीक्षक अभियंता यांची परवानगी घेतलेली नाही, त्यामुळे रक्कम रूपये ३,७७,६५० संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे. बांधकाम मुल्यांवर १ टक्के उपकर रक्कम शासकीय कोषागारात भरणा केल्याबाबत आवश्यक ते अभिलेखे लेखी मागणी करूनही उपलब्ध केले नाहीत, बांधकामाची नोंदवही ठेवलेली नाही, मंजुर दरापेक्षा मोजमाप पुस्तिकेतील प्रदान दर जास्तीचे आहेत, त्यामुळे रूपये ७३,३७७ इतकी रक्कम अतिप्रदान झालेली आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली साक्षीच्या दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, सदर काम ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्रात येत नाही, त्यामुळे प्रस्तुत काम कामवाटप समितीद्वारे मंजुर संस्थेस देणेत आले होते. तसेच स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्यात आली नाही या आक्षेपासंदर्भात समितीस विदीत करण्यात आले की, जे काही मातीकाम आहे त्याची वसुली करण्याची आवश्यकता नाही. सदर माती त्या ठिकाणीच वापरलेली आहे, बाहेरून आणलेल्या साहित्याची स्वामित्वधनाची रक्कम वसूल केलेली आहे. **गौण खनिजाची रक्कम रूपये ८६,६१७ दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ रोजी शासनाकडे भरणा केलेली आहे. सदर कामांचा दर्जा व गुणवत्ता योग्य असल्याची खात्री केलेनंतरच देयक अदा केलेली आहे. उप अभियंता यांनी १०० टक्के व कार्यकारी अभियंता यांनी ५ टक्के तपासणी केलेली आहे. लीड चार्जेसची परवानगी अधीक्षक अभियंता यांचेकडून घेण्यात आलेली आहे. देयकात १ टक्का उपकर कपात केलेली असून दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ अन्वये शासन सदरी भरणा केलेली आहे. जिल्हा दरसूचीनुसार देयक अदा केलेले आहे, त्यामुळे जादा प्रधान झालेले नाही. सबब या प्रकरणी समिती समाधान व्यक्त करीत आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, जळगांव

### गाव तलाव, साठवण तलाव व साठवण बंधारे बांधकामातील अनियमितता

### (१) मौजे सुंदरनगर, ता.चाळीसगांव येथील गाव तळयाच्या दुरुस्तीबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.३१६/२ (सन २०११-१२)**

उपरोक्त नमुद बांधकामावर रुपये ६,७९,७०० खर्च केलेला आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम १२० (२) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबीसाठी खर्च करण्याची तरतूद नाही. वाढ घट तक्त्यानुसार लेखासंहिती नियम १५३ (३) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे कामे करवून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता यांची आहे. तथापि नियमानुसार कार्यवाही केली नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय क्र. पंरास/१०८९/ प्र.क्र.१४५२५/३५ दिनांक १५ फेब्रुवारी, १९९० नुसार वापरलेले दगड , खडी, सिमेंट, इ. साहित्य शासकीय प्रयोगशाळेकडून तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त केलेले नाहीत.

(३) उपरोक्त कामाच्या नोंदी नमुना नं.३९ नोंदवहीतील रकाने परिपुर्ण नोंदवून हस्तांतरणासंबंधी कार्यवाही पुर्ण केल्याचे प्रमाणित करून व महसुली ७/१२ उतारे प्राप्त केलेले नाहीत.

(४) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/प्र.क्र.१०८ कामगार ७-अ मंत्रालय, मुंबई, दिनांक १७ जून, २०१० **(परिशिष्ट ७.१)** अन्वये १ टक्का एवढी रक्कम कामगार कल्याण उप कर निधीत जमा करणे आवश्यक असतांना र.रू.६७९७ इतकी कमी जमा केलेली आहे. सदरची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो १०११/प्र.क्र.३४७/जल दिनांक ३१ जुलै, २००० **(परिशिष्ट ७.२)** मधील परिच्छेद-एक नुसार समविभाग शासन निर्णय दिनांक ३० जून, २००८ **(परिशिष्ट ७.३)** प्रस्ताव परिच्छेद क्र.२ नुसार लघुपाटबंधारे योजनांच्या लाभ क्षेत्रातील योजनेच्या लाभधारकांना एकत्र येऊन योजनेच्या सिंचन व्यवस्थापन देखभाल व दुरूस्तीसाठी सहकारी पाणीवापर संस्था स्थापन करून सिंचन क्षेत्र हंस्तांतरीत केल्याचे कागदपत्र पहावयास मिळाले नाहीत. तसेच स्वामित्व शुल्क भरणा करावे असे नमुद असताना आतापर्यंत पुर्ण झालेले सर्व साठवण बंधाऱ्यांचे याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. परिणामी शासनाचे उद्दिष्ट सफल होत नसून आर्थिक नुकसानही होत आहे.

(६) कामासाठी पाणी उपसा केलेला आहे. तथापी त्याबाबतचे लॉगबुक ठेवलेले नाही. निविदा फॉर्म क्र.३ मध्ये मक्तेदाराकडे उपलब्ध असलेली स्वतःची/भाडेतत्वावर उपलब्ध होणार मशिनरी आणि इक्वीपमेंट यांची यादी जोडलेली नाही. तसेच भाडेतत्वावरील पंपाची भाड्याची पावती उपलब्ध केलेली नाही.

(७) कामाचे नस्तीसोबत खोदकामाचे मोजमापाचे फिल्डबुक तपासणीसाठी स्वाक्षरी आहे.

(८) करारनामा कोरा असून त्यावर फक्त कार्यकारी अभियंता व मक्तेदार यांची स्वाक्षरी आहे.

(९) नमुना ६५ मुल्यांकन दाखल्यावर दिनांक नमुद नाहीत त्यामुळे काम मदतीत पुर्ण झाल्याची पडताळणी करता आली नाही. मुल्यांकन दाखल्यास झेरॉक्स प्रती जोडलेल्या असून त्यावर कार्यकारी अभियंता यांचे नांव, पदनाम व स्वाक्षरी नाही.

(१०) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक मु.अ.प्रशा-५/२६११/दिनांक ३ ऑगस्ट, २००४ अन्वये क्लिअरिंग द साईड ही बाब अंतर्भुत करणेत येऊ नये असे असतांनाही सदर बाबीसाठी रक्कम रु.१५.४६९ प्रदान करण्यात आले आहे. रक्कम संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

(११) बाब क्र.५ नुसार भरावसाठी रक्कम रु.१६,७३८ जादा प्रदान झालेले आहे. जादा अदा रक्कम संबंधीताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

(१२) सहायक अधिक्षक, अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, नाशिक यांचेकडील कार्यालयीन आदेश क्रमांक ४०६/२००९ तसेच जावक क्र.३१२६ दिनांक २ डिसेंबर, २००९ अन्वये सार्वजनिक बांधकाम नियमावली, १९८४ परिशिष्ट-४२ मधील अट क्र.१३ दोन ((१) महाराष्ट्र शासन लेखा परिक्षा दिनांक १८ नोव्हेंबर, १९९६ मधील परिशिष्ट अ तसेच अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे (स्था स्तर) मंडळ, नाशिक यांचा नोंदणी आदेश क्रमांक आर/५७/सन ०९-१० अन्वये रक्कम रु.६,७९,७०३ रकमेस तांत्रिक प्रशासकीय मान्यता अटी व शर्तीस अधीन राहुन प्रदान

करण्यात आलेली आहे. अट क्रमांक ४ अन्वये सदरचा खर्च (मागणी क्रमांक एल - (३) २७०२ - लघुपाटबंधारे १९१ स्थानिक संस्थांना सहाय्य ४१ सहायक अनुदाने ०((१) महाराष्ट्र जि.प. व पं.सं. अधिनियम, १९६९ च्या कलम १९९२ अन्वये जिल्हा परिषद सप्रयोजन अनुदान (स्थानिक क्षेत्र) (२७०२-१४९७) या लेखाशीर्षातून होणाऱ्या अनुदानात करणेत यावा, तसेच अट क्र.५ नुसार अनुदान प्रत्यक्ष उपलब्ध झाल्याखेरीज निविदा प्रक्रिया सुरू करणेत येऊ नये, असे असतांना जिल्हा परिषद जळगांव यांनी अनुदान प्राप्त न होताच कामाचे आदेश दि. १९ डिसेंबर २००९ रोजी देऊन दिनांक १५ एप्रिल, २०१० रोजी काम पुर्ण संपलेले आहे. परंतु सदरच्या लेखाशीर्षाखाली अद्याप पर्यंत अनुदान प्राप्त नाही. लघुसिंचन कडील टिपणीनुसार सदरचे देयक लघुपाटबंधारे/ ले.प./पा.त. दुरुस्ती जिल्हा परिषद निधी ह्या लेखाशीर्षा अंतर्गत प्रदान केले आहे. त्यास मा.मु.ले.वि.अ./ मा.सभापती अर्थ/मा.अध्यक्ष जि.प. जळगांव व मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.जळगाव यांनी मान्यता देऊन आयत्या वेळचे विषय क्रमांक ५२६ दिनांक ४ जून, २०११ च्या सर्वसाधारण सभेमध्ये देयक प्रदान केलेले आहे. परंतु, सदरच्या लेखाशीर्षाखाली अद्यापपर्यंत आलेले नसल्याने अनियमितता झालेली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रत्यक्ष काम करत असतांना भुस्तर वर्गीकरणामध्ये बदल झाल्यामुळे उपलब्ध भरावयाच्या परिमाणामध्ये तसेच गाभा भरावाच्या परिणामामध्ये वाढ झालेली आहे. तसेच बाहेरून आणावयाच्या, भरावयाच्या साहित्यामध्ये बचत झालेली आहे.

म्हणून प्रचलीत अंदाजपत्रकास व बाबनिहाय झालेली वाढ व बचत विवरण तक्त्यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. कामावर झालेला खर्च हा प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेमध्ये असल्याने कामावर जास्तीचा खर्च झालेला नाही.

(२) सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी शासनमान्य प्रयोगशाळेकडुन करण्यात आलेली असून दिनांक १३ जुलै २०१० रोजीचा चाचणी अहवाल प्राप्त केलला आहे.

(३) काम पुर्ण झाल्यावर उप विभागीय स्तरावरून नमुना नं. ३९ नोंदवहीतील पृष्ठ क्र. २१७ वर कामाची नोंद घेण्यात आलेली आहे. सदर कामाच्या जागेचा ७/१२ उतारा प्राप्त करण्यात आलेला आहे. तसेच देखभाल व दुरूस्तीसाठी गांव तलावाचे करारनामा करून हस्तांतरण संबंधित ग्रामपंचायतीस करण्यात आलेले आहे.

(४) कामगार कल्याण उपकर (१ टक्का) वसुलपात्र रक्कम रुपये ६,७९७ संबंधीत मक्तेदाराच्या सुरक्षा अनामत मधुन वसुल करून दि.११ सप्टेंबर २०१५ रोजी भरणा करण्यात आलेली आहे.

(५) सदर गांव तलावापासून जलसंधारणाव्दारे अप्रत्यक्ष सिंचन होते. त्यामुळे कामाचे ठिकाणापासून अंदाजे २ ते ३ कि.मी.च्या परिसरात त्याचा फायदा होऊन भुगर्भामधील पाणी पातळीत वाढ झालेली आहे व या परिसरातील खाजगी विहिरींच्या पाणीसाठ्यात वाढ झालेली आहे.

सदर कामाचे बाबत अप्रत्यक्ष सिंचन होत असल्याने पाणी वापर संस्था निर्माण करण्यात आलेली नाही. सदर गांव तलाव देखभाल व दुरूस्तीसाठी ग्रामपंचायतीकडे करारनामा करून हस्तांतरित केलेला आहे.

(६) कामाच्या जागेवर पाणी उपसा केलेले नसल्याने लॉगबुक ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे भाडे तत्त्वावरील पंपाची भाड्याची पावती उपलब्ध करणेत आलेली नाही.

(७) सदर कामाचे खोदकामाचे व मोजमापाचे फिल्डबुक उपलब्ध करणेत आलेले आहे.

(८) सदर कामाच्या नस्तीसोबत असलेला करारनामा पुर्ण भरून घेण्यात आलेला आहे व त्यावर कार्यकारी अभियंता व मक्तेदारी स्वाक्षरी आहे.

(९) काम पुर्ण झाल्याची नोंद मोजमाप पुस्तकावरून दिनांक १५ एप्रिल, २०१० नुसार पुर्णत्वाचा दाखला नमुना नं.६५ वचर नमुद केलेला असून त्यावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी आहे.

(१०) गाव तलावाच्या दुरूस्ती करावयाच्या भागामध्ये काटेरी झाडे-झुडपे जास्त असल्याने ते काढून दुरूस्ती करणे आवश्यक असल्यामुळे अंदाजपत्रकात या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. व अंदाजपत्रकास म.अधिक्षक अभियंता (स्था.स्तर) नाशिक यांनी दिनांक २ डिसेंबर, २००९ अन्वये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिलेली आहे. त्यामुळे झालेला खर्च मक्तेदाराकडुन वसूल करण्यात आलेला नाही.

(११) प्रत्यक्ष काम करत असताना भुस्तर वर्गीकरणामध्ये बदल झाल्यामुळे उपलब्ध भरावयाच्या परिमाणामध्ये तसेच गाभा भरावाच्या परिमाणामध्ये वाढ झालेली आहे. तसेच बाहेरून आणावयाच्या, भरावयाच्या साहित्यामध्ये बचत झालेली आहे.

म्हणून प्रचलित अंदाजपत्रकास व बाबनिहाय झालेली वाढ व बचत विवरण तक्त्यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. कामावर झालेला खर्च हा प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेमध्ये असल्याने कामावर जास्तीचा खर्च झालेला नाही. त्यामुळे वसुली करण्यात आलेली नाही.

(१२) अंदाजपत्रकास अधीक्षक अभियंता (स्था.स्तर) नाशिक, यांनी दिनांक २ डिसेंबर, २००९ अन्वये रुपये ६,७९,७०३ रकमेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

कामाची निकड पाहता मक्तेदारास कार्यारंभ आदेश देऊन काम पुर्ण करण्यात आलेले आहे. यावेळी शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नसल्यामुळे व मक्तेदाराचे देयक अदा करणे गरजेचे असल्यामुळे जि.प.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.५२६ दिनांक ४ जून, २०११ अन्वये तात्पुरत्या कामाचा खर्च प्राप्त झाल्यावर त्याचे समायोजन जिल्हा परिषद निधीत करण्यात यावा. या निर्देशानुसार देयक पारित करण्यात आलेले आहे. या कामाच्या रकमेचे अनुदान शासनाकडुन प्राप्त करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी सादर करण्यात आला आहे.

**(२) मौजे भोणे-४, चमगांव व आलवाडी ता.धरणगांव येथे साठवण बंधारा बांधणे**

**परिच्छेद क्रमांक ३.३१८/२७ (सन २०११-१२)**

उपरोक्त नमुद बांधकामावर रुपये १२,२१,७२५ खर्च केलेला आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत :–

(१) लेखासंहिता नियम १२० (२) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींचे खर्च करण्याची तरतूद नाही. वाढ घट तक्त्यानुसार लेखासंहिता नियम, १५३ (३) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे कामे करवून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता यांची आहे. तथापि, नियमानुसार कार्यवाही केली नाही.

(२) महाराष्ट्र बांधकाम नियमावली, २९६ (२) नुसार माहे फेब्रुवारी व मार्च महिन्यात कामाचे आदेश निर्गमित करण्यास प्रतिबंध असतांना मार्च महिन्यात कार्यारंभ आदेश निर्गमित केल्याचे आढळून आले.

(३) ग्रामविकास व संधारण विभाग, शासन निर्णय क्र.पंरास/१०८९/प्र.क्र.१४५२५/३५ दिनांक १५ फेब्रुवारी, १९९० नुसार वापरलेले दगड, खडी, सिमेंट इ. साहित्य शासकीय प्रयोग शाळेकडून तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त केलेले नाहीत.

(४) उपरोक्त कामाच्या नोंदी नमुना नं. ३९ नोंदवहीतील रकाने परिपुर्ण नोंदवून हस्तांतरणासंबंधी कार्यवाही पुर्ण केल्याचे प्रमाणित करून व महसुली ७/१२ उतारा प्राप्त केलेले नाहीत.

(५) महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार, विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए २००९/प्र.क्र.१०८, कामगार ७-अ, मंत्रालय, मुंबई, दिनांक १७ जून, २०१० अन्वये १ टक्का एवढी रक्कम कामगार कल्याण उपकर निधीत जमा करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये ९,७६० इतकी कमी जमा केलेली आहे. सदरची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

(६) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. लपायो १०९९/प्र.क्र.३४७ जल, दिनांक ३१ जुलै, २००० मधील परिच्छेद एकनुसार समविभाग शासन निर्णय, दिनांक ३० जून, २००८, प्रस्तावात परिच्छेद क्र.२ नुसार लघुपाटबंधारे योजनांच्या लाभ क्षेत्रातील लाभधारकांना एकत्र येऊन योजनेच्या सिंचन व्यवस्थापन देखभाल व दुरूस्तीसाठी लाभधारकांना सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करून सिंचनक्षेत्र हस्तांतरीत केल्याचे कागदपत्र पहावयास मिळाले नाहीत. तसेच स्वामित्व शुल्क भरणा करावा असे नमुद असतांना आतापर्यंत पुर्ण झालेले सर्व साठवण बंधाऱ्याचे याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

(७) कामासाठी पाणी उपसा केलेला आहे. तथापि, त्या बाबतचे लॉगबुक ठेवलेले नाही. निविदा फार्म क्र.३ मध्ये मक्तेदाराकडे उपलब्ध असलेली स्वतःची/भाडेतत्वावर उपलब्ध होणारी मशिनरी आणि इक्विपमेंट यांची यादी जोडलेली नाही. तसेच भाडेतत्वावरील पंपाची भाड्याची पावती उपलब्ध झालेली नाही.

(८) कामाचे नस्तीसोबत खोदकामाचे मोजमापाचे फिल्डबुक तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही. सबब प्रत्यक्ष मोजमाप पुस्तकात नोंदवलेले मापांची पडताळणी फिल्डबुक अभावी करता आली नाही.

(९) करारनामा कोरा असून त्यावर फक्त कार्यकारी अभियंता व मक्तेदाराची स्वाक्षरी आहे.

(१०) नमुना ६५ मुल्यांकन दाखल्यावर दिनांक नमुद नाहीत. त्यामुळे, काम मुदतीत पुर्ण झाल्याची पडताळणी करता आली नाही. मुल्यांकन दाखल्याच्या झेरॉक्स प्रती जोडलेल्या असून त्यावर कार्यकारी अभियंता यांचे नांव, पदनाम व स्वाक्षरी नाही.

(११) महसुल व वन विभाग, मंत्रालय, अधिसूचना दिनांक ११ फेब्रुवारी, २०१० अन्वये रुपये ७०.६७ घ.मी. प्रमाणे स्वामित्व शुल्क वसूल करणे आवश्यक असतांना दिनांक १५ डिसेंबर, २००६ अन्वये रुपये ३५.३४ प्रमाणे कपात केल्याने रुपये १,२६,५२२ कमी कपात वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रत्यक्ष काम करतांना भुस्तराचे वर्गीकरणामध्ये बदल झालेले व भरावाची आवश्यकता असल्याचे जास्तीचा भराव केलेला आहे. तसेच, इतर काही बाबींमध्ये बचत झालेली आहे. परंतु कामावर झालेला खर्च हा मुळ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असलेने जास्तीचा खर्च झालेला नाही.

प्रचलित अंदाजपत्रकांस व बचत/वाढ विवरण तक्त्यास म. कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे.

(२) या कामासाठी शेतकऱ्यांची मागणी असल्याने व वाढीव तरतूद मंजुर झाल्याने सदर कामास मार्च महिन्यामध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

(३) सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी शासनमान्य प्रयोगशाळेकडुन दिनांक १७ मे, २०११ रोजीचा चाचणी अहवाल प्राप्त केलेला आहे.

(४) सदर काम पूर्ण झाल्याची नोंद उप विभाग स्तरावर नमुना नं ३९ मध्ये पान क्र. ९ वर घेण्यात आलेली आहे. सदर बंधाऱ्यांचे काम नाल्यावर असल्याने त्याचा ७/१२ उतारा घेण्यात आलेला नाही. सदर काम पुर्ण झालेनंतर संबंधित ग्रामपंचायतीकडे देखभाल व दुरुस्ती करारनामा करून हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

(५) सदर वसुलीपात्र उपकराची रक्कम रुपये ९,७६० संबंधित मक्तेदाराकडून वसुल करण्यात आली असुन दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी चलनाने भरणा करण्यात आली आहे.

(६) सदरील साठवण बंधाऱ्यामुळे जलसंधारणाद्वारे अप्रत्यक्ष सिंचन होऊन कामाचे ठिकाणापासून अंदाजे २ ते ३ कि.मी.च्या परिसरात त्याचा फायदा हाऊन भुगर्भामधील पाणी पातळीत वाढ झालेली आहे. व खाजगी विहिरींच्या पाणी साठ्यात वाढ झालेली आहे.

सदर कामाचे बाबत अप्रत्यक्ष सिंचन होत असल्याने पाणी वापर संस्था निर्माण करण्यात आलेली नाही. सदर बंधारा हा देखभाल व दुरूस्तीसाठी ग्रामपंचायतीकडे करारनामा करून हस्तांतरीत केलेला आहे.

(७) सदर कामात पाणी उपसा केलेला नसून पंप वापराचे लॉगबुक ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे पंपाच्या भाड्याची पावती जोडण्यात आलेली नाही.

(८) सदर कामाचे खोदाई व मोजमापाचे फिल्डबुक उपलब्ध आहे.

(९) सदर कामाचे नस्तीसोबत असलेला करारनामा पूर्ण भरून घेण्यात आलेला आहे. त्यावर मक्तेदाराची व कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी आहे.

(१०) सदर काम दिनांक १५ मे, २०११ रोजी पुर्ण झाल्याचे पुर्णत्वाचा दाखला नमुना नं. ६५ वर नोंद घेऊन त्यावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

(११) सदर कामाचे अंदाजपत्रक सन २००९-१० दुरूस्ती वापरुन तयार करण्यात आलेले आहे व कामास दिनांक २४ नोव्हेंबर, २००९ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रचलित दरसूची मध्ये रुपये ३५.३४ प्रति घ.मी दर मुळ दरात समाविष्ट आहे. त्यामुळे सदर दरानुसार गौणखनिज स्वामीत्व धनाची रक्कम रुपये १,२६,६३० देयकातुन वसूल करण्यात आलेली आहे.

**(३) मौजे धानवड ता.जळगांव येथील साठवण बंधारा बांधणे**

**परिच्छेद क्रमांक ३.३४९/४ (सन २००८-०९)**

मौजे धानवड ता.जळगांव येथील साठवण बंधाऱ्यावर जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीचा ठराव क्र.२९ नुसार एकुण रक्कम रुपये १३,८१,५९८ खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) बालाजी ट्रेडर्स नेरी यांचे सिमेंट उप प्रमाणक ११३, दिनांक २८ जानेवारी, २००८ रुपये ४६,००० टॅक्स इनव्हॉइस नाही. तसेच १:३:६ चे कामात २५ कि.मी. लिड जळगांव नमूद करून नेरी येथून सिमेंट वाहतुक करिता रुपये १०,३५१ ने अतिप्रदान केलेले आहे. प्रादेशिक दरसूची

सर्वसाधारण टिपणीतील अ.क्र.१७ नुसार सिमेंट रस्त्याने वाहतुकीकरिता अंदाजपत्रक तयार करून स्पर्धात्मक निविदा प्राप्त न करता लिडचा खर्च अनुज्ञेय केलेला आहे. पॅरामाऊंट ट्रेडींग जळगांव यांचेकडून २१०० बॅग सिमेंट खरेदी साठा व दराबाबत खात्री पटवावी.

(२) शासन पाणीपुरवठा परिपत्रक, दिनांक १५ जुलै, १९९४ व परिपत्रक ग्राविझेडपीए/ १०९७/प्र.क्र.१९४३/३३, दिनांक ४ सप्टेंबर, २००० अन्वये अंदाजपत्रक व ट्रायलपींट नुसार अचुक न केल्याने रक्कम रुपये ६१,५९४.३५ जादा खर्च व बचत खर्च रुपये ४६,१२८ दिसून आले. त्यामुळे मक्तेदाराने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १२० ब १ निविदानुसार काम केलेले नाही.

(३) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) पुणे, यांचेकडील पत्र क्र.मुअ/लपा/स्था. स्तर/उविअ/०२/१०४२/सन २००६, दिनांक १३ एप्रिल २००६ वाहन अंतर व नकाशा १० कि.मी. पुढील वाहन अंतर प्रमाणित केलेले नाही. करिता बाब क्र.४ वर लिडकरिता केलेला खर्च रुपये ३,००,०९० व अ.क्र.५ व ६ लिड विवरणात ठिकाण नमुद न करता केलेला खर्च रुपये ३,१०,५०० चा वाहन अंतर खर्चास नकाशासह अंतर प्रमाणित केलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रचलित मंजुर दरसूचीनुसार कामाचे अंदाजपत्रक बनऊन ब १ निविदेनुसार मक्तेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. निविदेच्या परिशिष्ट-अ मध्ये सिमेंटचा पुरवठा विभागाकडुन होणार नसल्याचे नमुद आहे. निविदा ब १ मधील अटी व शर्तीमध्ये कामाचे देयकासोबत मक्तेदाराने बाजारातून खरेदी केलेल्या सिमेंटची उपप्रमाणके सादर करणे नमुद नाही. तसेच प्रचलित दरसुची मधील संघानकाच्या दरामध्ये सिमेंटचा दर समाविष्ट असल्याने मक्तेदाराने स्वतः सिमेंट खरेदी करावयाचे आहे. प्रचलित दरसूचीनुसार देयकाचे प्रदान झालेले आहे.

अंदाजपत्रक तयार करतांना १० कि.मी. च्या पुढील वाहन अंतरासाठी अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) नाशिक यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. ती न घेतलेने संघाणक १:३:६ च्या परिमाणासाठी दरामध्ये जास्तीच्या वाहन अंतरासाठी केलेला रुपये २,०२,१३० च्या खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता न घेतलेने तत्कालिन कार्यकारी अभियंता सौ.रा.द.घाणे यांचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागाचे पत्र क्र. ३३९, दिनांक ११ मे २०१४ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे.

(२) प्रत्यक्ष काम करतांना भुस्तराचे वर्गीकरणामध्ये बदल झालेने पाया हा जास्त खोलीवर लागलेला आहे. त्यामुळे १:३:६ संधाणकाच्या परिमाणामध्ये वाढ झालेली आहे. तसेच इतर काही बार्बीमध्ये बचत झालेली आहे. परंतु कामावर झालेला खर्च हा मुळ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असलेने जास्तीचा खर्च झालेला नाही. प्रचलित अंदाजपत्रकास व बचत/वाढ विवरण तक्त्यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे.

(३) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) पुणे, यांचेकडील पत्र क्र.मुअ/लपा/स्था. स्तर /उविअ/०२/१०४२/सन २००६, दिनांक १३ एप्रिल, २००६ नुसार १० कि.मी. पुढील अंतरास अधीक्षक अभियंता, नाशिक यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे बाब क्र.४ मधील १:३:६ संधाणकाच्या दरामध्ये घेतलेल्या जास्तीच्या वहन अंतराकरिता केलेला रक्कम रुपये २,०२,१३० चे खर्चास अधिकृत प्राधिकरणाची मंजुरी नाही. या अनियमिततेकरिता तत्कालिन कार्यकारी अभियंता, सौ. आर. डी. घाणे यांची विभागीय चौकशीचा प्रस्ताव जा.क्र. लसिं/ आस्था/ आरआर/३३९/२०१४, दिनांक ११ मे, २०१४ अन्वये शासनास सादर केलेला आहे.

**(४) मौजे दोनगांव ता.धरणगांव येथील साठवण बंधारा बांधणे**

**परिच्छेद क्रमांक ३.३५० (सन २००८-०९)**

मौजे दोनगांव तालुका धरणगांव, जिल्हा जळगांव येथे साठवण बंधाऱ्यावर एकूण रक्कम रुपये ९,७३,३८३ खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) जय बजरंग ट्रेडर्स, एरंडोल व जे.के.ट्रेडर्स यांचे १६७२ सिमेंट खरेदीची उपप्रमाणक टॅक्स इनव्हॉईस नाही. मक्तेदारास धरणगांव येथील लिड अनुज्ञेय केलेला असतांना एरंडोल येथील पुरवठाधारकाकडुन खरेदी केलेली आहे. प्रादेशिक दरसूची टिपणी अ.क्र.१७ नुसार स्पर्धात्मक निविदा व स्वस्त व जवळचे अंतर व डायरेक्ट कंपनीकडून पोहोचसह दर प्राप्त करून लिड वाहन खर्च बचत केलेली नाही.

(२) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक मुअ/लपा/स्था.स्तर /उविअ /१०४२/सन २००६, दिनांक १३ एप्रिल, २००६ नुसार वाहन अंतर व नकाशा १० कि.मी. पुढील वाहन अंतर अधीक्षक अभियंता यांचेमार्फत प्रामाणित न करता वाहन अंतरादाखल केलेले रुपये ९८,७४१ खर्चास संबंधित प्राधिकरणाची मंजुरी नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रचलित मंजुर दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक बनवून ब १ निविदेनुसार मक्तेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. निविदेच्या परिशिष्ट अ मध्ये सिमेंटचा पुरवठा विभागाकडुन होणार नसल्याचे नमुद आहे. निविदा ब १ मधील अटी व शर्तीमध्ये कामाचे देयकासोबत मक्तेदाराने बाजारातून खरेदी केलेल्या सिमेंटची उपप्रमाणके सादर करणे नमुद नाही. तसेच प्रचलित दरसुची मधील संधाणकाच्या दरामध्ये सिमेंटचा दर समाविष्ट असल्याने मक्तेदाराने स्वतः सिमेंट खरेदी करावयाचे आहे. प्रचलित दरसुचीनुसार देयकाचे प्रदान झालेले आहे.

(२) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था स्तर) पुणे यांचेकडील पत्र क्र.मुअ/लपा/स्था स्तर/उविअ/०२/१०४२/सन २००६, दिनांक १३ एप्रिल, २००६ नुसार १० कि.मी. पुढील अंतरास अधीक्षक अभियंता, नाशिक यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे बाब क्र.४ मधील १:३:६ संधाणकाच्या दरामध्ये घेतलेल्या जास्तीच्या वाहन अंतराकरिता केलेला रुपये २९,७६६ चे खर्चास अधिकृत प्राधिकरणाची मंजुरी नाही. या अनियमिततेकरिता तत्कालिन कार्यकारी अभियंता सौ.आर.डी.घाणे यांची विभागीय चौकशीचा प्रस्ताव जा.क्र. लसिं/आस्था/आरआर/३३९/२०१४, दिनांक ११ मे, २०१४ अन्वये शासनास सादर केलेला आहे.

**(५) मौजे धामोडी २ ता. रावेर येथील साठवण बंधारा बांधणे**

**परिच्छेद क्रमांक ३.३५१ (सन २००८-०९)**

मौजे धामोडी २ ता. रावेर, जि. जळगांव जिल्हा येथील साठवण बंधाऱ्यावर एकूण रक्कम रुपये १०,२२,६७८ खर्च झालेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) सिमेंट थैली नग १७७४ तुराबअली ट्रेडर्स रावेर यांचे उपप्रमाणाक टॅक्स इनव्हॉईस नाही. प्रादेशिक दरसूची सर्वसाधारण टिपणीतील अ.क्र.१७ नुसार सिमेंट वाहतुक नाही.

(२) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था स्तर) पुणे यांचेकडील पत्र क्र.मुअ/लपा/स्था स्तर/ उविअ/०२/१०४२/सन २००६, दिनांक १३ एप्रिल, २००६ नुसार १० कि.मी. पुढील वाहन अंतर अधीक्षक अभियंता यांनी प्रामाणित न करता बाब क्र.४ मधील १:३:६ यामध्ये मुळ दराव्यतिरिक्त ईनिशियल लिड करिता केलेला रुपये १,९४,५९९ चे खर्चास संबंधित प्राधिकरणाची मंजुरी नाही.

(३) खोदाई उपलब्ध परिमाण ६४३.९५ असतांना ३७८ दर्शवुन परिणामी २६५.९५ करिता दर रुपये ५९.९५ नुसार रुपये १५,९४३ तसेच सदर परिमाणामुळे गौण खनिज परिमाणातील दर रुपये ३५.४० प्रमाणे रक्कम रुपये ९४०८ अशी रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

(४) पाणीपुरवठा परिपत्रक दिनांक १५ जुलै, १९९४ व परिपत्रक ग्राविझेडपीए/१०९७/३३, दिनांक ४ सप्टेंबर, २००० अन्वये ट्रायलपीट नुसार अचुक न केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १२० ब १ निविदानुसार निविदेतील अटी व शर्तीनुसार मक्तेदाराने काम न केल्याने सदर कामावर जादा झालेला खर्च रुपये ३६,५९३ व बचत खर्च रुपये २७,५९० यांस महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५४ (१) नुसार कार्यकारी अभियंता यांची.

(५) मॅन्युअल ऑफ मायनरइरिगेशन वर्क्स महाराष्ट्र स्टेट १९८३ चे परि.क्र.७.१० महाराष्ट्र शासन लघुपाटबंधारे, पुणे यांचे परि.क्र.मुअलपा/स्था/३/विअ २/१०४२/२००६, दिनांक १३ एप्रिल, २००६, नुसार तलाव योजनेसाठी पॉझिटीव जलरोधी कठीण खडक खोदाईचे परिमाणातील जादा खर्च रुपये ६६६ वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रचलित मंजुर दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक बनवुन ब १ निविदेनुसार नुसार मक्तेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. निविदेच्या परिशिष्ट अ मध्ये सिमेंटचा पुरवठा विभागाकडुन होणार नसल्याचे नमुद आहे. निविदा ब १ मधील अटी व शर्तीमध्ये कामाचे देयकासोबत मक्तेदाराने बाजारातुन खरेदी केलेल्या सिमेंटची उपप्रमाणके सादर करणे नमुद नाही. तसेच प्रचलित दरसुची मधील संधानकाच्या दरामध्ये सिमेंटचा दर समाविष्ट असल्याने मक्तेदाराने स्वतः सिमेंट खरेदी करावयाचे आहे. प्रचलित दरसुचीनुसार देयकाचे प्रदान झालेले आहे.

(२) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था स्तर) पुणे यांचेकडील पत्र क्र.मुअ/लपा/स्था स्तर /उविअ/०२/१०४२/सन २००६, दिनांक १३ एप्रिल, २००६ नुसार १० कि.मी. पुढील वाहन अंतरास अधीक्षक अभियंता, नाशिक यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे बाब क्र. ४ मधील १:३:६ संधाणकाच्या दरामध्ये घेतलेल्या जास्तीच्या वाहन अंतराकरीता केलेला रुपये १,१८,२१० चे खर्चास अधिकृत प्राधिकरणाची मंजुरी नाही. या अनियमिततेकरिता तत्कालिन कार्यकारी अभियंता सौ.आर.डी.घाणे यांची विभागीय चौकशीचा प्रस्ताव जा.क्र. लसिं/ आस्था/ आरआर/३३९/२०१४ दिनांक ११ मे, २०१४ अन्वये शासनास सादर केलेला आहे.

(३) सदर कामाचे मोजमाप पुस्तक क्र.१२६५ पान नं.१९ नुसार खोदाईतून उपलब्ध साहित्य ५७१.६० घ.मी. आहे. त्यातून ३७८ घमी. साहित्य भरावाकरिता वापरणेत आलेले आहे. उर्वरित १९३.६० घ.मी.साहित्य वापरण्यास अयोग्य असलेने नाकारलेले आहे त्यामुळे ते बंधाऱ्याच्या खालच्या बाजुस जागेवरच साठविलेबाबत मोजमाप पुस्तक क्र.१२६५ पान नं.१९ वर प्रमाणित केलेले आहे. त्यामुळे त्या साहित्याच्या गौण खनिजाच्या रकमेची आकारणी केलेली नाही.

(४) प्रत्यक्ष काम करतांना भुस्तराचे वर्गीकरणामध्ये बदल झालेने पाया हा जास्त खोलीवर लागलेला आहे. त्यामुळे १:३:६ संघानकाच्या परिमाणामध्ये वाढ झालेली आहे. तसेच इतर काही बाबींमध्ये बचत झालेली आहे. परंतु कामावर झालेला खर्च हा मुळ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असलेने जास्तीचा खर्च झालेला नाही.

प्रचलित अंदाजपत्रकांस व बचत/वाढ विवरण तक्त्यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे.

(५) परिच्छेदातील उप परिच्छेद ५ मधील वसूल पात्र रक्कम रु.६६६ चलनाने शासन सदरी भरणा करण्यात आलेली आहे.

**(६) भोद, तालुका धरणगांव साठवण बंधारा बांधणे**

**परिच्छेद क्रमांक ३.३५२ (सन २००८-०९)**

भोद ता.धरणगांव येथील साठवण बंधाऱ्यावर एकूण रु. ६,५०,६४८ खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) बाब क्र.२ प्रोव्हायडींग ॲण्ड लेयींग परिमाण २८७.२१ व गाईडबंड परिमाण ३९०० घ. मी. एकत्रित ४१८७.२१ घ.मी.साहित्यावर दिनांक १५ डिसेंबर, २००६ पासून ३५.३४ (-) १७.६७ तफावत दर रुपये १७.६७ नुसार रक्कम रुपये ७४०७२ वसुल करणे आवश्यक आहे.

(२) सिमेंट बिल प्रमाणके पडताळणीस सादर केले नाही.

(३) मक्तेदाराचे संस्था वर्गीकरण, आयकर विवरण मंजुरीचे विमा प्रमाणपत्र नाही.

(४) कामाच्या ठिकाणच्या ७/१२ हस्तांतरण संपादीत क्षेत्र इत्यादी अभिलेख पडताळणीस उपलब्ध केले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर कामांस सन २००६-०७ या आर्थिक वर्षामध्ये तांत्रिक मान्यता दिलेली असून प्रशासकीय मान्यता ही दिनांक १७ नोव्हेंबर, २००६ अन्वये अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेली आहे.अंदाजपत्रक बनवताना सन २००५-०६ ची दर सुची वापरण्यात आली असून त्यामध्ये गौणखनिज दर रुपये १७.६७ प्रती घ.मी. हा मुळ दरातच समाविष्ट करण्यात आला होता. त्यामुळे या दरानुसारच एकूण परिमाण ४१८७.२० घ.मी. ची गौणखनिज रक्कम रुपये ७३,९८८ ही देयकातुन वसुल करण्यात आलेली आहे.

सन २००७-०८ च्या दरसुची मध्ये रुपये ३५.३४/घ.मी. असा गौण खनिजाचा दर आहे. या अगोदरचे अंदाजपत्रक असलेने रुपये १७.६७/ घ.मी.नुसारच वसुली केली आहे.

(२) प्रचलित मंजुर दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक बनवुन ब १ निविदेनुसार मक्तेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. निविदेच्या परिशिष्ट अ मध्ये सिमेंटचा पुरवठा विभागाकडून होणार नसल्याचे नमुद आहे. निविदा ब १ मधील अटी व शर्तीमध्ये कामाचे देयकासोबत मक्तेदाराने बाजारातून खरेदी केलेल्या सिमेंटची उपप्रमाणके सादर करणे नमुद नाही. तसेच प्रचलित दरसुची मधील संधानकाच्या दरामध्ये सिमेंटचा दर समाविष्ट असल्याने मक्तेदाराने स्वतः सिमेंट खरेदी करावयाचे आहे. प्रचलित दरसुचीनुसार देयकाचे प्रदान झालेले आहे.

(३) चेअरमन सावता मजुर सह.संस्था मर्या. धरणगांव यांचे संस्था वर्गीकरण व आयकर विवरण, विमाप्रमाणपत्र उपलब्ध आहे.

(४) सदर काम नदी नाल्यावर असल्याने व सदरचे क्षेत्र शासकीय असल्याने त्याचा ७/१२ उतारा घेण्यात आलेला नाही. सदर काम पुर्ण झालेवर देखभाल दुरुस्तीसाठी संबंधित ग्रामपंचायतीकडे करारनामा करून हस्तांतर करण्यात आलेले आहे.

**(७) मौजे भोलाणे २ ता.जळगांव येथे साठवण बंधारा बांधणे**

**परिच्छेद क्रमांक ३.३५३ (सन २००८-०९)**

मौजे भोलाणे ता.जळगांव येथे साठवण बंधाऱ्यावर एकूण रक्कम रुपये १२,९७,८४५ खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) बाब क्र.४ मधील १:३:६ डबर बांधकाम जादा परिमाण ३२.१४ घ.मी.दर रुपये २,४१२.४० प्रमाणे रक्कम रुपये ७७,५३४.५३ व बाब क्र.१० दगडी पिचींग भराव कामी अंदाजपत्रकात ३३.८४ घ. मी.करिता दर रुपये ६९१.९५ प्रमाणे रुपये २३,३८९ खर्च न केल्याने बचत खर्च यास

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५३ (१) नुसार मान्यता नाही करीता जादा व बचत खर्चाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५२ (१) नुसार सदर कामावर जादा खर्च रुपये ९,२८,१०१ व बचत खर्च रुपये ८३,८३४ खर्चास सुधारीत अंदाजपत्रक तयार करून मान्यता घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रत्यक्ष काम करतांना भुस्तराचे वर्गीकरणामध्ये बदल झालेने पाया हा जास्त खोलीवर लागलेला आहे. त्यामुळे १:३:६ संघानकाच्या परिमाणामध्ये वाढ झालेली आहे. तसेच इतर काही बाबींमध्ये बचत झालेली आहे. तसेच बाब क्र.१० दगडी पिचींग करणे ही बाब प्रत्यक्ष कामावर आवश्यक नसलेने केलेली नाही त्यामुळे बचत झालेली आहे.

परंतु कामावर झालेला खर्च हा मुळ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असलेने जास्तीचा खर्च झालेला नाही. त्यामुळे प्रचलित अंदाजपत्रकांस व बचत/वाढ विवरण तक्त्यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे.

(२) मुळ प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये १३,३६,७८६ इतकी असुन या कामावर रुपये १२,९७,८४५ इतका खर्च झालेला असुन तो प्रशासकीय मान्यता रकमेच्या आत आहे व जास्तीचा खर्च झालेला नाही. त्यामुळे सुधारित अंदाजपत्रकाची आवश्यकता नाही. प्रचलित अंदाजपत्रकास व बचत/वाढ विवरण तक्त्यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे.

**(८) कावपिंप्री ता.अमळनेर येथे गाव तलाव बांधणे**

**परिच्छेद क्रमांक ३.३५४ (सन २००८-०९)**

मौजे कावपिंप्री ता.अमळनेर जि.जळगांव येथील साठवण बंधाऱ्यावर एकूण रक्कम रुपये १३,३०,९९६ खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) मक्तेदार मजुर सह.संस्थेचे कोणतेही कागदपत्रे कामासोबत नाही.

(२) अंदाजपत्रकात क्लिरिंग साईट करिता रुपये २५० तरतुद असताना रुपये ५००० खर्च नोंदविला आहे. रुपये ४७५० जादा खर्च झालेला आहे.

(३) अंदाजपत्रकात माहिती फलक करिता रुपये २००० तरतुद असताना रुपये ५००० खर्च नोंदविला आहे. रुपये ३००० जादा खर्च वसुल करणे आवश्यक आहे.

(४) गौणखनिज रक्कम रुपये २,२४,०९१ असतांना वसुल रुपये १,५१,३१७ दर रुपये १७.६७ प्रमाणे केली आहे. तफावत ३५.३४ (-) १७.६७ दराने रक्कम रुपये १,५१,३१७ वसुल करणे आवश्यक आहे.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५२ (२) नुसार सदर कामावर तरतुदीपेक्षा जादा खर्च रुपये २,६७,४३१ व बचत खर्च रुपये २,६७,४३८ खर्चास सुधारीत अंदाजपत्रक तयार करून मान्यता घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मक्तेदार मजुर सहकारी संस्थेचे नोंदणी दाखला (रजिट्रेशन), सभासदांची यादी, सभासदांची विमा पॉलिसी इत्यादी आवश्यक कागदपत्रे निविदा नस्तीसोबत जोडलेले आहेत.

(२) परिच्छेदातील उप परिच्छेद २ मधील क्लीअरींग साईटसाठी जादा झालेला खर्च रुपये ४,७५० शासन सदरी दिनांक २२ एप्रिल, २०१४ रोजी भरणा करण्यात आलेला आहे.

(३) अंदाजपत्रकात माहिती फलकाकरिता रुपये २००० तरतूद असून या बाबी करिता रुपये २००० खर्च केलेला आहे. त्यामुळे सदर बाबीसाठी तरतूदीपेक्षा जास्तीचा खर्च केलेला नाही.

(४) सदर कामात मातीकामाची एकूण मात्रा ९३४९.७८ घ.मी. असून तत्कलिन प्रचलित दर रुपये ३५.३४ प्रति घ.मी. नुसार स्वामित्वधन रक्कम रुपये ३,३०,४२१ इतकी होते. याबाबत प्रथम चालू देयकातुन रुपये १,२१,३११ व दुसऱ्या चालू देयकातुन रुपये १,०२,७८० अशी एकुण रुपये २,२४,०९१ वसुल करण्यात आली होती. उर्वरित रक्कम रुपये १,०६,३३० ही वसुल करून दिनांक २२ एप्रिल, २०१४ रोजी चलनाने भरणा केलेली आहे.

(५) प्रत्यक्ष काम करतांना भरावाच्या कामाची आवश्यकता असल्याने त्यामध्ये वाढ झालेली आहे. तथापि, इतर काही बाबींमध्ये बचत झालेली आहे. परंतु कामावर झालेला खर्च हा मुळ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असलेने जास्तीचा खर्च झालेला नाही. म्हणुन सुधारीत अंदाजपत्रकाची आवश्यकता नाही. कामाच्या प्रचलित अंदाजपत्रकास व बचत/वाढ विवरण तक्त्यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे.

**(९) शेळगांव तालुका जळगांव व ७ गावे सापापु कच्चा बंधारा बांधणे व स्लॉटेट पाईप गॅलरी/कॉफर डॅम श्रॉऊडींग कामातील अनियमितता.**

**परिच्छेद क्रमांक ३.४८३ (सन २००८-०९)**

शेळगांव तालुका जळगांव येथे कच्चा बंधारा बांधणे कामावर एकूण रक्कम रुपये १७,९१,५०६ इतका खर्च झाला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग परिपत्रक झेडपीए १०८९/प्र.क्रं. ८५४/३३, दिनांक ८ फेब्रुवारी, १९९० व दिनांक २७ एप्रिल, २००० नुसार कामाची विभागणी करता येत नसतांना ग्रा.पं. असोदा यांना महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग जलसंधारण शासन निर्णय क्रं. झेडपी ए - २००४/प्र.क्रं.१८/वित्त ९(३३) दिनांक ३० जून, २००४ नुसार रुपये १० लाखाचे वरील काम विभागुन जाहीर निविदा प्रसिद्ध न करता दिलेले आहे.

(२) नदीवरील कच्चा बंधारा, पाईप गॅलरी खोदाई ठिकाणचे ड्रॉईग/नकाशा, जागेचा उतारा नस्तीस नाही.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक दरसुची दिनांक १५ सप्टेंबर, २००८ सर्वसाधारण टिपणी पृष्ठ क्रं. १२ अ.क्रं. ३२ नुसार सदर कामात गौण खनिज आकारणी महसुल व वन विभाग, दिनांक १५ डिसेंबर, २००६ दर क्रं. ३५.३४ केलेली नाही. करीता मक्तेदार ग्रामपंचायत यांना अनुज्ञेय केलेल्या दरात गौणखनिज सह अदा केलेले दराची आकारणी निश्चित करून वसुल होणे आवश्यक आहे.

(४) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेड पी ए/२०००/प्र.क्रं. १८/३३, दिनांक १९ जानेवारी, २००१ नुसार ग्रामपंचायत, असोदा यांचेकडून ५ टक्के रक्कम रुपये ८९,५७५ वसुल करून ग्रामनिधी भरणा केल्याची नमुना नं.७ पावती पडताळणीस उपलब्ध केलेली नाही.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम ४९० प्रमाणे विहीत नमुना ६५ पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तीकेत नोंदवलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शेळगांव सामुहिक पाणीपुरवठा योजनेतील स्लॅाटेड पाईप गॅलरी चॉकअप झाल्यामुळे योजनेतील पाणीपुरवठा बंद झाला होता. चॉकअप काढून पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी कच्चा बंधारा किंमत रुपये ९,६२,५१८ इतक्या किंमतीचे व स्लॅाटेड पाईप गॅलरी खुदाई या कामासाठी रुपये ८,२८,९८८ इतक्या किंमतीचे दोन स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करून जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचा ठराव क्रं. २६९ व २७० याद्वारे मंजुरी घेण्यात आलेली आहे. काम तात्काळ करण्यासाठी ई-निविदा प्रसिद्ध न करता रुपये १०.०० लक्ष किंमतीचे आतील काम ग्रामपंचायतीस देण्याबाबत शासन निर्णय क्रं.झेडपीए-२००४/प्र.क्र.१८/वित्त-९/३३/दिनांक ३० जून, २००४ नुसार ग्रामपंचायती मार्फत करून घेण्यात आले आहे. सोबत शासन निर्णय जोडला आहे.

(२) मंजुर नकाशा सोबत जोडलेला आहे.

(३) दुरुस्तीचे काम असल्यामुळे व ती Refiling ला वापरण्यात येत असल्यामुळे अंदाजपत्रकात गौण खनिजाची तरतूद करण्यात आली नाही.

(४) ग्रामपंचायत आसोदा यांच्याकडून ५ टक्के रक्कम रुपये ८९,५७५ वसुल करून नमुना नं.७ ची पावती सोबत जोडलेली आहे.

(५) संबधीत कामाचा पुर्णत्वाचा दाखला घेण्यात आलेला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंता यांनी तपासणी अहवाल दिला आहे काय, वाढ/बचतीच्या विवरणपत्रामध्ये वाढ/बचतीची तपशीलवार कारणे नमूद करण्यात आलेली आहेत काय, कार्यकारी अभियंता यांची लेखी परवानगी घेऊन काम पूर्ण करण्यात आले आहे काय, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी खुलासा केला की, सुंदरनगर गाव तलावाच्या

कामात बचत वाढ झाली आहे. उपलब्ध मालामध्ये वाढ झाली आहे, मातीमध्ये वाढ झाली आहे. काही बाबींमध्ये बचत झाली आहे. बचत वाढ प्रशासकीय मान्यतेच्या आत आहे. ३४.९९ टक्के वाढ झाली. उकरलेले साहित्य वापरले आहे. कार्यकारी अभियंता यांनी अंदाजपत्रकाला मान्यता दिलेली आहे. बाहेरचे साहित्य कमी लागले आहे. चाचणीला न पाठविता ते साहित्य वापरले, हे गाव तलावाचे काम आहे. साधारणतः कॉंक्रिटच्या कामाची करण्यात येते. सदर कामाच्या बाबतीत दिनांक १३ जुलै, २०१० ला चाचणी अहवाल घेतला आहे. कामे लहान असतात, त्यामुळे कॉंक्रिटची चाचणी करण्यात येते.

यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांना उद्देशून समितीने असे मत व्यक्त केले की, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग त्यांच्या सोयीप्रमाणे उत्तरे देत आहेत, नियमावली ठरली आहे. या संदर्भात चाचणी अहवाल असला पाहिजे. दगड, सिमेंट, खडी असे साहित्य आहे, त्याची चाचणी झाली पाहिजे. कार्यकारी अभियंता समितीची दिशाभूल करीत आहेत. समितीने विचारलेल्या प्रश्नाला बगल देण्याचे काम कार्यकारी अभियंता करीत आहेत. अगोदर चाचणी अहवाल देण्याची गरज होती. चाचणी अहवाल देण्याची गरज असताना, लहान काम होते, असे ते सांगत आहेत. कॉंक्रिटची चाचणी केली आहे, लहान काम आहे, अशा पद्धतीने मोघम उत्तर देण्याची गरज नाही. सामग्रीची चाचणी करतात. आता देखील लघुसिंचन विभागात चाचणी शिवाय कामे सुरू आहेत. चाचणी अहवाल घेतला पाहिजे. मात्र अजूनही यांच्या काळात अशीच कामे सुरू आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, कॉंक्रिटची चाचणी केली आहे, त्याला कोणती चाचणी म्हणतात, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी खुलासा केला की, कॉंक्रिटच्या चाचणीला कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रेन्थची टेस्टिंग म्हणतात. सुधारणा करण्याचा कार्यकारी अभियंता यांना अधिकार नाही, तो अधिकार सरकारला आहे. चाचणी अहवाल नंतर घ्यायचा नाही. याचा चाचणी अहवाल त्याला चालवायचा, हे योग्य नाही. कार्यकारी अभियंता कायदा बदलत आहेत का, निकृष्ट सामग्री वापरायची आणि चाचणी अहवाल चांगला घ्यायचा, हे योग्य नाही. अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे की, काम लहान असल्यामुळे चाचणी केली नाही, चाचणीशिवाय काम करता येते हे अभिलेख्यावर आहे.

समितीला अनुमोदन देताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ते बरोबर नाही. नमुना ६५ मध्ये चिकटविणे चुकीचेच आहे, नोंद करणे अपेक्षित आहे. प्रक्रियेमधील चूक आहे, मान्य करावी, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी मोघम उत्तर देऊ नये. यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी विदित केले की, कृष्णा खोरे कालवा हे मोठे स्ट्रक्चर आहे. वाळू उपलब्ध होते, खडी उपलब्ध होते, त्याची मिक्स डिझाईन केली जाते आणि मग त्यानंतर त्याची चाचणी करण्यात येते.

मौजे भोणे-४, चमगांव व आलवाडी ता.धरणगांव येथील साठवण बंधाऱ्याचे सिमेंट कॉंक्रिटचे मोजमाप केव्हा घेण्यात आले, चाचणी अहवाल प्राप्त न होताच काम पूर्ण करण्यात आले आहे काय, लेखा परीक्षणाच्या वेळी चाचणी अहवाल उपलब्ध का करून दिला नाही, शासन निर्णय दिनांक ३० जून, २००८ नुसार पाणीवापर सहकारी संस्था स्थापन करण्यात काय अडचणी आहेत तसेच निविदा कार्यवाही करण्यापूर्वी गौणखनिजाच्या स्वामित्वाचे वाढीव दरानुसार सुधारित अंदाजपत्रक का तयार करण्यात आले नाही व सुधारित दराने स्वामित्वधनाची वसुली करणे आवश्यक असताना ते का केले नाही, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी खुलासा केला की, उपरोक्त कामाचे कास्टींग दिनांक १२ एप्रिल, २०११ रोजी केले होते. दिनांक १३ मे, २०११ रोजी चाचणी करण्यात आली. तसेच दिनांक १५ मे, २०११ रोजी कॉंक्रीट तपासणी केली होती. सदरहू काम दिनांक १५ मे, २०११ रोजी पूर्ण झाले आणि या कामाचा चाचणी अहवाल दिनांक १७ मे, २०११ रोजी प्राप्त झाला. सदरहू काम पूर्ण होण्यापूर्वी चाचणी झालेले आहे. परंतु त्यांचा अहवाल विलंबाने प्राप्त झाला.

यावर समितीने विचारणा केली की, अहवाल येण्यापूर्वी सामग्रीचा वापर कसा केला, समितीला असत्य माहिती देता कामा नये, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी खुलासा केला की, साहित्य वापरण्यापूर्वी साहित्याची चाचणी केलेली नाही. वास्तविक पाहता साहित्य आणि कॉक्रिटचे चाचणी करणे आवश्यक असते. तद्नंतर समितीने असे निदेश दिले की, मुळात उपरोक्त साहित्याची चाचणी करणे आवश्यक असताना ते केले नाही. समितीचे मत आहे की, यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करणे गरजेचे आहे. मौ. भोणे-४ या साठवण बंधाऱ्याबरोबरच मौजे चमगाव, ता. धरणगाव, मौजे आलवाडी, ता. चाळीसगांव या साठवण बंधाऱ्यांच्या कामाची सुद्धा चौकशी करून दोषींवर कारवाई करावी.

परिच्छेद क्र.३.३४९/४/ग्रापापु ते ३.३५४ व ३.४८३/६/ग्रापापु मौजे धानवड, ता. जळगांव, मौजे दोनगाव, ता. धरणगाव, मौजे घामोडी-२, ता. रावेर, मौजे भोद, ता. धरणगाव, मौजे भोलाणे-२ ता. जळगांव व मौजे कावपिंप्री, ता. अंमळनेर येथे साठवण बंधारा/गाव तलाव बांधणेबाबत तसेच मौ.शेळगाव, ता.जळगाव व ७ गावे सामुहिक पाणीपुरवठा कच्चा बंधारा बांधण्याबाबत व स्लॉटेट पाईप गॅलरी/कॉफर डम श्राऊडींग कामातील अनियमिततेबाबत समितीने विचारणा केली की, परिच्छेद क्र.३.३४९ ते ३.३.३५४ व ३.४८३ हे सर्व परिच्छेद सारखेच आहेत. मौजे भोलाणे-२, ता.जळगाव येथील साठवण बंधाऱ्याची ट्रायलपीट न घेताच अंदाजपत्रक तयार करण्यामागील कारणे काय आहेत, यावर कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांनी खुलासा केला की, जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणी विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. या संदर्भातील प्रस्ताव दिनांक ११ मे, २०१४ रोजी शासनाकडे सादर केला आहे. तद्नंतर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, श्रीमती आर.डी.घाणे, तत्कालिन

कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करुन, सदरहू प्रस्ताव शासनाला सादर केला आहे. त्यानंतर कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांनी विदित केले की, दोषी आढळून आलेल्या कार्यकारी अभियंत्यांवर बजावण्यात आलेले दोषारोप पुढीलप्रमाणे आहेत :—

"दोषारोप क्रमांक-१, श्रीमती आर.डी.घाणे, तत्कालिन कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगाव, हल्ली कार्यरत-कार्यकारी अभियंता, सरदार सरोवर, विभागीय कक्ष जळगांव यांनी खालीलप्रमाणे कामांचे अंदाजपत्रक मंजूर करताना मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर), पुणे यांचेकडील पत्र क्र.मुअ/लपा/स्था.स्तर/उविअ/०२/१०४२/सन २००६, दिनांक १३ एप्रिल, २००६ नुसार वहन अंतर व नकाशा १० कि.मी.पुढील वहन अंतर हे अधीक्षक अभियंता यांचेकडून प्रमाणित न करता अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे या गंभीर स्वरुपाची प्रशासकीय अनियमितता केलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतुदींचा भंग केला असून त्या दोषी आहेत.

(१) साठवण बंधारा, धानवड, ता.जळगांव, जि.जळगांव

(२) साठवण बंधारा दोनगांव, ता.धरणगांव, जि.जळगांव

(३) साठवण बंधारा घामोडी-२, ता.रावेर, जि.जळगांव

(४) साठवण बंधारा जाडगांव-२, ता.भुसावळ, जि.जळगांव

उपरोक्त साठवण बंधाऱ्याच्या कामांप्रकरणी तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, तत्कालिन कार्यकारी अभियंत्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केल्यानंतर जिल्हा परिषदेने उक्त प्रकरणी शासनस्तरावर पाठपुरावा केला आहे. जलसंपदा विभागाला ३ वेळा स्मरणपत्रे पाठविली आहेत. २०१४ नंतर, सन २०१५-१६ आणि आता नुकतेच पत्र पाठविले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या प्रकरणात तत्कालिन कार्यकारी अभियंत्यांनी गंभीर स्वरुपाचा गुन्हा केल्याची नोंद करण्यात आली आहे आणि दुसऱ्या बाजूला मात्र कारवाई करण्यात आलेली नाही. तत्कालिन अभियंत्यांवर केवळ विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. मुळात विभागीय चौकशीमध्ये तत्कालिन कार्यकारी अभियंता दोषी आढळून आले तर त्यांना निर्दोष सोडण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यांना आहे आणि जर ते निर्दोष आढळून आले तर त्यांना दोषी ठरविण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यांना आहे. विभागीय चौकशीअंती व्यक्ती दोषी आढळून आल्यास त्याला शिक्षा देण्याचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे साधी शिक्षा आणि दुसरी म्हणजे कठोर शिक्षा होय. जिल्हा परिषदेने सदरहू प्रकरणी नियम-६ नुसार कारवाई प्रस्तावित केली की नियम-८ नुसार प्रस्तावित केली.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, विभागीय चौकशी ही कठोर शिक्षेसाठीच प्रस्तावित केली जाते. तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, एखाद्या प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यामुळे जिल्हा परिषदेने तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. वास्तविक पाहता त्यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्यामुळे जिल्हा परिषदेने त्यांना निलंबित करून विभागीय चौकशी प्रस्तावित करावयास पाहिजे होती. ग्रामविकास विभागाच्या उप सचिवांचे मत जाणून घेतले असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी विदित केले की, कार्यकारी अभियंता हे ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीत येत नाहीत. दोषी अधिकाऱ्यास गंभीर शिक्षा करावयाची असेल तर त्यापूर्वी विभागीय चौकशी करणे आवश्यक असते. तसेच दुसरी बाब अशी की, दोषी अधिकारी/कर्मचारी हे साक्षीदारांवर दबाव आणू शकतात किंवा कागदपत्रांमध्ये फेरफार करून ते नष्ट करु शकतात अशी शक्यता असेल तर, त्या व्यक्तीला निलंबित करून त्याची विभागीय चौकशी करण्यात येते. विभागीय चौकशी ही त्रयस्थ अधिकाऱ्यांमार्फत केली जाते. विभागीय चौकशीचा अहवाल आल्यानंतर तो मान्य करणे वा अमान्य करणे याचे अधिकार नियुक्त प्राधिकारी यांना आहेत. जर त्यांना चौकशी अहवाल मान्य असेल तर तसे मत व्यक्त करावे लागते आणि चौकशी अहवाल मान्य नसेल तर तो कोणत्या मुद्द्याच्या अनुषंगाने मान्य नाही याबाबत नमूद करावे लागते.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) प्रयोगशाळेत साहित्याची तपासणी न करता उखरलेले निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे.

(२) सदरहू कामाचा अहवाल लिहिण्यापुर्वी मटेरीयल आणि कॉंक्रिटचे टेस्टींग करणे आवश्य्क असताना मौजे, भोणे -४ या साठवण बंधाऱ्यासमवेत मौजे चमगाव ता.धरणगाव व मौजे आलवाडी, ता. चाळीसगाव या साठवण बंधाऱ्याचे कामाची चौकशी केली आहे काय ? असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषीविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली ?

(३) (१) मौजे धानवड, ता. जळगांव, मौजे दोनगांव, ता. धरणगांव, मौजे धामोडी २ ता. रावेर, व मौजे जाडगाव -२ व भुसावळ या साठवण बंधाऱ्याचे कामाप्रकरणी तत्कालीन कार्यकारी अभियंताविरुद्ध जलसंपदा विभागाने कोणती कारवाई केली आहे ?

(२) तत्कालिन कार्यकारी अभियंता श्रीमती घाणे यांची विभागीय चौकशी करण्याबाबतचा शासनस्तरावर सादर केलेल्या प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे व त्यांच्याकडून किती रकमेची वसुली करण्यात आली.

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) अंदाजपत्रकामध्ये तलावाचे खोदकामातील उपलब्ध साहित्याचा वापर करण्याचा समावेश होता. याही प्रकरणी तलावाचे उद्‌ग्रहण क्षेत्रातून उपलब्ध झालेले साहित्य वापरले आहे व सदर तलाव आजही सुस्थितीत आहे. तथापि सदर साहित्याची तपासणी न करता वापर केल्याबाबत तत्कालीन उप अभियंता आर. डी. पाटील व कार्यकारी अभियंता, श्रीमती घाणे यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री. आर. डी. पाटील तत्कालीन उप अभियंता, यांचे स्पष्टीकरण प्राप्त झाले आहे. त्यांचा खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना लेखी समज देऊन, त्याची नोंद त्यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात आली आहे. श्रीमती आर. डी. घाणे तत्कालीन कार्यकारी अभियंता यांचा खुलासा प्राप्त झालेला नसल्याने व त्यांचेविरुद्ध इतर प्रकरणात विभागीय चौकशी सुरू असल्याने त्यामध्ये अतिरिक्त वाढीव आरोप समाविष्ट करण्यास्तव सादर करण्यात आले आहे.

(२) (१) मौजे भाणे-४ ता.धरणगांव येथे साठवण बंधारा बांधणे :-

सदर साठवण बंधाऱ्याच्या बांधकामासाठी १:३:६ प्रमाणाचे कॉंक्रीट करण्यात आलेले असून, त्यासाठी सिमेंट, खडी, व वाळू यांचा वापर करण्यात आलेला आहे. या साहित्याची टेस्टींग कार्यक्षेत्रावर करण्यात आली नाही. तथापि, यासाठी चांगल्या दर्जाचे सिमेंट तसेच क्रशर मशीनची खडी व गिरणा नदीची वाळू वापरण्यात आलेली आहे.

कॉंक्रिटच्या दर्जाबाबत दिनांक १२ एप्रिल, २०११ रोजी क्युबचे कॉस्टींग करून ते दिनांक १३ मे, २०११ रोजी कॉलेज ऑफ इंजिनियरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी, जि. जळगांव या अधिकृत प्रयोगशाळेमध्ये टेस्टींग केलेले आहे व त्याचा अहवाल दिनांक १७ मे, २०११ रोजी प्राप्त झालेला आहे. तथापि, वापरलेल्या साहित्याची टेस्टींग अनावधानाने राहून गेलेले आहे.

तसेच प्रत्येक्ष काम करतांना भूस्तराच्या वर्गीकरणामध्ये बदल झाल्याने व भरावाची आवश्यकता असल्याने जास्तीचा भराव केलेला आहे. तसेच इतर काही बाबींमध्ये बचत झालेली आहे. कामावर झालेला खर्च हा मूळ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत आहे.

(२) मौजे चमगांव, ता. धरणगांव येथे गावतलावाचे बांधकाम करणे :-

मौजे चमगांव, ता. धरणगांव या ठिकाणी गावतलावाचे काम पूर्ण करण्यात आले असून, त्यासाठी गाभा भराव करणेसाठी हार्टींग मटेरीयल (काळीमाती) व कवच भराव करणेसाठी मुरुमाचा वापर करण्यात आलेला आहे. या कामावर कॉंक्रिटचे काम केलेले नाही. त्यामुळे सिमेंट, स्टील, खडी व वाळू या साहित्याचा वापर केलेला नाही. त्यामुळे त्याची चाचणी घेण्यात आलेली नाही.

तथापि, गाभा भराव व कवच भराव यासाठी वापरलेल्या माती व मुरुम या साहित्याची चाचणी करणे अनावधानाने राहून गेलेले आहे. परंतू वापरण्यात आलेले माती व मुरुम चांगल्या दर्जाचे आहे.

प्रत्यक्ष काम करतांना काही परिमाणामध्ये वाढ व बचत झालेली आहे. यामध्ये गाभा भराव उपलब्ध व बाहेरुन आणणे, पिचींग यामध्ये वाढ झालेली आहे व कवच भराव उपलब्ध व बाहेरुन आणणे यामध्ये बचत झालेली आहे. तथापि, कामावर झालेला खर्च हा मुळ प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत आहे.

वरील साठवण बंधारा भोणे ता. धरणगांव व मौजे चमगांव ता.धरणगांव येथील गांव तलाव या दोन्ही कामांमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत विभागाचे पत्र क्र. सिंचन / आर आर / २३१ / २०१८ दिनांक १० मे २०१८ अन्वये श्री आर.टी.पाटील (तत्कालीन शाखा अभियंता) व श्री व्ही.जे.साळुंखे (तत्कालीन उप विभागीय अधिकारी) व श्रीमती आर. डी. घाणे (तत्कालीन कार्यकारी अभियंता) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

श्री. आर.टी.पाटील व श्री. व्ही.जे.साळुंखे, यांचे स्पष्टीकरण प्राप्त झालेले आहे. त्यांचा खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना लेखी समज देऊन, त्याची नोंद त्यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्याबाबत त्यांच्या विभागाला कळविण्यात आले आहे. श्रीमती आर. डी. घाणे यांचा खुलासा प्राप्त झालेला नसल्याने त्यांचेविरुद्ध इतर प्रकरणात विभागीय चौकशी सुरू असल्याने त्यामध्ये अतिरिक्त वाढीव आरोप समाविष्ट करण्यास्तव सादर करण्यात आले आहे.

(३) मौजे आलवाडी, ता.चाळीसगांव येथे साठवण बंधारा बांधणे :-

सदर साठवण बंधाऱ्याच्या बांधकामासाठी १:३:६ प्रमाणाचे कॉंक्रिटचे काम करण्यात आलेले असून, त्यासाठी सिमेंट, खडी व वाळू यांचा वापर करण्यात आलेला आहे. या साहित्याची चाचणी कार्यक्षेत्रावर करण्यात आली नाही. तथापि, यासाठी चांगल्या दर्जाचे सिमेंट तसेच क्रेशर मशीनची खडी व गिरणा नदीची वाळू वापरण्यात आलेली आहे.

कॉंक्रिटच्या दर्जाबाबत दिनांक १० मार्च, २०११ रोजी क्युबचे कॉस्टींग करून ते दिनांक ९ एप्रिल, २०११ रोजी शासकीय तंत्रनिकेतन, जळगांव जि.जळगांव या अधिकृत प्रयोगशाळेमध्ये चाचणी केलेली आहे व त्याचा अहवाल दिनांक ९ एप्रिल, २०११ रोजी प्राप्त झालेला आहे. तथापि, वापरलेल्या साहित्याची चाचणी केली गेलेली नाही.

प्रत्यक्ष काम करतांना भुगर्भीय परिस्थितीनुसार किरकोळ स्वरुपात बचत वाढ झालेली आहे. झालेला खर्च हा मुळ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत आहे.

वरील अनियमिततेबाबत विभागाचे पत्र क्रमांक सिंचन/आरआर/२२८/२०१८ दिनांक १० मे, २०१८ अन्वये श्री. आर. डी. पाटील, (तत्कालिन शाखा अभियंता व प्रभारी उप विभागीय अधिकारी) तसेच श्रीमती आर. डी. घाणे, (तत्कालिन कार्यकारी अभियंता) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

श्री.आर.डी. पाटील, यांचा खुलासा प्राप्त झालेला आहे. त्यांचा खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना सक्त ताकीद देऊन, त्याची नोंद त्यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात आली आहे. श्रीमती आर. डी. घाणे यांचा खुलासा प्राप्त झालेला नसल्याने त्यांचेविरुद्ध इतर प्रकरणात विभागीय चौकशी सुरू असल्याने त्यामध्ये अतिरिक्त वाढीव आरोप समाविष्ट करण्यास्तव सादर करण्यात आले आहे.

(३) (१) सदर प्रकरणी श्रीमती आर. डी. घाणे तत्कालीन कार्यकारी अभियंता यांचेवर विभागीय चौकशीचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र दिनांक ११ मे २०१४ रोजी जलसंपदा विभागास सादर करण्यात आले आहे.

जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक शिभंका /२०१४/५२१/ (२१/२०१५)/ दक्षता १, दिनांक १५ डिसेंबर २०१७ अन्वये श्रीमती राजश्री डी. घाणे यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. चौकशी प्रलंबित आहे.

(२) या प्रकरणी शितल माने, कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक शिभंका/२०१४/५२१/(२१/२०१५)/ दक्षता १ दिनांक १५ डिसेंबर २०१७ अन्वये श्रीमती राजश्री डी. घाणे यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी नाशिक विभाग, नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. चौकशी प्रलंबित आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

(१), (२), (३) व (४) **मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, जळगाव यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

(३) **जलसंपदा विभागाचे अभिप्राय :-** श्रीमती राजश्री घाणे, तत्कालिन कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांनी पंचायती राज समिती अहवालातील सन २००८-०९ व २००९-१० मधील परिच्छेदात घेतलेल्या आक्षेपानुसार केलेल्या अनियमिततेप्रकरणी त्यांच्याविरुद्ध शासन ज्ञापन दिनांक ९ मे, २०१६ अन्वये म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील नियम ८ खाली दोषारोपपत्रे बजावण्यात आली आहेत.(प्रत सोबत जोडली आहे.) सदर ज्ञापन श्रीमती घाणे यांना दिनांक ८ जून, २०१६ रोजी प्राप्त झाले आहे. श्रीमती घाणे यांनी याप्रकरणी बचावाचे अभिवेदन शासनास सादर केलेले नाही. यास्तव शासन आदेश दिनांक २७ जुलै २०१७ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, नाशिक यांची आणि सादरकर्ता अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांना शासन पत्र दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ व दिनांक ४ जुलै २०१८ अन्वये स्मरणपत्र पाठऊन चौकशी अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत कळविले आहे. अद्याप चौकशी अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्द्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ३० जानेवारी व दिनांक ११ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने दिलेल्या माहितीशी सहमत असल्याचा अभिप्राय जलसंधारण विभागाने दिलेला आहे. यामध्ये चौकशी सुरू असल्याने अतिरिक्त वाढीव आरोप समाविष्ट करण्यास्तव प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे नमूद केले आहे, याबाबत खुलासा करावा.

यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी खुलासा केला की, या संदर्भात मागच्या साक्षीमध्ये हे सर्व मुद्दे झालेले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे समितीच्या इतिवृत्तामध्ये त्याची नोंद पण असेल. यामध्ये एवढाच मुद्दा आहे की, श्रीमती घाणे नावाच्या अधिकाऱ्यांची सर्व चौकशी जलसंपदा विभागाकडे सुरू आहे. त्याची स्थिती जलसंपदा विभागाकडून घ्यावी लागेल. सध्या विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांच्याकडे ती चौकशी सुरू आहे. त्यावेळेस जलसंपदा विभागाकडे त्याची आस्थापना होती. सध्या त्यांची विभागीय चौकशी सुरू आहे.

तद्‌नंतर जलसंपदा विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, सन २०१६ मध्ये त्यांना दोषारोप पत्र बजावलेले आहे. बचाव पुरावा सादर करण्यासाठी २ महिन्याची मुदतवाढ मागितली होती. ती मुदतवाढ मंजूर करण्यात आली होती. पण मुदतवाढ संपल्यानंतरही त्यांनी पुरावा सादर केला नाही. त्यामुळे दिनांक २७ जुलै, २०१७ मध्ये प्रादेशिक अधिकाऱ्यांकडे ही चौकशी सोपविली आहे. त्यानंतर विभागीय अधिकाऱ्यांना वारंवार ८ ते १० स्मरणपत्र पाठवलेले आहेत. माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये समितीने साक्ष घेतल्यानंतर समितीचे निर्देश होते. त्या निर्देशाच्या आधारावर जलसंपदा विभागाने पत्र व्यवहार केला आहे आणि एक महिन्याच्या आत हे प्रकरण निकाली काढण्याचा आदेश दिला. पण ऑक्टोबर, २०१८ मध्ये परत त्यांचे पत्र आले की, त्यांच्याकडे चौकशीची १७० प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रकरणांमुळे वेळेत अहवाल देणे शक्य होणार नाही. त्यानंतर तीन ते चार स्मरणपत्र पाठवलेली आहेत. विभागाने हे प्रकरण सोडवण्यासाठी प्रयत्न करून चौकशी अधिकाऱ्यांकडे आधीच हे प्रकरण सोपविलेले आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, या प्रकरणामध्ये अनावश्यक वेळ वाया जात आहे. अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत पण या ठिकाणी निर्देश दिल्यानंतर ते प्रकरण तात्काळ निकाली निघाले पाहिजे. तर मग एवढी प्रकरणे का प्रलंबित राहत आहेत, मागच्या वेळी ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी विभागीय सचिवांच्या साक्षी घेतल्या आहेत. राज्यामध्ये १ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत. तसेच उप अभियंता श्री. आर.डी. पाटील यांनी कार्यकारी अभियंता श्रीमती घाणे यांना कारणे दाखवा नोटीस बजावून देखील त्यांचे स्पष्टीकरण प्राप्त झाले नाही.

यावर जलसंपदा विभागाच्या सचिवांनी विदित केले की, सदर प्रकरण माहे जुलै, २०१७ मध्येच चौकशी अधिकाऱ्यांकडे सोपविलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, जुलै, २०१७ पासून जानेवारी, २०१९ संपत आले आहे तरीही कारवाई होत नाही म्हणून जाणूनबुजून जलसंपदा विभागाचे चौकशी अधिकारी त्यांना संरक्षण देत आहेत असे वाटते, यावर जलसंपदा विभागाच्या सचिवांनी विदित केले की, नाही, महसूल विभागाचे काही प्रादेशिक चौकशी अधिकारी आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयात ते पद निर्माण केले आहे.

तदनंतर जलसंधारण विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, खुलासा आला नाही याचा अर्थ त्यांना हे आरोप मान्य आहे. समजा विभागाने १ ते ४ पत्र बजावल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी जर त्याचा काही खुलासा दिला असेल तर त्यावर विचार करता येतो. १ ते ४ जोडपत्र त्यांच्या संदर्भात आहे त्यासाठी त्यांनी चौकशी अधिकारी नेमले त्यामुळे आता तो भाग पूर्ण झालेला आहे. त्याचे निवेदन आले नाही म्हणून चौकशी करण्यात काही अर्थ नाही. समितीचे म्हणणे बरोबर आहे की, चौकशी विहित कालावधीत पूर्ण व्हायला पाहिजे. कार्यकारी अभियंत्याकडून माहिती घेतल्यानंतर त्यांनी असे सांगितले की, तिथे पूर्णवेळ अधिकारी नसल्यामुळे त्याची चौकशी कोणाकडे तरी दिलेली आहे. परंतु आता मागच्या नोव्हेंबर महिन्यात सामान्य प्रशासन विभागाने वर्ग १ च्या अधिकाऱ्यांच्या चौकशासाठी पॅनल तयार केले. पूर्वी असे होते की, वर्ग ब आणि वर्ग क च्या कर्मचाऱ्यांच्या चौकशा कंत्राटी पद्धतीमार्फत होत होत्या. रोजगार हमी योजनेमध्ये खूप मोठे प्रकरण प्रलंबित होते त्यामुळे जलसंधारण विभागाने याचा पाठपुरावा केला आहे. सामान्य प्रशासन विभागाने आता वर्ग १ च्या अधिकाऱ्यांच्या चौकशांसाठी कंत्राटी पद्धतीने अधिकारी नेमलेले आहेत. त्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून आता प्रलंबित असलेल्या चौकशी करता येतील.

यावर समितीने निदेश दिले की, मागच्या बैठकीत विभागीय आयुक्तांना बोलावून ती सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी समितीने सूचना निर्गमित केल्या होत्या. १ ते ४ जोडपत्र सादर केले आणि खुलासा करण्यास सांगितले तरी तसे केले जात नाही, हे सर्व स्पष्ट दिसत आहे. अशा प्रकरणांमध्ये तात्काळ कारवाईला सामोरे गेले पाहिजे.

यावर जलसंपदा विभागाच्या सचिवांनी विदित केले की, समितीचे म्हणणे योग्य आहे पण कार्यपद्धत अशी आहे की, त्या अधिकाऱ्यांना बचावाची संधी दिली पाहिजे. चौकशी अधिकाऱ्यांकडे हे प्रकरण सोपविलेले आहे. तद्‌नंतर कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, चौकशी प्रादेशिक विभागीय आयुक्तांकडे आणि कार्यकारी अभियंता सादरकर्ता अधिकारी आहेत.

यावर जलसंधारण विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणे आणि इतर सर्व बाबींचा विचार करावा लागेल. त्यामुळे आता चौकशीसाठी कंत्राटी पद्धतीने अधिकारी नेमलेले आहेत. कारण नियमीत अधिकाऱ्यांकडून ती कामे पूर्ण होत नव्हती.

यावर जलसंधारण विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, नाशिक आयुक्तांना जलसंधारण विभागाच्या सचिवांनी सांगितले होते की नाशिक आयुक्तांनी स्वतः जर या महिन्याच्या अखेर याची चौकशी संपवली नाहीतर मार्च महिन्यामध्ये नाशिक आयुक्तांना साक्षीसाठी बोलावले जाईल.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीला खात्री आहे की, हा अहवाल येणारच नाही. हा परिच्छेद सन २०१३-१४ चा आहे. मग सन २०१८-१९ पर्यंत हा परिच्छेद स्पष्ट होत नाही. समिती त्या ठिकाणी भेट देण्यासाठी गेली म्हणून काहीतरी हालचाल सुरू झाली नाहीतर काहीच केले नसते. यावर जलसंधारण विभागाच्या सचिवांनी विदित केले की, ८, ९, १२ आणि २३ क्रमांकाचे हे चारही मुद्दे त्या अधिकाऱ्यांच्या चौकशीच्या अनुषंगाने आहेत. त्या अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचा मुद्दा बाकी आहे. तो अधिकारी दोषी आहे असे म्हणून त्याची विभागीय चौकशी करून त्याबाबतीत निर्णय घेण्यात येईल.

मुद्दा क्रमांक ८ मौजे सुंदरनगर, ता. चाळीसगाव येथील गावतळ्यांची दुरुस्ती करणेबाबत नाशिक विभागीय आयुक्त यांनी समितीस विदित केले की, मुद्दा क्रमांक ८, ९, १२, २३ आणि २७ आहे. हे सर्व मुद्दे सर्वसाधारण जलसंधारण कार्यकारी अभियंता होते. यामध्ये सर्व कनिष्ठ अधिकारी उप अभियंता आहेत. त्यांच्यावर जलसंधारण विभागाने कारवाई केलेली आहे. यामध्ये जे मुख्य अभियंता होते त्यांचेशी संबंधित हे चार विषय आहेत. हे वेगवेगळ्या पाझर तलावासंदर्भातील आहे. सर्व मुद्यांवर तपासणी झाल्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयाकडे दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी जलसंधारण विभागाच्या मंजुरीने कारवाई करावी म्हणून प्रस्ताव आलेला आहे. त्यासोबतचे कागदपत्र नसल्यामुळे त्यांना लगेच दिनांक १४ ऑगस्ट,२०१७ रोजी कागदपत्रे मागितली. त्यामध्ये प्रशासकीय वेळ लागला. त्यानंतर दिनांक १५ डिसेंबर, २०१८ रोजी कागदपत्रे मिळाली. त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयाने लगेच दिनांक १५ डिसेंबर, २०१८ रोजीपासून सुनावणीची कार्यवाही विभागीय चौकशी अधिकाऱ्यांच्या मार्फत सुरू केली. श्री.ढाणे कार्यकारी अभियंता आहेत. त्यांना दिनांक १५ मे, २० ऑगस्ट, त्यानंतर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१८ रोजी बोलाविले. ते तिनही वेळा उपस्थित राहिले नाहीत. चौथ्या वेळी ते दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी उपस्थित राहिले आणि त्यांचे त्यांनी म्हणणे सादर केलेले आहे. त्यानंतर इतर लोकांच्या चौकशा आणि साक्षी झाल्या. यामध्ये महत्वाचे साक्षीदार श्री.नागरगोजे आहेत. ते त्यावेळेचे उप संचालक, सह मुख्य लेखापरीक्षक (स्थानिक निधी) नाशिक येथे होते. त्यांची साक्ष महत्वाची आहे. त्यांना विभागीय आयुक्त कार्यालयाने वारंवार बोलाविले आहे. दिनांक १४ डिसेंबर त्यानंतर दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९, दिनांक ११ मार्च, २०१९, दिनांक ११ मार्च, २०१९, दिनांक २७ मार्च, २०१९, इत्यादी तारखांना बोलाविले होते. आता त्यांची दिनांक १२ जून, २०१९ रोजी सुनावणी ठेवली आहे. त्यांच्या कार्यबाहुल्यांमुळे त्यांना उपस्थित राहता आले नाही.

यावर समितीने विचारणा केली की, इतक्या वेळेस पत्र देऊन सुद्धा ते उपस्थित राहिले नाहीत. यावर विभागीय आयुक्त यांनी विदित केले की, ते एमएमआरडीएला संचालक आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयाने आता पुन्हा एमएमआरडीएला समक्ष पत्र देऊन पुन्हा साक्ष घेण्यात येईल. कारण ही महत्वाची साक्ष आहे. त्यांनी हे मुद्दे काढलेले आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयाला तीन महिन्याची मुदत दिली तर हे सर्व पूर्ण होईल. ही न्यायालयीन चौकशी आहे.

यावर समितीने असे विचार व्यक्त केले की, चार-पाच वेळा पत्र देऊन श्री. ढाले कार्यकारी अभियंता यांची साक्ष झालेली आहे. परंतु श्री.नागरगोजे यांना चार पाच वेळा पत्र देऊनही ते आले नाहीत. त्यांचे तात्काळ म्हणणे ऐकून घेऊन लगेच कारवाई करावी.

यानंतर विभागीय आयुक्तांनी खुलासा केला की, ही चौकशी न्यायालयीन पद्धतीची आहे. यामध्ये उलट तपासणी होते. त्यानंतर दोन्ही लोकांचे अंतिम वाद होते. निश्चितपणे कारवाई व्हावी. अपिलात संधी मिळू नये यादृष्टीने थोडे व्यवस्थित प्रक्रिया पार पाडणे गरजेचे आहे.

यावर समितीने विचारणा केली की, या प्रक्रियेसाठी किती महिने लागतील, यावर विभागीय आयुक्तांनी खुलासा केला की, तीन महिने लागतील. तथापि, समितीच्या निदेशानुसार समितीला दोन महिन्यात कारवाईसह अहवाल सादर करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

मौजे सुंदरनगर, ता. चाळीसगांव येथील गावतळ्याच्या दुरुस्ती मौजे भोणे-४, चमगांव व आलवाडी ता. धरणगांव येथे साठवण बंधारा बांधणे या बांधकामावर रुपये १२,२१,७२५/-, मौजे धानवड, ता. जळगांव येथील साठवण बंधारा बांधणे या बांधकामावर रुपये १३,८१,५९८/-, मौजे दोनगाव व ता. धरणगांव येथील साठवण बंधारा बांधणे बांधकामासाठी रुपये ९,७३,३८३/-, मौजे धामोडी, २ ता.रावेर येथील साठवण बंधारा बांधकामासाठी रुपये १०,२२,६७८/-, भोद ता. धरणगांव साठवण बंधाऱ्यावर रुपये ६,५०,६४८/-, मौजे भोलाणे, २ ता. जळगांव येथे साठवण बंधाऱ्यावर रुपये १२,९७,८४५/-, मौजे कापिंप्री, ता. अंमळनेर येथील साठवण बंधाऱ्यावर रुपये १३,३०,९९६/-, शेळगांव, ता. जळगांव व ७ गावे सामुहिक पाणीपुरवठा कच्चा बंधारा व स्लॉटेट पाईप गॅलरी/कॉफर डॅम श्रीउडींग या कामासाठी रुपये १७,९१,५०६ याप्रमाणे उपरोक्त बांधकामासाठी एकूण रक्कम रुपये १,०३,५०,०७९ एवढा खर्च झालेला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम, १२० ((२) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींसाठी खर्च करण्याची तरतूद नाही. अंदाजपत्रकाप्रमाणे कामे करवून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता याची आहे. तथापि, नियमानुसार कार्यवाही केली नाही. दुरुस्तीसाठी वापरलेले दगड, खडी, सिमेंट इत्यादी साहित्य शासकीय प्रयोगशाळेकडून तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त केलेले नाहीत. कामाच्या नोंदी नमुना नं.३९ नोंदवहीतील रकाने परिपूर्ण नोंदवून /हस्तांतरणासंबंधी कार्यवाही

पूर्ण केल्याचे प्रमाणित करून महसुली ७/१२ उतारे प्राप्त केलेले नाहीत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १७ जून, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार १ टक्का एवढी रक्कम कामगार कल्याण उपकर निधीत जमा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ३१ जुलै, २००० मधील परिच्छेद एक नुसार समविभाग शासन निर्णय दिनांक ३० जून, २००८ प्रस्ताव परिच्छेद क्र.२ नुसार लघुपाटबंधारे योजनांच्या लाभ क्षेत्रातील योजनेच्या लाभधारकांना एकत्र येऊन योजनेच्या सिंचन व्यवस्थापन देखभाल व दुरुस्तीसाठी सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करून सिंचन क्षेत्र हस्तांतरीत केल्याचे कागदपत्र पहावयास मिळाले नाहीत तसेच स्वामित्व शुल्क भरणा केलेले नाही. पाणी उपसा केलेला आहे त्याबाबतचे लॉगबुक ठेवलेले नाही. मक्तेदाराची मशिनरी आणि साहित्य यांची यादी जोडलेली नाही. करारनामा कोरा असून त्यावर कार्यकारी अभियंता व मक्तेदार यांची स्वाक्षरी आहे. नमुना ६५ मुल्यांकन दाखल्यावर दिनांक नमूद नाहीत त्यामुळे काम मुदतीत पूर्ण झाल्याची पडताळणी करता आली नाही. मुख्य अभियंता लघुपाटबंधारे (स्था स्तर) पुणे यांचेकडील दिनांक ३ ऑगस्ट, २००४ अन्वये क्लिअरिंग द साईड ही बाब अंतर्भूत करण्यात येऊ नये असे असतानाही सदर बाबीसाठी प्रदान केलेली रक्कम संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे. भरावासाठी जादा प्रदान झालेली रक्कम संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे. अनुदान प्रत्यक्ष उपलब्ध झाल्याखेरीज निविदा प्रक्रिया सुरू करणेत येऊ नये, असे असतानाही जिल्हा परिषद, जळगांव यांनी अनुदान प्राप्त न होताच कामाचे आदेश दिनांक १९ डिसेंबर, २००९ रोजी देऊन दिनांक १५ एप्रिल, २०१० रोजी काम पूर्ण संपलेले आहे. परंतु सदरच्या लेखाशीर्षाखाली अद्यापपर्यंत अनुदान प्राप्त नाही. लघुसिंचनकडील टिपणीनुसार सदरचे देयक लघुपाटबंधारे/ले.प./पा.त.दुरुस्ती जिल्हा परिषद निधी ह्या लेखाशीर्षांतर्गत प्रदान केले आहे. त्यास मुख्य लेखा व वित्त अधिकारी / सभापती अर्थ / अध्यक्ष जिल्हा परिषद, जळगांव व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी मान्यता देऊन सर्वसाधारण सभेमध्ये देयक प्रदान केलेले आहे. परंतु सदरच्या लेखाशीर्षाखाली अद्यापपर्यंत आलेले नसल्याने अनियमितता झालेली आहे.

तसेच सिमेंट खरेदीची उप प्रमाणक टॅक्स इनव्हॉइस नाही. सिमेंट वाहतुकीकरीता अतिप्रदान केलेले आहे. सिमेंट बिल प्रमाणके पडताळणीस सादर केले नाही. सिमेंट रस्त्याने वाहतुकीकरीता अंदाजपत्रक तयार करून स्पर्धात्मक निविदा प्राप्त न करता लिडचा खर्च अनुज्ञेय केलेला आहे. वाहन अंतर खर्चास नकाशासह अंतर प्रमाणित केलेले नाही. खोदाई उपलब्ध परिमाण व दर्शविलेले परिमाण सदर परिमाणामुळे गौणा खनिज परिमाणातील दराप्रमाणे रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. तलाव योजनेसाठी पॉझिटीव्ह जलरोधी कठीण खडक खोदाईचे परिमाणातील जादा खर्च वसूल करणे आवश्यक आहे. मक्तेदाराचे संस्था वर्गीकरण आयकर विवरण मंजुरीचे विमा प्रमाणपत्र नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या समोर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी केलेल्या खुलाशानुसार सुंदरनगर गाव तलावाच्या कामात बचत वाढ झाली आहे. उपलब्ध मालामध्ये वाढ झाली आहे. मातीमध्ये वाढ झाली आहे. काही बाबीमध्ये बचत झाली आहे. सदर बचत वाढ प्रशासकीय मान्यतेच्या आत आहे. कार्यकारी अभियंता यांनी अदाजपत्रकाला मान्यता दिली आहे. बाहेरील साहित्य कमी लागले आहे. गाव तलावाचे काम असल्यामुळे साधारणतः कॉक्रिटच्या कामाची चाचणी करण्यात आली आहे. सदर कामाच्या बाबतीत दिनांक १३ जुलै, २०१० रोजी चाचणी अहवाल घेतला आहे. सदरहू खुलाशावर समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. समितीच्या मते दगड, सिमेंट, खडी इत्यादी साहित्य आहे त्याची चाचणी होणे आवश्यक होते. यासंदर्भात नियमावली ठरलेली आहे. चाचणी अहवालाशिवाय देयके काढण्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे समितीला दिली जाणारी उत्तरे मोघम व दिशाभूल करणारी आहेत ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक असल्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

उपरोक्त प्रकरणी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने प्रयोगशाळेत साहित्याची तपासणी न करता उकरलेले निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध केलेल्या कारवाईबाबत जिल्हा परिषदेकडून मागविलेल्या माहितीनुसार असे कळविण्यात आले आहे की, अंदाजपत्रकामध्ये तलावाचे खोदकामातील उपलब्ध साहित्याचा वापर करण्याचा समावेश होता. याप्रकरणी तलावाचे उदग्रहण क्षेत्रातून उपलब्ध झालेले साहित्य वापरलेले आहे व सदर तलाव सुस्थितीत आहे. तथापि, सदर साहित्याची तपासणी न करता वापर केल्याबाबत तत्कालिन उप अभियंता श्री.आर.डी.पाटील व कार्यकारी अभियंता श्रीमती घाणे यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. श्री.आर.डी.पाटील, तत्कालिन उप अभियंता यांचे स्पष्टीकरण प्राप्त झाले आहे. त्यांचा खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना लेखी समज देऊन त्याची नोद त्यांच्या मूळ सेवापुस्तकात घेण्यात आली आहे. श्रीमती घाणे, तत्कालिन कार्यकारी अभियंता यांचा खुलासा प्राप्त झालेला नसल्याने व त्यांचेविरुद्ध इतर प्रकरणात विभागीय चौकशी सुरू आहे. जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त खुलाशावरुन असे दिसून येते की, तत्कालिन कार्यकारी अभियंता श्रीमती घाणे तसेच तत्कालिन उप अभियंता श्री.आर.डी.पाटील यांचेकडून अनियमितता झालेली आहे.

उपरोक्त खुलाशासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, श्रीमती घाणे, तत्कालिन कार्यकारी अभियंता यांची चौकशी जलसंपदा विभागाकडे सुरू आहे. सध्या विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांच्याकडे विभागीय चौकशी सुरू आहे. सन २०१६ मध्ये त्यांना दोषारोप पत्र बजावलेले आहे. बचाव पुरावा सादर करण्यासाठी २ महिन्यांची मुदतवाढ मागितली होती. सदर मुदत वाढ मंजूर करण्यात येऊन देखील श्रीमती घाणे यांनी पुरावा सादर केला नाही. त्यानंतर विभागीय

अधिकाऱ्यांनी वारंवार ८ ते १० स्मरणपत्रे पाठविलेली आहेत. माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये समितीने साक्ष घेतल्यानंतर समितीने दिलेल्या निर्देशाच्या आधारावर जलसंपदा विभागाने पत्रव्यवहार केला व प्रकरण प्रलंबित असल्यामुळे एक महिन्याच्या आत अहवाल देणे शक्य होणार नाही असे कळविलेले असले तरी प्रस्तुत प्रकरण विभागीय अधिकाऱ्याकडे पाठवून जवळपास १० महिने उलटून गेल्यानंतरदेखील समितीने दिलेल्या निर्देशानुसार कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतलेली नसल्याने विभागीय चौकशी अधिकारी संबंधितांना संरक्षण देत आहेत अशी शंका उपस्थित होत आहे. त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. यासंदर्भात तात्काळ कारवाई करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

**त्यांच्यावर कोणतीही प्रस्तुत प्रकरणी तत्कालिन कार्यकारी अभियंता यांनी गंभीर स्वरुपाचा गुन्हा केल्याची नोंद करण्यात आली आहे, मात्र कारवाई करण्यात आलेली नाही. विभागीय चौकशीमध्ये कार्यकारी अभियंता दोषी आढळून आले तर जिल्हा परिषदेने त्यांना निलंबित करून विभागीय चौकशी प्रस्तावित करणे आवश्यक होते. तथापि, तत्कालिन उप अभियंता श्री. आर. डी. पाटील यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यावर श्री. पाटील यांनी पाठविलेला खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना लेखी समज देऊन त्याची नोंद मूळ सेवा पुस्तकात घेण्यात आली आहे ही कारवाई पुरेशी नसून याप्रकरणी ठोस कारवाई करण्यात यावी. तसेच कार्यकारी अभियंता, जलसंधारण श्रीमती घाणे या प्रकरणाचे महत्वाचे साक्षीदार श्री. नागरगोजे तत्कालिन उप संचालक, सह मुख्य लेखापरिक्षक (स्थानिक निधी) नाशिक यांची सुरू असलेली चौकशी प्रक्रिया एक महिन्याच्या आंत पूर्ण करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, जळगांव

## जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीतील पाणीपट्टीच्या थकीत वसुलीबाबत

### (१) परिच्छेद क्रमांक ३.८०९ (१०)/७ (सन २०११-१२)

जिल्हा परिषदा ह्या प्रादेशिक पाणी पुरवठ्याच्या योजना पुर्णपणे कार्यान्वित झाल्यावर त्या योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करून पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक विभागांसाठी वेगवेगळ्या दराने पाणी पट्टी वसूली करतात. पाणी पट्टीच्या रकमा ग्रामपंचायतीकडे थकित राहिल्याचे सन २०११-१२ या लेखापरिक्षणातून दिसून आले आहे. याबाबत उणीवा खालील प्रमाणे आहेत :—

(१) वसूल रकमांबाबत नोंद ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा परिपूर्ण करीत नाही. त्यामुळे हिशोब तपासणीत अडचणी येतात. मागील थकबाकी चालु मागणी व व्याज आणि एकूण थकीत रकमा यांचा आढावा घेवून रकमा वसुलात आणणे आवश्यक असतांना याकडे विशेष लक्ष दिले जात नाही.

(२) काही जिल्हा परिषदांच्या लघुपाटबंधारे विभागाच्या स्वतंत्र योजना आहेत. तर ज्या ठिकाणी अशा योजना नाहीत त्याठिकाणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणी पुरवठा जिल्हा परिषदा करतात त्यांची रक्कम थकीत राहिल्याने व्याजासहीत व वर्षागणीक रक्कम वाढत आहे वसुलीसाठी ठोस उपाययोजना जिल्हा परिषदा अंमलात आणत नाही.

(३) लघुपाटबंधारे विभागाने योजना राबविल्या नंतरच्या योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करणेसाठी जास्त कालावधी लागतो. अशा योजनांची वसूली प्रमाणात जिल्हा परिषदांकडे थकीत दिसते, तरी याबाबत योग्य उपाययोजना करून रकमा वसूलात आणणे आवश्यक आहे. सदर थकीत रकमा काही कोटी रुपयाहुन जास्त आहेत. अशा जिल्हा परिषदांची माहिती उदाहरणादाखल पुढील तक्त्यात देण्यात येत आहे. तरी रक्कम रुपये ४७,६०,९४,८०४ वसूलात आणणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण क्र. | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | जळगांव | ग्रामीण पाणी पुरवठा | ७ | ५,०१,६०,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सामुहिक पाणीपुरवठा योजनेच्या वसुली संदर्भात मागील थकबाकी, चालू मागणी व व्याज यांच्या नोदवहीत ठेवणेबाबत संबंधित ग्रामपंचायती व पंचायत समिती यांना कळविण्यात आलेले असून, विभागीय कार्यालयात नोंदवही ठेवण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे थकीत रक्कमा वसुलीबाबत पाठपुरावा चालू आहे.

(२) याबाबत जिल्हा परिषदेकडे लघु पाटबंधारे विभागाच्या स्वतंत्र योजना तसेच महाराष्ट्र राज्य औद्यागीक विकास महामंडळाकडून आलेली पाणीपुरवठा योजना नसल्याने वसुली करता येत नाही.

(३) दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर सर्व प्रादेशिक योजनांच्या एकत्रित थकबाकी रकमा रुपये ५,०१,६०,००० प्रलंबित असल्याने जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने वसुलीसंदर्भात वेळोवेळी ग्राम पंचायतींना, पंचायत समितींना व प्रत्यक्ष ग्रामंस्थांना भेट देऊन तसेच आम सभेत प्रश्न उपस्थित करून वसुलीबाबत कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांमार्फत प्रयत्न केलेले आहेत तसेच गट विकास अधिकारी/विस्तार आधिकारी व ग्रामसेवक यांचेमार्फत देखील वेळोवेळी आवश्यक ते प्रयत्न करण्यात आलेले आहेत. तथापि ग्रामस्थांकडून योग्य प्रमाणात प्रतिसाद न मिळाल्याने सदरची थकबाकी प्रलंबित राहिली आहे. सदर रक्कम १०० टक्के वसुलीबाबत कॅम्प लाऊन ग्राम पंचायतींना वितरित होणाऱ्या अनुदानातून जास्तीत जास्त रक्कम समायोजीत करणेची कार्यवाही विभागामार्फत सुरू आहे. आज अखेर वसुली रु. २,२५,७९,१५० झालेली आहे. प्रलंबित रक्कम वसूल करणेबाबत या विभागाकडून सतत पत्र व्यवहार करण्यात येत आहे.

### (२) परिच्छेद क्रमांक ४.३९५/११ (सन २०११-१२)

पंचायत समितीच्या हद्दीमध्ये असलेल्या पाणीपुरवठा व प्रादेशिक योजनांमधून कूपनलिका विहीरीतून तसेच विद्युतपंप व हातपंपाच्या सहाय्याने ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा केला जातो. हा पाणीपुरवठा लोकसंख्या व कुटुंबे यांच्या संख्येवर आधारीत असतो. सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षणात सदर पंचायत समित्यांच्या पाणीपुरवठा योजना बाबतच्या हिशोबाच्या नोंदवह्या तपासल्या असता दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर बऱ्याच रकमा वसुली अभावी थकीत असलेल्या दिसून आल्या. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून पंचायत समित्यांनी वेळच्या वेळी करणे

आवश्यक होते. वसुली न केल्याने थकबाकीच्या रकमा वर्षागणीक वाढत जाऊन ग्रामपंचायतीकडून वसूल करणे कठीण जाते. वसुलीबाबत पंचायत समित्या विशेष प्रयत्न करतांना दिसत नाही असे लेखा परिक्षणात आढळून आले आहे. ३१ मार्च, २०१२ अखेर खालील २० पंचायत समित्यांकडे रक्कम रुपये ३७,१५,४८,०७७ इतकी पाणीपट्टीची थकीत वसुली आहे. उदाहरणादाखल खालील पंचायत समित्यांचे आक्षेप एकत्रित करून तक्त्यामध्ये दर्शविले आहेत :—

| **अ.क्र** | **जिल्ह्याचे नाव** | **पंचायत समितीचे नाव** | **लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ११ | जळगाव | जळगाव | ११ | २,०१,१४,९४४ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सन २०११-१२ ची थकीत पाणीपट्टी रक्कम रुपये २,०१,१४,९४४ असून फेब्रुवारी, २०१७ अखेर रक्कम रुपये ७५,९३,५७२ मात्र रक्कम वसूल झालेली आहे. फेब्रुवारी, २०१७ अखेर थकीत राहिलेली रक्कम रुपये १,२५,२१,३७२ मात्र बाकी असून संबंधित ग्रामपंचायतीकडून वसुलीबाबतची कार्यवाही सुरू आहे.

**(३) परिच्छेद क्रमांक ४.३९५/४२ (सन २०११-१२)**

| अ.क्र | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १२ | जळगाव | भुसावळ | ४२ | ४२,८४,८७८/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पाणीपट्टी वसुली थकबाकीची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे :—

| अ.न. | पा.पु.योजना | दि.३१/३/१२ अखेर थकबाकी | आजपावेतो वसूल झालेली रक्कम | आज रोजी थकीत असलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | वरणगांव सह ५ गावे सामुहीक पा.पु. योजना | १३,३९,७५० | १३,३९,७५० | निरंक |
| २ | ८० गावे जागतिक बँक (ओ.डी.ए) पापु.योजना | २९,४५,०६७ | २९,४५,०६७ | निरंक |
| | **एकूण** | **४२,८४,८१७** | **४२,८४,८१७** | **निरंक** |

लेखा परिक्षण अहवालात उपरोक्त वर्षाअखेर थकबाकीची एकूण रक्कम रुपये ४२,८४,८७८ दर्शविलेली आहे. परंतु ती प्रत्यक्षात रुपये ४२,८४,८१७ एवढीच आहे. त्यानुसार थकित रक्कमेची १०० टक्के वसुली करण्यात आलेली आहे.

**(४) परिच्छेद क्रमांक ४.३९५/०४ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १३ | जळगाव | भडगाव | ४ | ९,९०,४७३ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदात नमूद केलेनुसार ८० टक्के पाणीपुरवठ्याची थकीत रक्कम रुपये ९,९०,४७३ पैकी माहे फेब्रुवारी २०१७ अखेर ४,२६,५७० वसूल झालेली आहे. उर्वरीत रक्कम रुपये ५,६३,९०३ इतकी थकीत वसुली करणे प्रलंबित आहे. सदर प्रलंबित थकीत रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सातत्याने सुरू आहे.

**(५) परिच्छेद क्रमांक ४.३९५/०५ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १४ | जळगाव | भडगाव | ५ | १०,७६,७२० |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदात नमूद केलेनुसार रक्कम रुपये १०,७६,७२० ही सन २०११-१२ अखेर भडगाव ग्रामपंचायत ही नगर परिषद झाल्याने त्यावेळीची थकीत वसुलीतून रुपये ३६,७२० वसूल झालेली आहे. तथापि, रुपये १०,४०,००० नगरपरिषदेकडून वसूल करणे प्रलंबित आहे. सदर प्रलंबित थकीत रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सातत्याने चालू आहे.

**(६) परिच्छेद क्रमांक ४.३९५/६ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १५ | जळगाव | पारोळा | ६ | २५,७९,८१५ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे पाणीपट्टी थकीत वसुली रक्कम रुपये २५,७९,८१५ पूर्ण वसूल झालेली आहे.

**(७) परिच्छेद क्रमांक ४.३९५/२४ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १६ | जळगाव | एरंडोल | २४ | ६९,९२,९८९ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ अखेर पाणीपट्टी थकबाकी रुपये ६९,९२,९८९ होती. सदरची वसुली दिनांक ३१ मार्च, २०१५ अखेर पूर्ण करण्यात आली आहे.

**(८) परिच्छेद क्रमांक ४.३९५/१३ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १७ | जळगाव | बोदवड | १३ | १०,७८,२४,९१९ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.३९५ अनुक्रमांक १७ प्रलंबित रक्कम रुपये १०,७८,२४,९१९ अशी दर्शविलेली आहे. परंतु लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक १३ व सामुहिक पाणीपुरवठा योजनेनची ग्रामपंचायतीकडील ८० टक्के पाणीपटटी वसुली परिशिष्ट ५ विवरणपत्रात प्रलंबित असलेली थकबाकी प्रत्यक्षात १,०८,२४,९१९ इतकी आहे. त्यापैकी रक्कम रुपये ३२,१५,५३१ वसूल केलेली आहे. उर्वरीत वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगाव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सद्यःस्थितीमध्ये पाणीपट्टी थकीत वसुली किती आहे, सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाअखेर प्रलंबित वसुलीपैकी किती रक्कम वसूल झाली, पाणीपट्टी वसूल न होण्याची कारणे काय आहेत.

यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी खुलासा केला की, प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची संख्या १० आहे. जिल्हा परिषदेमार्फत प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चालविण्यात येतात. दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर सर्व प्रादेशिक योजनांची एकत्रित थकबाकी रक्कम रुपये ५,०१,६०,००० प्रलंबित होती. परंतु वेळोवेळी ग्रामपंचायती, पंचायत समिती व प्रत्यक्ष ग्रामस्थांना भेट देऊन वसुलीबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यामुळे आतापर्यंत २,२५,७९,१५० एवढी रक्कम वसूल झालेली आहे. तसेच उर्वरित रक्कम वसूल करण्याबाबत ग्रामपचांयतीशी तगादा लावलेला आहे. उर्वरित रक्कम ग्रामपंचायत यांच्या मुद्रांक शुल्क आणि गौण खनिज यातून वसूल करावी, अशा सूचना दिलेल्या आहेत. पाणी पट्टी ग्रामपचांयतींकडून वसूल करणे आवश्यक आहे.

यावर समितीने विचारणा केली की, पाणी पट्टीचे अधिकार जल व्यवस्थापन समिती ठरविते. वसुली ठरवून दिलेले कर्मचारी करतात. योजना जिल्हा परिषदेचा पाणीपुरवठा विभाग राबविते. ग्रामपंचायतीच्या हक्काच्या रकमेतून म्हणजेच मुद्रांक शुल्कातून पाणी पट्टी वसूल करीत असाल तर ही चुकीची वसुली आहे. असे करता येत नाही. यावर ग्रामविकास विभागाच्या उप सचिवांनी विदित केले की, पाणीपुरवठा योजना हस्तांतरित करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेची योजना असेल तर पाणी पट्टी वसूल होणे अपेक्षित आहे. परंतु ग्रामपंचायतीच्या मुद्रांक शुल्कातून पाणी पट्टी वसूल करण्यात येत असेल तर ते चुकीचे आहे.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, असा शासन निर्णय आहे की, प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या वसुलीच्या अधिन राहून या योजनेवरील खर्च भागवायचा आहे. त्यामुळे हा मुद्दा घेतलेला आहे. आक्षेप यासाठी आहे की, या नळ योजना बंद झाल्या तर त्या जिल्हा परिषद स्वतःच्या सेस फंडातून चालवू शकत नाही. वसुलीच्या अधिन राहून देखभाल खर्च भागवावा, असा शासन निर्णय आहे. पाच कोटी रुपयांची थकबाकी असेल तर या योजना कशा चालतील.

यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी विदित केले की, या योजना होत असताना प्रत्येक ग्रामपंचायतीने ठराव दिलेले असतात की, या योजना शिखर समिती स्थापन करून त्याला शासनाकडून मंजुरी मिळत असते. त्यानंतर या योजना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत होतात आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून शिखर समितीला हस्तांतरीत होतात. म्हणजे शिखर समितीने या योजना चालवायच्या असतात.

यानंतर समितीने निदर्शनास आणून दिले की, कार्यकारी अभियंता यांनी चुकीची माहिती सांगितलेली आहे. योजना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत होतात की, जिल्हा परिषदेकडे होतात. शिखर समित्या गठित करणे ही जिल्हा परिषदेची पर्यायी व्यवस्था आहे. याचाच अर्थ त्यामध्ये ग्रामपंचायतीने येणे बंधनकारक नाही. प्रादेशिक नळ योजनेच्या प्रस्तावास शासन मंजुरी देते तेव्हा सर्व गावांचे प्रस्ताव आपण घेतो. या योजना आम्ही चालवू असे त्या प्रस्तावामध्ये लिहिलेले नसते. त्या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिल्यावर ते तपासले पाहिजे. तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी विदित केले की, थकबाकी वाढायला नको, हा महत्वाचा मुद्दा आहे. वसुलीसाठी ग्रामसेवकाची मदत घेतली जाऊ शकते. परंतु ग्रामपचांयतीच्या अनुदानातून वसुली करणे हे अतिशय चुकीचे आहे. हा मुद्दा अतिशयम महत्त्वाचा असून गुंतागुंतीचा आहे.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेकडे दहा, पंधरा गावे मिळून विहिरींची योजना आहे. याद्वारे गावांच्या पाण्याच्या टाकीपर्यंत पाणी पुरविले जाते, परंतु, गावातील पाण्याचे वाटप ग्रामपंचायत करते. ग्रामपंचायतीने गावातील नागरिकांना ज्या जोडण्या दिलेल्या आहे, त्याची वसुली ग्रामसेवक करतो. या वसुलीची ८० टक्के रक्कम जिल्हा परिषदेला द्यावी लागते आणि २० टक्के रक्कम ग्रामपंचायतीला स्वतःच्या देखभाल व वापरासाठी ठेवली जाते, असा निर्णय त्यावेळी घेतला होता. त्यानुषंगाने या दहा योजना चालू आहे. बहुतांशी ग्रामपंचायतींनी ८० टक्के रक्कम वसूल केली असेल किंवा रक्कम वसूल केली नसेल म्हणून जिल्हा परिषदेकडे भरलेली नाही. त्यामुळे थकबाकी जास्त वाटत आहे. प्रत्येक गावातील सरपंच किंवा सदस्य यांची शिखर समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला व त्या समितीने वसुली करावी. मुख्य दुरुस्ती असेल तर ती जिल्हा परिषदेने करावी, असा निर्णय घेतला होता. या योजना चालविण्यासाठी जिल्हा परिषदेकडे स्वतंत्र मनुष्यबळ नाही.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या योजना चालविण्यासाठी एका कामगाराला २०० रुपये दिले जातात. देखभाल दुरुस्तीकरिता २० टक्के रक्कम पाणीपुरवठा योजनेच्या प्रकल्पामधून खर्च केली जाते. या प्रादेशिक नळ योजना चालविण्यासाठी ती तरतूद केलेली आहे. देखभालीचे दोन भाग आहेत. एक तर ग्रामपंचायतीसोबत करारनामा करावा किंवा एखाद्या सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना निविदा द्यावी, जेणेकरून तो देखभाल करेल व वसुलीही करेल. जिल्हा परिषद हे शिखर समितीकडून करीत असाल तर शिखर समिती कोणत्याही ठिकाणी यशस्वी नाही.

यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांनी विदित केले की, आज रोजी पाणीपुरवठा योजना चालू आहे व लोकांना पाणी देखील मिळत नाही. यासंदर्भात तीन, चार वर्षापूर्वी जिल्हा परिषदेने ठराव केलेला होता. एका वर्षाकरिता एका कुटुंबाला ५,५०० रुपयांची पाणीपुरवठा योजना करण्यात आली होती. परंतु लोकांचे म्हणणे होते की, ही योजना आम्हाला परवडणारी नाही. त्यामुळे ही रक्कम जास्त दिसत आहे. दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजीपर्यंत थकित रक्कम रुपये १४ कोटी एवढी आहे. राष्ट्रीय पेयजलसाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांचा हिस्सा असतो, त्यातील १५ टक्के रक्कम देखभाल व दुरुस्ती यासाठी जमा होते, त्यामधून साडे सात टक्के वीज देयक भरण्यासाठी आणि साडे सात टक्के ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी असतात. अशा योजनांची मालकी जिल्हा परिषदांची असते.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हा मुद्दा ग्रामीण भागातील पाण्यासंदर्भातील महत्त्वाचा आहे. बऱ्याचशा ग्रामपंचायतींची पैसे भरण्याची परिस्थिती नाही. तसेच गावांमध्ये गोरगरीब कुटुंबियांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांची पैसे भरण्याची आर्थिक स्थिती नाही. यामध्ये मोठ्या अडचणी आहेत. जिल्हा परिषदेने पैसे भरण्यासंदर्भातील महत्त्वाचा विषय आहे. तद्‌नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, पाणीपुरवठा योजनेची आताची थकबाकी १४ कोटी रुपयांपर्यंत वाढलेली आहे. पूर्वी जे वीज देयक थकीत असायचे, परंतु नवीन वीज देयक भरले तरी वीज पुरवठा सुरू होत होता. नवीन काळामध्ये शासनाचे धोरण बदलले आहे. त्यामुळे वीज पुरवठा खंडीत व्हायला लागला. त्यानंतर वीज देयकांची थकबाकी २ कोटी ९६ लाख रुपये इतकी आहे. यापूर्वी वीज देयकांचा खर्च देखभाल दुरुस्तीतून टप्याटप्यातून सन्माननीय सदस्य म्हणाले ते अगदी बरोबर आहे. यामध्ये आम्ही दोन बाबी प्रस्तावित करीत आहोत. पहिली बाब अशी की, शिखर संस्थेमध्ये काहीतरी तर्क काढावा लागणार आहे. तसेच पालक मंत्री महोदयांनी एक सूचना केलेली होती की, जिल्ह्याचा प्रकल्प म्हणून सौर ऊर्जेवर काही करता येऊ शकत असेल तर पाहावे.

तद्‌नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. सौरऊर्जा, पिण्याचे पाणी, वीज देयक, पाणीपट्टी इत्यादी विषय महत्त्वाचे असून संबंधित विभागांच्या सचिवांची साक्ष घेऊन चर्चा करण्याची आवश्यकता आहे. अशी समितीची सूचना आहे.

तद्‌नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, आतापर्यंत झालेल्या चर्चेवरुन असे दिसून येत आहे की, जळगाव जिल्ह्यामध्ये पाणीपट्टी आणि पाणीपुरवठा संदर्भात बऱ्याच प्रकरणामध्ये अनियमितता झालेली आहे. पाणीपुरवठा योजनांमध्ये पैशांची अफरातफर देखील मोठ्या प्रमाणात झालेली आहे आणि जिल्ह्यामध्ये प्रलंबितावस्था देखील मोठ्या प्रमाणात झालेली आहे. तसेच मुद्दा क्रमांक २४ ते ३० बाबत देखील तसेच झालेले आहे. पाणीपट्टी वसूली असेल, प्रादेशिक योजना असेल किंवा इतर विषय असेल, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे दिसत आहे. पाणीपट्टी वसूली न झालेल्या ठिकाणची तात्काळ वसूली करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली**

(१) सन २०११-१२ या वित्तीय वर्षा अखेर १० प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची उर्वरित थकबाकी रक्कम रु. २,७५,८०,८५० वसुली करण्यात आली आहे काय. याबाबतची सद्यःस्थिती काय आहे.

(२) दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत ग्रामपंचायत पाणीपुरवठा योजनेची थकित रक्कम १४ कोटी बाबत शासनाने समिती नेमली आहे. त्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतलेला आहे.

(३) पाणीपट्टी थकबाकीच्या १० योजनांपैकी २ योजना ग्रामपंचायतींनी दिल्या आहेत, परंतु प्रादेशिक नळ योजना ग्रामपंचायतला हस्तांतरित करता येत नाहीत. यासंदर्भात पाणीपुरवठा योजनेत रकमेची अफरातफर झाल्याने मुद्दा क्र.२४ ते ३३ बाबत पाणीपट्टी वसुली करण्याचे समितीने दिलेल्या निदेशानुसार कोणती प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे ?

(४) जिल्हा नियोजन समितीकडून मागील ०६ वर्षांत ३६ कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहील्यामुळे विकासाची कामे पूर्ण झालेली नाहीत, परिणामी यावल तालुक्यात रुपये २४,५३,७९० इतक्या अफरातफरीच्या रक्कमेतून आतापर्यंत किती वसूली करण्यात आली आणि यासंबधी अनियमितता करणाऱ्या संबधीत दोषीविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सन २०११-१२ या वित्तीय वर्षा अखेरची प्रलंबित पाणीपट्टीची वसुली सन २०१७-१८ मध्ये रुपये ९४,२१,२१४ व सन २०१८-१९ मध्ये रुपये १०,८५,०९७ अशी एकूण पाणीपट्टीची वसुली रुपये १,०५,०६,३११ करण्यात आलेली असून शिल्लक रक्कम रुपये १,७०,७४,५३९ प्रलंबीत आहे.

(२) शासन स्तरावरुन याबाबत कोणतीही समिती नेमलेली नाही.

(३) पंचायत समिती, जळगाव अंतर्गत ३ सामुहिक पाणीपुरवठा योजनांमधुन पाणी पुरवठा केला जातो. सन २०११-१२ अखेरची थकीत पाणीपट्टी रुपये २,०१,१४,९४४ असून, माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर रुपये ७५,९३,५७२ वसुल झालेली असून माहे मार्च, २०१८ अखेर रुपये १४,८०,६३४ इतकी रक्कम वसुल झालेली आहे.

पंचायत समिती यावल ग्रामपंचायतीकडील अफरातफर प्रकरणांत दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर प्रलंबित असलेल्या रक्कमांपैकी माहे मे, २०१८ अखेर वसुल झालेल्या रक्कमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निधीचा प्रकार | गुंतलेली रक्कम | वसुल झालेली रक्कम | प्रलंबित रक्कम |
|---|---|---|---|---|
| (१) | ग्रामनिधी | ७,२३,०४० | ६,५०,६८२ | ७२,३८५ |
| (२) | जवाहर रोजगार योजना | १४,२१,३०० | ११,५३,८४९ | २,६७,४५१ |
| (३) | जवाहर समृद्धी योजना | ३,०९,१५० | ३,०९,१५० | निरंक |
| | एकूण | २४,५३,४९० | २१,१३,६८१ | ३,३९,८०९ |

सदरची जुन्यात जुनी प्रकरणे १९८९-९० पासूनची आहेत. त्यामध्ये एकूण रक्कम रुपये २४,५३,४९० गुंतलेली होती. त्यांच्यापैकी एकूण रक्कम रुपये २१,१३,६८१ वसुल झालेली आहे. रक्कम वसुली झाल्यामुळे त्यांच्याविरुद्ध काही कारवाई केलेली नाही. उर्वरित रक्कम रुपये ३,३९,८०९ इतकी ०७ (पैकी ०६ ग्रामसेवक व ०१ सरपंच) व्यक्तींकडून वसुली सुरू आहे. वसुली न झाल्यास संबधीतांविरुद्ध कारवाई करण्यात येईल.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**(१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेमार्फत वसुलीची कार्यवाही सूरू आहे. शासन स्तरावरून धोरणात्मक निर्णय घेण्याचे विचाराधीन आहे.

**(२) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** पंचायत समिती, जळगावमार्फत कार्यवाही सुरू आहे. शासन स्तरावरुन धोरणात्मक निर्णय घेण्याचे विचाराधीन आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगाव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, थकीत पाणीपट्टी वसुलीबाबत सद्यःस्थिती काय आहे, यावर पाणीपुरवठा विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी खुलासा केला की, पाणीपट्टी वसुलीची आकडेवारी दिलेली आहे. जिल्हा परिषदेने काही प्रमाणात पाणीपट्टीची वसुली केलेली आहे. या संदर्भात विभागाने मंत्रीमंडळ बैठकीसाठी टिप्पणी तयार केलेली आहे की, ज्या ग्रामपंचायती जिल्हापरिषदेच्या देणी देत नाहीत, पाणी घेतात पण पाणीपट्टी देत नाहीत अशा ग्रामपंचायतींना जिल्हा परिषदेमार्फत जो काही निधी दिला जातो त्यातून ते पैसे परस्पर वळते करावे. कारण पाणीपट्टी न भरल्यामुळे अनेक योजना बंद पडतात. त्या बंद पडू नयेत म्हणून असा निर्णय घेण्याच्या मार्गावर आहोत. ज्या ज्या ग्रामपंचायतीला जिल्हापरिषदेद्वारे चालविण्यात येणाऱ्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमार्फत पाणीपुरवठा केला जातो, त्या त्या ग्रामपंचायतीने त्यांना जेवढे पाणी देण्यात येते, त्याचा जो काही दर असेल त्याप्रमाणे जिल्हापरिषदेकडे भरणा केला पाहिजे. जर भरणा केला नाही तर जिल्हापरिषदेला अधिकार राहतील. ग्रामपंचायतीने ग्रामस्थांकडून पैसे वसूल करून ते भरावयाचे आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, एकूण रुपये १ कोटी ७४ लाख प्रलंबित आहेत. ही रक्कम केव्हा वसूल करण्यात येणार आहे. सन २०११-१२ मधील प्रकरण आहे. आता सन २०१८ सुरू आहे. तसेच किती पाणीपुरवठा योजना १०० टक्के कार्यान्वित आहेत. जळगाव जिल्ह्यामध्ये अनेक योजना पूर्ण झालेल्या नाहीत. त्या प्रकरणी कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू असून त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. योजना कागदावर अपूर्ण असल्यामुळे तेथे दुसरी नवीन योजना मिळत नाही. येथे कार्यकारी अभियंता उपस्थित आहेत. भडगाव तालुक्यातील मेंहेंदळे पाणीपुरवठा योजनचे पाईप एक फुटावरुन वर आहेत. या कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी आहेत, परंतु अजून कोणावरही कारवाई झालेली नाही की कोणाकडून वसुली झालेली नाही. जळगाव जिल्ह्यामध्ये अशा किती योजना अपूर्ण आहेत आणि त्यावर वसुली दाखविली आहे.

यावर पाणीपुरवठा विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी खुलासा केला की, जवळपास ६२५ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना आहेत. त्यापैकी १०० योजना बंद आहेत. प्रत्येक गावाच्या स्वतंत्र योजना आहेत. अशा एकूण ४० हजार योजना आहेत. जळगाव जिल्ह्याची आता आकडेवारी नाही.

तद्नंतर कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) यांनी खुलासा केला की, आतापर्यंत जळगाव जिल्हा परिषदेमध्ये १० पाणीपुरवठा योजना चालविण्यात येत होत्या, त्यापैकी चार पाणीपुरवठा हस्तांतरित केल्या आहेत. उर्वरित प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चालवित आहे. सन्माननीय सदस्यांनी मांडलेला प्रश्न राष्ट्रीय पेय जल आणि भारत निर्माण योजनेतील आहे. पूर्वी भारत निर्माण योजना समितीमार्फत चालविण्यात येत होती आणि तांत्रिक मार्गदर्शनासाठी टीएसपी नेमण्यात आले होते. त्यामध्ये जिल्हापरिषदेच्या कोणत्याही अभियंत्यांचा समावेश नव्हता, त्यामुळे भारत निर्माण योजनेमध्ये ज्या काही योजना झाल्या त्यामध्ये ३०-४० टक्के अडचणी आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, एक तर ती योजना पूर्ण झाल्याचे दाखवावे किंवा अयशस्वी झाल्याची दाखवून संबंधितांवर कारवाई करावी, जेणेकरून दुसरी योजना घेता येईल. गावात योजना पूर्ण झाल्याचे दिसत आहे, परंतु योजना प्रत्यक्षात कागदावर अपूर्ण आहे. ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांच्यावर कारवाई झालेली नाही. गावात पाणी मिळत नाहीत आणि एक योजना अपूर्ण असल्यामुळे दुसरी योजना मिळत नाही अशी गावाची तांत्रिक समस्या आहे.

कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) यांच्या म्हणण्यानुसार त्या योजनेवर गावातील समिती होती. त्या समितीला पैसे दिलेले आहेत. त्या योजनेवर तांत्रिक अधिकारी लक्ष ठेवून होता. पण त्यांनी नीट लक्ष दिले नाही. गावच्या अध्यक्षांनी आणि इतरांनी पैशाची अफरातफर केली. जिल्हा परिषदेचा तांत्रिक अधिकारी असताना त्यांनी या गोष्टींची पाहणी केली नाही हे योग्य नाही.

कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) यांनी समितीस विदीत केले की, भारत निर्माण योजनेमध्ये तांत्रिक मार्गदर्शन जिल्हा परिषदेचे नव्हते. त्यासाठी खाजगी टीएसपी नेमले होते. तद्नंतर पाणीपुरवठा विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी खुलासा केला की, सन २००९-२०१० पासून राष्ट्रीय पेयजल योजना कार्यक्रमातंर्गत आणि त्यापूर्वी भारत निर्माण योजनेंतर्गत काही योजना गावपातळीवर राबवावयाच्या होत्या. त्या योजनेचे धोरण असे होते की, ती योजना राबविण्याचे अधिकार ग्रामपातळीवर देण्यात आले होते. त्यांना निविदा काढण्याचा आणि कंत्राटदार नेमायचा अधिकार दिला होता. त्या कामाची तांत्रिक पाहणी करण्यासाठी खाजगी टीएसपी नेमले होते. त्यांनी फक्त तांत्रिक बाबीवर मार्गदर्शन करायचे.यामध्ये जिल्हापरिषदेच्या अधिकाऱ्यांना आणि अभियंत्यांना कोणतेही काम नव्हते. जिल्हापरिषदेने त्यांच्या मागणीप्रमाणे निधी द्यायचा. या योजनेमध्ये अनेक कामे झाली तसेच अनेक कामांमध्ये घोटाळा देखील झालेला आहे. मागील एक वर्षापासून यावर चर्चा करीत आहोत. या संदर्भात शासनाची मान्यता घेऊन दिनांक ९ मार्च २०१८ रोजी शासन निर्णय काढून त्याद्वारे स्वीतीच्या पॉवर्स परत घेतलेल्या आहेत आणि तसे जिल्हापरिषदेला सांगितलेले आहे. ज्या ज्या ठिकाणी अपहार झालेला आहे त्याबाबत आमचा सखोल अभ्यास सुरू आहे. त्याची बारकाईने माहिती घेण्यात येत आहे. अपूर्ण योजना पूर्ण करण्याकडे आमचे लक्ष आहे. आम्ही प्रत्येक महिन्याला सर्व मुख्य अभियंत्यांची बैठक घेतो. किती योजना पूर्ण झाल्या, किती योजनांमध्ये अपहार झालेला आहे याचा पाठपुरावा करीत आहोत. या संदर्भातील राज्याची माहिती समितीला सादर करण्यात येईल.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, पाणीपुरवठा योजना अनेक वर्षापासून बंद आहेत. काही लोकांवर फौजदारी गुन्हे देखील दाखल झालेले आहेत. गावात पाणीपुरवठा होण्याचा विषय आहे. शासनाचा निधी चुकीच्या पद्धतीने खर्च झाला. जिल्हा परिषदेने फक्त पैसे देण्याचे काम केले. त्यावर आपलेच नियंत्रण असावयास पाहिजे होते. पण ते चुकीचे झाले. आता त्या गावामध्ये सुस्थितीत पाणी मिळण्याकरिता, ग्रामविकास विभागाला काहीतरी ठोस निर्णय घ्यावा लागेल, या योजना कार्यान्वित नाहीत. गावाला पाणी मिळत नाही. दुष्काळामध्ये तात्पुरती पाणीपुरवठा योजना करायची असेल तर दिनांक ३१ मार्चच्या पूर्वी प्रस्ताव दिला पाहिजे असा नियम आहे. राज्यात माहे मे महिन्यात दुष्काळ जाणवतो. जळगाव जिल्ह्यासाठी दिनांक ३१ मार्च पूर्वी प्रस्ताव देऊनही तात्पुरती पाणीपुरवठा योजना मिळाल्या नाहीत. जळगाव जिल्ह्यामध्ये परिस्थिती आहे की, कागदावर पाणीपुरवठा योजना दिसत आहे, परंतु प्रत्यक्षात चालू नाही. अशा वेळेला त्या गावाला अत्यावश्यक सेवा पाहिजे असेल तर त्याबाबत विचार झाला पाहिजे.

पाचोरा तालुक्यातील बोजेगावाला ज्या धरणातून पाणीपुरवठा योजना झालेली आहे, परंतु अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शेती उपयोगासाठी महिनाभरात सर्व पाणी उपसले गेले. त्यांनी त्यावर नियंत्रण आणले नाही, एमएसईबीने नियंत्रण आणले नाही, पाटबंधारे विभागाने नियंत्रण आणले. धरणातून जास्त पाणी उपसले गेल्यामुळे माहे एप्रिल, महिन्यात पाणी टंचाई निर्माण झाली. जून महिन्यापर्यंत पाणी पुरेल असे गावकऱ्यांना माहीत होते, परंतु अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे पाणी उपसले गेले. त्यांना गावाकरिता कायम स्वरुपी योजना करायची नव्हती. शेवटी पाचोरा तालुक्याचा लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांची परवानगी घेऊन आमदार फंडातून ३ लाख रुपये दिले आणि आठ दिवसांत पाणीपुरवठा योजना केली. तात्पुरती पाणीपुरवठा योजना ही इतकी तांत्रिक योजना नाही. फक्त एक चारी पाडून गावामध्ये पाणी आणायचे आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने दिनांक ३१ मार्च रोजीच्या शासन निर्णयामध्ये बदल करावा.

तद्नंतर पाणीपुरवठा विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी खुलासा केला की, गावामध्ये एक योजना सुरू असताना दुसरी योजना घेण्यात येऊ नये असा नियम आहेच. परंतु टंचाईच्या अनुषंगाने तात्पुरती पाणीपुरवठा योजना द्यायची असेल तर त्याबाबत वेगळे धोरण आहे. इतर नियमित योजनेचा त्याच्याशी काही संबंध नाही. टंचाईच्या काळात घ्यावयाच्या योजने संदर्भात काढलेल्या शासन निर्णयात नमूद केलेले आहे की, दिनांक ३१ मार्चपर्यंत तात्पुरत्या योजनेला मान्यता दिली पाहिजे, जेणेकरून ती योजना राबवून उन्हाळ्यामध्ये लोकांना पाणी मिळू शकेल. माहे एप्रिल किंवा मे महिन्यात योजना मंजूर केली तर त्याचा फायदा उन्हाळ्यामध्ये होत नाही त्यामुळे ती तारीख टाकण्यात आली आहे. तसेच दिनांक ३१ मार्चचा आदेश हा आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या पातळीवरील आहे. ते दिनांक ३१ मार्चपर्यंत मंजूर करू शकले नाहीत तर शासनाच्या पातळीवर मंजूर केलेले आहे.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदेअंतर्गत प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पूर्णपणे कार्यान्वित झाल्यावर त्या योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करून पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक विभागासाठी वेगवेगळ्या दराने पाणी पट्टी वसुली करतात. जळगाव जिल्हा परिषदेअंतर्गत पाणी पट्टीच्या रक्कमा ग्रामपंचायतीकडे थकित राहिल्याने सन २०११-१२ या वर्षाच्या लेखापरिक्षणातून दिसून आले आहे. याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. पाणी पट्टीच्या वसूल रकमांबाबत नोंद ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा परिपूर्ण करीत नाही त्यामुळे हिशोब तपासणीत अडचणी येतात. मागील थकबाकी चालु मागणी व व्याज आणि एकूण थकित रकमा यांचा आढावा घेऊन रकमा वसुल करण्यासाठी विशेष लक्ष दिले जात नाही. एमआयडीसीमार्फत जिल्हा परिषदा पाणीपुरवठा करतात. थकित राहिलेली रक्कम व्याजासहित व वर्षागणिक रक्कम वाढत आहे. त्यासाठी जिल्हा परिषदा ठोस उपाययोजना अंमलात आणत नाही. पाणी पट्टीची थकित असलेली रक्कम रुपये ५,०१,६०,००० प्रलंबित आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची संख्या १० आहे. दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर सर्व प्रादेशिक योजनांची एकत्रित थकबाकी रक्कम रुपये ५,०१,६०,००० प्रलंबित होती. त्यापैकी रुपये २,२५,७९,१५० एवढी रक्कम वसुल झालेली आहे. उर्वरित रक्कम वसुल करण्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.

पाणीपट्टीचे अधिकार जिल्हा परिषदेची जल व्यवस्थापन समिती ठरविते, पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषदेचा पाणीपुरवठा विभाग राबवितो. पाणीपट्टीची रक्कम ग्रामपंचायतीच्या हक्काच्या रकमेतून म्हणजेच मुद्रांक शुल्कातून वसुली करणे उचित नाही तसेच जिल्हा परिषदेच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरीत करता येत नाहीत कारण प्रादेशिक नळ योजना १० ते २० गावांसाठी तयार करण्यात आलेल्या असतात. प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांवरील खर्च वसुलीच्या अधिन राहून करणे आवश्यक असते. या नळ योजना बंद झाल्या तर त्या जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून चालविता येऊ शकत नाहीत. वसुलीच्या अधिन राहून देखभाल दुरुस्तीचा खर्च भागवावा लागतो. पाणी पट्टीच्या थकबाकीमध्ये वाढ होऊ नये याकरीता संबंधित गावातील ग्रामसेवकाचे सहाय्य याकरिता घेतले जाऊ शकते. तथापि, ग्रामपंचायतीच्या अनुदानातून वसुली करणे अत्यंत चुकीचे व अक्षम्य आहे. **ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासंदर्भातील हा अतिशय महत्त्वाचा व मुलभूत गरजेचा विषय आहे. बहुतांश ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत तसेच सदर गावांमध्ये गोरगरीब कुटुंबियांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. परिणामी त्यांच्याकडून पाणीपट्टीची वसुली होत नाही त्यामुळे ग्रामपंचायती जिल्हा परिषदेची देय असलेली देणी अदा करू शकत नाहीत. याकरीता सदर ग्रामपंचायतींना जिल्हा परिषदेमार्फत जो निधी दिला जातो त्या निधीतून देय असलेली रक्कम परस्पर वळती करण्यात यावी, कारण पाणीपट्टी न भरल्यामुळे अनेक योजना बंद पडतात त्या बंद पडू नयेत यासंदर्भात धोरणात्मक निर्णय पाणीपुरवठा विभागाने लवकरात लवकर निश्चित करावा व तो सर्व राज्यांमधील ग्रामपंचायती व जिल्हा परिषदांसाठी लागू करावा अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर जळगाव जिल्हा परिषदेअंतर्गत २० पंचायत समित्यांकडे रक्कम रूपये ३७,१५,४८,०७७ इतकी पाणीपट्टीची थकीत वसुली आहे. जिल्हा परिषद जळगांव यांचेकडून कळविण्यात आलेल्या लेखी खुलाशानुसार जळगाव पंचायत समितीकडे माहे फेब्रुवारी, २०१७ अखेर थकीत राहिलेली रक्कम रूपये १,२५,२१,३७२ एवढी असून संबंधित ग्रामपंचायतीकडून वसुलीबाबतची कार्यवाही सुरू आहे. भडगांव पंचायत समितीकडे फेब्रुवारी २०१७ अखेर थकीत राहिलेली रक्कम रूपये ५,६३,९०३ एवढी आहे. तथापि, भडगांव ग्रामपंचायत ही नगर परिषद झाल्याने रूपये १०,४०,००० नगरपरिषदेकडून वसूल करणे प्रलंबित आहे. नगरपरिषदेला वेगवेगळया योजनेतून पैसे दिले जातात त्यातून ही रक्कम कपात करण्यात यावी.

**बोदवड पंचायत समितीकडून थकबाकीची प्रत्यक्षात रक्कम रूपये १,०८,२४,९१९ इतकी आहे. त्यापैकी रक्कम रूपये ३२,१५,५३१ वसूल केलेली आहे. उर्वरित रक्कम रूपये ७६,०९,३८८ वसूल करणे प्रलंबित आहे. अशाप्रकारे जळगाव पंचायत समिती, भडगांव पंचायत समिती, भडगांव ग्रामपंचायत (भडगाव नगर परिषद), बोदवड पंचायत समिती यांच्याकडे पाणीपट्टी वसुलीची एकूण थकीत रक्कम रूपये २,१७,३४,६६३ वसूल करण्यात यावी. तसेच पंचायत समिती, जळगांव अंतर्गत ३ सामुहिक पाणीपुरवठा योजनांमधून पाणीपुरवठा केला जातो. सन २०११-१२ अखेर थकीत पाणीपट्टी रुपये २,०१,१४,९४४ एवढी आहे. माहे मार्च, २०१८ अखेर रुपये १४,८०,६३४ इतकी रक्कम वसूल झालेली आहे. उर्वरित रक्कम रूपये १,८६,३४,३१० वसूल करण्यात यावी. पंचायत समिती, यावल ग्रामपंचायतीकडील अफरातफर प्रकरणात सन १९८९-९० पासून दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर एकूण रुपये २४,५३,४९० एवढी रक्कम गुंतलेली होती. यापैकी रूपये २१,१३,६८१ एवढी रक्कम वसूल झालेली आहे. तथापि, उर्वरित रक्कम रुपये ३,३९,८०९ ही रक्कम सहा ग्रामसेवक व एका सरपंच यांच्याकडून वसूल करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे व उपरोक्त वसुलीबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, जळगांव

## पंचायत समिती सेस १० टक्के महिला व बालकल्याण योननेतून मागासवर्गीय/ सर्वसाधारण महिलांना शिवण यंत्रे पुरविणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.२७८/१ (सन २०११-१२)**

सदर योजनेकरीता रक्कम रु. १,०८,१५१ एवढी तरतूद असून, खर्च रुपये १,०८,०३० झाला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. मागास १०९८/प्र.क्र.७३/३४, दिनांक २० ऑक्टोबर १९९९ मधील अं.क्र. ३ ते ११ नमूद बाबी व शासन निर्णय क्र. मागास २००१/प्र.क्र. ४०८/३४, दिनांक २० एप्रिल २००१ मधील निर्देशानुसार अनुज्ञेय लाभार्थीची पडताळणी करून कार्यवाही केलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र. मागास १०८९/प्र.क्र/५९७ दिनांक ५ ऑक्टोबर, १९८९ नुसार सर्व योजनांतर्गत काम दिल्या जाणाऱ्या लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/१०८९/६४६/२६६/३४, दिनांक २९ जुलै १९८९ अन्वये जिल्हा परिषद/पंचायत समिती मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे फलश्रृतीचे मूल्यमापन होऊन फलश्रृती अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तथापि, त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

(४) लाभार्थी बी.पी.एल व उत्पन्नाचा दाखला उपलब्ध झालेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) लाभार्थी निवड पंचायत समिती सभेत करून त्यानुसार लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देणेत आलेला आहे.

(२) परिच्छेदात नमूद शासन निर्देशानुसार लाभार्थीची प्रत्यक्ष पडताळणी व राबविलेली योजनांची लाभार्थी मास्टर नोंदवही अद्ययावत नोंदी घेऊन पूर्ण करणेत आलेली आहे.

(३) परिच्छेदात नमूद नुसार लाभार्थीना शिवणयंत्र वाटप केल्यानंतर त्या बाबत सर्वेक्षण करून विस्तार अधिकारी यांनी संबंधित लाभार्थी सदर योजनेचा लाभ घेत असून त्यांच्या जीवनमानात वाढ झाली असले बाबतचे दाखले दिलेले आहेत.

(४) परिच्छेदात नमूद प्रमाणे दोन लाभार्थी श्रीमती रिमा शरद पाटील व श्रीमती प्रियंका बापू देसले यांचे बी.पी.एल. व उत्पन्न दाखल उपलब्ध करून घेणेत आलेले आहेत.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २७ ऑक्टोबर २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शासन निर्णय दिनांक २० ऑक्टोबर, १९९९ नुसार विहीत कार्यपद्धतीनुसार लाभार्थी निवड का करण्यात आली नाही, प्रस्तावित योजनेंतर्गत किती प्रस्ताव प्राप्त झाले, त्याची नोंदवही ठेवण्यात आली आहे काय, लेखापरिक्षणामध्ये सातत्याने निदर्शनास आणून देऊनही वैयक्तिक लाभासाठी मास्टर नोंदवही परिपूर्ण का ठेवल्या जात नाही तसेच फलश्रुती अहवाल उपलब्ध आहेत काय, असल्यास समितीस सादर करावेत.

यावर कृषी विकास अधिकारी यांनी खुलासा केला की, पंचायत समितीच्या मंजुरीनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे आणि त्याची नोंद मास्टर नोंदवहीत घेण्यात आलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदरची माहिती लेखापरिक्षणाच्यावेळी का देण्यात आली नाही, हा मोठा आक्षेप आहे, हा सेस फंडाचा विषय आहे. महिला बालकल्याण विभागाच्या किंवा समाज कल्याण विभागाच्या मागासवर्गीयांकरिता विविध योजना असतात. या योजनांची नियमावली ठरलेली आहे. नियमावली ठरलेली असताना त्याप्रमाणे तरतूद झालेली नाही व नियमाचा भंग झालेला आहे. त्यामुळे संबंधितांवर चौकशी करून कार्यवाही होणे आवश्यक होते. समिती येथे येण्यापूर्वी आपण संबंधितांवर कार्यवाही केलेली आहे किंवा कसे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी समितीने केलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे समितीस आश्वासन दिले.

यावर समितीने मत व्यक्त केले की, पंचायती राज समिती जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असल्याची माहिती गेल्या दोन वर्षांपासून दिलेली आहे. आपल्याला येथे येऊन सहा महिन्यांचा कालावधी झालेला आहे व आपल्यालाही यासंदर्भात माहिती आहे. एखादा प्रश्नामध्ये

अनियमितता झाल्याचे किंवा चुकीचे काम झाल्याचे निदर्शनास आल्यावर त्यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात आली, असे एकही उत्तर समितीला मिळालेले नाही. तपासणी करतो, पाहतो आणि नंतर कार्यवाही करतो, असेच उत्तर मिळत आहे. प्रत्येक विभागाचे खाते प्रमुख मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अखत्यारित आहे, तरीही जिल्हा परिषदेने तयार केलेल्या अहवालामधील माहिती पूर्ण नाही. सर्व विषयांची पडताळणी करणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे काम होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून समितीस ठोस उत्तर अपेक्षित आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस मोघम स्वरुपाचे उत्तर न देता ज्यांनी अनियमितता केलेली आहे, त्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर तात्काळ कोणती कार्यवाही केली जाणार आहे, याची माहिती समितीस देण्यात यावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ज्या अधिकाऱ्यांनी वेळेवर नोंदी सादर केल्या नाही, त्यांच्यावर ३० दिवसांमध्ये चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल आणि समितीला त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, समाज कल्याण विभागाकडून महिला आरक्षण संदर्भातील निधीचा वापर करण्यात आलेला नाही. लाभार्थी निवड पंचायत समिती सभेत करून त्यानुसार किती लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आलेला आहे, तसेच सदर योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या जीवनमानात वाढ झालेली आहे, अशा प्रकारचे लाभार्थ्यांना लाभाचे दाखले देण्यात आलेले आहे. लाभाचे दाखले दिले असेल तर त्यांचे जीवनमान खरोखरच उंचावले आहे काय, त्याबाबत माहिती देण्यात यावी. लाभार्थ्यांच्या जीवनात काय परिवर्तन झाले, त्यांना कोणता लाभ दिला, अशा दोन, तीन प्रकरणांची माहिती समितीला देण्यात यावी.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण विभाग) यांनी यासंदर्भातील माहिती उपलब्ध करून समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले. तद्नंतर कृषी विकास अधिकारी यांनी सन २०११-२०१२ मध्ये शिलाई यंत्र दिलेले ३९ लाभार्थी होते अशी माहिती समितीस दिली. यावर समितीने विचारणा केली की, या ३९ लाभार्थ्यांचे जीवनमान बदलले आहे काय, जिल्हा परिषदेने स्पष्टीकरणात दिलेले आहे की, त्यांचे जीवनमान उंचावलेले आहे. शिलाई मशीन दिल्यानंतर उत्पन्नासाठी मशीनचा वापर सुरू आहे किंवा कसे याबाबत सविस्तर माहिती सादर करावी. तसेच सदरहू ३९ लाभार्थ्यांची यादी सादर करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती सेस १० टक्के महिला बालकल्याण योजनेतून मागासवर्गीय / सर्वसाधारण महिलांना शिवणयंत्रे पुरविताना शासन निर्णयाच्या विहीत कार्यपद्धतीनुसार लाभार्थी निवड करताना सदरची माहिती लेखा परिक्षणाच्या वेळी सादर न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध ३० दिवसांत चौकशी करण्याचे समितीला आश्वस्त केले होते, त्यानुसार या प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर प्रकरणी चौकशी केली असता प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र शासन ग्राममविकास विभाग शासन निर्णय क्र. मागास १०९८/ प्र.क्र. ७३/३४ दिनांक २० ऑक्टोबर, १९९९ नुसार विहीत कार्यपद्धतीचा अवलंबन करून सन २०११ या आर्थिक वर्षात ज्या लाभार्थीना लाभ द्यावयाचा आहे त्यांची निवड यादी त्याच आर्थिक वर्षात करण्यात आली आहे.

सदर योजनेसाठीची रक्कम रू.१,०८,१५१ ही सन २०१०-११ या आर्थिक वर्षाच्या अखेरीस दिनांक ३१ मार्च २०११ रोजी पंचायत समितीला प्राप्त झाली असल्याने सन २०११-१२ या आर्थिक वर्षात लगतच्या माहे मे, २०११ मधील पंचायत समिती सभा दिनांक २५ मे २०११ चा ठराव क्र. ४९९ नुसार निवड यादीतील ३९ पात्र लाभार्थीची निवड यादीतील अंतिम करून मंजुरी देण्यात आली. सदर मंजुरीस अनुसरून कार्यालयीन मंजूर आदेश क्रमांक सकवि/आरआर/२१५/२०११, दिनांक २७ मे २०११ रोजी निर्गमित करून ३९ लाभार्थ्यांना माहे जून, २०११ अखेरपर्यंत प्रत्यक्षात लाभ देण्यात आला आहे.

मंजुर लाभार्थी यादी व लाभार्थी नोंदवही, विनियोग दाखला, मास्टर नोंदवही हे अभिलेखे जिल्हा परिषदेकडे उपलब्ध आहेत व या प्रकरणी दिनांक ३० ऑगस्ट २०१२ ते दिनांक १४ सप्टेंबर २०१२ मध्ये लेखा परीक्षण झालेले आहे. त्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त- (३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायत समिती सेस १० टक्के महिला व बालकल्याण योजनेतून मागासवर्गीय/सर्वसाधारण महिलांना शिवण यंत्रे पुरविणे या योजनेकरीता रक्कम रुपये १,०८,१५१ एवढी तरतुद असून रुपये १,०८,०३० एवढा खर्च झाला आहे, याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

ग्रामविकास विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २०११ रोजीच्या शासन निर्णयामधील निर्देशानुसार अनुज्ञेय लाभार्थ्यांची पडताळणी करून कार्यवाही केलेली नाही. सर्व योजनांतर्गत काम दिल्या जाणाऱ्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. राबविण्यात येणाऱ्या योजनांचे फलश्रुती अहवाल सादर केलेले नाहीत, लाभार्थी बी.पी.एल. व उत्पन्नाचा दाखला उपलब्ध झालेला नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपावर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, पंचायत समितीच्या मंजुरीनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्याची नोंद मास्टर नोंदवहीत घेण्यात आलेली आहे. तथापि, सदरची माहिती लेखापरिक्षणाच्या वेळी देण्यात आली नाही. महिला व बालकल्याण विभागाच्या किंवा समाज कल्याण विभागाच्या मागासवर्गीयांकरीता विविध योजना असतात या योजनांच्या नियमावलीप्रमाणे तरतूद झालेली नाही व नियमाचा भंग झालेला आहे. याप्रकरणी अनियमितता झाल्याचे किंवा चुकीचे काम झाल्याचे निदर्शनास येऊन देखील तात्काळ कार्यवाही करण्यात आली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस मोघम स्वरुपाचे उत्तर दिली आहेत. त्यामुळे समिती तीव्र नापसंती व समाधानकारक व्यक्त करीत आहे.

**याप्रकरणी ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी लेखा परिक्षणाचेवेळी कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंडाची शास्ती करणे आवश्यक आहे. समितीने जळगांव जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी समितीने अभिलेखे उपलब्ध करून न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, त्याची एक तात्पुरती वेतनवाढ रोखणे व तशा प्रकारची त्यांच्या सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात यावी व त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात यावा असे निदेश दिले होते. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत सर्वंकष कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविला नाही ही बाब निश्चितच गंभीर स्वरुपाची असून समितीने दिलेल्या निदेशांची अवहेलना करणारी असून त्याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते. जर याप्रकरणी कार्यवाही केली नसेल तर ती त्वरेने करावी व सर्व संबंधितांवर समितीने निदेश दिल्याप्रमाणे दंडात्मक कारवाई, एक तात्पुरती वेतन वाढ रोखणे व सेवा पुस्तिकेत नोंद घेणे अशा प्रकारची कारवाई करून त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्यात पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषदजळगांव

## उपकर निधीतून समाजकल्याण व महिला व बालकल्याण योजनेवर खर्च न केलेबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.२८०/१ (सन २०११-१२)**

(१) एरंडोल पंचायत समितीने समाज कल्याणासाठी रु.२०,८०३ व महिला बाल कल्याणासाठी रु. १०,४०२ खर्च करणे आवश्यक असतांना खर्च केला नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. मागास/१०९३/सीआर/ १२६५/३४, दिनांक ०९ डिसेंबर १९९३ नुसार पंचायत समितीने त्यांच्या उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम मागासवर्गीयांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे तसेच शासन निर्णय क्रमांक मागास १०९४/सीआर/९६६/०५, दिनांक १२ ऑगस्ट १९९४ नुसार महिला व बालकल्याण संबंधित बाबींवर १० टक्के रक्कम खर्च करणे बंधनकारक असतांना पंचायत समितीलेखा परिक्षण वर्षात या योजनेवर खर्च केलेला नाही. त्यामुळे सदर पंचायत समिती अंतर्गत लाभार्थी लाभापासुन वंचीत राहिलेले आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पंचायत समितीने समाज कल्याणासाठी रुपये २०,८०३ व महिला व बाल कल्याणासाठी रुपये १०,४०२ खर्च करणे आवश्यक होते. परंतु अत्यल्प तरतूद असल्याने तालुक्यातील सर्व गणातील लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य नव्हते. करीत मागील अनुशेषासह खर्च करण्यात आलेला आहे.

(२) वरील प्रमाणे पुरेशी तरतूद नसल्याने पंचायत समितीने देण्यात आलेल्या योजना २० टक्के अनुशेषासह खर्च करण्यात आलेला आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २७ ऑक्टोबर २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस गटविकास अधिकारी, पंचायत समिती, एरंडोल यांनी माहिती दिली की, अहवाल वर्षात पंचायत समितीने त्यांच्या उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम मागासवर्गीयांसाठी आणि १० टक्के रक्कम महिला व बालकल्याण विभागावर खर्च करणे आवश्यक होते. यानुसार समाज कल्याणासाठी रु.२०,८०३ तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी रुपये १०,४०२ रुपये खर्च करणे अपेक्षित होते. परंतु अहवाल वर्षात अत्यल्प तरतूद असल्याने तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य नव्हते. अहवाल वर्षात अत्यल्प तरतूद असल्यामुळे त्या वर्षी निधी खर्च केला नाही. परंतु पुढील वर्षात मागील अनुशेषासह उक्त बाबींवर खर्च करण्यात आलेला आहे.

यावर समितीने पुढील प्रमाणे मत व्यक्त करून विचारणा केली की, जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प मंजूर होण्यापूर्वी त्या अर्थसंकल्पामध्ये समाजकल्याण विभागासाठी २० टक्के आणि महिला व बालकल्याण विभागासाठी १० टक्के तरतूद केली जाते. सदरहू अर्थसंकल्प मंजूर होण्यापूर्वी त्या अर्थसंकल्पावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची स्वाक्षरी होते. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या अर्थ समितीचे सभापती अर्थसंकल्प मंजुरीसाठी ठेवतात. अर्थसंकल्प मंजुरीसाठी ठेवण्यापूर्वी उपकराची तरतूद समाजकल्याण तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी का केली नाही या बाबत गट विकास अधिकाऱ्यांनी नव्हे तर मुख्य लेखा व वित्त अधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी उत्तर द्यावे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, प्रत्येक वर्षी समाजकल्याण आणि महिला व बालकल्याण विभागासाठी तरतूद केली आहे. जिल्हा परिषदेच्या सर्व विभाग प्रमुखांनी या बाबत तपासणी केली आहे. ही बाब बंधनकारक आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, २० टक्के आणि १० टक्के तरतूद करणे हे बंधनकारकच आहे. जर त्या वर्षी उक्त रकमेची तरतूद केली नाही किंवा रक्कम खर्च झाली नाही तर पुढच्या वर्षी अनुशेषासह तरतूद करून ती रक्कम खर्च करावी लागते.

यानंतर पुढे समितीने असे निदेश दिले की, समितीला प्रत्येक जिल्हा दौऱ्याच्या वेळी हे निदर्शनास आलेले आहे की, राज्यातील सर्वच पंचायत समित्यांमध्ये उपकर निधीतून पुरेशी तरतूद केली जात नाही. अनेक पंचायत समित्या अहवाल वर्षात निधीची तरतूद न करता पुढील वर्षात अनुशेषासह तरतूद करून ती खर्च करतात. हा संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. या विषयाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेऊन ग्रामविकास विभाग व वित्त विभागाच्या माध्यमातून सर्व जिल्हा परिषदांना मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्या लागतील.

पंचायत समितीच्या एकूण उत्पन्नाच्या २० टक्के निधी समाजकल्याण विभागावर आणि १० टक्के निधी महिला व बालकल्याण विभागावर खर्च करण्याची कायद्यात तरतूद आहे. या तरतुदीच्या संदर्भातील सूचना शासन निर्णय आणि नियमामध्ये अस्तित्वात आहेत. परंतु त्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी होत नाही. हा संपूर्ण राज्याशी निगडित विषय आहे. ज्या पंचायत समित्या उक्त दोन्ही विभागांसाठी विहित टक्केवारीनुसार तरतूद करीत नाहीत त्या पंचायत समित्या नियमांचे उल्लंघन करीत आहेत असे समितीचे स्पष्ट मत आहे. किंबहुना, अशा पंचायत समित्या कारवाईस पात्र आहेत. ज्या पंचायत समित्यांनी विहित टक्केवारीनुसार उक्त दोन्ही बाबींवर खर्च केला नाही त्या पंचायत समित्यांवर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कोणती कारवाई करण्यात आली.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, अशा प्रकारची कारवाई केल्याचे दिसून येत नाही. यावर समितीने मत व्यक्त केले की, मुळात कोणत्या बाबींवर किती तरतूद करणे आवश्यक आहे याबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचना असताना, कायद्यात तशी तरतूद असताना, त्या संदर्भाचे शासन निर्णय असताना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून उक्त तरतुदीच्या अनुषंगाने जी अंमलबजावणी होणे गरजेचे होते ती झाल्याचे दिसून येत नाही. समितीला वाटते मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अशी प्रकरणे तपासून ज्या पंचायत समित्यांनी समाजकल्याण तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी विहित तरतूद केली नसेल तर या विभागांसाठी तात्काळ तरतूद करावी आणि ज्यांनी तरतूद केली नसेल त्या जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या अंदाजपत्रकामध्ये समाजकल्याण तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी तरतूद करणे बंधनकारक असताना ती न करणे योग्य नाही. वास्तविक पाहता विहित टक्केवारीनुसार विभागनिहाय अर्थसंकल्पात तरतूद केली नसेल तर त्या अर्थसंकल्पाला मंजुरी मिळू शकत नाही. या बाबींची जे अधिकारी/कर्मचारी पालन करीत नाहीत त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कारवाई प्रस्तावित केली पाहिजे.

अर्थ समितीपुढे हा विषय येत असतो. पंचायत समितीच्या सर्व सेस फंडाचा आढावा अर्थ विभागाच्या समितीसमोर येतो. त्यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि सहायक लेखा अधिकारी या संदर्भात काय तपासणी करतात, मुळात या अधिकाऱ्यांनी खर्चाचा आढावा घेतला पाहिजे. कामे मंजूर केल्यानंतर ती सुरू का होत नाहीत याचा सुद्धा आढावा संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतला जात नाही. विहित बाबींवर तरतूद करून तो खर्च त्या त्या वर्षी खर्च होणे अभिप्रेत आहे. पंचायत समित्यांचा अर्थसंकल्प हा जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर केला जातो. या विषयी विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे ठरलेले आहे. त्यावेळी समितीकडून याबाबतचा खुलासा घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) शासनाच्या मार्गदर्शक सूचना असताना पंचायत समितीच्या एकूण उत्पनाच्या २० टक्के निधी समाज कल्याण विभाग आणि १० टक्के निधी महिला बालकल्याण विभागावर खर्च करण्याची नियमात तरतूद असतांना सदरहू योजनेची याग्यप्रकारे अंमलबजावणी न होण्याची कारणे काय ?

(२) पंचायत समित्यांनी समाज कल्याण तसेच महिला व बाल कल्याण विभागासाठी विहित तरतूद केली नसल्यास त्या विभागासाठी तात्काळ तरतूद करावी आणि ज्यांनी तरतूद केली नसेल त्या अधिकारी / कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी असे समितीने दिलेल्या निर्देशावर शासनाने कोणती कार्यवाही केली ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) पंचायत समितीने समाज कल्याणसाठी रुपये २०,८०३ व महिला व बालकल्याणासाठी रुपये १०,४०२ खर्च करणे आवश्यक होते. परंतु अत्यल्प तरतूद असल्याने तालुक्यातील सर्व गणातील लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य नव्हते याकरिता पुढील आर्थिक वर्षात अनुशेष खर्च करणे बाबत पंचायत समिती सभा दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ विषय क्र. ११, ठराव क्र ९.२ अन्वये सदरचा खर्च पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेबाबत ठरले. खर्च खालीलप्रमाणे :—

| अ.क्र. | वर्ष | प्रत्यक्ष जमा | जमा रक्कमेचे २० टक्के | मागील अनुशेष | एकूण | प्रत्यक्ष खर्च | शिल्लक अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | २०११-१२ | १०४०१६ | २०८०० | निरंक | २०८०० | निरंक | २०८०० |
| (२) | २०१२-१३ | १५७८४४३ | ३११५६८८ | २०८०० | ३३६४४८ | ९९००० | २३७४८८ |
| (३) | २०१३-१४ | १३६९९५८ | २७२९९१ | २३७४८८ | ५१११४७९ | ५३७१०० | निरंक |

| अ.क्र. | वर्ष | प्रत्यक्ष जमा | जमा रक्कमेचे १० टक्के | मागील अनुशेष | एकूण | प्रत्यक्ष खर्च | शिल्लक अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | २०११-१२ | १०४०१६ | १०४०२ | निरंक | १०४०२ | निरंक | १०४०२ |
| (२) | २०१२-१३ | १५७८४४३ | १५७८४४ | १०४०२ | १६८२४६ | ३७४५६ | १३०७९० |
| (३) | २०१३-१४ | १३६९९५८ | १३६९९५ | १३०७९० | २६७७८५ | १८००५० | ८७७३५ |
| (४) | २०१४-१५ | ४९१९४१८ | ४९१९४१ | ८७७३५ | ५७९६७६ | ४५४९०० | १२४७७६ |
| (५) | २०१५-१६ | ९८०६४९६ | ९८०६४९ | १२४७७६ | ११०५४२५ | ६५०५०० | ४५४९२५ |
| (६) | २०१६-१७ | ४१०८५१ | ४१०८५ | ४५४९२५ | ४९६०१० | ५४३२०० | निरंक |

(२) पंचायत समिती स्तरावर सन २०११-१२ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या उपकर अनुदानातून समाजकल्याण विभागासाठी २० टक्के व महिला बालकल्याण विभागासाठी १० टक्के नुसार सर्व गटांनी त्यांचे अंदाजपत्रकात तरतुदी केलेल्या आहेत. या आर्थिक वर्षात १५ गटांपैकी ९ गटांनी योजना राबवून मंजूर निधी खर्च केला आहे. उर्वरित ६ गटांनी सदर आर्थिक वर्षात २० टक्के समाजकल्याण व १० टक्के महिला बालकल्याण विभागावर खर्च केला असून त्यांचेकडील अखर्चित रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यात आली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :—**

(१) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

(२) वस्तुस्थिती विचारात घेता अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कारवाईची आवश्यकता नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगाव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात उपकर निधीतून समाजकल्याण, महिला व बालकल्याण योजनेवर निधी खर्च झाला आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, आवश्यक तेवढा निधी खर्च झालेला आहे. तद्नतर समितीने विचारणा केली की, जिल्हा नियोजन व विकास समितीचा कायदा आहे. मागील वर्षी पाचोरा मतदार संघाच्या आमदारांचे आमदार निधीच्या कामाचे अजून टेंडर झालेले नाही. आता जिल्हा नियोजन व विकास समितीचा सर्व निधी जिल्हा परिषदेकडे वर्ग झाला आहे. जिल्हा परिषदेची क्षमता नसेल, मनुष्यबळ नसेल, निधी जिल्हा परिषदेकडे पडून राहणार असेल तर लोकप्रतिनिधींनी काय करायचे, लेखाशीर्ष ३०५४ व ५०५४ चा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यास सहमती देण्यात यावी, जिल्हा परिषदेची क्षमता आहे काय ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी क्षमतेबाबत होकारार्थी उत्तर दिले असता समितीने विचारणा केली की, क्षमता आहे असे म्हणणे असेल तर कालमर्यादेत काम केले पाहिजे, तसे होणार नसेल तर हे योग्य नाही.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, गेल्या वर्षीचे नियोजन उशिरा झाले. सर्वसाधारण सभेची मान्यता झाल्यानंतर फेब्रुवारीमध्ये नियोजन झाले, त्याला विलंब झाला होता. सन्माननीय सदस्य म्हणतात ते सत्य आहे. त्याच्या निविदा आता झाल्या आहेत. ही सर्व डांबरीकरणाची कामे आहेत ती पावसाळा संपल्यानंतर म्हणजे माहे सप्टेंबरनंतर सुरू होतील. या वर्षीच्या निधीचे नियोजन झाले आहे. गेल्या बैठकीत मान्यता मिळाली.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे गटविकास अधिकाऱ्यांबाबत तक्रार केली होती, अजून कारवाई झालेली नाही. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, लेखाशीर्ष ३०५४ आणि ५०५४ च्या कामाचा निधी जिल्हा परिषदेच्या प्रक्रियेला विलंब होत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीला मुभा असावी, याबद्दल मंत्रिमंडळ बैठकीमध्ये चर्चा झाली. मंत्रिमंडळाने निर्देश दिले की ते करावे. जिल्हा परिषदेच्या कोणत्याही प्रक्रियेमुळे एखादा रस्ता चांगला होत नसेल तर १०१ (सी) नुसार परत घेऊन काम पूर्ण करून त्यांच्याकडे द्यावा अशी मुभा जिल्हा नियोजन व विकास समितीला असावी असे मंत्रिमंडळाने सांगितले आहे. दुरुस्ती प्रक्रिया सप्टेंबरमध्ये होईल. यावर समितीने याबाबत परिपत्रक निर्गमित करावे असे सांगितले.

त्यानंतर समितीने विचारणा केली की, ५० आमदारांनी सह्या करून सन्माननीय मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री यांना पत्र दिले होते. सन्माननीय सदस्य श्री.चरण वाघमारे यांच्या मा.उच्च न्यायालयातील एका केसमुळे कायदेशीर अडचण आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, रस्त्याची निवड आणि निविदा केल्यानंतर ते काम जिल्हा परिषदेने करावे की सार्वजनिक बांधकाम विभागाने करावे हा विषय आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन अभिकरण आहेत. जिल्हा परिषदेची खरोखर क्षमता असेल तर करा, नसल्यास ते चुकीचे आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनाकडे काम वर्ग करावे, जेणेकरून ग्रामविकास विभागाकडे ते येईल, निदान तो रस्ता घेता येईल. जिल्हा नियोजन व विकास समितीला अधिकार देऊन बदल करणार आहात. लेखाशीर्ष ५०५४ च्या संदर्भात समितीची शिफारस समजून जिल्हा नियोजन व विकास समितीला अधिकार असावेत.

यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर याबद्दल काय कायदेशीर मार्ग काढता येईल यावर चर्चा सुरू होती. नियोजन विभागाकडे नस्ती गेली होती. रस्त्याची निवड, अभिकरण निवडण्याचा अधिकार सार्वजनिक बांधकाम विभागाला मिळेल, या संदर्भातील शासन निर्णय सप्टेंबर महिन्यात निघेल.

## अभिप्राय व शिफारशी

एरंडोल पंचायत समितीने समाज कल्याणसाठी रुपये २०, ८०३ व महिला बालकल्याणासाठी रुपये १०,४०२ एवढा खर्च करणे आवश्यक असताना खर्च केला नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ९ डिसेंबर, १९९३ रोजीच्या शासन निर्णयानुसार पंचायत समितीने त्यांच्या उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम मागासवर्गीयांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. तसेच महिला व बालकल्याण संबंधित बाबींवर १० टक्के रक्कम खर्च करणे बंधनकारक असताना पंचायत समिती लेखा परीक्षण वर्ष सन २०११-२०१२ मध्ये या योजनेवर खर्च केलेला नाही, त्यामुळे सदर पंचायत समिती अंतर्गत लाभार्थी लाभापासून वंचित राहिलेले आहेत.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, सन २०११-२०१२ या अहवाल वर्षात अत्यल्प तरतूद असल्याने एरंडोल तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य नव्हते. अहवाल वर्षात अत्यल्प तरतूद असल्यामुळे त्यावर्षी निधी खर्च केला नाही, परंतु पुढील वर्षात मागील अनुशेषासह उक्त बाबींवर खर्च करण्यात आलेला आहे. तथापि, जिल्हा परिषदेमध्ये अर्थसंकल्प मंजुरीसाठी ठेवण्यापूर्वी उपकराची तरतूद समाजकल्याण तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी केली नाही. जिल्हा परिषदेच्या सर्व विभाग प्रमुखांनी याबाबत तपासणी करणे बंधनकारक आहे. जर त्यावर्षी उक्त रकमेची तरतूद केली नाही किंवा रक्कम खर्च झाली नाही तर पुढील वर्षी अनुशेषसह तरतूद करून ती रक्कम खर्च करावी लागते. समितीला प्रत्येक जिल्हा परिषदेच्या दौऱ्याच्या वेळी सर्वच पंचायत समित्यांमध्ये उपकर निधीतून पुरेशी तरतूद केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक पंचायत समित्या अहवाल वर्षात निधीची तरतूद न करता पुढील वर्षात अनुशेषासह तरतूद करून ती खर्च करतात याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. राज्यातील सर्व पंचायत समित्यानी या विषयाच्या अनुषंगाने निधीची तरतूद करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन ग्रामविकास विभाग व वित्त विभागाच्या माध्यमातून सर्व जिल्हा परिषदांना मार्गदर्शन सूचना निर्गमित कराव्यात अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

जळगाव जिल्हा परिषदे अंतर्गत पंचायत समित्यांनी समाज कल्याण विभाग तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी विहीत टक्केवारीनुसार तरतूद न केल्याप्रकरणी कारवाई केल्याचे दिसून येत नाही. कोणत्या बाबींवर किती तरतूद करणे आवश्यक आहे याबाबत मार्गदर्शक सूचना असताना त्यासंदर्भाचे शासन निर्णय असताना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून उक्त तरतुदीच्या अनुषंगाने जी अंमलबजावणी होणे गरजेचे होते ती झाल्याचे दिसून येत नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अशी प्रकरणे तपासून ज्या पंचायत समित्यांनी समाजकल्याण तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी विहित तरतूद केली नसेल तर या विभागांसाठी तात्काळ तरतूद करावी आणि ज्यांनी तरतूद केली नसेल त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. **ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ९ डिसेंबर, १९९३ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या अंदाजपत्रकामध्ये समाजकल्याण तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी तरतूद करणे बंधनकारक असताना ती न करणे योग्य नाही. वास्तविक पाहता विहीत टक्केवारीनुसार विभागनिहाय अर्थसंकल्पात तरतूद केली नसेल तर अर्थसंकल्पाला मंजुरी मिळू शकत नाही याबाबींचे जे अधिकारी / कर्मचारी पालन करीत नाही त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल एक महिन्याच्या आंत समितीस सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

तसेच पंचायत समितीच्या सर्व सेस फंडाचा आढावा अर्थ विभागाच्या समितीसमोर येतो त्यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि सहायक लेखा अधिकारी यांनी यासंदर्भात खर्चाचा आढावा घेऊन तपासणी करणे आवश्यक आहे. कामे / योजना मंजूर केल्यानंतर ती सुरू होतात किंवा कसे याबाबत सुद्धा आढावा संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतला जात नाही. विहीत बाबींवर तरतूद करून तो खर्च त्या त्या वर्षी होणे अभिप्रेत

आहे. पंचायत समितीचा अर्थसंकल्प जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर केला जातो. सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात जळगाव जिल्हापरिषदेमधील पंचायत समित्यांनी उपकर निधीतून समाजकल्याण व महिला व बालकल्याण योजनेवर खर्च न केल्याप्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, **जिल्हा परिषदेने लेखाशीर्ष ३०५४ व ५०५४ या आमदार निधीच्या कामाच्या अद्याप निविदा काढल्या नाहीत. जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन अभिकरणापैकी जिल्हा परिषदेची क्षमता नसल्यास मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेकडे (CMGSY) काम वर्ग करावे जेणेकरून ग्रामविकास विभागाकडे ते येईल व यासंदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये एक प्रकरण न्यायप्रविष्ट आहे या प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर जिल्हा नियोजन विकास समितीला (डीपीडीसी) अधिकार देण्यात यावे, अशी समिती शिफारस करीत आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.**

# प्रकरण अकरा

# जिल्हा परिषद, जळगांव

# अपूर्ण स्थितीतील बांधकामे

## (१) परिच्छेद क्रमांक ४.३९४/१६ (सन २०११-१२)

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा विहिर, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादी सारख्या स्थानिक विकासाच्या व सामुहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेंतर्गत तरतुदीतून अर्थ सहाय्य देण्यात येते. अर्थ सहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरूपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते. ही कामे सर्व साधारणपणे ग्रामपंचायतीच्या अभिकरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढ्याच रकमेचे बांधकाम पूर्ण करून उर्वरित काम पूर्ण केले जात नाही. अशा अपूर्णावस्थेत राहिलेली बांधकामे वर्षानुवर्षे पडून असतात त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपूर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजनेअंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कामाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्णावस्थेत पडून राहणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

उदाहरणादाखल लेखापरिक्षणाच्या वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशा प्रकारे अपूर्ण अवस्थेत पडून असलेल्या दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर बांधकामांचा तक्ता पुढीलप्रमाणे दिला आहे :—

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३२ | जळगांव | जळगांव | १६ | ४८,९५,११२/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ अखेर प्रलंबित असलेल्या कामांची स्थिती पुढीलप्रमाणे—

| योजनेचे नाव<br>(१) | सन २०११-१२ अखेर प्रलंबित कामे<br>(२) | फेब्रुवारी, २०१७ अखेर पूर्ण कामे<br>(३) | फेब्रुवारी, २०१७ अखेर प्रलंबित कामे<br>(४) |
|---|---|---|---|
| दलित वस्ती सुधार योजना | २१ | १९ | ०२ |
| १३ वा वित्त आयोग | ०२ | ०२ | ०० |
| १७ सामुहिक विकास | १४ | १३ | ०१ |
| मुलभूत सुविधा | ०२ | ०२ | ०० |

(१) दलित वस्ती सुधार योजनेतील सन २०११-१२ या वर्षातील एकूण मंजूर २१ कामांपैकी माहे फेब्रुवारी, २०१७ अखेर १९ कामे पूर्ण असून उर्वरित ०२ कामे आर्थिक अपहार झालेने अपूर्णावस्थेत आहेत. सदर कामांबाबत ग्रामपंचायत, जामोद यांना वारंवार लेखी स्वरुपात कळविणेत येऊन काम पूर्ण करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या.

(२) १७ सामुहिक विकास योजनेंतर्गत सन २०११-१२ या वर्षात एकूण १४ अंगणवाडी बांधकामे मंजूर करण्यात आली होती. पैकी माहे फेब्रुवारी, २०१७ अखेर १३ बांधकामे पूर्ण झालेली आहेत. अपूर्णावस्थेतील ०१ कामामध्ये मौजे आव्हाणे येथील ०१ अंगणवाडी केंद्र आर्थिक अपहार झालेने अपूर्णावस्थेत आहे. सदर अपूर्ण बांधकामांबाबत, ग्रामपंचायत आव्हाणे यांना वारंवार काम पूर्ण करणेबाबत नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

**(२) परिच्छेद क्रमांक ४.३९४/१५ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३३ | जळगांव | यावल | १५ | १५,०४,६३८/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :–**

पंचायत समिती, यावल अंतर्गत ग्रामपंचायतींना देणेत आलेल्या कामांपैकी माहे मार्च, २०१५ अखेर कामांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे :–

| अ.क्र. | योजनेचे नाव | मार्च, २०१२ अखेर अपूर्ण कामे | मार्च, २०१५ अखेर पूर्ण कामे | रद्द कामे |
|---|---|---|---|---|
| (१) | दलित वस्ती सुधार योजना | ७ | ६ | १ |
| (२) | अंगणवाडी बांधकामे | ८ | ६ | २ |
| (३) | १३ वा वित्त आयोग | १ | १ | - |
| (४) | जवाहर विहीर (सिंचन पा.पु.) | ९ | ९ | - |
| | एकूण | २५ | २२ | ३ |

**(३) परिच्छेद क्रमांक ४.३९४/४४ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३४ | जळगांव | रावेर | ४४ | ७,८५,४५३/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :–**

पंचायत समिती अंतर्गत अपूर्ण कामांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे :–

| योजनेचे नाव | अपूर्ण बांधकाम संख्या | आजअखेर पूर्ण बांधकाम संख्या | अपूर्ण बांधकामाची सद्यःस्थिती |
|---|---|---|---|
| दलित वस्ती सुधार योजना | ०६ | ०६ | ० |
| अंगणवाडी बांधकामे | ०२ | ०२ | ० |
| एकूण | ०८ | ०८ | ० |

**(४) परिच्छेद क्रमांक ४.३९४/२२ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३५ | जळगांव | मुक्ताईनगर | २२ | २२,१३,३५५/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :–**

| अ.क्र. | योजनेचे नाव | अपूर्ण कामांची संख्या | रद्द झालेली कामे | पूर्ण झालेली कामे | अपूर्ण कामे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | दलित वस्ती सुधार योजना | २ | १ | १ | १ पूर्ण १ रद्द |
| (२) | अंगणवाडी बांधकाम | ४ | - | ४ | काम पूर्ण |
| (३) | यशवंत ग्रामसमृद्धी योजना | - | - | - | |
| (४) | १३ वा वित्त आयोग | ५ | - | ५ | काम पूर्ण |
| (५) | विशेष घटक योजना (विहीर) | २२ | - | २२ | काम पूर्ण |
| (६) | ओ.टी.एस.पी. योजना विहीर | ७ | - | ७ | काम पूर्ण |
| (७) | जवाहर योजना (सिंचन) | - | - | - | |
| | एकूण | ४० | १ | ३९ | |

सदर परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दिनांक ३१ मार्च २०१४ अखेर ३९ कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. पूर्ण झालेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले दप्तरी आहेत. वरील ४० पैकी १ द.व.सु.यो. काम रद्दसाठी प्रस्तावित केलेले आहे.

**(५) परिच्छेद क्रमांक ४.३९४/२७ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३६ | जळगांव | जामनेर | २७ | ६१,२७,२७०/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

पंचायत समिती, जामनेर अंतर्गत दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर अपूर्ण असलेल्या कामांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | कामाचे नाव | दिनांक ३१.०३.२०१२ अखेर अपूर्ण कामे | दिनांक २८.०२.२०१७ अखेर पर्यंत पूर्ण कामे | दिनांक २८.०२.२०१७ अखेर पर्यंत अपूर्ण कामे |
|---|---|---|---|---|
| (१) | अंगणवाडी बांधकाम | ३ | ३ | ० |
| (२) | दलित वस्ती सुधार योजना | २४ | २३ | १ रद्द |
| (३) | ओ.टी.एस.पी. विहीर | ७ | ७ | ० |
| (४) | वि. घ. यो. विहीर | २६ | २६ | ० |
| (५) | ज. रा. यो. विहीर | ४२ | ३९ | ३ रद्द |
| | एकूण | १०२ | ९८ | ४ रद्द |

उपरोक्त अपूर्ण कामांपैकी ०१ अंगणवाडी बांधकाम, ०७ ओटीएसपी विहीर पूर्ण झालेल्या आहेत. दलित वस्तीची कामे १ काम व ज.रो.ओ. ०३ विहिरी रद्द करण्यात आलेल्या आहेत.

**(६) परिच्छेद क्रमांक ४.३९४/५२ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३७ | जळगांव | पाचोरा | ५२ | २५,६७,२३४/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

परिच्छेदातील दलित वस्तीच्या कासमपुरा येथे रस्ता, चिंचपुरे येथे रस्ता व गटार या तीन कामांना दोन वेळेस अग्रिम दिलेला आहे. तसेच टाकळी येथील काम रस्त्याचे नसून पाण्याच्या टाकीचे आहे. सबब, दलित वस्ती सुधार कामे १८ व जवाहर कामे १७ अपूर्ण होती. कामांची स्थिती खालीलप्रमाणे—

| कामाचे नाव | योजनेचे नाव | दिनांक ३१.३.२०१२ अखेर पूर्ण कामे | फेब्रुवारी, २०१७ अखेर पूर्ण झालेली कामे |
|---|---|---|---|
| जवाहर विहीर | विहीर | १७ | १७ |
| दलित वस्ती सुधार योजना | रस्ता, गटार बांधकामे | १८ | १८ |

**(७) परिच्छेद क्रमांक ४.३९४/२८ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३८ | जळगांव | एरंडोल | २८ | ७,४३,३०३/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ या वर्षात पंचायत समिती कार्यालयांतर्गत खालील कामे अपूर्ण होती :—

(१) दलित वस्ती सुधार योजना - ०५ कामे

(२) महिला व बालकल्याण अंगणवाडी - ०२ कामे

(३) जरोयो विहिरी - ०६ कामे

एकूण - १३ कामे

वरीलप्रमाणे २०११-१२ या वर्षातील अपूर्ण कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

**(८) परिच्छेद क्रमांक ४.३९४/१८ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३९ | जळगांव | अंमळनेर | १८ | ५६,७१,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

परिच्छेदात नमूद केल्यानुसार योजनानिहाय अपूर्ण कामांची स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अपूर्ण कामे | पूर्ण का | रद्द केलेली कामे | अपूर्ण कामे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | दलित वस्ती सुधार | ४५ | ४३ | ०२ | ०० |
| (२) | १३ वा वित्त आयोग | ०६ | ०६ | ०० | ०० |
| (३) | २५१५ मुलभूत सुविधा | ०७ | ०७ | ०० | ०० |

**(९) परिच्छेद क्रमांक ४.३९४/५२ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ४० | जळगांव | धरणगांव | ५२ | २४,१८,०३०/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

पंचायत समिती, धरणगांव येथील दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर अपूर्ण असलेल्या व दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ अखेरपर्यंत पूर्ण व अपूर्ण असलेल्या कामांची स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | कामाचे नाव | सन २०११-१२ अखेर एकूण अपूर्ण कामे | दि. २८/२/२०१७ अखेर पूर्ण कामे | दि. २८/२/२०१७ अपूर्ण कामे |
|---|---|---|---|---|
| (१) | रस्ता | ०६ | ०६ | ० |
| (२) | गटार | ०६ | ०३ | ०३ |
| (३) | समाज मंदिर | ०३ | ०३ | ० |
| (४) | पाणीपुरवठा योजना | ०४ | ०२ | ०२ |
| (५) | शौचालय | ०३ | ०१ | ०२ |
| | एकूण | २२ | १५ | ०७ |

सद्य:स्थितीत अपूर्ण असलेली एकूण ०७ कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीस नोटीस देवून कार्यवाही करण्यात येत आहे.

**(१०) परिच्छेद क्रमांक ४.३९४/२१ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ४१ | जळगांव | बोदवड | २१ | ३७,१९,७३०/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखा परिक्षण अहवाल सन २०११-१२ च्या परिच्छेद क्र.२१ च्या परिशिष्ट ७ मध्ये नमूद अपूर्ण बांधकामाची आजची स्थिती पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | अपूर्ण कामे | फेब्रुवारी, २०१७ अखेर पूर्ण कामे | फेब्रुवारी, २०१७ अखेर अपूर्ण कामे |
|---|---|---|---|---|
| (१) | द.व.सु. योजना | १९ | सर्व कामे पूर्ण | ० |
| (२) | विशेष घटक योजना विहिर | १५ | सर्व कामे पूर्ण | ० |
| (३) | जवाहर विहिर (सिंचन व पाणीपुरवठा) | ६ | ३ कामे पूर्ण २ रद्द | १ अपूर्ण |
| (४) | ओटीएसपी विहीर | ९ | सर्व कामे पूर्ण | - |
| (५) | १३ वा वित्त आयोग | १ | सर्व कामे पूर्ण | ० |
| (६) | वैधनिक विकास कार्यक्रम | १ | सर्व कामे पूर्ण | ० |
| (७) | अंगणवाडी बांधकाम | १ | सर्व कामे पूर्ण | ० |

वरील प्रमाणे सर्व कामे आज रोजी पूर्ण आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, प्राथमिक माहिती केव्हा प्राप्त झाली, कार्यारंभ आदेश केव्हा दिले, कामे अपूर्ण असल्याने संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली, माहे मार्च २०१२ पर्यंत अपूर्ण असलेली कामे विहित मुदतीत पूर्ण करण्यात आली होती काय, नसल्यास दंडात्मक कारवाई काय केली, अपूर्ण कामांची सद्यस्थिती काय आहे व खर्च वाया गेल्यास त्याला जबाबदार कोण आहे.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०११-१२ मध्ये दलित वस्ती सुधार योजनेतील पंचायत समिती, जळगावकडील २१ कामे अपूर्ण होती, त्यातील १९ कामे पूर्ण झाली आहेत. सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये याचा विशेष आढावा घेऊन सर्व कामे पूर्ण केली. जी कामे सुरू झाली नाहीत, ती सर्व रद्द केली आहेत. त्या कामाचा निधी शासनाकडे जमा करण्याची कार्यवाही केली आहे. यावर समितीने विचारणा केली की, सन २०११-१२ मध्ये जी कामे अपूर्ण राहिली ती माहे मार्च, २०१३ पर्यंत पूर्ण केली पाहिजे होती. दलित वस्ती सुधार योजनेसाठी आलेला निधी खर्च का केला नाही, निधी खर्च करण्याची जबाबदारी ज्या यंत्रणेची होती त्यांच्यावर कोणती कारवाई केली किंवा का केली नाही, गटविकास अधिकाऱ्यांसोबत ग्रामपंचायतीचा करारनामा होतो. त्यांनी निविदा काढून हा खर्च का केला नाही, गटविकास अधिकाऱ्यांवर याची जबाबदारी निश्चित केली आहे का, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यासंदर्भात गटविकास अधिकाऱ्यांची भूमिका आहे. गावात कामे होण्याचा वाव नाही, परंतु कामे मंजूर केली होती. त्यामुळे निधी परत केला.

यानंतर समितीने मत व्यक्त केले की, योग्य प्रस्ताव नसताना ज्यांनी कामे मंजूर केली त्यांच्यावर कारवाई करावी. मूळ प्रस्ताव चुकीचा केला, त्यामुळे निधी वापरता आला नाही. ग्रामपंचायतीकडून पंचायत समितीकडे प्रस्ताव जातो. त्याची छाननी करून जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविला जातो. समाजकल्याण अधिकाऱ्यांनी छाननी केल्यानंतर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव जातो. त्या काळात त्यांना अधिकार होते. तो प्रस्ताव व्यवहार्य असताना अव्यवहार्य कसा केला, तसेच दलित वस्तीमध्ये कोणती कामे घ्यायची, कोणत्या वस्त्या संपर्काबाहेर आहेत याचा आराखडा ठरलेला आहे. तो तपासूनच जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी त्या कामांना मंजुरी द्यायची असते.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मंजुरी जिल्हा परिषदेकडून दिली जाते. काम सुरू करण्याच्या वेळी अडथळा आला तर काम रद्द केले जाते, अन्यथा नाही. सन २०११-१२ ची २१ अपूर्ण कामे होती, त्यापैकी १९ कामे पूर्ण केली, २ कामे शिल्लक आहेत. २ कामांमध्ये अपहार आढळून आला, ज्या यंत्रणांनी अपहार केला त्यांच्यावर कारवाई केली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, गटविकास अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली नाही, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, होय, त्यांच्यावर कारवाई केली नाही. यानंतर समितीने निदेश दिले की, करारनामा करून घेणारे आणि देणारे दोन्हीही जबाबदार आहेत. गटविकास अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीशिवाय धनादेश काढला जात नाही. मग गटविकास अधिकाऱ्यांना कसे सोडले, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जळगाव जिल्ह्यामध्ये ९० टक्के रक्कम गटविकास अधिकाऱ्यांना अग्रिम देण्यात येते. ती २५ टक्के रक्कम मागणीनुसार ग्रामपंचायतीला अग्रिम देतात. त्यामध्ये अपहार झाला तर ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाविरुद्ध प्रथम दर्शनी अहवाल दाखल केला जातो.

यांनतर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, गटविकास अधिकाऱ्यांच्या अधिनस्त दर महिन्याला २ आणि १६ तारखेला बैठक होते. त्या बैठकीमध्ये गटविकास अधिकाऱ्यांनी चालू योजनांचा आढावा घेऊन प्रगती तपासली पाहिजे. ज्या ज्या ग्रामपंचायती कार्यक्षम नसतील तर वेळेवर नोटीस दिली पाहिजे. संबंधितांची वेतनवाढ थांबविली पाहिजे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांचा दोष आहे, त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल. यावर समितीने मत व्यक्त केले की, अपहार झाला असेल तर ग्रामसेवक आणि गटविकास अधिकारी दोघेही दोषी आहेत. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, चौकशी करून समितीला अहवाल सादर करण्यात येईल.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, अनुक्रमांक १४ ते २३ ही प्रकरणे दलित वस्तीतील कामे व अपूर्ण कामांच्या संदर्भातील आहेत. कोणतेही काम न करता निधी परत केला आहे. दलित वस्तीसाठी देण्यात आलेला निधी खर्च करणे बंधनकारक आहे. ग्रामसेवक आणि गटविकास अधिकारी यांचे संयुक्त खाते असते. निधीचा विनियोग योग्यप्रकारे झाला नाही. यामध्ये जे जे अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरुद्ध कारवाई होणे गरजेचे आहे. गटविकास अधिकारी यामध्ये जबाबदार आहेत. ग्रामसेवक आणि गटविकास अधिकारी यांचे संयुक्त खाते असल्यामुळे ग्रामसेवकांवर कारवाई केली असेल तर गटविकास अधिकाऱ्यांवर कारवाई न करता मोकळे सोडता येणार नाही. या प्रकरणी सखोल चौकशी करून ग्रामसेवकांपासून जिल्हा परिषदेच्या यंत्रणेपर्यंत जे जे दोषी असतील त्यांच्यावर तातडीने कारवाई करून एक महिन्याच्या आत समितीला अवगत करावे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०११-१२ मधील २१ कामांपैकी २ कामांमध्ये अपहार आढळून आल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर २ कामांमध्ये अपहार आढळून आल्याप्रकरणी जामोद ता.जळगांव येथील दलित वस्ती सुधार योजना कामांची चौकशी करण्यात आली असून जबाबदार असणारे ग्रामसेवक यांना निलंबित करून त्यांची चौकशी करण्यात आली व त्यांच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी बंद करण्यात आल्या. तसेच त्यांच्याकडून अपहारीत रक्कम रुपये ७५,००० वसुल करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद स्तरावरुन कार्यवाही करण्यात आली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा विहिर, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादी सारख्या स्थानिक विकासाच्या व सामूहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेंतर्गत तरतुदीतून अर्थ सहाय्य देण्यात येते. अर्थ सहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा व स्थानिक भागातून लोकवर्गणीचा हिस्सा जमा करून सदर बांधकामे ज्यावर्षी मंजूरी दिली जाते त्यावर्षात पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते. तथापि, सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढ्याच रकमेचे बांधकाम पूर्ण करून उर्वरित काम पूर्ण केले जात नाही अशा अपूर्णावस्थेत राहिलेली बांधकामे वर्षानुवर्षे पडून असतात त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेली रक्कम निरर्थक अडकून पडते. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच

अशी बांधकामे दीर्घकाळ अपूर्णावस्थेत राहिल्याने त्याची पडझड होण्याची शक्यता असते, त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजनेंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कामाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्णावस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक असते. जळगांव जिल्हा परिषदेंतर्गत असणाऱ्या पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणावेळी पुरविलेल्या माहितीनुसार दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर अपूर्णावस्थेत पडून असलेली बांधकामे पुढील प्रमाणे आहेत.

जळगांव पंचायत समिती अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेतील सन २०११-१२ या वर्षातील एकूण मंजूर २१ कामांपैकी माहे फेब्रुवारी, २०१७ अखेर १९ कामे पूर्ण असून उर्वरित २ कामे आर्थिक अपहार झाल्याने अपूर्णावस्थेत आहेत. १७ सामुहिक विकास योजनेंतर्गत सन २०११-१२ या वर्षात मंजूर असलेल्या एकूण १४ अंगणवाडी बांधकामांपैकी फेब्रुवारी, २०१७ अखेर १३ बांधकामे पूर्ण असून मौजे आव्हाणे येथील १ अंगणवाडी केंद्र आर्थिक अपहार झाल्याने अपूर्णावस्थेत आहे. पंचायत समिती, यावल अंतर्गत ग्रामपंचायतींना देण्यात आलेल्या दलित वस्ती सुधार योजनेचे ६ पैकी ५ कामे पूर्ण झालेली असून १ काम रद्द केले आहे. तसेच ८ अंगणवाडी बांधकामांपैकी ६ कामे पूर्ण असून २ कामे रद्द आहेत. मुक्ताईनगर पंचायत समिती अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेच्या २ कामांपैकी १ काम पूर्ण असून १ काम रद्द करण्यात आले आहे. जामनेर पंचायत समिती अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेच्या २४ पैकी २३ कामे पूर्ण असून १ काम रद्द करण्यात आले आहे तसेच जवाहर रोजगार योजनेतील ४२ विहिरींपैकी ३९ कामे पूर्ण असून ३ विहिरी रद्द करण्यात आलेल्या आहेत. अंमळनेर पंचायत समिती अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेच्या ४५ कामांपैकी ४३ कामे पूर्ण झालेली असून २ कामे रद्द केलेली आहेत. धरणगांव पंचायत समिती अंतर्गत गटाराची कामे/पाणीपुरवठा योजनेची २ कामे व शौचालयाची २ कामे अपूर्ण आहेत. एकूण ७ कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतीस नोटीस देवून कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच बोदवड पंचायत समिती अंतर्गत जवाहर विहिर (सिंचन पाणीपुरवठा) योजनेच्या ६ कामांपैकी ३ कामे पूर्ण असून २ कामे रद्द करण्यात आली आहेत.

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, सन २०११-१२ मध्ये दलित वस्ती सुधार योजनेतील पंचायत समिती जळगांवकडील २१ अपूर्ण कामांपैकी १९ कामे पूर्ण झाली असून सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये सर्व कामे पूर्ण झाली आहेत. जी कामे सुरू झाली नाहीत ती सर्व रद्द केली आहेत. तथापि, समितीच्या मते सन २०११-१२ मध्ये जी कामे अपूर्ण राहिली ती माहे मार्च, २०१३ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. दलित वस्ती सुधार योजनेसाठी आलेला निधी खर्च करण्यात आला नाही, त्यामुळे निधी खर्च करण्याची जबाबदारी ज्या यंत्रणेवर होती त्यांनी निधी खर्च करून कामे पूर्ण न केल्याप्रकरणी संबंधित गटविकास अधिकारी यांचेविरुद्ध कोणती कारवाई केल्याचे दिसून येत नाही. तसेच योग्य प्रस्ताव नसताना ज्यांनी कामे मंजूर केली त्यांच्यावर देखील कारवाई केल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नाराजी व असमाधान व्यक्त करीत आहे.

यासंदर्भात समितीचे स्पष्ट मत आहे की, दलित वस्ती सुधार योजनेचा मूळ प्रस्ताव चुकीचा केल्यामुळे निधी वापरता आला नाही. ग्रामपंचायतीकडून पंचायत समितीकडे प्रस्ताव पाठविला जातो, प्रस्तावाची छानणी करून जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविला जातो. समाजकल्याण अधिकाऱ्यांनी छाननी केल्यानंतर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविला जातो. सदर प्रस्ताव व्यवहार्य आहे अथवा अव्यवहार्य आहे तसेच दलित वस्तीमध्ये कोणती कामे घ्यावयाची, कोणत्या वस्त्या संपर्कक्षेत्राबाहेर आहेत याबाबत संपूर्ण आराखडा ठरलेला असताना तो आराखडा तपासून जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी त्या कामांना मंजूरी द्यावी लागते. सन २०११-१२ मधील दलित वस्ती सुधार योजनेच्या २१ कामांपैकी १९ कामे पूर्ण करण्यात आली असून २ कामे शिल्लक आहेत. २ कामांमध्ये अपहार झाला असल्याचे सकृतदर्शनी आढळून आलेले आहे, तरीदेखील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून समितीने निदेश देण्यापूर्वी कारवाई केल्याचे दिसून येत नाही. **प्रस्तुत प्रकरणी अपहार झालेला असल्यामुळे संबंधित ग्रामसेवक आणि गटविकास अधिकारी दोषी आहेत. कारण दलित वस्तीतील कामे व अपूर्ण कामांच्या संदर्भात कोणतेही काम न करता निधी परत करण्यात आला आहे. दलित वस्तीसाठी देण्यात आलेला निधी दलित वस्तीतच खर्च करणे बंधनकारक आहे. या प्रकरणी दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीचा विनियोग योग्यप्रकारे झाला नाही, त्यामुळे याबाबीची सखोल चौकशी करण्यात यावी व त्यानुसार संबंधित ग्रामसेवकांविरुद्ध कारवाई न करता जिल्हा परिषदेच्या यंत्रणेपर्यंत जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, जळगांव

### पंचक वरगव्हाण व बिडगांव मोहरद रस्ता डांबरीकरण व खडीकरण करणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१८५ (सन २००८-०९)**

पंचक वरव्हाण रस्ता व बिडगांव मोहरद रस्ता कामाकरिता अनुक्रमे रक्कम रुपये २४,८५,००४ व रक्कम रुपये १९,९०,००० खर्च झालेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) शासन निर्णय भांडार १०८८ (२५१२) उद्योग-६, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ पार्ट १०८ दिनांक २ जानेवारी, १९९२ चे भांख/सा २००२ (२९९०) उद्योग ६ दिनांक ४ फेब्रुवारी, २००३ नुसार निम्न निविदा प्राप्त व अप्राप्त नसतांना मक्तेदाराची निवड करताना जादा दर अनुक्रमे १४ टक्के व २५ स्विकृतीमुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

(२) बिडगाव मोहरद रस्ता प्रशासकीय मान्यता दिनांक २८ फेब्रुवारी, २००५ रोजी प्राप्त असताना तांत्रिक मान्यता दिनांक १ जुलै, २००७ व कार्यारंभ आदेश दिनांक १ जानेवारी, २००९ अशा अक्षम्य विलंबाने दिल्याने जनतेला सोयी सुविधा पुरविण्यास व सदरच्या कालावधीत दरात वृद्धी झाल्याने जादा दराने स्विकृती करून रुपये ३,९१,८६३ ने अतिरिक्त प्रदान व मक्तेदार हित जोपासलेले आहे. त्या अभावी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ११४ व १५२ व १३९ नुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता व कार्यवाही न करता काम केलेले आहे.

(३) बिडगाव मोहरद रस्ता मक्तेदारांचा करारनामा परिपूर्ण भरलेला नसतांना कार्यारंभ आदेश निर्गमित केलेले आहेत.

(४) परिपत्रक ग्रा. व झेडपीए-१०९७/प्र.क्र.१९४३/१३३ दिनांक ४ सप्टेंबर, २००० अंदाजपत्रक अचुक असणे व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम १२० नुसार ब-१ निविदा अटी व शर्ती नुसार काम करणे बंधनकारक असताना व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम १५४ नुसार कार्यकारी अभियंता यांनी मंजूर निविदेपेक्षा जादा खर्च व बचत केलेल्या खर्चास बाबनिहाय तांत्रिक निरिक्षण टिपणी स्पष्टीकरण व सुधारित वर्कींग अंदाजपत्रक न करता रुपये ३५,१७४ जादा खर्च व रक्कम रुपये १,२०,५२५ ने बचत खर्च नोंदविला आहे.

(५) मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक नाशिक यांचे पत्र क्र.का-२/रस्ते १/१९८४ दिनांक २९ एप्रिल, २००८ अन्वये २० कि.मी. पुढील अंतर अधीक्षक अभियंता यांची मान्यता प्राप्त नाही तसेच वाहन अंतर व खदान नकाशा सक्षम प्राधिकारणांमार्फत प्रमाणित नाही तसेच दरसुची सामान्य टिपणी बाब क्र.१६ पृष्ठ क्र.५ नुसार कंप्लीट वर्क बाब क्र.५ सप्लाय ऑफ ग्रॅव्हल साठी २ कि.मी. करिता रुपये १५,०८२ अनुज्ञेय नसताना प्रदान केलेले आहे व बाब क्र.७, ८, ९ मध्ये २० कि.मी. पुढील अंतर सक्षम प्राधिकारणाने प्रमाणित न करता वाहन अंतराकरिता देय केलेली रक्कम रुपये १,७६,२५७ मंजूर प्राप्त न करता प्रदान केलेली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पंचक वरगव्हाण रस्ता कि.मी.२८ ते ३० खडीकरण डांबरीकरण व बिडगांव मोहरद तालुका चोपडा रस्ता कि.मी. १८.५०० ते २२ आदिवासी योजनेंतर्गत डांबरीकरण करणे या कामाची निविदा शेकडा १४ टक्के जादा दराची व बिडगांव मोहरद रस्ता या कामाची निविदा शे. २५ टक्के जादा दराची प्राप्त झाली असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.सीऐटी-१०८७/सीआर-१९६/बिल्डींग-२, मंत्रालय, मुंबई दिनांक ४ मे, १९८८ अन्वये सदर दराची तुलना प्रचलित दर सुचीबरोबर केली असता सदरचे दर अनुक्रमे शेकडा ०.१९ टक्के जादा व शेकडा ७.७२ टक्के कमी असे येत असून सदरचे दर हे लेखासंहिता १९६८ मधील नियम १३९ नुसार वित्तीय मर्यादेत येत असल्याने मान्य करण्यात आले आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला आहे.

(२) बिडगांव मोहरद रस्त्याची मजबुती व डांबरीकरण करणे त्याच्या अंदाजित रक्कम रुपये १९,९०,००० चे कामास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २००५ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १०६ (क) नुसार निधी पुरविण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून हमी मिळालेली असल्याखेरीज कोणत्याही बांधकामाच्या संबंधित कोणतेही दायित्व पत्करण्यात येणार नाही अशी तरतुद आहे. त्यानुसार निधीच्या उपलब्धते प्रमाणे काम हाती घेण्यात आलेले आहे. प्रचलित दर सुचीशी तुलना करता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम १३९ नुसार सदर कामावर प्रशासकीय मान्यता रक्कमेपेक्षा जादा खर्च झालेला नाही, त्यामुळे नियम ११४ व १५२ नुसार सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याची आवश्यकता भासली नाही.

(३) बी-१ निविदेच्या अटी व शर्ती असलेल्या निविदेच्या प्रत्येक पानावर मत्तेदाराने स्वाक्षरी केली असून "बी-१ निविदेच्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत" असे विहित केलेल्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर लिहून दिलेले आहे. आक्षेपात नमूद केलेप्रमाणे नोंद घेण्यात आली आहे.

(४) मुळ अंदाजपत्रकीय व प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा जादा खर्च झालेला नाही. तथापि, सदर कामाच्या कार्यन्वयी अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

(५) सदर कामास प्रशासकीय मान्यता मुख्य अभियंता यांनी दिलेली आहे. प्रशासकीय मान्यतेचे वेळी प्रस्ताव सादर करताना कामाचे अंदाजपत्रक व तत्सम कागदपत्र दिल्या नंतरच प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ ऑक्टोबर २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचक वरगव्हाण रस्ता कॉ.मा. २८ ते ३० खडीकरण-डांबरीकरण व बिडगाव-मोहरद, तालुका चोपडा रस्ता कि.मी. १८.५०० ते २२ आदिवासी योजनेंतर्गत डांबरीकरण काम पूर्ण झाले आहे काय, तसेच बांधकाम परवाना मोजमाप पुस्तिका आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आली आहे क़ाय.—

यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, पंचक वरगव्हाण व बिडगांव-मोहरद रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. या दोन्ही कामाचे बांधकाम परवाने, मोजमाप पुस्तिका आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची स्वाक्षरी घेतलेली आहे. या दोन्ही कामांमध्ये दर अनुक्रमे शेकडा ०.१९ जादा व शेकडा ७.७२ कमी येत असून सदरचे दर लेखासंहितेच्या वित्तीय मर्यादेत येत असल्याने मान्य करण्यात आले आहेत. यासाठी प्रशासकीय मान्यता आहे व २४ लाख ९० हजार रुपयांच्या खर्चाला मान्यता होती.

यावर समितीने विचारणा केली की, रुपये १५,०८२ व रुपये १,७६,२५७ वसूल करणे आवश्यक आहे, ते वसूल करण्यात आले आहेत काय, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी बहुतेक, होय असा खुलासा करताच समितीने नाराजी व्यक्त करून कार्यकारी अभियंता (बांधकाम) बरोबर उत्तर देत नाहीत असे मत व्यक्त केले. तद्‌नंतर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी पैशाच्या वसुली संदर्भात खुलासा करताना असे नमूद केले की, कामाची प्रशासकीय मान्यता आणि कामाचे अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता यांच्यामार्फत सादर करण्यात येते. यामध्ये रुपये १५,०८२ व रुपये १,७६,२५७ हे लीड चार्जेस आहेत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, एका बाजूला २५ टक्के पेक्षा जादा दराची निविदा स्वीकृत केली आणि दुसऱ्या बाजूला मात्र प्रशासकीय मान्यतेच्या रकमेमध्ये काम पूर्ण केले. तसेच कामाची लांबी सुद्धा १६० मीटरने कमी करण्यात आली. एकंदरीत या कामामध्ये स्पष्टपणे गैरप्रकार झाल्याचे दिसून येत आहे. तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, एका बाजूला जादा दराची निविदा स्वीकृत झाली आणि दुसऱ्या बाजूला प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून देयक अदा करण्यात आलेले आहे हे कसे शक्य आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या कामाला मुख्य अभियंता यांची नंतर मान्यता घेतली होती. या प्रकरणी वसूल रकमेच्या बाबतीत नंतर परवानगी घेण्यात आली काय, सदरहू परवानगी कोणाच्या अधिकारात घेण्यात आली या बाबतची माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल.

पुढे समितीने पृच्छा केली की, बिडगाव-मोहरद रस्त्याची निविदा सन २००८-०९ मध्ये २५ टक्के जादा दराने स्वीकृत केलेली आहे. या कामावर प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च न होण्याची कारणे काय आहेत, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, या कामाला प्रशासकीय मान्यता १९ लाख ९० हजार रुपयांची होती. तसेच तांत्रिक मान्यता १६ लाख ९० हजार रुपयांची दिली होती. परंतु प्रत्यक्षात काम करताना रस्त्याची लांबी १६० मीटरने कमी केली. त्यामुळे खर्च कमी झाला. यामध्ये ३ लाख रुपयांचा फरक आहे. रस्त्याचे काम १६० मीटरने कमी केल्यामुळे उक्त रकमेची बचत झाली आहे. दिनांक ४ मे १९८८ अन्वये सदर दराची तुलना प्रचलित दर सुचीबरोबर केली असता सदरचे दर अनुक्रमे ०.१९ टक्के एवढेच जादा आहेत.

तद्‌नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, हा विषय अतिशय गंभीर आहे. पंचगव्हाण रस्ता व बिडगांव-मोहर रस्त्याच्या कामासाठी २५ टक्के जादा दराची निवदा स्वीकृत करण्यात आलेली आहे. या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामध्ये अनेक ठिकाणी गैरव्यवहार झालेला आहे. तसेच जिल्हापरिषदेच्या बांधकामाचा दर्जा उत्कृष्ट राहत नाही. ग्रामीण भागात जिल्हापरिषदेच्या रस्त्यांचा दर्जा अतिशय निकृष्ट असल्याचे पहावयास मिळते. हा गंभीर मुद्दा असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी वरिष्ट पातळीवरून या कामाची चौकशी करावी. तसेच सदरहू विषयी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचगव्हाण व बिडगाव-मोहर रस्त्याची सन २००८-०९ मध्ये २५ % जादा दराने निविदा स्वीकृत केल्याने सदरहू कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याने या प्रकरणी सखोल चौकशीनुसार गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**पंचक वरगव्हाण रस्ता ता. चोपडा**

(१) प्रशासकीय मान्यता दिनांक २१ जानेवारी २००३ रक्कम रुपये २४,९०,०००

(२) तांत्रिक मान्यता दिनांक ०१ जुलै २००७ रक्कम रुपये २१,४४,९०१

(३) निविदा सूचना क्र. १/२००८-०९ नुसार किंमत रुपये २१,४४,९०१

(४) निविदेचा देकार १४ % जादा दराची न्यूनतम निविदा स्विकृत करण्यात आली आहे.

(५) सन २००८-०९ चे प्रचलित दरानुसार ०.१९ % जादा दराने येते.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय दिनांक १५ जुलै २००८ अन्वये सदरची निविदा मा.सभापती विषय समिती यांनी सक्षम प्राधिकारी म्हणून स्वीकृत करण्यास मान्यता दिलेली आहे.

**बिडगांव-मोहरद, ता. चोपडा**

(१) प्रशासकीय मान्यता दिनांक २८ फेब्रुवारी २००५ रक्कम रुपये १९,९०,०००

(२) तांत्रिक मान्यता दिनांक ०१ जुलै २००७ रक्कम रुपये १६,९०,६६२

(३) निविदा सूचना क्र. ३/२००७-०८ नुसार किंमत रुपये १६,९०,६६२

(४) निविदेचा देकार २५ % जादा दराची न्यूनतम निविदा स्विकृत करण्यात आली आहे.

(५) सन २००८-०९ चे प्रचलित दरानुसार ७.७२ % कमी दराने येते.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय दिनांक १५ जुलै २००८ अन्वये सदरची निविदा मा.सभापती विषय समिती यांनी सक्षम प्राधिकारी म्हणून स्वीकृत करण्यास मान्यता दिलेली आहे.

चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवालामध्ये अनियमितता झाली नाही, असे नमूद केले आहे. याबाबत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याने कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय** :- जिल्हापरिषद, जळगांव यांचे अखत्यारितील विषय असल्याने ग्रामविकास विभागाशी संबंधित आहे. या विभागाचे अभिप्राय निरंक आहे.

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** (बांधकाम-३) जिल्हापरिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी माहिती दिली की, सदर रस्त्याची २५ टक्के जादा दराने निविदा स्वीकृत केल्याने कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे म्हटले होते. प्रत्यक्ष या कामाला प्रशासकीय मान्यता सन २००५ मध्ये मिळाली होती. निविदा सन २००८ मध्ये काढण्यात आली. प्रचलित दरानुसार सदर निविदा ७.७२ टक्के कमी दराने दिलेली आहे. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचक वरगव्हाण रस्ता व बिडगांव-मोहरद रस्ता डांबरीकरण व खडीकरण करणे या रस्त्याच्या कामाकरिता अनुक्रमे रक्कम रुपये २४,८५,००४ व रक्कम रुपये १९,९०,००० खर्च झालेला आहे याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. मत्तेदारांची निवड करताना जादा दर अनुक्रमे १४ टक्के व २५ टक्के स्वीकृतीमुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही. बिडगांव-मोहरद रस्ता प्रशासकीय मान्यता दिनांक २८ फेब्रुवारी २००५ रोजी प्राप्त असताना तांत्रिक मान्यता दिनांक २ जानेवारी २००९ एवढ्या अक्षम्य विलंबाने दिल्याने जनतेला सोयी-सुविधा पुरविण्यास व सदरच्या कालावधीत दरात वृद्धी झाल्याने रुपये ३,९१,८६३ एवढे अतिरिक्त प्रदान व मत्तेदार हित जोपासले आहे. त्या अभावी महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ११४ व १५२ व १३९ नुसार सुधारित प्रशासकीय मान्यता व कार्यवाही न करता काम केलेले आहे. बिडगांव-मोहरद रस्ता मत्तेदारांचा करारनामा परिपूर्ण भरलेला नसताना कार्यारंभ आदेश निर्गमित केलेले आहेत. कार्यकारी अभियंता यांनी मंजूर निविदेपेक्षा जादा खर्च व बचत केलेल्या खर्चास बाबनिहाय तांत्रिक निरीक्षण टिप्पणी स्पष्टीकरण व सुधारित वर्किंग अंदाजपत्रक न करता रुपये ३५,१७४ जादा खर्च व रुपये १,२०,५२५ एवढा बचत खर्च नोंदविला आहे. २० कि.मी. पुढील अंतरास अधीक्षक अभियंता यांची मान्यताप्राप्त नाही तसेच वाहन अंतर व खदान नकाशा सक्षम प्राधिकरणामार्फत प्रमाणित नाही तसेच दरसुचीनुसार २ कि.मी. करीता रुपये १५,०८२ एवढी रक्कम अनुज्ञेय नसताना प्रदान केलेले आहे व २० कि.मी. पुढील अंतर सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित न करता वाहन अंतराकरिता देय केलेली रक्कम रुपये १,७६,२५७ मंजुरी प्राप्त न करता प्रदान केलेली आहे.

सदर लेखा आक्षेपावर जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, पंचक वरगव्हाण रस्ता व बिडगांव-मोहरद रस्ता आदिवासी योजनेंतर्गत डांबरीकरण करण्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच बांधकाम परवाना, मोजमाप पुस्तिका आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. सदर कामासाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. तथापि, दरसूचीनुसार सप्लाय ऑफ ग्रॅव्हलसाठी २ कि.मी. करीता अनुज्ञेय नसताना प्रदान केलेले रुपये १५,०८२ व २० कि.मी. पुढील अंतर सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित न करता वाहन अंतराकरिता देय केलेली मंजूर प्राप्त न करता प्रदान केलेली रक्कम रुपये १,७६,२५७ वसूल करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी ठामपणे उत्तरे न देता संदिग्ध उत्तरे दिल्यामुळे समिती तीव्र नाराजी व असमाधान व्यक्त करीत आहे.

पंचक वरगव्हाण रस्ता व बिडगांव-मोहरद रस्त्याच्या कामासाठी २५ टक्के जादा दराची निविदा स्वीकृत करण्यात आलेली आहे. त्यामुळे या कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे. जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागामध्ये अनेक ठिकाणी गैरव्यवहार झालेला आहे तसेच जिल्हापरिषदेच्या बांधकामाचा दर्जा उत्कृष्ट राहत नाही. विशेषतः ग्रामीण भागात जिल्हापरिषदेच्या रस्त्यांचा दर्जा अतिशय निकृष्ट असल्याचे पहावयास मिळते तसेच पंचक वरगव्हाण रस्ता व बिडगांव-मोहरद रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता सन २००५ मध्ये मिळालेली असताना सदर रस्त्यांच्या कामाची निविदा सन २००८ मध्ये काढण्यात आली. **बिडगांव-मोहरद रस्त्याची मजबुती व डांबरीकरण करणे अंदाजित रक्कम रुपये १९,९०,००० एवढी प्रशासकीय मान्यता होती आणि रुपये १६ लाख ९० हजार रुपयांची तांत्रिक मान्यता दिली होती. त्यामुळे यामध्ये ३ लाख रुपयांचे तफावत आढळत आहे तसेच रस्त्याचे काम १६० महिने कमी करण्यात आले आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशीनुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण तेरा

## जिल्हा परिषद, जळगांव

## पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणास अभिलेख सादर न करणेबाबत

### (१) परिच्छेद क्रमांक ४.३९३/०१ (सन २०११-१२)

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरवले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमांचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरीक्षणास कागदपत्रे / अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद / विभाग पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरीक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेतः-

| अ.क्र | जिल्ह्याचे नांव | पंचायत समितीचे नांव | लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २१ | जळगांव | जळगांव | ०१ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ अखेर ४१ घटकांचे लेखा परिक्षण दप्तर उपलब्ध न झाल्याने प्रलंबित होते. त्यापैकी आज अखेर २५ घटकांचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले आहे. ०२ घटकांचे अभिलेखे उपलब्ध झालेले आहे. ज्या घटकांचे दप्तर उपलब्ध झालेले आहे त्या ०२ घटकांचे लेखा परिक्षण करून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. ०३ घटकांचे अद्यापपावेतो अभिलेखे उपलब्ध नाहीत. त्यापैकी ०६ घटकांचे दप्तर वाळवीने नष्ट झालेली आहे. ०५ घटकांचे दप्तर न्यायालयात जमा आहे. तसेच ०३ घटकांचे बाबतीत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १७९ प्रमाणे कारवाई करण्यात येत आहे.

### (२) परिच्छेद क्रमांक ४.३९३/१६ (सन २०११-१२)

| अ.क्र | जिल्ह्याचे नांव | पंचायत समितीचे नांव | लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २२ | जळगांव | चोपडा | १६ | २८,१०,५००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला:—**

परिच्छेदात नमूद केलेनुसार आक्षेपातील ८ कर्मचाऱ्यांपैकी ३ कर्मचाऱ्यांकडील शासकीय गट विमा योजनेतून गृह कर्ज अग्रीम मंजूर रकमेची पूर्ण परतफेड झालेली असून उर्वरित ५ कर्मचाऱ्यांकडील वसुली सुरू आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :—

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | हुद्दा | गृह कर्जाची रक्कम | फेब्रुवारी, २०१७ अखेर एकूण वसुली | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्री. फकीरा सिकंदर तडवी | उ.शि. | ३२५००० | ८८०३६ | वेतनातून दर महा वसुली सुरू आहे. |
| (२) | श्री. निवृत्ती गंगाराम बाविस्कर | उ.शि. | ४१२५०० | - | संस्थेने सभासदत्व रद्द केले असून भरणा संस्था करणार आहे. |
| (३) | श्री. बिस्मिला ईस्माईल पठाण | उ. शि. | ३२५००० | १९५००० | वेतनातून दर महा वसुली सुरू आहे. |
| (४) | श्री. जेमसिंग थावऱ्या बारेला | उ.शि. | ४२१००० | ४२१००० | पूर्ण परतफेड झालेली आहे. |
| (५) | श्री. गुलाब बारकू अवव्या | उ.शि. | ४२१००० | ४२१००० | पूर्ण परतफेड झालेली आहे. |
| (६) | श्री. दिलीप पौलाद मैराळे | उ.शि. | ३९५००० | ७०९०२ | वेतनातून दर महा वसुली सुरू आहे. |
| (७) | श्रीमती सुशिला भागवत सपकाळे | उ.शि. | २७०००० | २७०००० | पूर्ण परतफेड झालेली आहे. |
| (८) | श्री. अफसर बन्नेसाहेब मलीक | ड्रेसर | २४१००० | ९५६८० | वेतनातून दर महा वसुली सुरू आहे. |

वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांकडून कर्जाची वसुली सुरू असून वसूल केलेली रक्कम शासनाकडे नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात आलेली आहे.

उक्त तक्त्यातील ३ कर्मचाऱ्यांचे मंजूर असलेले गृहकर्जाची व्याजासह १०० टक्के परतफेड झाली असून कार्यासन अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रउद्योग विभाग, मुंबई यांचे कडील नादेय दाखला प्राप्त करून घेण्यात आलेला आहे.

वरील तक्त्यातील एकूण ८ कर्मचाऱ्यांच्या घरबांधणी कर्जाची नोंद मुळसेवा पुस्तकातील शेवटच्या पानावर घेण्यात आलेली आहे.

प्रस्तुत शकात नमूद केल्यानुसार पंचायत समिती, चोपडा अंतर्गत कार्यरत असलेल्या मुळसेवा पुस्तकांची तपासणी करण्यात आलेली असून ज्या कर्मचाऱ्यांनी शासनाकडून गृहकर्ज घेतले आहे त्यांच्या दरमहा वेतनातून वसुली सुरू करण्यात आलेली आहे. तसेच कर्ज घेतले असल्या-बाबत त्यांच्या सेवा पुस्तकात नोंदी व इतर आवश्यकते अभिलेखेत पासून खात्री करण्यात आलेली आहे.

**(३) परिच्छेद क्रमांक ४.३९३/२५ (सन २०११-१२)**

| अ.क्र | जिल्ह्याचे परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नांव | लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २३ | जळगांव | भडगांव | २५ | .... |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आलाः—**

परिच्छेदात नमूद केलेनुसार लेखापरिक्षण न झालेल्या ९ ग्रामपंचायतींचे ९० ची कार्यवाही निकाली काढण्यासाठी अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून घेण्यात आलेले असून सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षण, जळगांव यांना कळविणेत आलेले आहे.

| अ.क्र. | योजनेचे नावा | लेखा परिक्षणासाठी दप्तर उपलब्ध न करून देणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या | संबंधित ग्रामसेवक मयत झालेल्या घटक संख्या | म.ग्र.पं. अधिनियम १९५८ चे कलम १७९ प्रमाणे कार्यवाही प्रस्तावित केलेल्या घटक संख्या | शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करून दोषारोप ठेवलेल्या घटक संख्या | लेखा-परिक्षणास | दप्तर उपलब्ध झालेल्या घटक संख्या | लेखा परिक्षण पूर्ण झालेल्या घटक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | ग्रामनिधी | ९ | १८ | १ | २ | – | १० | ८ |
| (२) | जरोयो | १ | ३ | १ | – | – | ३ | – |
| (३) | जग्रासंयो | ८ | ३५ | २ | ५ | – | ३२ | ३ |
| | एकूण | १८ | ५६ | ४ | ७ | – | ४५ | ११ |

**(४) परिच्छेद क्रमांक ४.३९३/२२ (सन २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नांव | लेखा परीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| २४ | जळगांव | पारोळा | २२ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आलाः—**

लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. २२ नुसार ग्रामनिधी ६७ घटक, ज.रो.यो. २० घटक व ज.ग्रा.से.यो. व संपूर्ण ग्रामीण योजना ३४ घटक ग्रामपंचायतीने लेखा परिक्षणास दप्तर उपलब्ध न केल्यामुळे लेखापरिक्षणात प्रलंबित होते. सदर परिच्छेदाचा गोषवारा खालीलप्रमाणे :—

| अ.क्र. | तपशिल | ग्रामनिधी | जरायो | संपूर्ण ग्रामीण | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १) | एकूण प्रलंबित घटक | ६७ | २० | ३४ | १२१ |
| २) | लेखा परिक्षण झालेले घटक | २० | ०० | २४ | ४४ |
| ३) | दप्तर उपलब्ध तथापि लेखा परिक्षण बाकी | १० | ०४ | ०० | १४ |
| ४) | न्यायालयात दाखल दप्तर | ०० | ०० | ०० | ०० |
| ५) | १७९ नुसार केलेली कारवाई | १६ | १२ | १० | ३८ |
| ६) | मयत व्यक्ती | १५ | ०४ | ०० | १९ |
| ७) | नैसर्गिक आपत्ती | ०६ | ०० | ०० | ०६ |

वरीलप्रमाणे एकूण १२१ परिच्छेद प्रलंबित होते. पैकी ४४ घटक लेखा परिक्षण झालेले असून १४ परिच्छदांचे दप्तर ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असून लेखा परिक्षण करणेसाठी पत्र दिलेले आहे. ३८ घटकांसाठी संबंधितांविरुद्ध कलम १७९ नुसार कारवाई प्रस्तावित केली असून १९ घटक संबंधित व्यक्ती मयत झालेले आहेत व ६ घटक नैसर्गिक आपत्तीने दप्तर नष्ट झाले आहेत. १०० टक्के ग्रामपंचायत लेखा परिक्षणास दप्तर उपलब्ध करून देणेसाठी कारवाई करण्यात येत आहे.

**(५) परिच्छेद क्रमांक ४.३९३/३ (सन २०११-१२)**

| अ.क्र | जिल्हाचे परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नांव | लेखा परीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| २५ | जळगांव | एरंडोल | ०३ | .... |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आलाः—**

एकूण १० ग्रामपंचायतीचे ३८ घटकांचे दप्तर लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नव्हते त्यानुसार घटकनिहाय केलेल्या कार्यवाहीची माहिती खालीलप्रमाणे :—

| अ.क्र. | योजनेचे नाव | लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध न करुन देणाऱ्या ग्राप संख्या | | मे. न्यायालय पोलिस स्टेशनमध्ये घटक संख्या | संबंधित ग्रामसेवक मयेत झालेले घटक संख्या | नैसर्गिक आपतकालीन वाळवी लागून लेख खराब झालेले घटक संख्या | म.ग्रा.प. अधि. १९५८ चे कलम १७९ प्रमाणे कार्यवाही प्रस्तावित केलेले घटक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्राप संख्या | घटक | | | | |
| १) | ग्रामनिधी | ५ | १६ | -- | -- | -- | १६ |
| २) | जरोयो | १ | ५ | -- | ५ | -- | -- |
| ३) | ज/संग्राम | ४ | १७ | -- | -- | -- | १७ |
| | एकूण | १० | ३८ | -- | ५ | -- | ३३ |

**(६) परिच्छेद क्रमांक ४.३९३/४ (सन २०११-१२)**

| अ.क्र | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नांव | लेखा परीक्षा परिच्छेद क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| २६ | जळगांव | एरंडोल | ०४ | .... |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

प्राथमिक आरोग्य केंद्र, तळई व रिंगणगांव येथे कनिष्ठ सहायक पद रिक्त असल्याने अतिरिक्त चार्ज आरोग्य सेवक यांच्याकडे देण्यात आले असल्याने दप्तर लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करून देता आले नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र, तळई व रिंगणगांव येथील दप्तर उपलब्ध असून लेखा परिक्षण होणेबाबत प्राथमिक आरोग्य केंद्र, तळई यांच्याकडील पत्र क्र. आरोग्य/आरआर/११२/१३, दिनांक ३ ऑगस्ट, २०१३ व क्र. १५१, दिनांक १७ जून, २०१४ आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, रिंगणगांव यांच्याकडील प्र.क्र. आरोग्य आरआर/११५, दिनांक १५ सप्टेंबर, २०१३ व प्र.क्र. ११९, दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ अन्वये विनंती केलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.३९३/१ ते ३.३९३/४ हे सर्व परिच्छेद पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न करण्यासंदर्भातील आहेत. त्यामुळे या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अहवाल सादर करावा व यासंदर्भात मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये २५ हजार रुपये दंड आकारावयाचा असून सेवापुस्तिकेत नोंदही घ्यावयाची आहे. तसेच, वेतनवाढ रोखण्यासंदर्भात देखील तरतूद आहे. ही सर्व कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या स्तरावर करावी व समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समित्यांनी लेखा परीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे.**

पंचायत समितीचे सन २०११-१२ आणि सन २०१२-१३ मध्ये अभिलेखे लेखा परीक्षणाचे वेळी सादर करण्याबाबतच्या मुद्यास ६ वर्षाचा कालावधी झालेला असताना अभिलेखे सादर न करणाऱ्या संबंधिताविरुद्ध विभागीय आयुक्तांनी आक्षेप घेतल्यानंतर सुद्धा तपासणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत यांचे लेखा परिक्षण मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षण अधिनियम, १९३० नुसार स्थानिक निधी विभागाकडून करण्यात येते. परिच्छेदाचे अनुषंगाने सदरचा परिच्छेद हा स्थानिक निधी लेखा कार्यालयाने घेतलेल्या लेखा परीक्षणाच्या संबंधित असून ज्या ग्रामपंचायतीने लेखा परीक्षणासाठी वेळीच अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत. त्यांच्या पंचायत समितीचे नांव परिच्छेदात नमूद करण्यात आलेले आहे. परिच्छेद क्रमांक ४.३९३/२१/१ पंचायत समिती अंतर्गत १० ग्रामपंचायतीचे एकूण ३७ घटकाचे वेळीच अभिलेखे सादर न केल्यामुळे लेखा परीक्षण प्रलंबित राहिले यास जबाबदार एकूण ९ ग्रामसेवकांविरुद्ध महाराष्ट्र अधिनियम १९५८ चे कलम १७९ नुसार प्रशासकीय कारवाई करण्याची नोटीस जिल्हा परिषद जळगांव संबंधितांना दिल्यानंतर त्यापैकी ५ ग्रामपंचायतींचे अभिलेखे ग्रामसेवकांनी उपलब्ध करून दिले त्याचे एकूण २४ घटकाचे लेखा परिक्षण स्थानिक निधी परिक्षा विभागाकडून करण्यात आले. उर्वरित ४ ग्रामपंचायती पैकी २ ग्रामपंचायतीमधील अभिलेख्यांना वाळवी लागल्याने नष्ट झाले आहेत. १ ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक परागंदा झालेले आहेत व त्याचे अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाविरुद्ध दंडात्मक कारवाइ करण्यात आलेली आहे व रुपये ६००० दंड जिल्हा परिष्द, जळगांव यांच्याकडून करण्यात आलेला आहे.

| ले.प. न झालेले ग्रा.प. संख्या | ले.प. न झालेले घटक संख्या | जबाबदार ग्रा.से. संख्या | पैकी ले.प. झालेले ग्रा.पं.संख्या | ले.प.झालेले घटक संख्या | वाळविने नष्ट झालेले | परागंदा घटक संख्या | दंडात्मक कारवाई घटक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ३७ | ९ | ५ | २४ | १ ग्रा.से. २ घटक | १ ग्रा.से. २ घटक | १ ग्रा.से. ५ घटक |

उपरोक्त नुसार जिल्हा परिषदेने काराावाई केलेली आहे. सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने तपासणी ही स्थानिक निधी परीक्षा विभागाकडून करण्यात आलेली आहे. सदर तपासणी ग्रामपंचायतीची असल्याने या विषयी विभागीय आयुक्त यांचेकडून आक्षेप घेतलेला नाही.

स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० कलम ७ सुधारणा २०११ मधील कलम ८ अन्वये अभिलेखे उपलब्ध न करून दिल्यास दंडात्मक तरतूद आहे. सदर परिच्छेदाबाबत दंडाचे प्रस्ताव स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालयाकडून प्राप्त नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) जिल्हा परिषदेने केलेल्या खुलाशावर शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे यामध्ये दंड वसूल करण्यात यावा, वेतनवाढ रोखण्यात यावी व सेवा पुस्तिकेमध्ये नोंद घेण्यात यावी, अशा प्रकारची कारवाई करण्यात यावी, असे सांगितले होते.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, सदरहू विषयाबाबतची कारवाई करण्यात आलेली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०११-१२ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकांस ते तपासणी करीत असताना त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दाखविली नाहीत. सन २०११-१२ या वर्षाचे एकूण ६ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५०००/- इतकी

दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करून देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत.

समिती राज्यात अनेक ठिकाणी भेट देत असताना लेखा परिक्षकांना अभिलेखे संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळीच उपलब्ध करून दिले जात नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, **"जी कोणतीही व्यक्ती कलम ६ पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिद्ध झाल्यानंतर लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५% किंवा रुपये ५०,००० यापैकी जास्त असणाऱ्या रक्कमे इतक्या दंडात्मक रक्कमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी"** अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या रक्कमेबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.

ज्या प्रकरणामध्ये अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत, त्या प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई केलेली दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरीक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. **जळगाव जिल्हा परिषदेमध्ये सन २०११-१२ या वर्षामध्ये एकूण ६ परिच्छेदांसंदर्भात अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अभिलेखे लेखापरीक्षणाच्यावेळी सादर करण्यात आलेले नाहीत अशा सन २०११-१२ मधील परिच्छेदासंदर्भात कलम ६ मधील पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करून वसुल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चौदा

## जिल्हापरिषद, जळगांव

## सर्वसाधारण शिफारशी

**(१) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :-**

समितीने राज्यातील जिल्हापरिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः जळगांव जिल्हापरिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असताना समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हापरिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हापरिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसूल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरित परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हापरिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हापरिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधी तरतुदी करून मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्त्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हापरिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून जळगांव जिल्हापरिषदेमधील रकमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

**(२) लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :-**

समितीने जळगांव जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध**

**करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखापरीक्षणाचे वेळी लेखापरिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रु.२५,००० इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जळगांव जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करून नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरुद्ध कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच नि:पक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट (अ)

## शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके

(परिशिष्ट ३.१)

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत
तांदुळाची वाहतूक आणि धान्यादी
मालाचा पुरवठा सुरु करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शासन परिपत्रक क्र.शापोआ २००९/प्र.क्र.३८३/प्राशि-४**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक - २६ फेब्रुवारी, २०१०.**

**संदर्भ:-** शासन निर्णय क्र.शापोआ २००९/प्र.क्र.१३६/प्राशि-४ दि. १८ जुन, २००९.

**शासन परिपत्रक -** शासन निर्णय क्र.शापोआ-२००९/प्र.क्र.१३६/प्राशि-४,दि. १८.६.२००९ अन्वये तांदुळाची वाहतुक करणे व ग्रामीण भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार बनविण्यासाठी धान्यादी (उदा. कडधान्य, तेल, मीठ, मिरची पावडर, मसाला इ.) पुरवठा निविदा मागवून करण्यात यावा, असे आदेश देण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयानुसार शिक्षण संचालनालयामार्फत निविदा प्रक्रिया राबवून पुरवठाधारकाची निवड करण्यात आलेली असुन निविदा प्रक्रीयेनुसार आलेल्या दरास शासनाने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या शालेय पोषण आहार योजनेच्या सुधारणेबाबत अंतिम करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत, तांदुळाची वाहतूक करणे तसेच ग्रामीण भागामध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करणे याबाबत मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेसंदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले होते. मा. उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका क्रमांक ९४६६/२००९ वर दिनांक १७.१२.२००९ रोजी शासनाच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. त्यानुसार शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदुळाची वाहतूक करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी क्षेत्रीय यंत्रणेला खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

अ) <u>तांदूळ वाहतूक करण्याची कार्यपध्दती :-</u>

**(अ-१)** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणारा तांदूळ भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून प्राप्त होतो. निविदा प्रक्रियेनूसार अंतिम करण्यात आलेले पुरवठाधारक दि महाराष्ट्र स्टेट को.-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई हे भारतीय अन्न महामंडळाच्या जिल्हानिहाय गोदामातून शालेय पोषण आहार योजनेसाठीचा तांदूळ उचल करतील. पुरवठाधारक यांनी उचल केलेला शालेय पोषण आहार योजनेचा हा तांदूळ ज्या दर्जाचा व ज्या स्थितीत उचलला आहे, त्या स्थितीत जसाच्या तसा शाळेपर्यंत पोहोच करावयाचा आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून उचल केलेल्या तांदुळाची माहिती पुरवठाधारकांनी दरमहा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना सादर करावी.

**(अ-२)** पुढील आर्थिक वर्षापासून (२०१०-११) केंद्र शासनामार्फत मोफत देण्यात येणाऱ्या तांदुळाची किंमत राज्य शासनांस अनुदान स्वरुपात वितरीत करण्यात येणार आहे. राज्य शासनाने सदर अनुदान म्हणजे तांदुळाची बीपीएल दराने येणारी किंमत भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करुन तांदूळ प्राप्त करून घ्यावयाचा आहे. चालू आर्थिक वर्षाच्या (२००९-१०) अखेर पर्यंत मात्र भारतीय अन्न महामंडळच्या तांदुळाची किंमत केंद्र शासनामार्फत परस्पर देण्यात येणार आहे.

**(अ-३)** पुढील आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेचे वार्षिक कार्य अंदाजपत्रक मंजूर केल्यानुसार संपूर्ण राज्यासाठी जिल्हा निहाय तांदुळाचे नियतन प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत वितरीत करण्यात येईल. शिक्षण संचालनालय (प्राथमिक) ३-३ महिन्याचे (Quarterly) तांदुळाचे नियतन जिल्हानिहाय आगाऊ स्वरूपात वितरीत करतील.

**(अ-४)** केंद्र शासनाकडून पुढील आर्थिक वर्षापासुन (सन २०१०-११) तांदुळाची किंमत राज्यास अनुदान स्वरूपात प्राप्त होणार आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षण संचालनालयाने भारतीय अन्न महामंडळाकडे संपूर्ण राज्यासाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळाची किंमत (३-३

महिन्यासाठीची) भारतीय अन्न महामंडळाकडे भरण्याची कार्यवाही करावी. सदर निधी भारतीय अन्न महामंडळाला देत असतांना जिल्हा निहाय तांदुळाचे नियतन भारतीय अन्न महामंडळास आगाऊ कळवावे, जेणेकरून भारतीय अन्न महामंडळास आगाऊ स्वरुपात माहिती प्राप्त झाल्याने त्यांना त्यांच्या जिल्ह्याच्या गोदामामध्ये साठा करणे सोयीचे होऊन, संबंधित जिल्ह्यांना तांदुळ वेळेवर उपलब्ध करुन देणे भारतीय अन्न महामंडळास शक्य होईल.

**(अ-५)** प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन तांदुळाचे नियतन व तांदुळाची किंमत भारतीय अन्न महामंडळास अदा केल्याची माहिती सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद तसेच शिक्षण प्रमुख / प्रशासन अधिकारी / शिक्षणाधिकारी (महानगरपालिका) यांना कळवली जाईल. त्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे जिल्हा स्तरावरून त्या जिल्ह्यामधील ग्रामीण भागातून तसेच नागरी भागातून (महानगरपालिका, नगरपालिका यामधील शाळांसह) सर्व शाळांसाठी लागणाऱ्या तांदुळाची मागणी मंजूर नियतनाप्रमाणे नियुक्त केलेल्या पुरवठादार दि महाराष्ट्र स्टेट को.ऑ. मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांना कळवतील. सदर मागणी करीत असतांना २ महिन्यासाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळाची मागणी करण्यात येईल. तांदुळाचे नियतन जरी ३ महिन्यासाठी मंजूर करण्यात आले असले तरी सुरुवातीला २ महिन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील व त्यानंतर शाळेमध्ये २० दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असताना पुढील महिन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील.

**(अ-६)** जिल्हयामध्ये विविध पंचायत समिती गट अस्तित्वात आहेत. त्याप्रमाणे जिल्ह्यामध्ये नगरपालिका/नगर पंचायती/नगर परिषद / कटकमंडळे अस्तित्वात आहेत. त्या शिवाय काही जिल्ह्यामध्ये महानगरपालिका कार्यरत आहेत. जिल्हा स्तरावरून पुरवठा आदेश देत असताना ज्या पंचायत समिती क्षेत्रामध्ये नगरपालिका क्षेत्र येईल त्या नगरपालिका क्षेत्रामधील नागरी भागातील शाळांसाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळाची मागणी संबंधित पंचायत समिती क्षेत्रात समाविष्ट करण्यात यावी. ज्या जिल्ह्यामध्ये महानगरपालिका कार्यरत आहेत त्या महानगरपालिकेमधील सर्व शालेय पोषण आहार पात्र शाळांसाठी लागणाऱ्या तांदुळासाठी एक पंचायत समिती गट असल्याचे गृहीत धरण्यात यावे, तसेच कटक मंडळासाठी सुध्दा एक पंचायत समिती गट गृहीत धरावे. म्हणजे उदाहरण स्वरुपाने, एखाद्या जिल्ह्यामध्ये

७ पंचायत समिती, २ कटकमंडळे व २ महागरपालिका कार्यरत असल्यास त्या जिल्ह्यामध्ये शालेय पोषण आहार योजनेच्या मागणीसाठी ७+२+२ =११ गट गृहित धरण्यात यावेत. जिल्ह्यातील गटासाठी गटनिहाय तांदुळाच्या नियतनाची विभागणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

**(अ-७)** तालुकास्तर म्हणजे गटस्तरावर गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार हे तांदूळ वाहतुकीसाठी निश्चित केलेल्या 'दि महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड, मुंबई या पुरवठाधारकास तांदूळ वाहतुकीचे पुरवठा आदेश देतील.

**(अ-८)** या पुरवठा आदेशासोबत गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार हे शालेय पोषण आहार योजनेच्या पात्र शाळानिहाय तांदुळाचे मागणीपत्र प्रमाणानुसार प्राधान्याने ५० किलोच्या गोणीप्रमाणे किंवा गरजेनुसार ५, १० किलोच्या पटीत पुरवठाधारकास पुरवठा आदेश देतील. सदरील पुरवठा आदेश देण्याअगोदर गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी घेतील.

**(अ-९)** महानगरपालिका व कटकमंडळ या कार्यक्षेत्रामध्ये शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासनअधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे पुरवठाधारकास तांदूळ वाहतुकीचे पुरवठा आदेश देतील.

**(अ-१०)** या पुरवठा आदेशासोबत महानगरपालिकेचे शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे शालेय पोषण आहार योजनेच्या पात्र शाळानिहाय तांदुळाचे मागणीपत्र प्रमाणानुसार प्राधान्याने ५० किलोच्या गोणीप्रमाणे किंवा गरजेनुसार ५, १० किलोच्या पटीत पुरवठाधारकास पुरवठा आदेश देतील. सदरील पुरवठा आदेश देण्यापूर्वी महानगरपालिकांच्या बाबतीत शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी घेतील.

**(अ-११)** मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद अस्तित्वात नसून या संपूर्ण क्षेत्रासाठी बृहन्मुंबई म.न.पा. कार्यरत आहे. त्यामुळे मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील महानगरपालिकेच्या शाळांसाठी तसेच म.न.पा. क्षेत्रातील खाजगी संस्थांच्या शाळांसाठी

लागणाऱ्या तांदुळाच्या तांदूळ वाहतुकीचे पुरवठा आदेश शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका हे निश्चित केलेल्या पुरवठाधारकास देतील. पुरवठा आदेशासोबत शालेय पोषण आहारासाठी पात्र शाळांचे मागणीपत्र असावे. शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पुरवठा आदेशाची प्रत्येक प्रत प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांना पाठवावी.

**(अ-१२)** प्रत्येक शाळेसाठी लाभार्थींच्या गणनेनुसार आवश्यक असणाऱ्या तांदुळाची माहिती सर्व शाळांकडून त्या त्या गटामार्फत गट स्तरावर एकत्रित करण्यात यावी. कोणत्याही शाळेस तांदुळाचे नियतन कमी किंवा अधिक होणार नाही या संदर्भात गट स्तरावरील यंत्रणा जबाबदार राहील. पंचायत समिती गट स्तरावरुन मागणी देणे व त्याप्रमाणे पुरवठा प्राप्त करुन घेणे यासाठी गट शिक्षणाधिकारी हे संनियंत्रण करतील तसेच महानगरपालिका क्षेत्रात मागणी देणे व पुरवठा प्राप्त करुन घेणे यासाठी शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी हे संनियंत्रण करतील.

## ब) तांदूळ वाहतुकीच्या खर्चाचे देयक अदा करण्याची कार्यपध्दती :-

**(ब-१)** भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून शाळेपर्यंत तांदुळाची वाहतूक करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पुरवठाधारकास प्रत्यक्ष तांदुळ वाहतुक केल्यानुसार वाहतूक खर्चाचे देयक शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरून देण्यात येईल. वाहतूक खर्चाचे देयकात भारतीय अन्न महामंडळाचे गोडावूनमधून राज्यातील शालेय पोषण आहार योजनेच्या प्रत्येक पात्र शाळेपर्यंत तांदूळ पोहोच करण्यापर्यंत येणारा सर्व खर्च समाविष्ट राहील.

i) भारतीय अन्न महामंडळाचे गोडावूनमधून तांदूळ उचल केल्यानंतर भारतीय अन्न महामंडळाचे गोडावून ते शाळास्तरापर्यंत वाहतूक, साठवणूक, धुरीकरण, प्रमाणीकरण इ. बाबींची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल.

ii) भारतीय अन्न महामंडळाचे गोडावूनमधून तांदुळाची उचल केल्यानंतर शाळेपर्यंत पोहोच करण्यापर्यंत संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकाची असेल. त्यामध्ये गोडावून ते शाळा

दरम्यान वाहतूक करणा-या वाहनांचे विमा, वाहनांच्या अपघाताने होणारे तांदुळाचे नुकसान, तांदूळ साठवणूक करणा-या गोडावूनचा विमा, आग, चोरी, इ. बाबींचा समावेश असेल.

**(ब-२)** सदर देयके अदा करण्यासाठी संबंधित पुरवठाधारक त्या जिल्हयाअंतर्गत गटातील गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार, महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे देयक सादर करतील. गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार, महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे मुख्याध्यापकाने दिलेल्या पोहोच पावतीनुसार देयक तपासून प्रमाणीत करुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे पाठवतील. सदर देयक शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून प्रमाणित करण्यात येईल व प्रमाणित करण्यात आलेले देयक शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवले जाईल. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून प्रमाणित करुन आलेले तांदुळाचे देयक शासनाकडून उपलब्ध होणा-या अनुदानाप्रमाणे संबंधित पुरवठाधारकास प्राथमिक शिक्षण संचालनालय यांचे स्तरावरुन जिल्हानिहाय देयकानुसार अदा करण्यात येईल.

**(ब-३)** मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील महानगरपालिकेच्या शाळांसाठी तसेच मनपा क्षेत्रातील खाजगी संस्थांच्या शाळांसाठी लागणाऱ्या तांदुळाच्या वाहतूक खर्चाची देयके बृहन्मुंबई महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी सदर देयकाची तपासणी करुन तसेच गोषवारा प्रमाणित करुन देयकाच्या अदायगीसाठी शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठवतील. वाहतूक खर्चाचे देयक शिक्षण संचालनालयास सादर करताना पुरवठा करण्यात आलेला तांदूळ योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे.

**(ब-४)** संबंधित पुरवठादारांनी त्यांना प्राप्त झालेल्या शाळानिहाय मागणीनुसार तांदुळ पुरवठा शाळेपर्यंत करावयाचा आहे. नागरी भागातील शाळांसाठी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा अवलंब केला असल्यास त्या शाळांसाठी द्यावयाचा तांदुळ त्या शाळांच्या मागणीप्रमाणे सदर केंद्रीय स्वयंपाकगृह असणाऱ्या ठिकाणी पुरवठा करणे आवश्यक राहील.

क) ग्रामीण भागामध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करण्याची कार्यपध्दती -

**(क-१)** शासन निर्णय क्र.शापोआ-२००९/प्र.क्र. १३६/प्राशि-४, दि.१८.६.२००९ अन्वये ग्रामीण भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार बनविण्यासाठी धान्यादी (उदा.कडधान्य, तेल, मीठ, मिरची पावडर, मसाला इ.) पुरवठा निविदा मागवून करण्यात यावा, असे आदेश देण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयानुसार शिक्षण संचालनालयामार्फत निविदा प्रक्रिया राबवून पुरवठादाराची निवड करण्यात आलेली आहे. त्यानंतर शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १ व दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांचेमध्ये दिनांक २३ ऑक्टोबर २००९ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. दिनांक १८/६/२००९ चा वर नमूद केलेल्या क्रमांकाचा शासन निर्णय, निविदा प्रक्रियेत निश्चित केलेल्या अटी व शर्ती व करारनामा यास अधिन राहून पुरवठाधारकामार्फत ग्रामीण भागातील शाळांमध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येईल.

**(क-२) तालुका स्तर:-** तालुकास्तर म्हणजे गटस्तरावर गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार निश्चित केलेल्या पाककृतीनुसार ठरवून दिलेल्या धान्यादी मालाची प्रमाणानुसार परिगणना करतील व प्राधान्याने एक, दोन व पाच किलोच्या पॅकींगमध्ये किंवा आवश्यकतेनुसार शाळेतील एकूण विद्यार्थ्यांसाठी लागणा-या धान्यादी मालाचे शाळानिहाय मागणी पत्रासह पुरवठाधारकास पुरवठा आदेश देतील. गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक हे संबंधित पुरवठादारास पुरवठा आदेश देण्यापूर्वी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी घेतील. सदर पुरवठा आदेशाची प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना देण्यात यावी.

**(क-३)** गटस्तरावरुन पुरवठा आदेश ज्या दिनांकास काढला जाईल त्या दिनांकापासून पुरवठा करण्यासाठीचा कालावधी गृहीत धरण्यात येईल. तसेच संबंधितांनी पुरवठाधारकास तांदुळाची वाहतूक तसेच इतर धान्यादी मालाचा पुरवठा, याबाबतचे पुरवठा आदेश एकाच वेळी द्यावेत.

**(क-४)** शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ व धान्यादी माल हा दैनंदिन आहार बनविण्यासाठी वापरावयाचा असतो. त्यामुळे त्याचा पुरवठा वेळेवर होणे आवश्यक आहे.

त्यासाठी गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार यांनी वेळेत मागणी करणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी वेळेत पुरवठा आदेश काढणे व पुरवठा आदेशानंतर पुरवठाधारकाने १५ दिवसाच्या आत मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेत करणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधितांनी वेळेत पुरवठा होणेसाठी कालमर्यादेत कार्यवाही करावी.

**(क-५) धान्यादी मालाचा प्रत्यक्ष पुरवठा :-** ग्रामीण भागातील शाळांमध्ये संबंधित पुरवठाधारकामार्फत तांदूळ व इतर वस्तूंचा पुरवठा एकत्रित करण्यात येईल. मात्र तांदूळ पुरवठयाच्या व धान्यादी माल पुरवठयाच्या पावत्या वेगवेगळया ठेवण्यात येतील. संबंधित पुरवठादार सदर मालाच्या पुरवठयासंदर्भातील शासन विहित करील त्या नमुन्यातील पावत्या स्वत:च्या खर्चाने छापून घेईल व त्याच पावत्यांचा वापर पुरवठादार करेल. त्यासाठी गुलाबी, पिवळया व पांढ-या अशा तीन रंगाच्या पावत्या बनविण्यात येतील. गुलाबी रंगाची पावती आहार घेणा-या शाळेकडे राहील. पिवळया रंगाची पावती पुरवठाधारक देयकासोबत जोडून गट स्तरावर सादर करतील. पांढ-या रंगाची पावती पुरवठाधारकाकडे त्याची स्वत:ची प्रत म्हणून ठेवण्यात येईल. सदर पावतीवर गटाचे व जिल्हयाचे नांव, पुरवठयाचा दिनांक, वाहन क्रमांक, माल वाहतूक करणा-याचे नांव इ. तपशील असेल. तीनही पावत्यावर माल योग्य वज-नाचा व दर्जाचा व सुस्थितीत प्राप्त झाल्याची पोहोच मुख्याध्यापक देतील.

**(क-६)** प्रारंभिक पुरवठा २ महिन्यांसाठी करण्यात येईल, त्यानंतर १ महिन्यासाठी पुरेल एवढे अन्नधान्य पुरवठा करण्यात यावा. शाळेमध्ये २० दिवस पुरेल इतका धान्य साठा शिल्लक असताना नवीन पुरवठा आदेश देण्यात येतील. शाळांकडून मागणी वेळेत प्राप्त करुन घेणे व पुरवठा आदेश वेळेत पुरवठाधारकास देण्याची जबाबदारी गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक शालेय पोषण आहार यांची असेल.

**ड) धान्यादी मालाची तपासणी :-**

**(ड-१)** पुरवठाधारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे नमुने प्रत्येकी २५० ग्रॅम प्रमाणे गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार यांनी त्यांचे पत्रासोबत शासकीय प्रयोगशाळेत पाठवावेत. शासकीय प्रयोगशाळेतील तपासणीचा संपूर्ण खर्च पुरवठाधारकाने अदा करणे आवश्यक राहील. प्रयोगशाळेचा समाधानकारक अहवाल प्राप्त

झाल्यानंतर मालाच्या देयकासोबत सदरचा तपासणी अहवाल गटशिक्षणाधिकारी व अधीक्षक, शालेय पोषण आहार यांच्याकडे पुरवठाधारक सादर करतील. सदरचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयके अदा केली जातील. धान्यादी मालाच्या दर्जाबाबत काही तक्रारी आल्यास सदरील धान्यादी वस्तू पुरवठाधारकाकडून बदलून घेण्यात याव्यात.

**(ड-२)** पुरवठाधारकाने सादर केलेल्या पोहोच पावत्या, प्रयोगशाळा तपासणी अहवाल व गटाचा एकत्रित गोषवारा याची तपासणी अधिक्षक, शालेय पोषण आहार यांनी करावी. गटास प्राप्त झालेला माल योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे प्रमाणपत्र नोंदवून पुरवठाधारकाकडून सादर झालेले देयक शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद यांना १० दिवसाच्या आत सादर करण्याची जबाबदारी व गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार यांची असेल. सर्व गट स्तरावरुन धान्यादी मालाच्या पुरवठयाची देयके प्राप्त झाल्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या मंजूर अनुदानातून/ निधीमधून सदर देयके संबंधित पुरवठाधारकास देयक दाखल झाल्यापासून १० दिवसाच्या आत अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून अदा करावीत. तांदुळाच्या वाहतूकीची देयके शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद यांचे स्तरावर अदा न करता त्या त्या जिल्हयामधील गट स्तरावरुन तांदूळ वाहतूकीची आलेली देयके यांचा गोषवारा बनवून शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद यांनी सदर देयके शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे अदायगीसाठी सादर करावीत. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे तांदूळ वाहतुकीची देयके सादर करताना लेखाधिकारी, शालेय पोषण आहार व शिक्षणाधिकारी यांनी योग्य दर्जाचा व वजनाचा माल प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र सादर करावे व त्यानंतर वाहतूक खर्चाची देयके प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडून अदा करण्यात यावीत.

**(ड-३)** संबंधित पुरवठाधारक त्यांनी पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची देयके ४ प्रतीत बनवून सादर करतील, त्यापैकी १ प्रत पुरवठाधारक स्वत:कडे ठेवतील व देयकाच्या ३ प्रती गट स्तरावर सादर करतील. अधिक्षक, शालेय पोषण आहार यांनी सदर देयकाची तपासणी करुन त्याचा गोषवारा बनवून देयकाच्या ३ प्रतींपैकी २ देयके शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद यांचेकडे सादर करण्यात यावीत. सदर देयकाची अदायगी करताना

एक प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद व देयकाची दुसरी प्रत मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हापरिषद यांचे कार्यालयात राहील.

**(ड-४)** दि.१८.६.२००९ च्या शासन निर्णयाप्रमाणे अन्न शिजविण्याच्या अनुदानात विभागणी करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये पाककृतीनुसार आवश्यक लागणारा इतर धान्यादी माल (उदा. कडधान्य, डाळ, तेल, मिठ, मिरची पावडर इ.) निश्चित केलेल्या पुरवठाधारकामार्फत करण्यात येणार आहे. फक्त अन्न शिजवून देण्यासाठी म्हणजे इंधन व मजूरी यासाठी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु. ०.५० म्हणजे ५० पैसे याप्रमाणे ग्रामशिक्षण समित्यांना अनुदान देण्यात येणार आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी फक्त इंधन व मजूरीचे अनुदान तालुक्यांना / गटांना वर्ग करावे. व गटांनी ग्रामशिक्षण समित्यांना वर्ग करावेत. इंधन व मजूरीचा खर्च वजा जाता प्राथमिक (इ. १ ली ते ५ वी) साठी उर्वरित रु. १.५८ प्रतिदिन प्रतिविद्यार्थी व उच्च प्राथमिक (इ. ६ वी ते ८ वी) साठी उर्वरित रु. २.१० प्रतिदिन प्रतिविद्यार्थी हा खर्च शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पुरवठाधारकाचे धान्यादी मालाची देयके देण्यासाठी उपयोग करावा. गटस्तरावर वर्ग करावयाचा निधी व पुरवठाधारकास अदा करावयाची रक्कम याची एकत्रित मागणी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचेकडे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पाठवावी. तसेच मासिक खर्चाचा अहवाल व मासिक प्रगती अहवाल शिक्षण संचालनालयाकडे मुदतीत सादर करावेत. नवीन कार्यपध्दतीप्रमाणे संबंधित शाळेस पुरवठाधारकामार्फत तांदूळ व धान्यादी वस्तूं ज्या दिवसापासून प्राप्त होतील त्या दिवसापासून नवीन पध्दतीप्रमाणे अनुदानाची विभागणी लागू करण्यात येईल. संबंधित शाळेकडे यापूर्वी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वाहतूक होवून आलेला तांदूळ उपलब्ध असल्यास सदर तांदुळाचा साठा नोंदवहीमध्ये तशी नोंद करुन त्या तांदुळाचा वापर करण्यात यावा. पुढील मागणी नोंदविताना शाळेकडील शिल्लक विचारात घ्यावी.

**(ड-५)** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नवीन पध्दतीप्रमाणे पुरवठाधारकामार्फत तांदुळाची वाहतूक ग्रामीण व नागरी भागासाठी करण्यात येणार आहे. त्याशिवाय ग्रामीण भागामध्ये पाककृतीप्रमाणे इतर वस्तूंचा पुरवठा करण्यात येणार आहे. सदर पुरवठा साधारणपणे एकाच वेळी होईल अशा पध्दतीने पुरवठा आदेश देण्यात यावेत. प्रारंभिक पुरवठा

२ महिन्यांसाठी असेल. यानंतर एक महिन्यासाठी पुरेल एवढया धान्यादी मालाचे तसेच तांदूळाचे पुरवठा आदेश देण्यात यावेत.

**(ड-६)** शालेय पोषण आहार योजनेमध्ये वरील सुधारणा अंमलात आणताना यापूर्वी अन्न शिजविण्यासाठी नियुक्त केलेल्या यंत्रणांना आगाऊ कल्पना देण्यात यावी जेणेकरुन त्यांचेकडून आवश्यक वस्तूंची खरेदी होणार नाही.

**फ).** संबंधित शाळेकडून गटशिक्षणाधिकारी व अधिक्षक,शालेय पोषण आहार यांनी खालील माहिती प्राप्त करुन घ्यावी:-

१ नवीन पध्दतीप्रमाणे कोणत्या तारखेस मालाचा पुरवठा करण्यात आला.

२ जुन्या पध्दतीप्रमाणे शाळेमध्ये शिल्लक असलेला तांदूळ किती.

३ १ एप्रिल २००९ ते जुन्या पध्दतीप्रमाणे अन्न शिजवून देण्याचा शेवटचा दिनांक.

४ वरील मुद्दा क्र. ड-४ च्या आधारे इंधन व मजूरीचे अनुदान त्याचप्रमाणे धान्यादी मालाची किंमत याची विभागणी गट स्तरावर करण्यात यावी.

**इ) <u>अन्न शिजविण्याची कार्यपध्दती</u> :-**

**(इ-१)** ग्रामीण भागामध्ये ग्राम शिक्षण समितीने शाळेस उपलब्ध होणारा तांदूळ आणि इतर खाद्य वस्तूंपासून विहित केलेल्या पाककृतीप्रमाणे स्वयंपाक्यामार्फत आहार बनवून घ्यावा. या योजनेंतर्गत स्वयंपाकाचे काम महिला बचत गट, महिला मंडळ यांच्याकडून करुन घ्यावे. मात्र वैयक्तिक स्थानिक स्वयंपाकी नियुक्त करताना त्या गावातील विधवा, परितक्त्या अथवा गरजू महिलांना तसेच मागासवर्गीय उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे.

i)अन्न शिजवून देणा-या व्यक्तींनी सक्षम वैद्यकीय अधिका-याकडून आरोग्य विषयक तपासणी करुन घ्यावी व वैद्यकीय प्रमाणपत्र शाळेमध्ये ठेवण्यात यावे.

ii)अन्न शिजवून देणा-या प्रत्येक व्यक्तीकडे कायम स्वरुपाचे संबंधित मुख्याध्यापक यांनी दिलेले ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

iii) विद्यार्थ्यांना दर्जेदार आहार देण्याच्या दृष्टीकोनातून ग्रामशिक्षण समितीने स्थानिक पातळीवर लोकसहभागातून सहभाग घ्यावा. तसेच अन्न धान्य व आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी तपासणी करावी.

iv) सर्व क्षेत्रिय अधिकारी, जिल्हा स्तरावरील भरारी पथके, राज्यस्तरावरील दक्षता पथके यांचे मार्फत आहाराचा दर्जा वेळोवेळी तपासण्यात येईल.

(इ-२) ग्रामीण भागामधील शाळेसाठी ग्राम शिक्षण समितीमध्ये शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात पाच (५) लाभार्थी विद्यार्थ्यांच्या पालकांना निमंत्रित सदस्य म्हणून घेण्यात यावेत. अशा प्रकारे ग्राम शिक्षण समितीमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रित सदस्य म्हणून घेऊन त्याद्वारे ग्राम शिक्षण समितीने शाळेमध्ये उपलब्ध होणा-या अन्न-धान्यादी मालापासून विद्यार्थ्यांना आहार देण्याची व्यवस्था करावी.

ग). **<u>साठा नोंदवही व अभिप्राय पुस्तिका</u>** - प्रत्येक शाळेमध्ये (ग्रामीण भागातील तसेच नागरी भागातील शाळांमध्ये) प्राथमिक शिक्षण संचालनालयाने विहित केलेली एक साठा नोंदवही व अभिप्राय पुस्तिका ठेवण्यात यावी. सदर साठा नोंदवही मध्ये शाळेमध्ये प्राप्त होणा-या तांदुळाची नोंद करण्यात यावी. साठा नोंदवहीमध्ये शिल्लक असलेला तांदूळ, पुरवठेदाराकडून/ वाहतूकदाराकडून पुरवठा आदेशानुसार प्राप्त झालेला तांदूळ, शाळेमध्ये आहार देण्यासाठी प्रत्येक दिवशी लागलेला तांदूळ व त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाच्या तांदळाची नोंद करण्यात यावी. ग्रामीण भागातील शाळांमध्ये तांदूळाबरोबर इतर धान्यादि मालाचा पुरवठा करण्यात येणार असल्याने या धान्यादी मालासाठी स्वतंत्र साठा नोंदवही ठेवण्यात यावी व तांदुळाच्या साठा - नोंदवही प्रमाणे यामध्ये धान्यादी वस्तुंची नोंद करण्यात यावी. साठा नोंद वही अद्यावत ठेवण्यात यावी. अभिप्राय पुस्तिकेत आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी ग्रामशिक्षण समिती सदस्य, माता, पालक व अधिका-यांचे अभिप्राय घेण्यात यावेत.

**ह). <u>सर्वसाधारण सुचना :-</u>**

**(ह-१)** पुरवठाधारकाने भारतीय अन्न महामंडळाच्या गोडावूनमधून उचल केलेल्या तांदुळाचे हिशेब प्राथमिक (इ. १ ली ते ५ वी) व उच्च प्राथमिक (इ. ६ वी ते ८ वी) साठी स्वतंत्रपणे ठेवावेत व दरमहा तांदूळ उचल वाटप अहवाल प्राथमिक शिक्षण संचालनालयास सादर करावा.

**(ह-२)** तांदूळ व इतर धान्यादी मालाच्या पुरवठयासंदर्भात सर्व यंत्रणांमध्ये समन्वय राखण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दरमहा जिल्हयातील गटशिक्षणाधिकारी,

अधीक्षक, शालेय पोषण आहार, कटक मंडळे व महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी यांची एकत्रित बैठक घ्यावी. या बैठकीस पुरवठाधारकाचा जिल्हा व्यवस्थापक हजर असणे बंधनकारक असेल.

**(ह-३)** शासन निर्णय क्र. शापोआ २००९/प्र.क्र.१३६/प्राशि ४, दि. १८/६/२००९, या संदर्भात मागविण्यात आलेल्या निविदेतील व करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच संचालनालयामार्फत वरील संदर्भात यापुढील काळात वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व आदेश यांचे पालन करणे पुरवठाधारकास बंधनकारक असेल.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) २०१००२२६१४२६४६००१ क्रमांकाने प्रसिद्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(ना.ऊ.रौराळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मुख्यमंत्र्याचे /उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मंत्री / राज्यमंत्री , शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), सर्व जिल्हे
गट शिक्षणाधिकारी, सर्व
शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी/शिक्षण प्रमुख सर्व (म.न.पा./न.पा.)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

(परिशिष्ट ७.१)

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती ) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत उपकर वसूल करावयाची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शासन निर्णय क्रमांक : बीसीए २००९/प्र.क्र. १०८/कामगार ७-अ

मंत्रालय, मुंबई- ३२.

दिनांक १७ जुन २०१०

**वाचा - अ) नियम व अधिनियम**

१) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६

२) इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम १९९६

३) इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८

४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) नियम २००७ दि.५.२.२००७

**ब) शासननिर्णय व परिपत्रके**

१) शासन अधिसूचना, क्रमांक एमएससी १०९७/सीआर ७७५/कामगार-२, दिनांक २६ जून,१९९७

२) शासन निर्णय क्र. एमएससी १०९७/सीआर ४४२/कामगार १०, दि. २१ मे,१९९९

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. बीसीए १२००७/प्र.क्र.७७५/ कामगार-७, दिनांक ४ ऑगस्ट, २००७

४) शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. बीसीए १२००७/ प्र.क्र.- ७७८/ कामगार-७, दिनांक ४ ऑगस्ट, २००७ व शुध्दीपत्रक५ ऑगस्ट, २००८

५) शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. बीसीए २००८/ प्र.क्र.- ९०७/कामगार-७, दिनांक १६ एप्रिल, २००८ .

६) शासन परिपत्रक क्रमांक : बीसीए २००७/प्र.क्र. ७८८/कामगार ७-अ, दिनांक २६ ऑक्टोबर, २००९

७) शासन परिपत्रक क्रमांक : इमारत २००९/प्र.क्र. ११९/कामगार ७-अ, दिनांक १ डिसेंबर, २००९

८) सचिव (कामगार)यांनी नोदंणी महानिरिक्षक यांसलिहिलेले अ.शा.पत्र क्रं. असंका २००९ प्र.क्रं.६२ काम ७ अ दि. १४ जुन २०१०

**प्रस्तावना :-**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण अधिनियम १९९६ हे केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात कार्यरत असलेल्या बांधकाम मजूरांना, जे राज्य शासनाने गठित केलेल्या इमारत व इतर बांधकाम कल्याण मंडळात लाभार्थी म्हणून नोंदित झालेले किंवा ज्या कामगारांची लाथार्थी म्हणुन नोंदणी करण्यात येणार आहे अशा

कामगारांचे कल्याण करण्याच्या उद्देशाने पारीत केलेले आहेत. सदर कायद्याची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम २००७ तयार करण्यात आले आहेत. अधिनियमातील तरतुदीनुसार दि.२६.६.१९९७ च्या अधिसुचनेनुसार पांच शासकीय सदस्यांचे मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. या अधिनियमांतर्गत उपकर गोळा करण्याबाबतची तसेच बांधकामाचे मुल्यांकन करण्याची तपशीलवार कार्यपध्दती तयार करण्यासाठी मंत्रिमंडळाने दिनांक १२/०५/२०१० रोजी तत्वत: मान्यता घेण्यात आली, त्या नुसार मा. मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने निश्चित केलेली कार्यपध्दती पुढिलप्रमाणे आहे.

**शासन निर्णय:-**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ (केंद्रिय अधिनियम २७/१९९६) आणि त्या अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ (केंद्रिय अधिनियम २८/१९९६) (उपकर अधिनियम ) हे कायदे केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात कार्यरत असलेल्या बांधकाम मजूरांच्या कल्याणकारी उद्वेश्याने जसे की,आरोग्य, सुरक्षा आणि कल्याण इत्यादी योजना बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना पुरविण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंमलात आणलेले आहेत. मुख्य अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने बीसीए ३२००३/सीआर १४६/ कामगार ७ दि.५.२.२००७ अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम २००७ तयार केलेले आहेत. तसेच दि.१८.९.२००७ च्या ठरावानुसार उपकराची रक्कम जमा करण्यासाठी खाते क्रमांक ००४२२०११०००००१५३ बँक ऑफ इंडिया येथे उघडण्यात आला आहे.

२. मुख्य अधिनियम व उपकर अधिनियमाच्या महत्वाच्या तरतुदी परिशिष्ट १ मध्ये नमुद केलेल्या आहेत.

३. खाजगी किंवा सार्वजनिक उपक्रमाच्या बांधकामाच्या संदर्भात जे विभाग बांधकामाच्या आराखड्यास मान्यता देण्यास सक्षम आहेत, जसे की (१) महानगर पालिका,नगरपालिका प्रशासन आणि नगर विकास विभाग (सर्व शहरी स्थानिक संस्थांच्या बाबतीत). (२) जिल्हापरिषद, ग्रामपंचायत आणि ग्राम विकास विभाग (सर्व ग्राम पंचायती). (३) उद्योग विभाग (एम.आय.डी.सी. आणि विकास आयुक्त, एसईझेड) आणि सर्व राज्य /केंद्र शासनाचे विभाग ज्यामध्ये बांधकाम चालू आहे व त्यात कामगार नियुक्त केले आहेत, त्यांना त्यांच्या विभागीय प्रमुखांनी तातडीने सूचना द्याव्या.

(१). इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर वसूल करताना, बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार(जमीनीची किंमत वगळून )तसेच संबंधित आस्थापनेने कामगारांना किंवा त्यांच्या नातलगांना कामगारांसाठी नुकसान भरपाई अधिनियम १९२३ मधील तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारची भरपाई दिलेली असेल ती रक्कम वगळून उर्वरीत बांधकाम मुल्यावर १ % उपकर वसुल करावयाचा आहे. हा उपकर खाजगी तसेच शासकीय बांधकामावर देखिल वसूल करावयाचा आहे.

(२). बांधकामाची अंदाजित मुल्य ठरविण्याबाबत नोंदणी महानिरिक्षक यांना मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यासाठी निर्देश देण्यात आले आहेत. व नोंदणी महानिरिक्षक यांनी याबाबतीत स्वतंत्रआदेश निर्गमित करावेत.

अशा प्रकारे निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा आणि त्या मध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांचा आधार बांधकामाचे अंदाजित मुल्य ठरविताना घ्यावा.

(३) नोंदवही ठेवणे व मासिक विवरण पुढील महिन्याच्या १० तारखेपुर्वी अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई (परिशिष्ट २ प्रमाणे)यांच्या कडे पाठवावे. जेणेकरुन यांना जमा केलेल्या उपकराच्या रक्कमेचा तसेच बँकेत/कोषागारात जमा झालेल्या रक्कमेचा (परिशिष्ट ३ प्रमाणे) ताळमेळ घेणे शक्य होईल. तसेच उपकरवसुलीच्या नोंदी ठेवण्यासाठी नोदवह्या व मासिक विवरणपत्र ठेवण्याबाबत दि.१.१२.२००९ परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या सुचनांचेही पालन करावे.

(४) इमारत व इतर बांधकामास मंजूरी देणारे व त्यासंदर्भातील उपकर जमा करणाऱ्या विभाग/स्थानिक स्वराज्य संस्था/प्राधिकरण यांनी त्यांचे यासंदर्भातील विवरणपत्रे व वार्षिक अहवाल परिशिष्ठ ४ प्रमाणे इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळास प्रत्येक पुढिलआर्थिक वर्षाच्या १५ मे पूर्वी सादर करावेत. हे वार्षिक विवरणपत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मंडळ बांधकामाच्या आराखडयास मंजूरी देणाऱ्या व उपकर गोळा करणाऱ्या संबंधित प्राधिकरणास सदर उपकर गोळा करण्यासाठी झालेल्या खर्चाचा ( जमा - झालेला उपकाराच्या १ टक्कापेक्षा अधिक नाही) परतावा करील.

४. सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा व वन विभाग तसेच जिल्हा परिषद यांच्याद्वारे केली जाणारी जी कामे "इमारत व बांधकामाच्या परिभाषेत येतात अशा कामांसाठी इमारत व इतर बांधकामाचे कंत्राट घेणाऱ्या कंत्राटदार/अभिकरण यांच्या देयकातून इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर विहित दराने वसूल करण्यात यावा." सदर जबाबदारी संबंधित विभागाची असेल तसेच जी देयके कोषागारात सादर होतील अशा देयकात संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याने "इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर" याची वसूली दर्शवावी व त्यानुसार कोषागाराने सदर वसूली करावी.

५. सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना व सर्व शासकीय अभिकर्त्यांना निर्देश देण्यात यावेत की, या उपकर अधिनियमाच्या कलम ३ आणि केंद्रशासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ च्या नियम ३ नुसार निर्गमित केलेल्या दि.२६.९.१९९६ च्या अधिसुचनेनुसार १ टक्का उपकराची रक्कम त्यांनी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळात वरील पध्दतीने दि.१.७.२०१० पासून न चुकता जमा करावी.

६. जी इमारत व इतर बांधकामे 'इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६' च्या कलम २ (१) (डी) अनुषंगाने परिभाषेत येतात व ज्याचे काम घेण्यासाठीचा करार दिनांक ०१ जुले २०१० वा तद्नंतर करण्यात येईल अशा सर्व इमारत व इतर बांधकामांना वरील पध्दत लागू राहील.

७. सर्व संबंधित विभागांशी विचारविनिमय करुन उपकर वसूलीमध्ये सुसूत्रता येण्यासाठी प्रत्येक प्रकरणास युनिक क्रमांक देण्याबाबत शासन परिपत्रक दि.२६.१०.२००९ अन्वये सविस्तर निर्देश देण्यात

आलेले आहेत. त्यानुसार सदर युनिक क्रमांकाची पध्दत टप्याटप्याने संबंधित विभागाकडून राबविण्यात यावी व प्रथम टप्प्यात नगर विकास विभाग व त्यांच्या अधिनस्त महानगरपालिका, नगरपालिका, सर्व शहरी स्थानिक संस्था व प्राधिकरणे इत्यादी तसेच गृहनिर्माण विभाग व त्यांच्या अधिनस्त सर्व संस्था/प्राधिकरण यांना प्रथम टप्प्यात लागू राहील, तसेच पुढील टप्प्यांसाठी कामगार विभागाकडून स्वतंत्रपणे सूचना देण्यात येतील.

८. सदर शासन निर्णय हा मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने व सदर बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व संबंधित विभागांच्या प्रधान सचिव/सचिवांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कविता गुप्ता )
सचिव,कामगार

प्रत-
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.
(मंत्रालयीन सर्व विभागांकडून हा शासन निर्णय त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक उपक्रमांच्या निदर्शनास आणण्यात यावा.)
मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा,
सर्व नोंदणी अधिकारी,
कक्ष अधिकारी (प्रशासन-२) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांना सदर शासन निर्णय वेबसाईटवर टाकण्याच्या विनंतीसह अग्रेषित./निवडनस्ती.

# परिशिष्ट -१
## मार्गदर्शक तत्वे.

**नियम व अधिनियम**

१) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६
२) इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम १९९६
३) इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८
४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) नियम २००७ दि.५.२.२००७

**महत्वाच्या तरतूदी व त्याच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक तत्वे.**

**१.** ‘‘इमारत किंवा इतर बाधकाम काम’’ ची व्याख्या (कलम २ (d) ) मध्ये दिलेली आहे. बांधकाम, फेरफार, दुरुस्ती,देखभाल, किंवा पाडून टाकणे इत्यादी इमारत, रस्ते,मार्ग, रेल्वे, ट्रामवेज,एअर फिल्डस्, पाठबंधारे, जलनिस्सारण,बंधारा व नेव्हीगेशन काम, पुर नियंत्रणाचे काम (वादळामुळे जलनिस्सारणाच्या कामासहीत), तेल व वायुची जोडणी टाकणे, विद्युत लाईन्स, वायरलेस, रेडीओ, टेलिव्हीजन, टेलिफोन, टेलिग्राफ, आणि समुद्रापार दळणवळण, धरणे, कालवे,जलाशये,जलप्रवाह, बोगदे, पुल, सेतु, सेतुप्रणाल, पाईपलाईन, टॉवर्स, कुलीग टॉवरर्स, पारेषण टॉवर्स आणि या प्रकारचे इतर कामे समुचित शासन अधिसुचनेद्वारे लागु करु शकते परंतू कारखाने अधिनियम, १९४८ किंवा खाण अधिनियम, १९५२ च्या तरतूदी ज्या आस्थापनेस लागु होतात त्यांना इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या तरतूदी लागु होणार नाहीत.

**२.** कोणत्याही दिवशी १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार कामावर ठेवले अशा सर्व आस्थापनाना हा कायदा लागु होतो. ‘‘आस्थापना’’ म्हणजे कलम २ (जे) कोणतीही आस्थापना जी शासनाच्या नियंत्रणात आहे. कोणत्याही निगमच्या नियंत्रणाखाली आहे किंवा व्यवसाय संस्थेच्या नियत्रणाखाली आहे आणि वैयक्तीक किंवा असोसीएशन किंवा इतर वैयक्तीक संस्थांच्या अंतर्गत जे बांधकाम कामगार नियुक्त करतात आणि ज्यात कंत्राटदारांचा समावेश होतो परंतू व्यक्तीगतरित्या जे असे कामगार त्यांचे स्वत:चे घर बांधण्याकरीता रुपये १० लाख पर्यत पेक्षा जास्त
नसेल ते त्यांना आस्थापनेची व्याख्या लागु होणार नाही.

**३.** ‘‘ **मालक** ’’ ची व्याख्या कलम २ (i) मध्ये इस्टाब्लीशमेंट संबंधात नमुद केलेली आहे. त्यात खालील प्रमाणे अंतर्भाव होतो :-

**i)** इमारत व इतर बांधकाम काम स्थानिक संस्थांतर्फे किंवा इतर आस्थापनेमार्फत करण्यात येत असल्यास व ज्यात प्राधिकारी नेमुन दिलेला नसल्यास अशा बाबतीत विभागाचा प्रमुख.

**ii)** जेथे इमारत व इतर बांधकामाचे काम स्थानिक प्राधिकरणामार्फत किंवा इतर आस्थापनामार्फत, थेट कंत्राटदारा शिवाय करण्यात येते अशा बाबतीत त्या प्राधिकारणाचा किंवा आस्थापनेचा मुख्य कार्यकारी अधिकारी,

**iii)** इमारत व इतर बांधकाम कामगार कंत्राटदारामार्फत किंवा मालकामार्फत करण्यात येते अशा बाबतीत कंत्राटदार

**४.** उपकर अधिनियमाच्या कलम ३ व नियम ४ (३) नुसार केंद्र शासनाने एसओ नं.२८९९, दिनांक २६.३.१९९६ अन्वये बिलातून १ % उपकर कपात करण्याबाबत निर्गमित केलेल्या अधिसुचनेच्या अनुषंगाने कपात केलेल्या उपकराची रक्कमेचा धनाकर्ष महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचा खाते क्रमांक ००४२२०११००००१५३ बँक ऑफ इंडिया मुंबई या बँकेच्या महाराष्ट्रातील कोणत्याही शाखेत सोबत जोडण्यात आलेल्या विहित चलनाद्वारे जमा करावयाचा आहे.

**५.** उपकर नियमाच्या नियम, ४ (४) अनुसार जेथे बांधकामाकरीता स्थानिक संस्थेची मंजूरी आवश्यक आहे. तेथे अशा मंजूरीकरीता प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जा सोबत मंडळाच्या नांवे उपकरासंबंधीचा रेखांकित धनाकर्ष (एका वर्षाच्या बांधकामाच्या अंदाजीत खर्चाच्या १ % रक्कमे एवढा)सदर स्थानिक संस्थेस सादर करणे आवश्यक आहे.

**६.** पुढे नियम ५ नुसार शासकिय कार्यालय/सार्वजनिक उपक्रम/स्थानिक संस्थाच्या बाबतीत वसूली अधिका-यांने नियम ४ अंतर्गत जमा केलेला उपकराची रक्कम चलनाद्वारे प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम जी १ % पेक्षा जास्त नसणार तेवढी कमी करुन उर्वरीत उपकराची रक्कम जमा करेल.

**७.** नियम ५ (३) नुसार जमा केलेली रक्कम मंडळाकडे ३० दिवसांत जमा करणे आवश्यक आहे.

**८.** कोणत्याही बांधकाम आस्थापनेने किंवा बांधकाम मालकाने किंवा उपकर वसुली अधिका-याने किंवा स्थानिक संस्थेने किंवा शासकीय कार्यालयाने किंवा सार्वजनिक उपक्रमाने किंवा लाभार्थी कामगाराने म्हणजेच जे कोणी कल्याण मंडळ निधीमध्ये उपकर अथवा लाभार्थी नोंदणी शुल्क याचा भरणा करणार असतील ते बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या बँक ऑफ इंडिया मधील महाराष्ट्रातील कोणत्याही शाखेत करण्याकरिता सोबत जोडण्यात आलेल्या विहित चलनाद्वारे सदर भरणा करतील. या चलनाची ४ प्रतीत विभागणी असून २ प्रती बँक स्वतःकडे ठेवून उर्वरित २ प्रती भरणा करणा-या व्यक्तीस (रेमिटरकडे) देण्यात येईल. सदर भरणा करणा-याने १ प्रत सचिव इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ यांना पाठवावयाची आहे. दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी उपकरापोटी जमा करण्यात आलेल्या रकमेचा तपशिल दर्शविलेल्या मासिक तक्त्यात जोडपत्र-३ मध्ये उपकर भरणा करणा-याने

कल्याण मंडळाकडे माहिती सादर करावयाची आहे. तसेच जोडपत्र-४ मध्ये नमूद केलेल्या तक्त्यात शासकीय विभाग, स्थानिक संस्था व सार्वजनिक उपक्रम यांनी वार्षिक विवरणपत्र कल्याण मंडळाकडे सादर करावयाचे आहे. आराखडा मंजूर करणा-या प्राधिका-याने देखील उपरोक्त प्रमाणे उपकराची रक्कम प्राप्त झाल्यानंतर कल्याण मंडळाकडे चलनाद्वारे भरणा करावयाचा आहे. तसेच त्याबाबतचा मासिक अहवाल जोडपत्र-३ मध्ये व वार्षिक विवरणापोटी जोडपत्र-५ मध्ये कल्याण मंडळास सादर करावयाचा आहे. चलनाची उर्वरित प्रत भरणा करणा-याने स्वत:कडे ठेवून रकमेच्या इतर तपशिलासह मंडळाने तपासणीकरिता मागितल्यास सादर करणे आवश्यक असेल.

९. उपकर तसेच लाभार्थी नोदंणी शुल्क बँकेच्या ज्या शाखेमध्ये जमा होत असेल ती शाखा दरमहा बँक ऑफ इंडिया यांच्या मुंबई येथील ताडदेव शाखेत चलनाच्या उर्वरीत प्रती एकत्रितपणे सादर करेल. जेणेकरुन बँक ऑफ इंडिया, कल्याण मंडळ यांना आपापसात जमा उपकर व लाभार्थी नोंदणी शुल्काचा ताळमेळ घालणे शक्य होईल.

१०.उपकर अधिनियमाच्या कलम ६ (१) नुसार प्रत्येक मालक बांधकामाचे काम सुरु झाल्यापासून ३० दिवसात किंवा उपकराची रक्कम भरल्या नंतर निर्धारण अधिका-यास प्रपत्र १ मध्ये माहिती सादर करेल (प्रत जोडली आहे.)

११.नियम ७ नुसार निर्धारण अधिकारी त्यांना फॉर्म १ प्राप्त झाल्यानंतर ६ महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीत उपकर निर्धारणाबाबतचे आदेश पारीत करेल.जर तो उपकर निर्धारणाच्या बाबतीत समाधानी असेल तर

१२. युनिक कोड नं. :- i) सर्व संबंधित विभाग शासकीय/निम शासकीय उपक्रम यांनी बांधकामास परवानगी देण्याच्या प्रत्येक प्रकरणास हा युनिक क्रमांक द्यावा. आणि हा क्रमांक बांधकाम सुरु करण्याच्या प्रमाणपत्रामध्ये नमूद करावा. महाराष्ट्र व इतर बांधकाम उपकरा संबंधीचा हा युनिक कोड नसेल तर बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणपत्र अपूर्ण असल्याचे मानण्यात यावे. हा युनिक कोड क्रमांक निर्धारण अधिका-याने द्यावयाच्या युनिक कोडच्या धर्तीवर असेल.

उपकर निर्धारण अधिका-याने द्यावयाचा युनिक कोड नं. हा शासन परिपत्रक दि.२६.१०.२००९ अन्वये निर्धारित केल्यानुसार असेल.

१३. उपकर अधिनियम, व त्या अंतर्गत नियमाच्या तरतूदीनुसार जर पुर्तता केली नाही तर खालील प्रमाणे कारवाईची तरतूद करण्यात आलेली आहे :-

<u>उपकर उशिरा भरल्यास कलम ८ नुसार व्याज</u>

कोणताही मालक कलम ३ नुसार विहीत केलेल्या वेळेत उपकर निर्धारणाच्या आदेशानुसार उपकराची रक्कम न भरल्यास असे मालक उपकराच्या रक्कमेवर प्रतिमहा किंवा ज्या तारखेपासून उपकर भरण्यास पात्र आहेत अशा तारखेपासून २ % व्याज भरावे लागेल.

विहीत वेळेत उपकराची रक्कम न भरल्यास कलम ९ प्रमाणे दंड :- कलम ३ नुसार विहीत वेळेत उपकराची रक्कम कलम ५ नुसार निर्धारण केल्याप्रमाणे न भरल्यास संबंधित अधिकारी योग्य ती चौकशी करुन मालकाविरुध्द् दंडाची रक्कम जी उपकराच्या रक्कमेपेक्षा जास्त रहाणार नाही एवढी भरण्याची शिक्षा मालकास देता येईल.

तथापि, अशी शिक्षा देण्यापुर्वी अशा मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्याची योग्य ती संधी देणे आवश्यक आहे. जर मालकाने योग्य व पुरेशा कारणामुळे दंडाची रक्कम भरली नाही. असे संबंधित प्राधिका-यांचे मत झाल्यास मालका विरुध्द् दंड आकारला जाणार नाही.

अधिनियमाच्या कलम १० नुसार रक्कमेची वसूली करण्याबाबत:- हया कायद्या अंतर्गत व्याज किंवा दंडाची कोणतीही रक्कम वसूल करण्याबाबत थकबाकीची रक्कम लॅण्ड रेव्हीन्युच्या पध्द्तीनुसार वसूल करता येईल.

दंड:- १) कलम १२ नुसार जो कोणी कायद्याच्या तरतूदीनुसार जाणुनबुजून विवरणपत्र सादर करणार नाही किंवा खोटे विवरणपत्र सादर केल्यास अशांना ६ महिन्यापर्यतची शिक्षा किंवा दंड जो १००० रुपयापर्यत असेल किंवा दोन्हीची तरतूद करण्यात आलेली आहे.

१) जो कोणी हेतुपुरस्पर उपकराची रक्कम भरण्यास टाळाटाळ करतो अशांना ६ महिन्यापर्यतची कैद अथवा दंड अथवा दोन्ही होऊ शकते.
२) कोणतेही न्यायालय अशा गुन्हयांचे दखल घेणार नाही जो पर्यत केद्र शासनाच्या प्राधिका-यांने तक्रार केलेली नसेल.

रक्कम न भरल्यास उपकर नियम १२ नुसार दंड :- (१) निर्धारण अधिका-यांस असे जर असे आढळून आले की, मालकाने उपकराची रक्कम निर्धारण आदेशात नमुद केल्यानुसार भरली नसेल किंवा कमी भरली असेल किंवा उपकराची रक्कम एकुण रक्कमेवर कमी कापली असेल तर मालकास निर्धारण अधिकारी नोटीस थकबाकी असल्याचे कळविल आणि योग्य ती चौकशी करुन उपकर निर्धारण अधिकारी मालका विरुध्द् दंड लावेल.जो उपकराच्या रक्कमेपेक्षा जास्त नसेल.

परंतू असा दंड लावण्यापुर्वी मालकास त्यांचे म्हणणे ऐकुन घेण्याकरीता संधी देण्यात येईल व मालकाने उपकराची रक्कम न भरण्या मागणी कारणे योग्य व पुरेशी आहेत असे निर्धारण अधिका-यांचे मत झाल्यास त्यांच्या विरुध्द् दंड लावला जाणार नाही.

३) जो कोणी हेतुपुरस्पर उपकराची रक्कम भरण्यास टाळाटाळ करतो अशांना ६ महिन्यापर्यतची कैद अथवा दंड अथवा दोन्ही होऊ शकते.

४) कोणतेही न्यायालय अशा गुन्हयांचे दखल घेणार नाही जो पर्यत केद्र शासनाच्या प्राधिका-यांने तक्रार केलेली नसेल.

रक्कम न भरल्यास उपकर नियम १२ नुसार दंड :- (१) निर्धारण अधिका-यांस असे जर असे आढळून आले की, मालकाने उपकराची रक्कम निर्धारण आदेशात नमुद केल्यानुसार भरली नसेल किंवा कमी भरली असेल किंवा उपकराची रक्कम एकुण रक्कमेवर कमी कापली असेल तर मालकास निर्धारण अधिकारी नोटीस थकबाकी असल्याचे कळविल आणि योग्य ती चौकशी करुन उपकर निर्धारण अधिकारी मालका विरुध्द् दंड लावेल.जो उपकराच्या रक्कमेपेक्षा जास्त नसेल.

परंतू असा दंड लावण्यापुर्वी मालकास त्यांचे म्हणणे ऐकुन घेण्याकरीता संधी देण्यात येईल व मालकाने उपकराची रक्कम न भरण्या मागणी कारणे योग्य व पुरेशी आहेत असे निर्धारण अधिका-यांचे मत झाल्यास त्यांच्या विरुध्द् दंड लावला जाणार नाही.

जोडपत्र - १ चे परिशिष्ट
प्रपत्र १ (नियम ७)
नोंदणी क्र.
इमारत व इतर बांधकाम कामगार
(रोजगार नियमन व सेवाशर्ती)
अधिनियम, १९९६ अंतर्गत
नोंदणी प्राधिकारी

१) आस्थापनेचे नांव :-
२) पत्ता
३) कामाचे नांव/स्वरुप
४) नियुक्त केलेले कामगार संख्या
५) काम सुरुवात झाल्याची तारीख/महिना/वर्ष — कामाचे अंदाजे कालावधी महिने / वर्ष

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६) | बांधकामाचे अंदाजीत मुल्य | | उपकर भरण्याबाबतचा तपशिल. | |
| | टप्पे | मुल्य | रक्कम, चलन क्र.व दिनांक | अग्रीम - ए<br>वजावट - अ<br>अंतीम - एफ |

पहीले वर्ष
दुसरे वर्ष
तिसरे वर्ष
चौथे वर्ष

एकुण

---

मालकाची स्वाक्षरी
मालकाचे नांव
दिनांक

**निर्धारण अधिका-यांने भरावयाचे**

७.पुर्णत्वाची तारीख — ८. अंतिम मुल्य
९) निर्धारणाची तारीख — १०) निर्धारीत रक्कम
११) अपिलाची तारीख असल्यास — १२) अपिलासंबंधीच्या आदेशाची तारीख
१३) अपिलाच्या आदेशानुसार रक्कम — १४) उपकराची रक्कम मंडळात जमा केल्याची तारीख
१५) हस्तांतरीत रक्कम - चलन क्र. व दिनांक
स्वाक्षरी
हूदद्दा

# परिशिष्ट- २

## उपकरापोटी जमा करण्यात आलेल्या रक्कमेचा तपशिल दर्शविणारा मासिक तक्ता

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव व पत्ता | सुपुर्द करण्यात आलेल्या कामाचा तपशिल | बिलापोटी देण्यात आलेली एकुण रक्कम | बिले देण्यात आलेल्या तारखा | कपात करण्यात आलेल्या उपकराची रक्कम | उपकराची रक्कम मंडळात जमा केल्याबाबतचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | तारीख | चलन क्रमांक | रक्कम |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |

परिशिष्ट- ३

शासकिय विभाग/स्थानिक संस्था/सार्वजनिक उपक्रमातर्फे सादर करावयाचे वार्षिक विवरण

सन २००       करीता

विभागाचे नांव :-

आहरण व संवितरण अधिका-यांचे नांव व हूद्दा :-

नोंदणी क्रमांक :-

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम अंतर्गत

आहरण व संवितरण अधिका-यांचा संदर्भ क्रमांक

| अ.क्र. | ज्यावर्षी काम सुरु करण्यात आले त्या वर्षात देण्यात आलेल्या कामाची संख्या | ज्या वर्षात कंत्राटदारांना कामाचे बिले अदा करण्यात आली त्याबाबत कामाच्या कामाची संख्या | दिलेल्या एकुण बिलाची रक्कम | कपात करण्यात आलेल्या उपकराची रक्कम | भरण करण्यात आलेल्या उपकराची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |

## परिशिष्ट- ४

## आराखडे मंजूर करणा-या प्राधिका-यांकडून सादर करावयाचे वार्षिक विवरण

## सन २०००-        करीता

कार्यालयाचे नांव व आराखडा मंजूर करणा-यां प्राधिका-यांचा हूदद्‌ :-

संदर्भ क्रमांक

| अ.क्र | आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या आराखडयाची संख्या | जमा केलेल्या उपकराची रक्कम रुपये | भरणा केलेल्या उपकराची रक्कम रुपये | सर्व १२ महिन्याचे मासिक विवरणपत्र सादर केले आहेत काय आणि भरणा केलेल्या उपकराची रक्कमेचा मेळ बसला काय | जमा करण्यात आलेल्या उपकरासंबंधी झालेला प्रत्यक्ष खर्च (१ % पेक्ष जास्त नसलेला) | मंडळातर्फे आराखडे मंजूर करण्यात आलेल्या अधिका-यांना उपकर गोळा करण्यासाठी खर्च करण्यात आलेल्या रक्कमेची करण्यात आलेल्या परीपुर्ती बाबतचा तपशिल (मंडळाकरीता |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |

| | | | |
|---|---|---|---|
| **BANK COPY**<br>(To be sent to BANK OF INDIA, Tardeo Branch, Mumbai-34)<br><br>**MAHARASHTRA STATE**<br>Building & Other Construction Workers Welfare Fund Account. | **BANK COPY**<br>(To be sent to BANK OF INDIA, Tardeo Branch, Mumbai-34)<br><br>**MAHARASHTRA STATE**<br>Building & Other Construction Workers Welfare Fund Account. | **REMITTER'S COPY**<br>(To be sent to Secretary, Maharashtra Building & Other Construction Workers Welfare Board, Commerce Centre, Tardeo, Mumbai-34).<br>Along with Form-I or List of Beneficiary.<br><br>**MAHARASHTRA STATE**<br>Building & Other Construction Workers Welfare Fund Account. | **REMITTER'S COPY**<br>(To be sent to Secretary. Maharashtra Building & Other Construction Workers Welfare Board, Commerce Centre, Tardeo, Mumbai-34).<br>Along with Form-I or List of Beneficiary.<br><br>**MAHARASHTRA STATE**<br>Building & Other Construction Workers Welfare Fund Account. |
| **BANK OF INDIA**<br><br>Branch :-<br>Code No. :- Date :- | **BANK OF INDIA**<br><br>Branch :-<br>Code No. :- Date :- | **BANK OF INDIA**<br><br>Branch :-<br>Code No. :- Date :- | **BANK OF INDIA**<br><br>Branch :-<br>Code No. :- Date :- |
| Paid into the credit of Maharashtra State Welfare Board for Building & Other Construction Workers Account No. 004220110000153<br>Bank of India, Tardeo, Mumbai-400 034.<br><br>Rs..............(Rupees..............<br>.......................................only)<br>Denomination / Details of DDs Overleaf.<br><br>Towards contribution of Beneficiary/Cess as per details overleaf.<br><br>Signature of the Employer/Remitter alongwith address stamp/seal.<br><br>1. Outstation cheques will not be accepted<br>2. Fraction amount shall be rounded to Rupee only.<br><br>FOR BANK USE ONLY.<br><br>Received Rs............................<br>(Rupees.......................................<br>.....................only)<br><br>Cash/Cheque/D.D.<br><br>Date.............. Cashier / Officer | Paid into the credit of Maharashtra State Welfare Board for Building & Other Construction Workers Account No. 004220110000153<br>Bank of India, Tardeo, Mumbai-400 034.<br><br>Rs..............(Rupees..............<br>.......................................only)<br>Denomination / Details of DDs Overleaf.<br><br>Towards contribution of Beneficiary/Cess as per details overleaf.<br><br>Signature of the Employer/Remitter alongwith address stamp/seal.<br><br>1. Outstation cheques will not be accepted<br>2. Fraction amount shall be rounded to Rupee only.<br><br>FOR BANK USE ONLY.<br><br>Received Rs............................<br>(Rupees.......................................<br>.....................only)<br><br>Cash/Cheque/D.D.<br><br>Date.............. Cashier / Officer | Paid into the credit of Maharashtra State Welfare Board for Building & Other Construction Workers Account No. 004220110000153<br>Bank of India, Tardeo, Mumbai-400 034.<br><br>Rs..............(Rupees..............<br>.......................................only)<br>Denomination / Details of DDs Overleaf.<br><br>Towards contribution of Beneficiary/Cess as per details overleaf.<br><br>Signature of the Employer/Remitter alongwith address stamp/seal.<br><br>1. Outstation cheques will not be accepted<br>2. Fraction amount shall be rounded to Rupee only.<br><br>FOR BANK USE ONLY.<br><br>Received Rs............................<br>(Rupees.......................................<br>.....................only)<br><br>Cash/Cheque/D.D.<br><br>Date.............. Cashier / Officer | Paid into the credit of Maharashtra State Welfare Board for Building & Other Construction Workers Account No. 004220110000153<br>Bank of India, Tardeo, Mumbai-400 034.<br><br>Rs..............(Rupees..............<br>.......................................only)<br>Denomination / Details of DDs Overleaf.<br><br>Towards contribution of Beneficiary/Cess as per details overleaf.<br><br>Signature of the Employer/Remitter alongwith address stamp/seal.<br><br>1. Outstation cheques will not be accepted<br>2. Fraction amount shall be rounded to Rupee only.<br><br>FOR BANK USE ONLY.<br><br>Received Rs............................<br>(Rupees.......................................<br>.....................only)<br><br>Cash/Cheque/D.D.<br><br>Date.............. Cashier / Officer |

OVERLEAF

Name & Address of the establishment :-

Unit Code No. given by ______ Officer :-

Name the person responsible :-

Phone No:-

**CONTRIBUTIONS OF BENEFICIARIES**

No. of workers :-

Period of Contribution:-

Total Amount of Contribution:-

List of Workers along with Registration Number allotted by the Board enclosed to the Remitter's Copy sent to the Secretary of the Building & Other Construction Workers' Welfare Board, Mumbai

**CESS**

Plan Approval Authorities:-

Unit Code No. :-

Details :-

(Govt. Departments/Organisation) Engineer/Contractor:-

Estimated cost of construction:-

For the year....................................
(From .................................. to ........................)
(Form-I, enclosed to the Remitter's copy sent to the Secretary of the Board)

---

Name & Address of the establishment :-

Unit Code No. given by Assesment Officer:-

Name the person responsible :-

Phone No:-

**CONTRIBUTIONS OF BENEFICIARIES**

No. of workers :-

Period of Contribution:-

Total Amount of Contribution:-

List of Workers along with Registration Number allotted by the Board enclosed to the Remitter's Copy sent to the Secretary of the Building & Other Construction Workers'

**CESS**

Plan Approval Authorities:-

Unit Code No. :-

Details :-

(Govt. Departments/Organisation) Engineer/Contractor:-

Estimated cost of construction:-

For the year....................................
(From .................................. to ........................)
(Form-I, enclosed to the Remitter's copy sent to the Secretary of the Board)

---

OVERLEAF

Name & Address of the establishment :-

Unit Code No. given by ______ Officer :-

Name the person responsible :-

Phone No:-

**CONTRIBUTIONS OF BENEFICIARIES**

No. of workers :-

Period of Contribution:-

Total Amount of Contribution:-

List of Workers along with Registration Number allotted by the Board enclosed to the Remitter's Copy sent to the Secretary of the Building & Other Construction Workers' Welfare Board, Mumbai

**CESS**

Plan Approval Authorities:-

Unit Code No. :-

Details :-

(Govt. Departments/Organisation) Engineer/Contractor:-

Estimated cost of construction:-

For the year....................................
(From .................................. to ........................)
(Form-I, enclosed to the Remitter's copy sent to the Secretary of the Board)

---

Name & Address of the establishment :-

Unit Code No. given by ______ Officer :-

Name the person responsible :-

Phone No:-

**CONTRIBUTIONS OF BENEFICIARIES**

No. of workers :-

Period of Contribution:-

Total Amount of Contribution:-

List of Workers along with Registration Number allotted by the Board enclosed to the Remitter's Copy sent to the Secretary of the Building & Other Construction Workers' Welfare Board, Mumbai

**CESS**

Plan Approval Authorities:-

Unit Code No. :-

Details :-

(Govt. Departments/Organisation) Engineer/Contractor:-

Estimated cost of construction:-

For the year....................................
(From .................................. to ........................)
(Form-I, enclosed to the Remitter's copy sent to the Secretary of the Board)

**शासन निर्णय:-**

१. पूर्ण झालेल्या लघु पाटबंधारे तलाव, साठवण तलाव, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे इ.लघु पाटबंधारे योजनांच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांनी एकत्र येवून योजनेच्या सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी लाभधारकाच्या सहकारी पाणी वापर संस्थेची स्थापन करावी. संस्थेचे अध्यक्ष आणि किमान ५ सदस्यांची कार्यकारी समितीची लोकशाही पध्दतीने निवड करावी. या कार्यकारी समितीत शासनाचे वतीने संबंधित कनिष्ठ अभियंता पदसिध्द सचिव राहतील मात्र त्यांना कोणत्याही मतदानात भाग घेता येणार नाही.

२. कार्यकारी समिती स्थापन होताच दैनंदिन कामकाजासाठी नियमावली तयार केली जाईल.

३. या पाणी वापर संस्थेची त्या क्षेत्राच्या सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी करावी. संस्थेस नोंदणी क्रमांक मिळाल्यावर शासनाच्या वतीने संबंधीत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) व संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष स्टँपपेपर करारनाम्यावर स्वाक्षऱ्या करतील. करारात खालील कलमे असतील.

३.१ लघु पाटबंधारे योजनांची जमिनीसहीत संपूर्ण मालकी महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण खाते यांची राहील. सिंचन व्यवस्थापन, पाणीपट्टी वसुली, व या वसुलीतून योजनेतील धरण व शीर्षकामे, कालवे,विमोचक, विलरिका व वितरण व्यवस्था यांची देखभाल व दुरुस्ती संस्थेस करावी लागेल. शासनाची ही मालमत्ता सांभाळण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

३.२ धरण व शीर्षकामांचे बांधकामात यदाकदाचित काही दोष असल्यास त्याची दुरुस्ती, मोठया दुरुस्त्या, अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची दुरुस्ती, तसेच काही कामे अपूर्ण असल्यास ती पूर्ण करणे ही कामे शासनामार्फत केली जातील.

३.३ शीर्षनियंत्रकाची दरवर्षीची देखभाल व आवश्यक ती किरकोळ दुरुस्ती ही कामे संस्थेस करावी लागतील.

३.४ लघु पाटबंधारे तलाव, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आदि योजनांचे स्वामित्व शुल्क म्हणून रु.१०००/- प्रति योजना/ प्रती वर्ष संस्थेने शासनाकडे भरावेत. साठवण तलावाकरीता ही रक्कम रु.१०,०००/- प्रती योजना /प्रति वर्ष राहील. तसेच अगोदरच्या वर्षी जमा झालेल्या पाणीपट्टीपैकी २० टक्के रक्कम स्थानिक शुल्क म्हणून संस्थेने दरवर्षी शासनाकडे भरावेत.

३.५ लघु पाटबंधारे योजनेत कार्यकारी अभियंता यांच्या लेखी परवानगी शिवाय बांधकामातील बदल किंवा अतिरिक्त कामे संस्थेस करता येणार नाहीत.

३.६ पावसाळयात योजना धोक्यात येण्याची शक्यता असल्यास या धोक्याची सूचना संस्थेने कार्यकारी अभियंता व त्यांचे प्रतिनिधी यांना द्यावी लागेल आणि कार्यकारी अभियंता यांच्या सल्ल्याने योजनेस प्रतिबंधात्मक उपाय योजना करावी लागेल.

GR-2004|008||3|22001-1201

२५० हे.पर्यन्तच्या सिंचन क्षमतेच्या को.प.बंधारे व लघु पाटबंधारे योजनांचे सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी लाभधारकांच्या सहकारी पाणी वापर संस्थांना हस्तांतर करणे.

(परिशिष्ट ७.२)

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र.लपायो १०९९/प्र.क्र.३४७/जल १,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३१ जुलै, २०००.

**प्रस्तावना** :-

१. जल व भूमी ही शेतक-यांच्या जीवनातील प्रमुख अंगे आहेत.

शासनाने अनेक लहान, मध्यम व मोठी धरणे बांधून शेतक-यांना खात्रीशीर पाण्याची हमी निर्माण केली आहे. तथापि शेतक-यांना शेतीसाठी पाणी पुरविण्यासाठी सिंचन व्यवस्थापन हे शासकीय यंत्रणेकडेच आहे. त्यामुळे शेतक-यांना सुलभतेने व आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे न्याय पाण्याचे वाटप मिळण्यासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. या अडचणींवर मात करण्यासाठी व लाभार्थींना आवश्यकतेनुसार सुलभतेने पाणी उपलब्ध व्हावे या दृष्टीकोनातून सिंचन व्यवस्थापनेत लाभधारकांचा सक्रीय सहभाग असणे गरजेचे आहे. त्यासाठी लाभधारकांनाच सहभागी करुन त्यांची सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्याची संकल्पना शासनाच्या विचाराधीन होती.

२. पाटबंधारे विभागाच्या मोठया, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात लाभधारकांची पाणी वापर संस्था निर्माण करुन त्यांना घनमापन पध्दतीने पाणी देऊन त्यांचे मार्फत सिंचन व्यवस्थापन करण्यात येते. पाणीपट्टी शासन वसूल करते व या रकमेच्या २० टक्के रक्कम शासनाकडून संस्थेस व्यवस्थापकीय अनुदान म्हणून अदा होते. शासनाने असे धोरण स्विकारले असून पाटबंधारे विभागाने त्यानुसार परिपत्रक निर्गमित केले आहे.

पाणीपट्टी वसुली व योजनेची देखभाल दुरुस्ती शासनामार्फत केली जात असल्याने सिंचन व्यवस्थापनात आपला सहभाग आहे असे लाभधारकांना वाटत नाही. लाभधारकांचा सहभाग अधिक प्रभावी होण्याकरीता पाटबंधारे विभागाकडून अवलंबविण्यात येणा-या पध्दतीत थोडीफार सुधारणा करुन ग्राम विकास व जलसंधारण विभागांतर्गत २५० हे. पर्यन्तच्या सिंचन क्षमतेच्या योजनांसाठी लाभधारकांची सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करुन त्यांना सिंचनक्षेत्र हस्तांतरित करण्याचे धोरण महाराष्ट्र शासन स्विकारत असून पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

३.७ पाणी वाटप, पाणीपट्टी वसुली, देखभाल दुरुस्तीचा खर्च, सिंचन व्यवस्थापनेचा खर्च इ. चा हिशोब कार्यकारी अभियंता यांनी निर्देशित केलेल्या पत्रकात ठेवून या सर्व हिशोबाचा त्रैमासिक अहवाल कार्यकारी अभियंता यांना सादर करावा लागेल. तसेच सहकारी संस्थांच्या निबंधकाकडून संस्थेचा अहवाल दरवर्षी तपासून घ्यावा लागेल.

३.८ संस्थेच्या ताब्यात देण्यात आलेली लघु पाटबंधारे योजना (धरण व शीर्षकामे, कालवे, वितरण व्यवस्था) संस्थेचे सर्व हिशोब व कामकाज पाहण्याचे/तपासण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता अथवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांना राहतील.

३.९ संबंधित कार्यकारी अभियंता किंवा त्यांचे प्रतिनिधी शीर्षकामे, धरण, कालवे, कालव्यावरील पुल, मोठी बांधकामे यांचे निरीक्षण दरवर्षी पावसाळयापूर्वी व पावसाळ्यानंतर नेहमीप्रमाणे करतील. या कामास आवश्यक असणाऱ्या दुरुस्तीची लेखी आदेश संबंधित कार्यकारी अभियंता देतील. या आदेशावरहुकूम या कामाची दुरुस्ती संस्थेस त्वरित करावी लागेल. न केल्यास कार्यकारी अभियंता त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करतील.

३.१० संस्थेच्या कामकाजाबाबतचा अहवाल कार्यकारी अभियंता, दरवर्षी अधिक्षक अभियंता यांना सादर करतील. संस्था व्यवस्थित काम करीत नसेल तर संस्थेबरोबर केलेला करारनामा रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांना राहील.

३.११ जलाशयातील मत्स्यव्यवसायाचे अधिकार संस्थेचे राहतील.

## ४. संस्थेच्या कामाची व्याप्ती पुढीलप्रमाणे राहील.

४.१ दरवर्षी होणारी भाववाढ तसेच योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च विचारात घेवून पाणीपट्टी वसूलीचा दर ठरविण्याचे स्वातंत्र्य संस्थेस राहील. आर्थिकदृष्टया संस्था स्वयंपूर्ण होईल हा मुद्दा दर ठरवितांना विचारात घेण्याचा अधिकार संस्थेचा राहील.

४.२ लाभक्षेत्रात कोणत्या पीक पध्दतीचा अवलंब करावयाचा हे ठरविण्याचे स्वातंत्र्य संस्थेस राहील परंतु अवलंबण्यात येणा-या पीक पध्दतीस पाणी पुरेल किंवा नाही याबाबत कार्यकारी अभियंता यांचा सल्ला घेणे संस्थेस आवश्यक राहील.

४.३ अवलंबण्यात येणा-या पीक पध्दतीमुळे व जास्त पाणी दिल्यामुळे जमिनी खराब होणार नाहीत याची प्रत्येक लाभधारकाने व संस्थेने खबरदारी घ्यावी. याकरीता लाभक्षेत्रातील त्या त्या पिकांचे क्षेत्र दरवर्षी बदलण्यात यावे.

४.४ लाभक्षेत्रातील सर्व लाभधारकांना सिंचन वेळापत्रकानुसार पाण्याचे वाटप करणे तसेच सर्व लाभधारकांना पाणी पुरवठा करणे ही संस्थेची जबाबदारी राहील.

४.५ लाभधारकांनी पाणी घेतल्यावर भिजलेल्या क्षेत्राची मोजणी करुन त्यावर ठरलेल्या दराने पाणीपट्टी वसुली करुन त्यांना पावत्या द्याव्या लागतील.

४.६ जमा झालेल्या वसुलीतून योजनेची देखभाल दुरुस्ती करावी लागेल. या कामाकरीता सद्य:परिस्थितीत शासनाकडून कोणतेही अनुदान मिळणार नाही.

४.७ कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याच्या फळया/दरवाजे संस्थेस स्वत:च्या खर्चाने बदलावे किंवा दुरुस्त करावे लागतील. याकरीता आवश्यक ती आर्थिक तरतूद संस्थेस दरवर्षी स्वत:चे उत्पन्नातून करावी लागेल. कार्यकारी अभियंता यांच्या सूचनेप्रमाणे फळया/दरवाजे काढणे व घालणे ही कामे संस्थेस करावी लागतील.

४.८ पाण्याची हानी व गैरवापर टाळण्याकरीता प्रभावीपणे परिणामकारक उपाय योजना करावी लागेल.

४.९ सामाजिकदृष्टया कमकुवत वर्गास समान पाणी वाटपाचे तत्वानुसार न्याय देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४.१० पावसाच्या कमतरतेमुळे योजनेत पुरेसा पाणीसाठा उपलब्ध नसल्यास सर्वमान्य तोडगा काढून त्याप्रमाणे पाण्याचा वापर कसा करावयाचा हा संस्थेचा अधिकार राहील.

४.११ सर्व लाभधारकांना पाणी दिल्यावर अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध असल्यास कालव्याच्या वरील बाजूस व जलाशयात पूर्ण जलाशय पातळीचे वरील जमिनीस मागणीप्रमाणे पाणी उपसा सिंचनाची मंजूरी देता येईल. हे क्षेत्र एकूण लाभक्षेत्राचे १६ टक्केपेक्षा जास्त असू नये. यापासून मिळणारे उत्पन्न संस्थेने स्वत:कडे जमा करावे.

४.१२ उपलब्ध पाणी साठयामधून अतिरिक्त सिंचनक्षमता निर्माण करण्यासाठी संस्थेने ठिबक सिंचन व इतर कमी पाणी लागणा-या पध्दतीने पाणी वापरास प्राधान्य द्यावे.

५. एखादया प्रकल्पावर अशा त-हेने सिंचन व्यवस्थापन संस्था निर्माण होऊ शकली नाही तर त्या गावातील विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटींना हे काम सुपूर्द करावे. या विकास सेवा सोसायटीचे समितीत लाभक्षेत्रातील काही लाभधारक निवडणुकीने समाविष्ट करुन घ्यावेत.

५.१ अशा विकास सेवा सोसायटीने काम करण्यास नकार दिल्यास त्या भागातील एखादया अशासकीय संस्थेस हे काम सुपूर्द करावे. अशा त-हेने काम विकास सेवा सोसायटी अथवा अशासकीय संस्थेस देण्याचे अधिकार अधिक्षक अभियंता यांचे राहतील.

५.२ जर अशी अशासकीय संस्थाही नसेल तर संबंधित कार्यकारी अभियंता शेवटचा व तात्पुरता उपाय म्हणून पाणीपट्टी वसुली करुन त्या वसूलीतून सिंचन व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती खर्च भागवितील. वसूल झालेल्या निधीतील अतिरिक्त निधी महसूल जमा शिर्षाखाली जमा करतील.

५.३ नवीन प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजनांसाठी जोपर्यन्त लाभधारक पाणी वापर संस्था स्थापन करणार नाहीत तोपर्यन्त या योजनेस वित्तीय तरतूद करण्यांत येणार नाही. योजनेसाठी पाणीवापर संस्था स्थापन करणे अनिवार्य राहील याचा उल्लेख शासन निर्णयात करण्यांत येईल.

५.४ जिल्हा परिषदेअंतर्गत ०-१०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन योजनेसाठी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे बांधकाम सुरु करण्यासाठी कार्यारंभ आदेश देऊ नयेत असे निर्देश/सूचना जिल्हा परिषदेस देण्यात येतील.

५.५ ज्या योजना पूर्वी पूर्ण झाल्या असून सिंचन सुविधा पुरविण्यात येत आहेत व ज्या बांधकामाधीन अंतिम टप्प्यात आहेत अशाही योजनांसाठी लाभधारकांची पाणी वापर संस्था स्थापन होणे आवश्यक असून त्यासाठी लोकप्रतिनिधी व अशासकीय संस्थांनी पुढाकार घेवून शेतक-यांना उदयुक्त करावे.

५.६ पूर्ण झालेल्या व दुरुस्ती आवश्यक असलेल्या को.प.बंधा-यांची विशेष दुरुस्ती शासन एकदाच करुन देईल. असे करतांना लाभधारकांनी पाणी वापर संस्था स्थापन करण्याची लेखी हमी देण्यांत यावी. सदर लाभधारकांना पाणी वापर संस्था स्थापन करण्यास सर्वतोपरी सहाय्य करण्यांत येईल. विशेष दुरुस्तीनंतर सदर को.प.बंधारा पाणी वापर संस्थेस हस्तांतर करण्यांत येईल व त्यानंतर त्याची दुरुस्ती व देखभाल करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या व सहकार व वस्त्रोद्योग विभागाच्या अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्र. प्रसवि ११६८/व्यय-१५ दि.२५.२.२००० व सचिव (सहकार) क्र.निरंक/स.व.व.वि.-७ सी दि. २९.४.२००० अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

मं.सु.यादव.

( मंगला यादव )
शासनाच्या उप सचिव.

प्रतिलिपी :-

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
मा.मंत्री (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक.
मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे स्वीय सहाय्यक.
मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक.
मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे स्वीय सहाय्यक.
मा.अध्यक्ष, जलसंधारण सल्लागार परिषद यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य (७५ प्रती)
प्रधान सचिव, वित्त विभाग
प्रधान सचिव, नियोजन विभाग.
सचिव, पाटबंधारे विभाग.

सचिव, वित्त विभाग.
सचिव, नियोजन विभाग.
सचिव, कृषी विभाग.
सचिव, सहकार विभाग.
सचिव, ग्राम विकास विभाग.
सचिव, जलसंधारण विभाग.
सह सचिव, जलसंधारण विभाग.
उप सचिव, जलसंधारण विभाग.
उप सचिव (लपा) पाटबंधारे विभाग.
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) पुणे.
मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, सर्व.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, सर्व.
सहाय्यक अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग,सर्व.
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर)विभाग, जर्मन अर्थसहाय्य कक्ष पुणे.
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, सर्व.
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, सर्व.
अवर सचिव, जल १ कार्यासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
विभागीय जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
जलसंधारण विभागातील सर्व कार्यासने.
जल १ संग्रहार्थ.

**लघु पाटबंधारे तलाव , कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यातील आणि वळवणीच्या बंधा-यातील पाणी वापराबाबत पाणी वापर संस्थेने शासनाबरोबर करावयाचा करारनामा.**

---

...................................................................................सहकारी संस्था ....................... ता.............................. जि........................... व महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग यामध्ये लघु पाटबंधारे तलाव / कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा / वळवणीचा बंधारा बांधकाम किंमत रुपये.......................................लाभक्षेत्र................ हेक्टर (...............................ही गावे ) सिंचन व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणा-या पाण्याबद्दल करावयाचा करारनामा.

मानिनय राज्यपाल , महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे वतीने कार्यकारी अभियंता , लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर ) / जिल्हा परिषद ) विभाग .................................................................................. व अध्यक्ष ...................................सहकारी संस्था मर्यादित.......................... ता........................ जि........................... नोंदणी क्रमांक ...................................................) यांच्यामध्ये खालील प्रमाणे करारनामा ............................................................मुक्कामी दिनांक ...................................रोजी करण्यात येत आहे.

या करारानाम्यानुसार जलसंधारण विभागाच्या / जिल्हा परिषदेच्या वरील लघु पाटबंधारे तलावाचे / कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याचे / वळवणीच्या बंधा-याचे लाभक्षेत्र सिंचन व्यवस्थापनेसाठी करारनाम्याच्या कालावधी पुरते वरील संस्थेस हस्तांतरीत करण्यात येत आहे. ( सोबत लाभक्षेत्राचा नकाशा जोडण्यात येत आहे. ) तथापि संस्थेच्या व्यवस्थापनेसाठी दिलेली बांधकामे व त्यासाठी संपादित केलेली जमिन तसेच शासकीय खर्चाने केलेल्या वरील क्षेत्रातील सर्व कामाचे मालकी हक्क शासनाकडे राहील. वरील उद्दिष्टांसाठी या करारनाम्याच्या दोन्ही पक्षांना खालील अटी मान्य आहेत. दोन्ही पक्षाच्या संमतीने या अटीमध्ये बदल करता येतील.

## (१) करारनाम्याचा उद्देश

संबंधीत प्रकल्पातील पाण्याचा योग्य वापर करुन पिक उत्पादनामध्ये भरीव वाढ करण्याच्या दृष्टीने सिंचन व्यवस्थापनेमध्ये लाभधारकांचा सहभाग वाढविणे हा या करारनामा करण्यामागील शासनाचा मुख्य उद्देश आहे. संस्थेबाबतचे नियम व त्याचा मुख्य उद्देश खालीलप्रमाणे राहील.

**अ)** संबंधित लघु पाटबंधारे तलाव , वळवणीचा बंधारा व कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यावरील एकूण लाभक्षेत्रापैकी कमीत कमी लाभक्षेत्र **५१ टक्के** संस्थेच्या अधिकारात असले पाहीजे किंवा एकूण लाभधारकांपैकी **५१ टक्के** लाभधारक तरी संस्थेचे सभासद असले पाहीजेत.

**आ)** शासनाकडुन पाणी घेऊन ते सभासद असलेल्या अगर नसलेल्या शेतक-यांना पीक क्षेत्राच्या आकारांच्या प्रमाणात पाणी देणे. पाण्याची काटकसर करुन कृषि उत्पादन वाढविणे.

**इ)** संस्थेच्या कार्यक्षेत्रातील को.प.बंधा-यामध्ये / वळवणीच्या बंधा-यामध्ये पावसाळ्या नंतर १५ ऑक्टोबर नंतर फळया टाकणे आणि पावसाळयापूर्वी मे महीन्यात फळया काढणे. बांधकामाची देखभाल व दुरुस्ती करणे. त्यातील गवत कापणे व गाळ काढणे इत्यादि.

ई ) जल व्यवस्थापनेतील आधुनिक तंत्रज्ञान लाभधारकांना देऊन पाण्याची काटकसर करणे. योग्य पिकरचना घेऊन पिकांसाठी पाण्याचा योग्य त-हेने उपयोग करण्याचे ज्ञान पुरविणे.

याशिवाय संस्थेस वरील उदि्दष्टांना बाधा न येता जर काही वेगळी उदि्दष्टये संस्थेच्या उपविधीत ठेवावयाची असतील तर ती ठेवण्यास शासनाची हरकत नाही.

**(२) पाण्याचा हक्क**

(अ) संबंधित तलावातील / वळवणीचा बंधारा / कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यामुळे अडविलेला पाणी साठा संबंधित पाणी वापर समितीस देय ठरेल. तथापि एखादया वर्षी जलाशयामध्ये पाणी कमी उपलब्ध झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

(आ) त्या वर्षाच्या पावसाप्रमाणे साठवणारे सर्व पाणी वापरण्याचा हक्क पाणी वापर संस्थेला राहील. हे पाणी प्रकल्प नियोजनाप्रमाणे त्या त्या हंगामात म्हणजे रब्बी व उन्हाळी हंगामात वापरण्याचे अपेक्षित आहे.

(इ) एखादया सभासदाने संस्थेच्या कार्यक्षेत्रातील जमिनीची विक्री केल्यास त्यांचे सभासदत्व आपोआप रदद होईल व नविन मालक संस्थेचा सभासद होण्यास पात्र ठरेल.

(ई) पावसाळ्याचे शेवटी नदी / नाल्यास पाण्याचा प्रवाह अडविण्याकरीता संस्थेने संबंधित कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यात फळया टाकाव्या. सिंचन सुरु होण्यापुर्वी १० दिवस अगोदर संस्थेने पाणी पाळी पत्रक प्रसिध्द करावे तसेच प्रत्येक पाळी मध्ये किती व केंव्हा पाणी देणार व ते पाणी सभासदांना कसे वाटणार याचे धोरण सर्व सभासदांना कळवावे.

(उ) संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सर्व लाभधारकांना संस्थेचा सभासद होण्याचा हक्क राहील. प्रत्येक सभासदाला प्रत्येक हंगामात पाणी घेण्याचा हक्क राहील. काही सभासदांनी पाणी घेतले नाही तर ते संस्थेतील इतर सभासदांना वितरीत करण्याचा अधिकार संस्थेस राहील.

संस्थेच्या सभासदाने ठराविक पीक घेतले पाहीजे असे शासनाचे बंधन नाही. परंतु कोणत्याही परिस्थितीत जमिन पाणथळ होऊ नये म्हणुन आवश्यक ते बंधन घालण्याचा अधिकार शासनाकडे राहील व त्या दृष्टीने संस्थेच्या कार्यक्षेत्रातील जमिनीतील पाण्याची पातळी जमिनीखाली जमीनीपासून ३.०० मिटरपेक्षा जास्त वर येणार नाही. याची काळजी संस्थेने घेतली पाहीजे.

**(ए) पाण्याचा फक्त सिंचनासाठी वापर**

संस्थेस पाणी पुरवठा हा फक्त सिंचनासाठी करण्यात येईल. प्रस्तावित लाभक्षेत्र भिजत असल्यास क्षेत्र वाढविण्यास शासनाची हरकत राहणार नाही.

(ऐ) योजनेच्या अंदाजपत्रकाची व संकल्पनाची सत्यप्रत योजना हस्तांतरणाचे वेळी संस्थेस देण्यात येईल.

## (३) पाण्याचे दर व आकारणी

संस्था ठरविल त्या दरानुसार पाणी पट्टी आकारणी व वसुली लाभधारकांकडुन संस्था करेल. या प्रकल्पातील प्रकल्प अहवालानुसार ..........................स.घ.मी. पाणी सह्य असुन ............... स.घ.मी. सिंचनासाठी पाणी वापर करण्याची या करारनाम्याद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

लघु पाटबंधारे तलाव , व को.प. बंधारे , उपसा सिंचन आदि योजनांचे स्वामीत्व शुल्क म्हणुन रुपये १०००/- प्रति योजना / प्रतिवर्ष संस्थेने शासनाकडे भरावेत. साठवण तलावाकरीता ही रक्कम रुपये १०,०००/- प्रतिवर्ष / प्रति योजना राहील. तसेच अगोदरच्या वर्षी जमा झालेल्या पाणीपट्टी पैकी २० टक्के रक्कम स्थानिक शुल्क म्हणुन संस्थेने दरवर्षी शासनाकडे भरावेत.

३० जून पर्यंत संस्थेने पाणी पट्टी न भरल्यास बंधा-याच्या पाट्या शासन ताब्यात घेईल. आणि जोपर्यंत संस्था पाणी पट्टी भरणार नाही तोपर्यंत पाटया संस्थेच्या ताब्यात येणार नाही.

तलावाबाबतीत मुख्य कालव्याच्या दरवाजाचे गेट बंद करण्यात येईल. आणि जोपर्यंत देय पाणी पट्टी शासनास जमा होणार नाही. तोपर्यंत कालव्याचे दरवाजे उघडण्यात येणार नाही.

दरवर्षी बंधारा शाखा अभियंता / उपविभागीय अभियंता आणि संस्थेच्या पदाधिका-यांनी संयुक्तपणे तपासणे आवश्यक राहील. संस्थेने बंधा-याची योग्य देखभाल केली नाही असे तपासणी करणा-या अभियंत्यांच्या निदर्शनास आल्यावर एक महिन्याची लेखी सुचना संस्थेस देऊन योग्य ती दुरुस्ती करण्यास संस्थेला सांगण्यात येईल. एक महिन्यात संस्थेतर्फे दुरुस्ती करण्यात आली नाही तर करारनामा रदद करुन प्रकल्प शासनाचे ताब्यात घेण्यात येईल.

## (४) विद्युत पंप

लाभधारकांनी विद्युत पंप बसवावयाचे असल्यास संस्थेकडुन परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधन कारक राहील.

## (५) सभासदाचे हक्क

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील जमिन मालकास संस्थेचा सभासद होता येईल. संबंधित जमिनीच्या ७/१२ उता-यावर अशा शेतक-यांची नावाची नोंद असली पाहीजे. सभासदास त्यांची पाणी मागणी संस्थेकडे विहीत नमुन्यात करावी लागेल व योग्य मुदतीत संस्थेने सभासदाच्या मागणीचा विचार करुन त्यांना निर्णय कळविणे आवश्यक आहे. प्रत्येक हंगामामध्ये उपलब्ध पाण्यामधुन संस्थेच्या धोरणानुसार पाणी मिळण्याचा हक्क प्रत्येक सभासदाचा राहील. प्रत्यक्ष पाणी घेत असणा-या शेतक-यांची संख्या किंवा प्रत्यक्ष भिजणारे क्षेत्र ५१ टक्केपेक्षा कमी होणार नाही अशी पिक रचना सभासदांना मान्य करावी लागेल.

## ( ६ ) पाणीपट्टी वसूली

सभासदांना पाणीपट्टी कोणत्या दराने आकारावी हे संस्थेनेच ठरवावयाचे आहे. संस्थेचे सभासद नसलेल्या शेतक-यांकडुन संस्थेच्या सभासदापेक्षा वेगळी पाणीपट्टी वा दर ठरविण्याचा संस्थेस हक्क राहील व त्याप्रमाणे अशा बिगर सभासदांकडुन पाणी पट्टी वसुल करण्याचा संस्थेस हक्क राहील.

## ( ७ ) देखभाल व दुरुस्ती

### (अ ) देखभालीमध्ये खालील बाबींचा अंतर्भाव असेल.

१) गाळ काढून बंधारा / तलाव /कालवा व्यवस्थीत ठेवणे.

२) बांधकामे सुव्यवस्थीत ठेवणे.

३) बंधा-यात पावसाळयानंतर ( १५ ऑक्टोबर नंतर ) फळया टाकून पाणी साठा करणे.

४) बंधा-यात लावलेल्या फळया सुव्यस्थित ठेवणे.

५) हंगाम संपल्यानंतर पावसाळयापूर्वी (३० जूनपूर्वी ) फळया काढून सुस्थितीत ठेवणे.

(आ ) लाभार्थींना पाणी पंपाव्दारे घेण्याकरीता कार्यक्रम ठरविणे व त्यावर नियंत्रण व सुसूत्रिकरण ठेवणे .

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील वितरिकांची / लघु वितरीकांची व त्यावरील बांधकामाची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

## ( ८ ) लाभक्षेत्रातील विहीरीवरील सिंचन व्यवस्थापन

बंधा-यामुळे लाभक्षेत्रातील विहीरींना पाणी वाढल्यामुळे विहीरीपासून होणारे , अतिरीक्त सिंचन बंधा-यामुळे होत आहे. असे मानन्यात येऊन या अतिरीक्त क्षेत्रावर पाणीपट्टी आकारणी करण्याचा अधिकार संस्थेस राहील.

## ( ९ ) शासकीय अधिका-यांचे अधिकार

संस्थेस केल्या जात असलेल्या पाणी पुरवठ्याची व संस्थेच्या कार्यक्षेत्राची व करारनाम्याची अंमलबजावणी व्यवस्थीत होते की नाही हे तपासण्यासाठी केव्हाही पहाणी करण्याचे अधिकार संबंधित प्रकल्प अधिका-यांना आहेत.

संस्थेच्या कामकाजाची तत्पर तपासणी संबंधित अधिका-यामार्फत वर्षातून वेळोवेळी केली जाईल. अशी तपासणी अहवालाची पुर्ती करण्याची जबाबदारी संस्थेची असेल. संस्था व अधिकारी याच्यात काही प्रश्न मतभेद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय शासनाचा राहील.

## (१० ) करारनाम्याची मुदत व मानद सभासद

करारनाम्याची मुदत ......... ....................वर्षाची राहील. व त्यानुसार , करारनामा पुढे चालु ठेवावयाची की नाही हे दोन्ही पक्षाच्या सहमतीने ठरविण्यात येईल.

संस्थेच्या कार्यकारी समितीवर शासनाचा एक प्रतिनिधी पदसिध्द मानद सभासद म्हणुन असेल.

हा करारनामा दिनांक .................................. ला केला आहे.

कार्यकारी अभियंता ,
लघु पाटबंधारे (            ) विभाग

..........................

अध्यक्ष ,
..............................................
मु.............................................
ता............................................
जि............................................

## सहकारी पाणी वापर संस्था " नोंदणीसाठी मार्गदर्शक सुचना "

१) पाणी वाटपासाठी संस्थेच्या आदर्श उपनियमांत , संस्थेचे कार्यक्षेत्र , सभासदत्व , पाणीपट्टी , भरण्याची पध्दत,
बंधाऱ्याची मालकी , इत्यादी मुद्दे समाविष्ट करुन संस्थेने नोंदणी करावी.

२) सहकारी पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र हे कमीत कमी एका योजनेचे लाभक्षेत्र असावे. एकाच संस्थेकडे जवळपासच्या आणि गाव शिवेतील एक पेक्षा जास्त योजनाही व्यवस्थापनासाठी असू शकतील. प्रस्तावित
संस्थेकडे एकच योजना असल्यास लाभधारकांची संख्या ५ पेक्षा कमी नसावी. पंच किंवा त्यापेक्षा जास्त सभासदांना नोंदणीस परवानगी नसावी.

३) प्रस्तावित संस्थेच्या लाभक्षेत्रातील किमान ५१ टक्के क्षेत्राचे लाभधारक किंवा एकूण लाभधारकांपैकी ५१ टक्के
लाभधारक नोंदणी अर्जाच्या वेळी संस्थेचे सभासद असले पाहीजे. या विषयी संबंधीत कार्यकारी अभियंतानी
प्रमाणित करणे आवश्यक राहील. तसेच या क्षेत्रात एकाच खातेदाराची जमिन जरी दोन ठिकाणी असली तरी
गणना ५१ टक्के ठरवितांना एकदाच करावी.

४) नियोजीत संस्था आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल या संबंधीचे टिपण संस्थेच्या प्रवर्तकाकडून घ्यावे.

५) नोंदणीच्या वेळी सभासदांच्या सात बाराच्या खाते उता-याच्या स्वतंत्र उता-याच्या तलाठ्याच्या प्रमाणित प्रती असतात. त्यावरुन सभासदाच्या जमिनीच्या वहीवाटबारी संबंधी यादी उपविभागीय अभियंत्याने दिली तरी ती ग्राहय धरावी.

६) संस्था नोंदणीच्या वेळी जी कागदपत्रे सादर करावयाची आहे त्यांची यादी खालील प्रमाणे आहे.

**<u>सहकारी पाणी वापर संस्थेच्या नोंदणीकरीता लागणा-या कागदपत्राची यादी</u>**

१) सहाय्यक निबंधक ,सहकारी संस्था यांना पाठविणा-या पत्राचा नमूना .
२) संस्थेची नोंदणी करण्यासाठी करावयाचा अर्जाचा नमुना (नमुना अ )
३) लाभधारक सभासदांची यादी व त्यांच्या सर्वे नं. / गट नं. मधील एकुण क्षेत्राची माहीती कार्यालयाच्या दप्तर नोंदीप्रमाणे असल्याच उपविभागीय अधिकारी , पाटबंधारे उपविभाग यांचा दाखला.
४) चलन भरल्याची प्रत.
५) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निर्देशित शाखेत संस्थेच्या नावाचा शिल्लक रकमेचा दाखला.
६) संस्थेकडे एकुण जमा झालेली रक्कम , झालेला खर्च , बँकेत जमा झालेली रक्कम याबाबत मुख्य प्रवर्तकाचा दाखला
७) संस्थेच्या कार्यक्षेत्राचा नकाशा.
८) संस्थेस पाणी पुरवठा करण्यासंबंधीचा कार्यकारी अभियंता यांचा दाखला.
९) संस्था तांत्रिक दृष्टया सक्षम होईल या संबंधीचा कार्यकारी अभियंता यांचा दाखला.
१०) आर्थिक सक्षमतेबाबत संस्थेचे टिपण.
११) उपविधींच्या चार प्रती.
१२) संस्थेचे प्रवर्तक वेगवेगळ्या कुटुंबातील असल्याचा मुख्य प्रवर्तक यांचा दाखला.

(टिप :- वरीलपैकी फक्त उपविधींच्या ४ प्रती व अन्य कागदपत्राच्या दोन प्रती जोडणे आवश्यक आहे. )

वाढविलेले आहे. क्षेत्रिय यंत्रणेमार्फत निधी उपलब्ध नसतांना पूर्ण करण्यात आलेल्या कामांची देयके अदा करण्यासाठी व अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी शासनाकडे निधीची सातत्याने मागणी करण्यात येत आहे. नवीन कामे हाती घेण्यापूर्वी निधी उपलब्धतेची खात्री करुन व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ यांची पूर्व संमती घेऊनच कामे सुरु करावीत, असे स्पष्ट आदेश आहेत. असे असतांनादेखील काही कार्यकारी अभियंत्यांनी या आदेशाकडे दुर्लक्ष करुन फार मोठया प्रमाणावर कामे हाती घेऊन ती पूर्ण केली आहेत. त्यामुळे शासनावर नाहक दायित्व वाढविले असून शासनाच्या आदेशांकडे दुर्लक्ष केले आहे, ही बाब गंभीर स्वरुपाची अनियमितता आहे.

वरील परिस्थितीच्या संदर्भात शासनाने यापूर्वी दिलेल्या सूचनांचा खालीलप्रमाणे पुनरुच्चार करण्यात येत असून, वित्तीय अनियमिततेच्या अशा बाबी भविष्यात पुन्हा उद्‌भवू नयेत म्हणून काही नवीन सूचनाही शासनामार्फत खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत :-

१. जिल्हा परिषदा ही स्वायत्त संस्था असून, ०-१०० हेक्टर क्षमतेच्या लघुपाटबंधारे योजनांसाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळ, जेवढा निधी उपलब्ध करुन देते त्याच्या अधीन राहूनच लघु पाटबंधारे योजनांची निवड करणे आवश्यक असून, निधीचे योग्य प्रकारे नियोजन होईल, याची काळजी घ्यावी. **जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून उपलब्ध होणा-या निधीची वापर जिल्हा परिषदेमार्फत आतापर्यंत पूर्ण केलेल्या योजनांची/कामांची देयके अदा करण्यासाठी करावा. अशी देयके अदा केल्यानंतर जर निधी शिल्लक राहिला तर तो निधी अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी प्रथमतः वापरावा.कोणत्याही परिस्थितीमध्ये अपूर्ण कामे पूर्ण केल्याशिवाय नवीन कामे सुरु करु नयेत. निधी उपलब्ध नसताना नवीन कामे सुरु करुन शासनावरील दायित्व वाढवू नये. तसेच अशाप्रकारे दायित्व वाढविल्याचे निदर्शनास आल्यास, त्याची गंभीर दखल घेवून संबंधीतांना व्यक्तीशः जबाबदार धरुन त्यांच्यावर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.**

२. लघु पाटबंधारे विभागाच्या स्थानिक स्तर यंत्रणेने जिल्हा परिषदांकडून निधीच्या उपलब्धतेशिवाय ठेव कामे स्वीकारु नयेत. तसेच ०-१०० हे. सिंचन क्षमतेच्या आतील कामांसाठी अन्य स्त्रोतामधून प्रत्यक्षात निधी उपलब्ध असल्याशिवाय व शासनाच्या मान्यतेशिवाय अशी कामे सुरु करु नयेत.

३. लघु पाटबंधारे प्रकल्पांतून सिंचनासाठी पुरविलेल्या पाण्यापासून पाटबंधारे विभागाने ठरवून दिलेल्या पाणीपट्टीनुसार संबंधीत लाभधारकांकडून वसुली करणे आवश्यक आहे. तथापि, पाणीपट्टी वसुली अपेक्षेप्रमाणे होत नाही. पाणीपट्टी वसुलीतून मुख्यतः देखभाल व दुरुस्तीचा खर्च करावयाचा असल्याने वसुली प्राथम्याने करण्यात यावी व त्यातूनच देखभाल दुरुस्तीचा खर्च भागवावा.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची सर्व क्षेत्रीय अधिका-यांनी दक्षता घ्यावी, यातील सूचनांचे पालन न करणा-या अधिका-याविषयी गंभीर दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील
० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या
लघुपाटबंधारे योजनांना प्रशासकीय
मान्यता प्रदान करुन अंमलबजावणी
करणेबाबतचे नियोजन.

(परिशिष्ट ७.३)

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक लपायो-२००८/प्र.क्र.१५३/जल-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३० जून, २००८.

**वाचा** - १) शासन परिपत्रक क्रमांक लपायो-२०००/प्र.क्र.-१०४/जल-१, दिनांक १४-९-२००१.
२)शासन परिपत्रक क्रमांक पंरास-१००१/प्र.क्र.-२९०/जल-३, दिनांक १-१०-२००१
३)शासन निर्णय क्रमांक लपायो-२००१/प्र.क्र.-१०४/जल-१, दिनांक १-१-२००२.
४) शासन पत्र क्रमांक लपायो-२००१/प्र.क्र.-१०४/जल-१, दिनांक २१-१-२००३.

**प्रस्तावना**

जिल्हा परिषदांमार्फत ०-१०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघुपाटबंधारे योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देऊन त्यांची अंमलबजावणी करण्यात येते. अशा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे व त्यांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेस आहेत. जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या योजनांसाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून आवश्यक ती तरतूद करण्यात येते. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदांनी आतापर्यंत फार मोठया प्रमाणावर योजनांची अंमलबजावणी केली आहे.

२. जिल्हा परिषदांकडील अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करुन नंतर वित्तीय तरतूदीच्या उपलब्धतेनुसार नवीन योजना हाती घेण्यात याव्यात, अशा सूचना वरील परिपत्रकान्वये जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत. तसेच नवीन काम हाती घेण्यापूर्वी निधी उपलब्धतेची खात्री करुन व अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) यांची पूर्वसंमती घेऊनच नवीन कामे सुरु करण्यात यावीत. त्याचप्रमाणे लघुपाटबंधारे योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी लाभधारकांची पाणी वापर संस्था स्थापन करणे. अशा संस्थांकडे लघुपाटबंधारे योजनांचे हस्तांतरण करणे व पाणीपट्टी वसूल करुन, योजनांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत जातीने लक्ष द्यावे, अशाही सूचना दिनांक १-१-२००२ च्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या होत्या.

३. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषदा व स्थानिक स्तर यंत्रणेकडील क्षेत्रिय अधिका-यांनी त्यांच्याकडे निधी उपलब्ध नसताना किंवा शासनाकडे भविष्यात निधी उपलब्ध होणार असल्याबाबतचे काही कळविलेले नसतांना फार मोठया प्रमाणावर १०० हेक्टरच्या आतील कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देऊन अशी कामे सुरु केली आहेत. त्यातील बरीचशी कामे पूर्ण झाली असून काही कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे, निधीची उपलब्धता विचारात न घेता, अशा प्रकारे नवीन कामे सुरु करुन शासनावर नाहक आर्थिक दायित्व

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००८०६३०१५४७३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दिलीप शिंदे )
शासनाचे उप सचिव.

प्रति,

- मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर), महाराष्ट्र राज्य, पुणे-६.
- अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
- कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद सर्व,
- कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग सर्व,
- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
- मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
- उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
- जिल्हा लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व)
- ग्रा.वि. व ज.सं. वि. का.क्र. जल-२, जल-३ , जल-४, जल-११, जल-१९ व जल-२२
- निवड नस्ती-जल-१.

# परिशिष्ट (ब)

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०१७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जळगांव**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा**

श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**जिल्हा परिषद पदाधिकारी :-**

(१) श्रीमती उज्वला पाटील, अध्यक्षा, जि.प.जळगांव

(२) श्री. नंदकिशोर भागवत महाजन, उपाध्यक्ष, जि.प.जळगांव

(३) श्रीमती माधुरी नेमाडे, सभापती, पंचायत समिती, रावेर

(४) श्री. सुभाष पाटील, सभापती, पंचायत समिती, पाचोरा

(५) श्री. प्रभाकर गोडू सोनवणे, सभापती, समाजकल्याण, जि.प. जळगांव

(६) श्री. दिलीप पाटील, सभापती, आरोग्य समिती, जि.प.जळगांव

(७) श्री. पोपट भोळे, सभापती, शिक्षण, क्रीडा व अर्थ विभाग, जि.प.जळगांव

(८) श्री. प्रतापराव पाटील, सदस्य, जि.प.जळगांव

(९) श्री. नानाभाऊ महाजन, सदस्य, जि.प.जळगांव

(१०) श्री. रविंद्र पाटील, सदस्य, जि.प.जळगांव

(११) श्रीमती पल्लवी सावकारे, सदस्य, जि.प.जळगांव

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. अ.रा.आठल्ये, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, जळगांव :**

(१) श्री. कौस्तुभ दिवेगांवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. संजय मस्कर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

(४) श्री. राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता

(५) श्री. विक्रांत बगाडे, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए.

(६) श्री. नरेंद्र महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(७) डॉ. अनिता राठोड, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(८) श्री. बाळासाहेब बोटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग

(९) डॉ. वर्षा फडोळ, सहाय्यक आयुक्त, नाशिक विभाग

(१०) श्री. रफिक तडवी, महिला व बालविकास अधिकारी

(११) डॉ. प्रकाश इंगळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१२) श्री. मधुकर चौधरी, कृषि विकास अधिकारी

(१३) डॉ. कमलापूरकर बी. एस., जिल्हा आरोग्य अधिकारी

(१४) श्री. महाजन पंडित, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१५) श्री. बी.जे.पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१६) सौ. सुनंदा नरवाडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१७) श्री. राजन नाईक, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

(१८) श्री. प्रदीप कापडणीस, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग

(१९) श्री. ए.बी.जोशी, गटविकास अधिकारी, जामनेर

(२०) श्री. डी.आर.लोखंडे, गटविकास अधिकारी, मुक्ताईनगर

(२१) सौ. दिपाली कोतवाल, गटविकास अधिकारी, भडगांव

(२२) सौ. स्नेहा कुडचे, गटविकास अधिकारी, एरंडोल

(२३) सौ. सोनिया नाकाडे, गटविकास अधिकारी, रावेर

(२४) श्री. गणेश चौधरी, गटविकास अधिकारी, पाचोरा

(२५) श्री. अशोक पटाईत, गटविकास अधिकारी, अंमळनेर

(२६) श्री. एस.बी.मावळे, गटविकास अधिकारी, भुसावळ

(२७) श्री. वाय.पी.सपकाळे, गटविकास अधिकारी, यावल

(२८) श्री. एस.डी.जाधव, गटविकास अधिकारी, धरणगांव

(२९) श्री. अशोक बावस्कर, प्रभारी गटविकास अधिकारी, बोदवड

(३०) श्री. अशोक आर.दांडगे, गटविकास अधिकारी, चोपडा

(३१) श्री. आर.के. गिरासे, गटविकास अधिकारी, पारोळा

(३२) श्री. अजितसिंग पवार, प्रभारी गटविकास अधिकारी, चाळीसगांव

(३३) डॉ. मंजुश्री गायकवाड, प्रभारी गटविकास अधिकारी, जळगांव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जळगांव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील जळगांव जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०१७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जळगांव**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(८) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(११) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(३) श्री. ह.वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्री. अ. रा. आठल्ये, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, जळगांव :**

(१) श्री. कौस्तुभ दिवेगांवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. संजय मस्कर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. विक्रांत बगाडे, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए.
(४) श्री. ए. बी. जोशी, गटविकास अधिकारी, जामनेर
(५) श्री. डी. आर. लोखंडे, गटविकास अधिकारी, मुक्ताईनगर
(६) सौ. दिपाली कोतवाल, गटविकास अधिकारी, भडगांव
(७) सौ. स्नेहा कुडचे, गटविकास अधिकारी, एरंडोल
(८) सौ. सोनिया नाकाडे, गटविकास अधिकारी, रावेर

(९) श्री.गणेश चौधरी, गटविकास अधिकारी, पाचोरा

(१०) श्री.अशोक पटाईत, गटविकास अधिकारी, अंमळनेर

(११) श्री.एस.बी.मावळे, गटविकास अधिकारी, भुसावळ

(१२) श्री.वाय.पी.सपकाळे, गटविकास अधिकारी, यावल

(१३) श्री.एस.डी.जाधव, गटविकास अधिकारी, धरणगांव

(१४) श्री.अशोक बावस्कर, प्रभारी गटविकास अधिकारी, बोदवड

(१५) श्री.अशोक आर.दांडगे, गटविकास अधिकारी, चोपडा

(१६) श्री.आर.के. गिरासे, गटविकास अधिकारी, पारोळा

(१७) श्री. अजितसिंग पवार, प्रभारी गटविकास अधिकारी, चाळीसगांव

(१८) डॉ. मंजुश्री गायकवाड, प्रभारी गटविकास अधिकारी, जळगांव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जळगांव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात जळगांव जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०१७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जळगांव**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

(३) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा**

श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. अ.रा.आठल्ये, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, जळगांव**

(१) श्री. कौस्तुभ दिवेगांवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. संजय मस्कर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

(४) श्री. राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता

(५) श्री. विक्रांत बगाडे, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए.

(६) श्री. नरेंद्र महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(शा.म.मु.) एचबी ४८५—९ (४५०-६-२०१९)

(७) डॉ.अनिता राठोड, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(८) श्री.बाळासाहेब बोटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग

(९) डॉ.वर्षा फडोळ, सहायक आयुक्त, नाशिक विभाग

(१०) श्री.रफिक तडवी, महिला व बालविकास अधिकारी

(११) डॉ.प्रकाश इंगळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१२) श्री.मधुकर चौधरी, कृषि विकास अधिकारी

(१३) डॉ.कमलापूरकर बी. एस., जिल्हा आरोग्य अधिकारी

(१४) श्री.महाजन पंडित, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१५) श्री. बी.जे.पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१६) सौ.सुनंदा नरवाडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१७) श्री.राजन नाईक, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

(१८) श्री.प्रदीप कापडणीस, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग

(१९) श्री.ए.बी.जोशी, गटविकास अधिकारी, जामनेर

(२०) श्री.डी.आर.लोखंडे, गटविकास अधिकारी, मुक्ताईनगर

(२१) सौ.दिपाली कोतवाह, गटविकास अधिकारी, भडगांव

(२२) सौ.स्नेहा कुडचे, गटविकास अधिकारी, एरंडोल

(२३) सौ.सोनिया नाकाडे, गटविकास अधिकारी, रावेर

(२४) श्री.गणेश चौधरी, गटविकास अधिकारी, पाचोरा

(२५) श्री.अशोक पटाईत, गटविकास अधिकारी, अंमळनेर

(२६) श्री.एस.बी.मावळे, गटविकास अधिकारी, भुसावळ

(२७) श्री.वाय.पी.सपकाळे, गटविकास अधिकारी, यावल

(२८) श्री.एस.डी.जाधव, गटविकास अधिकारी, धरणगांव

(२९) श्री.अशोक बावस्कर, प्रभारी गटविकास अधिकारी, बोदवड

(३०) श्री.अशोक आर.दांडगे, गटविकास अधिकारी, चोपडा

(३१) श्री.आर.के. गिरासे, गटविकास अधिकारी, पारोळा

(३२) श्री.अजितसिंग पवार, प्रभारी गटविकास अधिकारी, चाळीसगांव

(३३) डॉ.मंजुश्री गायकवाड, प्रभारी गटविकास अधिकारी, जळगांव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जळगांव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील जळगांव जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी ८२५—२० (४५०-६-२०१९)

**मंगळवार, दिनांक २८ ऑगस्ट २०१८**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(८) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,

**मंत्रालयीन विभागीय सचिव :**

(१) श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) श्री.विजय कुमार, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग

(४) श्री.अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग

(५) श्री.असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्री.विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

(७) श्री.संजीव कुमार, संचालक, महावितरण मंडळ

(८) श्री.एन.व्ही.शिंदे, मुख्य अभियंता व प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे प्रतिनिधी

(९) श्री.सी.आर.गजभिये, मुख्य अभियंता व विकास (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(१०) श्री.दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(११) श्री.र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१२) डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१३) श्री.ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग

(१४) श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१५) श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१६) श्री.किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग

(१७) श्री.खा.म.नानद, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१८) श्री.विजयकुमार कलवले, सह संचालक, जलसंधारण विभाग

(१९) श्रीमती सु.प्र.आहिरराव, सहाय्यक संचालक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**जिल्हा परिषद, जळगांव :**

(१) श्री.शिवाजी दिवेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(२) श्री.संजय मस्कर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(३) श्री.पी.एस.अक्काडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, जळगांव

(४) श्री.नरेंद्र महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(५) श्री.भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जळगांव

(६) डॉ.अनिता राठोड, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(७) श्री.सुनंद नरवाडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, जळगांव

(८) श्री.आर.के.नाईक, कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव

(९) श्री.प्रविण मुंढे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

**स**न २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, प्रधान सचिव, गृह विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, संचालक, महावितरण मंडळ, मुख्य अभियंता व प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे प्रतिनिधी, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, कृषी विभाग, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, मुख्य अभियंता व विकास (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग), सह संचालक, जलसंधारण विभाग, सहाय्यक संचालक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगांव यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ३० जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(२) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(३) श्री. आर.व्ही.पानसे, सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग

(४) श्री. ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग

(५) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, जळगांव**

(१) डॉ. बी.एन.पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(२) श्री. संजय मस्कर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(३) श्री. बी.एस.अककाडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, जळगांव

(४) श्री. रफिक तडवी, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(५) श्री. बी.ए.बोटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जळगांव

(६) श्री. आर.के.नाईक, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन), जिल्हा परिषद, जळगांव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगांव यांची उर्वरित साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ११ जून २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री.सुनिल भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री.असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री.म.र.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(३) श्री.कि.शा.परब, उप सचिव, जलसंपदा विभाग

(४) श्री.वि.वि.बेंद्रे, अवर सचिव, जलसंपदा विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक :**

श्री.आर.आर.माने, विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, नाशिक

**जिल्हा परिषद, जळगांव :**

(१) डॉ.बी.एन.पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(२) श्री.वि.एस.अककाडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(३) श्री.एस.आर.येवले, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, उप सचिव, जलसंपदा विभाग, अवर सचिव, जलसंपदा विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगांव यांची उर्वरित साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २७ जून २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(३) डॉ.देवराव होळी, वि.स.स.

(४) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.

(५) श्री.किशोर पाटील, वि.स.स.

(६) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.

(७) श्री.भारत भालके, वि.स.स.

(८) श्री.राहुल मोटे, वि.स.स.

(९) श्री.प्रविण दरेकर, वि.प.स.

(१०) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.

(१२) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

(१) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(३) श्री.किशोर दराडे, वि.प.स.

(४) श्री.निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

श्री.नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत बत्तीसाव्या व तेहतीसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई